# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

सभा क्र.०९/ २०१५ — दिनांक २४.०६.२०१५

स्थळ- साईनिवास अतिथीगृह, शिर्डी — वेळ- दुपारी ०४.०० वाजता

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सर्वसाधारण सभा बुधवार दिनांक २४.०६.२०१५ रोजी दुपारी ०४.०० वाजता साईनिवास अतिथीगृह, शिर्डी येथे आयोजित करण्यात आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस/ वशी-०४/ १४६८/ २०१५, दिनांक २३/०६/२०१५ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार सदरहू सभा बुधवार दिनांक २४.०६.२०१५ रोजी दुपारी ०४.०० वाजता साईनिवास अतिथीगृह, शिर्डी येथे मा.अध्यक्ष श्री.विनय जोशी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा.सदस्य उपस्थित होते.

०१. मा.श्री. विनय जोशी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर, अध्यक्ष
०२. मा.श्री.अनिल कवडे, जिल्हाधिकारी, अहमदनगर, सदस्य
०३. मा.श्री.राजेंद्र जाधव, कार्यकारी अधिकारी, सदस्य

सभेच्या सुरुवातीस श्री साईबाबांची प्रार्थना करणेत येऊन, मा.अध्यक्ष श्री.विनय जोशी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सभेचे कामकाज सुरु करण्यात आले.

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.

विषय नं.०१ **दिनांक २८.०५.२०१५ रोजी अहमदनगर येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

निर्णय क्र.१६१ दिनांक २८.०५.२०१५ रोजी अहमदनगर येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविणेत आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करणेत आले.

---

विषय नं.०२ **दिनांक १६.०६.२०१५ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

निर्णय क्र.१६२ दिनांक १६.०६.२०१५ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या. त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील शिफारशींना पुष्टी देण्यात आली.

०१ **निरुपयोगी भंगार/ सादिल स्वरुपाचे साहित्य विक्री करणेकामी मागविण्यात आलेली दरपत्रके (बंद कोटेशन) उघडणेबाबत.**

संस्थानच्या इतर विभागाकडील दैनंदिन वापरामुळे जमा होणारे निरूपयोगी सादिल स्वरूपाचे भंगार साहित्य सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात वार्षिक कोटेशनचे उच्चत्तम दराने विक्री करणेसाठी उपरोक्त संदर्भ क्र.०३ चे मंजूरीनुसार वर्तमानपत्रात जाहीरात देवून स्थानिक परिसरातील व्यापा-यांकडून बंद पाकीटात दरपत्रके मागविण्यात आलेली आहे. याकामी मुदतीत फक्त ०७ व्यापा-यांनी दरपत्रके भरून दिलेली/पाठविलेली आहेत. आलेल्या दरपत्रकांचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.नं. | व्यापा-यांचे नांव | गांव | मो.नं. | प्रशासन शाखा आवक क्रमांक | दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री सय्यद शफीक समा | कोपरगांव | ९८९०६५४७९४ | २८०१ | ११/०५/२०१५ |
| ०२ | मे.या सलाम ट्रेडर्स | श्रीरामपूर | - | २८४० | ११/०५/२०१५ |
| ०३ | मे न्यु इंडिया सक्रॅप सेंटर | कोपरगांव | ९८५०८८१२१८ | २८४२ | ११/०५/२०१५ |
| ०४ | श्री अकबरखॉं सांडेखॉं पठाण | कोपरगांव | ९८९०१४५७६८ | २८४३ | ११/०५/२०१५ |
| ०५ | श्री कांती देवजी परमार | सटाणा | ९८६०८८६२४९ | २८४४ | ११/०५/२०१५ |
| ०६ | मे.अे.पी.ट्रेडींग कंपनी | श्रीरामपूर | ९७६५९२४७८६ | २८४५ | ११/०५/२०१५ |
| ०७ | मे.जलाराम ट्रेडींग कंपनी | कोपरगांव | ९३२६१८१८१८ | २८४६ | ११/०५/२०१५ |
| ०८ | मे.तुलसीदास वेलजी & कंपनी | कोपरगांव | ९४२२२२३२१८ | २८७६ | १२/०५/२०१५ |

**मागणी:-**

**अ)** उपरोक्त अ.नं.०१ ते ०७ दरपत्रके मुदतीत प्राप्त झालेली आहेत व अ.नं.०८ हे एक दिवस उशिराने प्राप्त झाले आहे. तरी अ.नं.०१ ते ०७ दरपत्रक आपले समक्ष उघडणेस तसेच उशिराने प्राप्त झालेले दरपत्रक स्विकारून आपले समक्ष उघडणेस मान्यता असावी.

**ब)** ज्या व्यापा-यांचे विशिष्ट वस्तूंचे दर समान असतील त्या दराबाबत संबंधीत व्यापा-यांशी वाढीव दराबाबत चर्चा/ वाटाघाटी करणेकामी संबंधित व्यापा-यांना मा.उपसमिती सभेसमोर समक्ष बोलविता येईल व अंतीम दरनिश्चिती करता येईल.

उपरोक्त प्रमाणे प्राप्त दरपत्रके मा.उपसमितीचे सभेसमोर समक्ष उघडणेसाठी सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात संस्थानमधील निरुपयोगी भंगार/ सादिल स्वरुपाच्या साहित्यांची उच्चतम दराने विक्री करणेकामी मागविण्यात आलेली दरपत्रके आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित दरपत्रकधारकांसमक्ष उघडणेत आले. या दरपत्रकांमधील मुळ दरांचा तुलनात्मक तक्ता तयार करणेत येऊन, कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने उच्चतम दरधारकास संबंधीत साहित्यांसाठी कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, अभिलेख कक्ष)

---

०२ **श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये प्रस्तावित आर्थो आय.सी.सी.यु. विभागास ए.सी. खरेदी करणेकामी प्राप्त झालेले टेंडर्स उघडून निर्णय होणेबाबत.**

श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये उपचार घेणाऱ्या रुग्णांच्या संख्येत व आय.सी.सी.यु. मध्ये दाखल होणाऱ्या रुग्णांच्या संख्येत वाढ झाली आहे. यामुळे आय.सी.सी.यु. मध्ये रुग्णांना ठेवण्यात बेड अपुरे पडत असल्याने, अत्यव्यस्थ्, अपघात झालेले रुग्ण्, हार्ट अॅटक इत्यादी सिरीयस रुग्णांना बेड मिळत नसल्यामुळे, रुग्णांना बाहेरील रुग्णालयात रेफर करावे लागते. त्यासाठी न्युरो ओटीमधील रिकव्हरी रुमचा तसेच आर्थोमधील रिकव्हरी व मायनर ओटी हे दोन्ही भाग एकत्र करुन तेथे 10 ते 12 बेडचा आय.सी.सी.यु. वॉर्ड तयार करणेस मा. व्यवस्थापन समितीच्या दिनांक 12/06/2014 चे सभेतील निर्णय क्र. 525 अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे तसेच मा. व्यवस्थापन समिती दिनांक 30/01/2015 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 2/18 नुसार व्होल्टास / ब्लु-स्टार कंपनीचे 2 टन क्षमतेचे 5 नग ए.सी. खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्क् म रुपये 2,25,000/- मात्रचे खर्चास मान्यता मिळाली आहे.

त्यानुसार टेंडर विक्रीसाठी दिनांक 7/05/2015 रोजी दैनिक सार्वमत वर्तमानपत्रात जाहीरात देण्यात आली होती. टेंडरची विक्री दिनांक 08/05/2015 ते 14/05/2015 अशी होती. टेंडर विकत घेणाऱ्याची यादी खालीलप्रमाणे :

| अ.नं. | टेंडरधारकाचे नांव | अ.नं. | टेंडरधारकाचे नांव |
|---|---|---|---|
| 1. | श्री जी.एम. रेफ्रिजरेशन अॅन्ड एअरकंडीशनींग, पुणे | 3. | एअरकुल, पुणे |
| 2. | श्री व्यंकटेश्वरा टंकी प्रोजेक्ट प्रा.लि. पुणे | | |

वरीलप्रमाणे एकूण 3 टेंडरधारकांनी टेंडर विकत घेतले होते. टेंडर सबमिशन तारीख 19/05/2015 अशी होती. त्यानुसार मुदतीत खालीलप्रमाणे 3 टेंडर्स प्राप्त् झाले आहेत.

| अ.नं. | टेंडरधारकाचे नांव | अ.नं. | टेंडरधारकाचे नांव |
|---|---|---|---|
| 1. | श्री जी.एम. रेफ्रिजरेशन अॅन्ड एअरकंडीशनींग, पुणे | 3. | एअरकुल, पुणे |
| 2. | श्री व्यंकटेश्वरा टंकी प्रोजेक्ट प्रा.लि. पुणे | | |

उपरोक्तप्रमाणे साईबाबा हॉस्पीटलमध्ये प्रस्तावित आर्थो आय.सी.सी.यु. विभागासाठी 05 एसी खरेदी करुन बसविणेकामी प्राप्त् झालेले ०३ टेंडर्स आजचे उपसमिती सभेसमोर उपस्थित टेंडरधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | टेंडरधारकाचे नांव | टेंडरमधील मुळ दर रु. |
|---|---|---|
| 1. | श्री जी.एम. रेफ्रिजरेशन अॅन्ड एअरकंडीशनींग, पुणे | २,९१,१७०/- |
| 2. | श्री व्यंकटेश्वरा टंकी प्रोजेक्ट प्रा.लि., पुणे | २,८५,९९५/- |
| 3. | एअरकुल, पुणे | ३,१७,६२५/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलमधील प्रस्तावित आर्थो आय.सी.सी.यु. विभागामध्ये ०५ नग ए.सी. खरेदी करुन बसविणेकामी श्री व्यंकटेश्वरा टंकी प्रोजेक्ट प्रा.लि., पुणे यांचे एकत्रित रु.२,८५,९९५/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

०३ **समाधी मंदिर व दर्शनरांगेतील इमर्जन्सी लाईटकरीता युपीएस व बॅट-या खरेदी करणेकामी प्राप्त झालेली टेंडर्स उघडून निर्णय होणेबाबत.**

मा.त्रीसदस्य समितीचे दिनांक १८-०२-२०१५ चे सभेतील विषय नं.०२ निर्णय क्र.३० (१९) अन्वये समाधी मंदिर व दर्शनरांगेतील इर्मजन्सी लाईटकरीता युपीएस व बॅट-या खरेदी करणेकामी येणा-या खर्चास, कामास व वर्तमानपत्रात जाहिरात देऊन तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन टेंडर मागविणेकामी येणारे रक्कम रुपये २,४५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळाली होती.

त्यानुसार टेंडर विक्रीसाठी दि.२७-०४-२०१५ रोजी दै.सार्वमत,अहमदनगर या वर्तमान पत्रात तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात देण्यात आलेली होती. टेंडर विक्रीची तारीख दि.२८-०४-२०१५ ते दि.११-०५-२०१५ अखेर ठेवण्यात आलेली होती. व टेंडर जमा करण्याची शेवटची तारीख दि.१३-०५-२०१५ अशी देण्यात आलेली होती. त्यानुसार ०४ टेंडरची विक्री झालेली असून सिलबंद टेंडर जमा करणेचे मुदतीत खालीलप्रमाणे चार टेंडर प्राप्त् झाले आहेत. जमा झालेल्या टेंडरचा तपशील खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | टेंडरधारकाचे नांव |
| --- | --- |
| ०१) | मे.गुरु इंजिनिअरींग ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स, नाशिक |
| ०२) | मे.साई ऑटो बॅटरी सर्व्हीस, शिर्डी |
| ०३) | मे.तेजस इलेक्ट्रॉनिक्स, अहमदनगर |
| ०४) | मे.श्री साईश्रद्धा इलेक्ट्रीकल्स्, नाशिक |

उपरोक्तप्रमाणे समाधी मंदिर व दर्शनरांगेतील इर्मजन्सी लाईटकरीता युपीएस व बॅट-या खरेदी करणेकामी प्राप्त झालेली ०४ टेंडर आजचे उपसमिती सभेसमोर उपस्थित टेंडरधारकासमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.क्र. | टेंडरधारकाचे नांव | टेंडरमधील मुळ दर रु. |
| --- | --- | --- |
| ०१) | मे.गुरु इंजिनिअरींग ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स, नाशिक | २,४०,१००/- |
| ०२) | मे.साई ऑटो बॅटरी सर्व्हीस, शिर्डी | २,१३,१५०/- |
| ०३) | मे.तेजस इलेक्ट्रॉनिक्स, अहमदनगर | २,५७,२५०/- |
| ०४) | मे.श्री साईश्रद्धा इलेक्ट्रीकल्स्, नाशिक | २,५६,०२५/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, समाधी मंदिर व दर्शनरांगेतील इमर्जन्सी लाईटकरीता युपीएस व बॅट-या खरेदी करणेकामी मे.साई ऑटो बॅटरी सर्व्हीस, शिर्डी यांचे रु.२,१३,१५०/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

०४ **श्री साईबाबा हॉस्पिटलमधील ऑर्थो तसेच न्युरो ऑपरेशन थिएटरचे रिकव्हरी युनिटचे वायरींग काम करणेकामी प्राप्त झालेली टेंडर्स उघडून निर्णय होणेबाबत.**

मा.त्रीसदस्य समितीचे दिनांक ३०-०१-२०१५ चे सभेतील विषय नं.०३ निर्णय क्र.०३ (२०) अन्वये श्री साईबाबा हॉस्पीटलमधील ऑर्थो तसेच न्युरो ऑपरेशन थिएटरचे रिकव्हरी युनिटचे वायरींग काम करणेकामी येणा-या खर्चास, कामास व वर्तमानपत्रात जाहिरात देऊन तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन टेंडर मागविणेकामी येणारे रक्कम रुपये २,५७,५१०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळाली होती.

त्यानुसार टेंडर विक्रीसाठी दि.२७-०४-२०१५ रोजी दै.सार्वमत,अहमदनगर या वर्तमान पत्रात तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात देण्यात आलेली होती. टेंडर विक्रीची तारीख दि.२८-०४-२०१५ ते दि.११-०५-२०१५ अखेर ठेवण्यात आलेली होती. व टेंडर जमा करण्याची शेवटची तारीख दि.१३-०५-२०१५ अशी देण्यात आलेली होती. त्यानुसार ०५ टेंडरची विक्री झालेली असून सिलबंद टेंडर जमा करणेचे मुदतीत खालीलप्रमाणे चार टेंडर प्राप्त झाले आहेत. जमा झालेल्या टेंडरचा तपशील खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | टेंडरधारकाचे नांव |
| --- | --- |
| ०१) | मे.गिरीराज ट्रेडर्स, संगमनेर |
| ०२) | मे.गुरु इंजिनिअरींग ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर, नाशिक |
| ०३) | मे.श्री साईश्रद्धा इलेक्ट्रीकल्स्, नाशिक |
| ०४) | मे.जाधव इलेक्ट्रीकल्स्, कोपरगांव |

उपरोक्तप्रमाणे श्री साईबाबा हॉस्पीटलमधील ऑर्थो तसेच न्युरो ऑपरेशन थिएटरचे रिकव्हरी युनिटचे वायरींग काम करणेकामी प्राप्त झालेली ०४ टेंडर्स आजचे उपसमिती सभेसमोर उपस्थित टेंडरधारकासमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.क्र. | टेंडरधारकाचे नांव | टेंडरमधील मुळ दर रु. |
| --- | --- | --- |
| ०१) | मे.गिरीराज ट्रेडर्स, संगमनेर | २,३९,४८४/- |
| ०२) | मे.गुरु इंजिनिअरींग ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर, नाशिक | २,४७,३१३/- |
| ०३) | मे.श्री साईश्रद्धा इलेक्ट्रीकल्स्, नाशिक | २,४४,६३५/- |
| ०४) | मे.जाधव इलेक्ट्रीकल्स्, कोपरगांव | २,३६,२१०/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलमधील ऑर्थो तसेच न्युरो ऑपरेशन थिएटरचे रिकव्हरी युनिटचे वायरींग काम करणेकामी मे.जाधव इलेक्ट्रीकल्स्, कोपरगांव यांचे रु.२,३६,२१०/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

०५ **श्री साईनाथ रुग्णालयातील क्ष-किरण विभागाकरिता Fuji कंपनीच्या C.R. System Cassettes with screen खरेदी करणेकामी प्राप्त तांत्रिक निविदा उघडून मिळणेबाबत.**

श्री साईनाथ रुग्णालयातील क्ष-किरण विभागाने दि. १६/०८/२०१४ रोजीचे मागणीपत्रान्वये (औषध भांडार विभाग प्राप्त दि. २५/०८/२०१४) Fuji कंपनीच्या 10"x12", 14"x17" व 8"x10" प्रत्येकी २ नग C.R. System Cassettes with screen ची मागणी केलेली आहे. सदर मशिन सन २०१३ या वर्षी देणगी म्हणून प्राप्त झालेले होते

व कंपनीने त्याचे सोबत Cassettes with screen ह्या मोफत दिलेल्या होत्या, परंतु दैनंदिन वापराचे प्रमाण जास्त असल्यामुळे त्या वापरुन खराब झालेल्या आहेत.

सदर विभागात दर वर्षी साधारणतः २५,००० फोटो काढले जातात, त्यामुळे कॅसेट लवकर खराब होतात. श्री साईनाथ रुग्णालयात Fuji कंपनीचे मशिन असुन त्यासाठी त्याच कंपनीच्या कॅसेट स्क्रिनसह लागतात. त्यामुळे त्यांनी नवीन Cassettes ची मागणी केलेली आहे. सदरहू Cassettes खरेदीकामी Fuji कंपनीचे अधिकृत विक्रेते M/s. Nirmal Agencies, Ahmednagar यांचेकडून ई-मेल द्वारे दरपत्रक मागविण्यात आले होते, त्यांचे दरानुसार सदरचे खरेदीकामी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| Sr. No. | Particular | Rate Per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|
| 01. | 14x17 Cassettes with screen | 1,01,250.00 | 2,02,500.00 |
| 02. | 10x12 Cassettes with screen | 95,625.00 | 1,91,250.00 |
| 03. | 8x10 Cassettes with screen | 90,000.00 | 1,80,000.00 |
| | | **Total Amt. in Rs.** | **5,73,750.00** |

उपरोक्त साहित्य खरेदीकामी अंदाजे रक्कम रु. ५,७३,७५०/- इतका खर्च अपेक्षित आहे.

दि.२०/११/२०१४ निर्णय क्र. १०१० अन्वये मा.त्रिसदस्य समिती सभेत सदरहू CR System Cassettes with screen विहीत पद्धतीने निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे खर्च रु. ५,७३,७५०/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार सदरचे खरेदीस जास्तीत जास्त प्रतीसाद मिळणेकामी सदरची जाहिरात फ्री - प्रेस जरनल - मुंबई, दिव्य मराठी - नाशिक, दै. पुण्यनगरी – पुणे, सामना औरंगाबाद या वर्तमान पत्रात देण्यात आली होती. तसेच संस्थानचे संकेत स्थळावर वरीलप्रमाणे जाहिरात व निविदा देण्यात आली होती.

निविदा विक्रीची मुदत दि.०४/०२/२०१५ ते १८/०२/२०१५ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.२१/०२/२०१५ अखेर ठेवण्यात आली होती.

त्यास अनुसरुन शिर्डी येथील कार्यालयात ०३ निविदा प्राप्त झालेल्या आहेत, तर मुंबई कार्यालयात एकही निविदा प्राप्त झालेली नाही, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे –

| Sr.No. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 1 | M/s. Shreya Enterprises, Ahmednagar (2 Envelope) | 21/02/2015 |
| 2 | M/s. Kundan Surgical, Ahmednagar (2 Envelope) | 21/02/2015 |
| 3 | M/s. Nirmal Agencies, Ahmednagar (2 Envelope) | 21/02/2015 |

तरी उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या ०३ तांत्रिक सिलबंद निविदा आजचे सभेपुढे संबंधीत निविदाधारकांचे समक्ष उघडून मिळाव्यात ही विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील क्ष-किरण विभागाकरिता Fuji कंपनीच्या C.R. System Cassettes with screen खरेदी करणेकामी प्राप्त झालेल्या ०३ तांत्रिक सिलबंद निविदा आजचे सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत आल्या. या उघडणेत आलेल्या तांत्रिक निविदांचा अहवाल पुढील उपसमिती सभेसमोर सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

०६ **श्री साईनाथ रुग्णालयातील सोनोग्राफी विभागाकरिता यु.पी.एस. खरेदीकामी प्राप्त कोटेशन उघडून निर्णय घेणेबाबत.**

श्री साईनाथ रुग्णालयातील सोनोग्राफी विभागाने दि. ०१/०९/२०१४ रोजीचे मागणीपत्रान्वये (औषध भांडार विभाग प्राप्त दि. २६/०९/२०१४) एक नग यु. पी. एस. ची मागणी केलेली आहे. कारण त्यांचेकडे सध्या वापरत असलेला यु.पी.एस. हा वापरुन खराब झालेला आहे त्यामुळे तो व्यवस्थित काम देत नाही.

याकामी मे. तेजस इलेक्ट्रॉनिक्स, अहमदनगर यांचेकडून दुरध्वनीवरुन दरपत्रक मागविण्यात आले होते त्यानुसार सदरचे खरेदीकामी अंदाजे रक्कम रु. २६,७७५/- इतका खर्च अपेक्षित आहे, त्याचा तपशील खालीलप्रमाणे–

| Sr. No. | Description | Qty. | Rate per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| 01. | 2 KVA/ 96VDC On Line UPS Internal Battery back up system 30 Min. Back up time | 01 | 26,775.00 | 26,775.00 |
| | | **Total Amt. in Rs.** | | **26,775.00** |

वरीलप्रमाणे एक नग यु.पी.एस. खरेदीकामी अंदाजे रु. २६७७५/- इतका खर्च अपेक्षित आहे. त्यानुसार दि.२०/११/२०१४ रोजीचे मा. त्रिसदस्य समिती सभेत मंजूरी अन्वये उपरोक्त १ नग यु.पी.एस. विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणा-या अंदाजे रु. २६७७५/- इतक्या खर्चास मान्यता मिळालेली होती.

त्यानुसार इकडील पत्र क्र. ३२२८, दि. १७/१२/२०१४ अन्वये एकूण १९ अधिकृत विक्रेते / पुरवठा धारक यांचेकडून दि. ३१/१२/२०१४ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते. त्यानुसार ०१ सिलबंद कोटेशन प्राप्त झाल्यामुळे

उर्वरित अधिकृत विक्रेते / कोटशन धारक दूरध्वनीव्दारे तगादा करण्यात आला होता तेंव्हा ज्या अधिकृत विक्रेते / पुरवठा धारक कोटेशन मागणी पत्र मिळाले नाही असे सांगितले त्यांना दि.३१/१२/२०१४ रोजी ई मेल द्वारे पुन्हा पत्र देण्यात आले होते. त्यास अनूसरुन १ सिलबंद कोटेशन प्राप्त झाल्यामुळे उर्वरित १७ अधिकृत विक्रेते / कोटशन धारकांना इकडील पत्र क्र.३८४५ दि. १२/०२/२०१५ रोजी स्मरणपत्र पाठविण्यात आले होते त्यास अनूसरुन १ सिलबंद कोटेशन प्राप्त आहे. असे एकूण ०३ सिलबंद कोटेशन प्राप्त झालेले आहेत. त्याचा तपशिल खाली प्रमाणे आहे.

1. M/s. Tejas Electronics, Ahmednagar- सिलबंद कोटेशन प्राप्त दि.२९/१२/२०१४.
2. M/s. Tek-Excel Electronica Pvt. Ltd., Mumbai- सिलबंद कोटेशन प्राप्त दि.०९/०१/२०१५
3. M/s. Bhawani Digital System, Mumbai- सिलबंद कोटेशन प्राप्त दि.०५/०३/२०१५

उपरोक्त अ. नं. १ हया कोटेशन धारकाचे मुदतीत सिलबंद कोटेशन प्राप्त झाले आहे. परंतु, वरील अ. नं. २ व ३ हया कोटेशन धारकाचे कोटेशन मुदतीनंतर प्राप्त झालेले असून, तुलनात्मक तक्ता तयार करण्याच्या दृष्टीने फायदा होऊ शकेल असे नम्र मत आहे.

वरीलप्रमाणे प्राप्त झालेली सिलबंद कोटेशन्स आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित कोटेशनधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| Sr. no. | Description | Tejas Electronics, Ahmednagar | | Tek- Excel Electronic Pvt. Ltd., Mumbai | | Bhawani Digital Systems Pvt. Ltd., Mumbai | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Make / Model | Rate Per in Rs. | Make / Model | Rate Per in Rs. | Make / Model | Rate Per in Rs. |
| 1 | 2 KVA / 96 VDC On Line UPS Internal Battery back up system 30 Min. Back up time | Emerson ISO 9001-02 2KVA/ 72DCV Online UPS with 12V, 7AH SMF battery for 30min. Backup Libert GXT-MT+ CX2 | **27500/-** | SRC2KUXI , APC MAKE Online UPS System of rating 2KVA<br>Batteries & Accessories- 12V 26AH, a Set of 12v, 26 AH, smf Battery to provied the desired backupt time as desired lod 30min.<br>BR 826, Rack for housing 8Nos. Of 12V, 26AH, SMF Battery along with inter row inter Tier battery connecting links.<br>Service Charge- Installation and Commissioning Charges | 58069.8 | Eaton 9130 Series Tower type 3 KVA Single Phase Online UPS System Single phase, double conversion with other features as per the product catalogue enclosed SMF Bttery Bank 7 AH X 16 Nos. for back up with battery Stand with Battery intelink cables and UPS- Battery Cable. | 52395/- |
| | | Switching AVO Electro power Ltd., 2KVA/72 VDC On line UPS with 12V, 7 AH SMF Battery for 30min. Back up time. | 23,500.00 | | | | |
| | Warranty | 3 Years UPS & 2 Years Battery | | 2 Years UPS & 1 Years Battery | | 24 month UPS & 12 month Battery | |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील सोनोग्राफी विभागाकरिता ०१ नग यु.पी.एस. खरेदीकामी मे.तेजस इलेक्ट्रॉनिक्स, अहमदनगर यांचे रु.२७,५००/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

०७ **श्री साईबाबा रुग्णालयातील C.V.T.S. OT-02 विभागाकरिता Washing Machine खरेदीकामी प्राप्त कोटेशन उघडून निर्णय घेणेबाबत.**

श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस. ओ.टी.- 2 विभागातील सर्जरी ओ.टी. मधील इतर कर्मचारी यांना शस्त्रक्रियेचे वेळी लागणारे लिनन दररोज धुवून नंतर Autoclave करुन वापरावे लागते. सध्या त्यांचेकडे एक 7 Kg. क्षमतेचे Washing Machine असुन ते सन २०११ या वर्षात खरेदी केलेले होते. परंतु सध्या ते नादुरुस्त आहे. त्यामुळे त्यांनी नवीन 11 Kg. क्षमतेच्या Washing Machine ची मागणी केलेली आहे. सदरहू एक नग Washing Machine खरेदीकामी अंदाजे रक्कम रु. ४०,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

त्यानुसार दि. २५/०९/२०१४ रोजीचे मा.त्रिसदस्य समिती सभेतील निर्णय क्र.८७० मंजूरी अन्वये एक नग Washing Machine विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणा-या अंदाजे रु. ४०,०००/- इतक्या खर्चास मान्यता मिळालेली होती.

त्यानुसार इकडील पत्र क्र. २८८० दि. २०/११/२०१४ अन्वये एकूण ११ अधिकृत विक्रेते/ पुरवठा धारक यांचेकडून दि. १०/१२/२०१४ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते. त्यानुसार ०२ सिलबंद कोटेशन प्राप्त झाल्यामुळे उर्वरित अधिकृत विक्रेते/ कोटशन धारक दूरध्वनीव्दारे तगादा करण्यात आला होता. त्यावेळी M/s.R.T. Karachiwala, Ahmednagar यांनी कोटेशन मागणी पत्र मिळाले नसल्याचे सांगितले. त्यामुळे दि.१६/०१/२०१५ रोजीचे ई– मेलव्दारे कोटेशन मागणीपत्रक पाठविले होते. तरीही एकच सिलबंद कोटेशन प्राप्त झाल्यामुळे इकडील पत्र क्र.३८४४ दि.१२/०२/२०१५ अन्वये पुन्हा ०९ कोटेशन धारकांना स्मरणपत्र देण्यात आले आहे. त्यास अनुसरुन एकच सिलबंद कोटेशन प्राप्त झालेले आहे. तर M/s. Sai Agencies, Kopargoan यांनी स्वतः कोटेशन मागणीपत्रक नसतांनी सिलबंद कोटेशन दिलेले आहे.

प्राप्त कोटेशनचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| Sr. no. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 1 | M/s. Sai Agencies, Kopargoan | सिलबंद कोटेशन प्राप्त दि. ०६/०१/२०१४ |
| 2 | M/s. Kothari Electronic, Kopargoan | सिलबंद कोटेशन प्राप्त दि. ०६/०१/२०१४ |
| 3 | M/s. Jeevan Radio House, Shrirampur | दि.०६/०३/२०१५ रोजीचे ई – मेल पत्र |

उपरोक्त एक नग Washing Machine खरेदी करण्यासाठी दि. १०/१२/२०१४ अखेर सिलबंद कोटेशन मागविण्यात आले होते. त्याप्रमाणे अ. नं. १ व २ हया कोटेशन धारकांचे सिलबंद कोटेशन मुदतीनंतर प्राप्त झालेले आहेत. अ. नं. ३ हया कोटेशन धारकाचे कोटेशन ई – मेलव्दारे प्राप्त झाले असून, तुलनात्मक तक्ता तयार करण्याच्या दृष्टीने फायदा होऊ शकेल असे नम्र मत आहे.

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित कोटेशनधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| Sr. no. | Description | M/s. Jeevan Radio House, Shrirampur | | M/s. Kothari Electronics, Kopargaon | | M/s. Sai Agencies, Kopargaon | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Make / Model | Rate Per in Rs. | Make / Model | Rate Per in Rs. | Make / Model | Rate Per in Rs. |
| 1 | Washing Machine 11KG (1 Nos.) | Samsung WT1007AG - 8kg. | 13000.00 | LG TLW/ MT1232AFDS 5- 17kg | 64000.00 | LG TLW/ MT12AFDS5- 17kg | 65300.00 |
| | | Samsung WA75H4000H P- 7.5kg. | 26000.00 | | | | |
| | | Samsung WD8804- 8kg. | 49000.00 | | | | |
| | | Samsung WA11F5S4QT A- 11kg. | <u>32500.00</u> | | | | |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील C.V.T.S. OT-02 विभागाकरिता प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे ०१ नग Washing Machine खरेदीकामी मे.जीवन रेडीओ हाऊस, श्रीरामपूर यांचे रु.३२,५००/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

०८ **साईनगर इलेक्ट्रीक कंट्रोल पॅनेलमधील स्पेअरपार्ट खरेदी करणेबाबत.**

अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही एका प्रयोजनासाठी करण्यात येईल :-

(क). मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन

वरील अधिनियमास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

संस्थानचे साईनगर सबस्टेशनमध्ये इलेक्ट्रीक कंट्रोल पॅनेल बसविण्यात आलेले आहेत. सदर पॅनेलमध्ये महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचा सप्लाय व जनरेटरसेटचा सप्लाय चेंज होणेकरीता पॅनेलमध्ये कॉन्टॅक्टर रिले टायमर इत्यादि इलेक्ट्रीक पार्टस बसविलेले आहेत. सततच्या वापरामुळे ते खराब होतात. ते खराब झालेवर विद्युतपुरवठा खंडीत होते. त्यामुळे श्री साईबाबा हॉस्पीटल व कर्मचारी वसाहत येथील विद्युत पुरवठा बंद होईल. तो त्वरीत चालू करणेसाठी सदरचे स्पेअरपार्ट उपलब्ध ठेवणे गरजेचे आहे. मेन्टेनन्सकरीता लागणारे स्पेअरपार्ट मध्यवर्ती भांडारमध्ये व विद्युत विभागाचे सबस्टोअरला शिल्लक नाही. त्यामुळे दैनंदिन कामकाजात अडचण निर्माण होत आहे. वार्षिक खरेदीस वेळ लागणार असल्याने दैनंदिन कामामध्ये अडचण निर्माण होऊ नये. त्याकरीता खालीलप्रमाणे स्पेअरपार्टस तातडीने खरेदी करणे गरजेचे आहे. खरेदी करावे लागणा-या स्पेअरपार्टचा तपशील खालीलप्रमाणे :-

| Sr. No. | Description | Qty | Rate | Amount |
|---|---|---|---|---|
| 01) | Under over Relay, Type :- VCF-D2,UV % 75 to 95% OV% 105 to 120 %,Make :- Minilec | 01 Nos. | Rs. 2,340/- | Rs. 02,340/- |
| 02) | Timer Siemens, Type :- 3RP 15131 AP 308 K Setting time rang. 5-100 Secs., 200-240 V 50/60 Hz Rated Voltage 24V AC / DC, Ie / AC 15 at 230V = 3A Ie/DC 13 at 230 V = 0.1 A, IS / IEC 60947 IEC 61812-1 Made In India. | 02 Nos. | Rs. 274/- | Rs. 00,548/- |
| 03) | Contactor Relay, Siemens, Air Break (Aux)Contactor Relay, AC 230V 3 TH 30 22-oB, Aux Cont-2 No + 2 NC Ie / AC 15 Ref IEC 947-1S 1394, Made In India 071034008 | 02 Nos. | Rs. 1,425/- | Rs. 02,850/- |
| 04) | Contactor Relay, Siemens, Air Break (Aux) Contactor Relay, DC 24V 3 TH 30 22-oB Aux Cont-2 No + 2 NC Ie / AC 15 Ref IEC 947-1S 1394, Made In India 071034008 | 02 Nos. | Rs. 2,405/- | Rs. 04,810/- |
| 05) | Isolattor, Siemens, 55 x 44, C6 – 240-415V / 4 Pole Isoletter | 01 Nos. | Rs. 850/- | Rs. 00,850/- |
| 06) | Contactor Relay 3 TH 30 22-oA, Air Break (Aux) Contactor Relay Aux Cont – 2 No + 2 NC, Ie/AC 15 Ref IEC 947 1S 13947 | 02 Nos. | Rs. 2,800/- | Rs. 05,600/- |
| 07) | Auxilary Contactor-051103190, 3 TX 4010-2A – 1 No. IS 13947 IEC 60947 Aux Cont Block for Mounting on, 3 TF3 and 3 TH3 Contactor Made In India 051103190 | 02 Nos. | Rs. 2,600/- | Rs. 5,200/- |
| 08) | Auxilary Contactor 3 TX 4001 – 2 A - 1 NC, IS – 13 947 IEC – 60947 Aux cont Block for Maunting on 3 TF3 and 3 TH3 Contactor Made In India, Contactor- 051029190 | 02 Nos. | Rs. 3,260/- | Rs. 6,520/- |
| 09) | Fuse :- 20 A 550 V~ IS 9224, Siemens-3NW20 NNSF | 06 Nos. | Rs. 520/- | Rs. 03,120/- |
| 10) | TNC – Switch – Switron Make | 01 Nos. | Rs. 2,386/- | Rs. 02,386/- |
| 11) | Line Monitoring Relay, Type :-3 UG, Catlog No.3 UG46151CR20 | 01 Nos. | Rs. 15,120/- | Rs.15,120/- |
| 12) | Buzzar 230 Volt | 01 Nos. | Rs. 660/- | Rs. 00,660/- |
| 13) | Voltmeter 00 to 500 Volt | 01 Nos. | Rs. 760/- | Rs. 00,760/- |
| 14) | Voltmeter Selector Switch | 01 Nos. | Rs. 715/- | Rs. 00,715/- |
| | | | **Total :-** | **Rs. 51,479/-** |

उपरोक्तप्रमाणे साईनगर इलेक्ट्रीक कंटोल पॅनेलमधील स्पेअरपार्ट खरेदी करणेकामी येणा-या अंदाजे रक्कम रुपये ५१,४७९/-इतक्या खर्चास मान्यता मिळणेस व वर्तमानपत्रात जाहिरात देऊन तसेच संस्थानचे वेबसाईटवर ही जाहिरात अपलोड करुन टेंडर मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, साईनगर इलेक्ट्रीक कंट्रोल पॅनेलमधील प्रस्तावात नमुद केलेले स्पेअरपार्ट खरेदीकामी वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.५१,४७९/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

०९ **सन २०१५-२०१६ करीता पाणी शुध्दीकरणांसाठी फेरीक ॲलम खरेदी करणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:-** २१ (१) चा (क)- मंद्रिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन.

**प्रस्तावना:-** संस्थानचे मौजे कनकुरी येथे साठवण तलावालगत जलशुध्दीकरण केंद्र असून, पाणी पुरवठा विभागाकरीता कनकुरी साठवण तलाव येथे पाणी शुध्दीकरण करणेसाठी आवश्यक फेरीक ॲलम (ग्रेड-१, १६% ॲलोमिना फेरीक उपलब्ध) ची दैनंदिन आवश्यकता भासते.

मागील वर्षी सन २०१४-१५ करीता पाणी शुध्दीकरणांसाठी आवश्यक ब्लीचिंग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरीन गॅस सिलेंडर खरेदी करणेसाठी व त्यासाठी येणारे अंदाजे रु. १२,४५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेसाठी

मा.त्रिसदस्यीय समितीचे दि. ०४/०२/२०१४ रोजीचे सभेत मान्यता देण्यात येवून याकामी येणा-या खर्चास मा.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाची मान्यता मिळणेसाठी संस्थान वकिल श्री चौकीदार यांचेमार्फत सिव्हील ॲप्लिकेशन नं.५८१५/ २०१४, दि.२७/०६/२०१४ अन्वये सादर करण्यात आलेले होते. मा.उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठात याबाबतचा निर्णय अदयापपर्यंत प्रलंबित असल्याने दरम्यानचे कालावधीत पाणीपुरवठा विभागाकडून पाणीशुध्दीकरण प्रक्रियेसाठी आवश्यक फेरीक ॲलमची तात्पुरत्या स्वरुपात (रु. २५,०००/- मात्र रकमेचे आत) खरेदी करण्यात येत आहे. परंतू तात्पुरत्या स्वरुपात मटेरियलची खरेदी करतेवेळी मोठया प्रमाणावर अडचणी येत आहेत. माल पुरवठादार यांचेकडुन वेळेवर मालाचा पुरवठा होत नाही, पुरवठादार जादा मालाची मागणी नोंदविणेची मागणी करतांत तसेच दरवेळी कोटेशन मागणी केली असता नकार देतात. अशा अडचणी येत आहेत. मा. उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठात सन २०१४-२०१५ करीता ब्लीचिंग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरीन गॅस सिलेंडर खरेदी करणेसाठी व त्यासाठी येणारे अंदाजे रु. १२,४५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेसाठी सिव्हील ॲप्लिकेशन (नं. ५८१५/२०१४, दि. २७/०६/२०१४) दाखल करण्यात आलेले आहेत. सिव्हील ॲप्लीकेशन मध्ये सन २०१४-२०१५ या कालावधीत आवश्यक मटेरीयल खरेदी करणेसाठी मान्यता मिळणेबाबत नमुद करण्यात आलेले आहे. उपरोक्त कालावधी संपलेला असून अदयापपर्यंत मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांची मान्यता प्रलंबीत आहे.

**प्रस्ताव**:- तरी आपणास पुढील कालावधी सन २०१५-१६ करीता पाणी शुध्दीकरणांसाठी आवश्यक फेरीक ॲलमची खरेदी करणेसाठी नव्याने खरेदी प्रक्रिया करावी लागणार आहे.

सन २०१५-१६ या कालावधीत पाणी शुध्दीकरणांसाठी आवश्यक फेरीक ॲलमचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | तपशिल | आवश्यकता | अंदाजे दर प्रती मे.टन (व्हॅटसह) | एकुण रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | फेरीक ॲलम (ग्रेड-१, १६% ॲलोमिना फेरीक उपलब्ध) | ५० मे.टन | रु. ७,०००/- | ३,५०,०००.०० |
| | | | **एकुण रक्कम-** | **३,५०,०००.००** |

**विभागाचे स्पष्ट मत/ अभिप्राय**:- याकामी श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ कलम २१ (१) चा (क) मध्ये नमुद केलेल्या तरतुदीनुसार व जा.क्रं. एसएसएस/साप्रशा/आस्था/१८८१/२०१४, दि. ०४/०८/२०१४ रोजीचे आदेशान्वये रक्कम रु. २५,००१/- ते रु. १०,००,०००/- मात्र आर्थीक मर्यादेतील आवश्यक साहित्य खरेदी करणे / विभागांतर्गत आवश्यक कामे करणे आदि बाबींना (अशा बाबींसाठी विहीत पध्दतीने दरपत्रके / निविदा बोलविणे, त्याच्या अटी-शर्ती निश्चित करणे, त्याची गुणवत्ता / दर्जा / उपयुक्तता निश्चित करणे इ. ) प्रशासकिय मान्यता देणेचे अधिकार उपसमितीस प्रदान करण्यात आलेले आहेत. मा.उपसमितीची मान्यता घेतल्यानंतर सदरचे पाणी शुध्दीकरणांसाठी आवश्यक फेरीक ॲलमची खरेदी करता येईल असे मत आहे.

तरी वरीलप्रमाणे नमुद फेरीक ॲलम खरेदी करणेसाठी अंदाजे रु. ३,५०,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे. तरी सदरचा फेरीक ॲलम विहीत पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदी करणेस व त्यासाठी येणारे अंदाजे रु. ३,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळावी ही विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे पाणी पुरवठा विभागास सन २०१५-२०१६ करीता पाणी शुध्दीकरणांसाठी आवश्यक असलेले फेरीक ॲलमचा शासनाकडील रेट कॉन्ट्रॅक्ट यादीमध्ये समावेश असल्यास रेट कॉन्ट्रॅक्ट नुसार खरेदी करणेत यावे. रेट कॉन्ट्रॅक्ट मध्ये समावेश नसल्यास ते खरेदीकामी विहीत पध्दतीने ई-निविदांची मागणी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.३,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.**

(कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

१० **सन २०१५-२०१६ करीता पाणी शुध्दीकरणांसाठी ब्लीचींग पावडर खरेदी करणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद**:- २१ (१) चा (क)- मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन.

**प्रस्तावना**:- संस्थानचे मौजे कनकुरी येथे साठवण तलावालगत जलशुध्दीकरण केंद्र असून, पाणी पुरवठा विभागाकरीता कनकुरी साठवण तलाव येथे पाणी शुध्दीकरण करणेसाठी आवश्यक ब्लीचिंग पावडर (विक्रम (ग्रासिम) ब्रँड, डी.सी.एच. (डी.एस.सी.एल), आय.एस.आय. मार्क, ३४ % क्लोरीन उपलब्ध) याची दैनंदिन आवश्यकता भासते.

मागील वर्षी सन २०१४-१५ करीता पाणी शुध्दीकरणांसाठी आवश्यक ब्लीचिंग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरीन गॅस सिलेंडर खरेदी करणेसाठी व त्यासाठी येणारे अंदाजे रु. १२,४५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेसाठी मा.त्रिसदस्यीय समितीचे दि. ०४/०२/२०१४ रोजीचे सभेत मान्यता देण्यात येवून याकामी येणा-या खर्चास मा.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाची मान्यता मिळणेसाठी संस्थान वकिल श्री चौकीदार यांचेमार्फत सिव्हील ॲप्लिकेशन नं. ५८१५/२०१४, दि. २७/०६/२०१४ अन्वये सादर करण्यात आलेले होते. मा.उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठात याबाबतचा निर्णय अदयापपर्यंत प्रलंबित असल्याने दरम्यानचे कालावधीत पाणीपुरवठा विभागाकडून पाणीशुध्दीकरण प्रक्रियेसाठी आवश्यक ब्लिचिंग पावडरची तात्पुरत्या स्वरुपात (रु. २५,०००/- मात्र रकमेचे आत) खरेदी करण्यात येत आहे. परंतू तात्पुरत्या स्वरुपात मटेरियलची खरेदी करतेवेळी मोठया प्रमाणावर अडचणी येत आहेत. माल पुरवठादार यांचेकडुन वेळेवर मालाचा पुरवठा होत नाही, पुरवठादार जादा मालाची मागणी नोंदविणेची मागणी करतांत तसेच दरवेळी कोटेशन मागणी केली असता नकार देतात. अशा अडचणी येत आहेत. मा. उच्च न्यायालयाचे

औरंगाबाद खंडपीठात सन २०१४-२०१५ करीता ब्लीचिंग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरीन गॅस सिलेंडर खरेदी करणेसाठी व त्यासाठी येणारे अंदाजे रु. १२,४५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेसाठी सिव्हील ॲप्लिकेशन (नं. ५८१५/२०१४, दि. २७/०६/२०१४) दाखल करण्यात आलेले आहेत. सिव्हील ॲप्लीकेशन मध्ये सन २०१४-२०१५ या कालावधीत आवश्यक मटेरियल खरेदी करणेसाठी मान्यता मिळणेबाबत नमुद करण्यात आलेले आहे. उपरोक्त कालावधी संपलेला असून अदयापपर्यंत मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांची मान्यता प्रलंबीत आहे.

**प्रस्ताव**:- तरी आपणास पुढील कालावधी सन २०१५-१६ करीता पाणी शुध्दीकरणांसाठी आवश्यक ब्लीचिंग पावडर खरेदी करणेसाठी नव्याने खरेदी प्रक्रिया करावी लागणार आहे.

सन २०१५-१६ या कालावधीत पाणी शुध्दीकरणांसाठी आवश्यक ब्लीचिंग पावडरचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | तपशिल | आवश्यकता | अंदाजे दर प्रती मे.टन (व्हॅटसह) | एकुण रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | ब्लीचिंग पावडर (विक्रम (ग्रासिम) ब्रॅंड, डी.सी.एच. (डी.एस.सी.एल), आय.एस.आय. मार्क, ३४ % क्लोरीन उपलब्ध) | ३५ मे.टन | रु. १७,८००/- | ६,२३,०००.०० |
| | | | **एकुण पुर्णांकित रक्कम-** | **६,२३,०००.००** |

**विभागाचे स्पष्ट मत / अभिप्राय**:- याकामी श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ कलम २१ (१) चा (क) मध्ये नमुद केलेल्या तरतुदीनुसार व जा.क्रं. एसएसएस/साप्रशा/आस्था/१८८१/२०१४, दि. ०४/०८/२०१४ रोजीचे आदेशान्वये रक्कम रु. २५,००१/- ते रु. १०,००,०००/- मात्र आर्थीक मर्यादेतील आवश्यक साहित्य खरेदी करणे/ विभागांतर्गत आवश्यक कामे करणे आदि बाबींना (अशा बाबींसाठी विहीत पध्दतीने दरपत्रके/ निविदा बोलविणे, त्याच्या अटी-शर्ती निश्चित करणे, त्याची गुणवत्ता / दर्जा / उपयुक्तता निश्चित करणे इ.) प्रशासकिय मान्यता देणेचे अधिकार उपसमितीस प्रदान करण्यात आलेले आहेत. मा.उपसमितीची मान्यता घेतल्यानंतर सदरचे पाणी शुध्दीकरणांसाठी आवश्यक ब्लीचिंग पावडरची खरेदी करता येईल असे मत आहे.

तरी वरीलप्रमाणे नमुद ब्लीचिंग पावडर खरेदी करणेसाठी अंदाजे रु. ६,२३,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे. तरी सदरची ब्लीचिंग पावडर विहीत पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदी करणेस व त्यासाठी येणारे अंदाजे रु. ६,२३,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळावी ही विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे पाणी पुरवठा विभागास सन २०१५-२०१६ करीता पाणी शुध्दीकरणांसाठी आवश्यक असलेली ब्लीचींग पावडर शासनाकडील रेट कॉन्ट्रॅक्ट यादीमध्ये समावेश असल्यास रेट कॉन्ट्रॅक्ट नुसार खरेदी करणेत यावे. रेट कॉन्ट्रॅक्ट मध्ये समावेश नसल्यास ते खरेदीकामी विहीत पध्दतीने ई-निविदांची मागणी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.६,२३,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.**

(कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

११ **सन २०१५-२०१६ करीता पाणी शुध्दीकरणांसाठी क्लोरीन गॅस सिलेंडर खरेदी करणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद**:- २१ (१) चा (क)- मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन.

**प्रस्तावना**:- संस्थानचे मौजे कनकुरी येथे साठवण तलावालगत जलशुध्दीकरण केंद्र असून, पाणी पुरवठा विभागाकरीता कनकुरी साठवण तलाव येथे पाणी शुध्दीकरण करणेसाठी आवश्यक क्लोरीन गॅस सिलेंडरची दैनंदिन आवश्यकता भासते.

मागील वर्षी सन २०१४-१५ करीता पाणी शुध्दीकरणांसाठी आवश्यक ब्लीचिंग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरीन गॅस सिलेंडर खरेदी करणेसाठी व त्यासाठी येणारे अंदाजे रु. १२,४५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेसाठी मा.त्रिसदस्यीय समितीचे दि. ०४/०२/२०१४ रोजीचे सभेत मान्यता देण्यात येवून याकामी येणा-या खर्चास मा.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाची मान्यता मिळणेसाठी संस्थान वकिल श्री चौकीदार यांचेमार्फत सिव्हील ॲप्लिकेशन नं. ५८१५/२०१४, दि. २७/०६/२०१४ अन्वये सादर करण्यात आलेले होते. मा.उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठात याबाबतचा निर्णय अदयापपर्यंत प्रलंबित असल्याने दरम्यानचे कालावधीत पाणीपुरवठा विभागाकडून पाणीशुध्दीकरण प्रक्रियेसाठी आवश्यक क्लोरीन गॅस सिलेंडरची तात्पुरत्या स्वरुपात (रु. २५,०००/- मात्र रकमेचे आत) खरेदी करण्यात येत आहे. परंतू तात्पुरत्या स्वरुपात मटेरियलची खरेदी करतेवेळी मोठया प्रमाणावर अडचणी येत आहेत. माल पुरवठादार यांचेकडुन वेळेवर मालाचा पुरवठा होत नाही, पुरवठादार जादा मालाची मागणी नोंदविणेची मागणी करतांत तसेच दरवेळी कोटेशन मागणी केली असता नकार देतात. अशा अडचणी येत आहेत. मा. उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठात सन २०१४-२०१५ करीता बुलीचिंग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरीन गॅस सिलेंडर खरेदी करणेसाठी व त्यासाठी येणारे अंदाजे रु. १२,४५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेसाठी सिव्हील ॲप्लिकेशन (नं. ५८१५/२०१४, दि. २७/०६/२०१४) दाखल करण्यात आलेले आहेत. सिव्हील ॲप्लीकेशन मध्ये सन २०१४-२०१५ या कालावधीत आवश्यक मटेरियल खरेदी करणेसाठी मान्यता मिळणेबाबत नमुद करण्यात आलेले आहे. उपरोक्त कालावधी संपलेला असून अदयापपर्यंत मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांची मान्यता प्रलंबीत आहे.

प्रस्ताव:-

तरी आपणास पुढील कालावधी सन २०१५-१६ करीता पाणी शुध्दीकरणांसाठी आवश्यक क्लोरीन गॅस सिलेंडर खरेदी करणेसाठी नव्याने खरेदी प्रक्रिया करावी लागणार आहे.

सन २०१५-१६ या कालावधीत पाणी शुध्दीकरणांसाठी आवश्यक क्लोरीन गॅस सिलेंडरचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अं.नं. | तपशिल | आवश्यकता | अंदाजे दर प्रती मे.टन (व्हॅटसह) | एकुण रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | क्लोरीन गॅस सिलेंडर (१०० किलो प्रती सिलेंडर क्षमता) | ४० नग | रु. ४,०००/- | १,६०,०००.०० |
| | | | एकुण रक्कम- | १,६०,०००.०० |

**विभागाचे स्पष्ट मत/ अभिप्राय:-** याकामी श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ कलम २१ (१) चा (क) मध्ये नमुद केलेल्या तरतुदीनुसार व जा.क्रं. एसएसएस/साप्रशा/आस्था/१८८१/२०१४, दि. ०४/०८/२०१४ रोजीचे आदेशान्वये रक्कम रु. २५,००१/- ते रु. १०,००,०००/- मात्र आर्थीक मर्यादेतील आवश्यक साहित्य खरेदी करणे/ विभागांतर्गत आवश्यक कामे करणे आदि बाबींना (अशा बाबींसाठी विहीत पध्दतीने दरपत्रके/ निविदा बोलविणे, त्याच्या अटी-शर्ती निश्चित करणे, त्याची गुणवत्ता/ दर्जा/ उपयुक्तता निश्चित करणे इ.) प्रशासकिय मान्यता देणेचे अधिकार उपसमितीस प्रदान करण्यात आलेले आहेत. मा.उपसमितीची मान्यता घेतल्यानंतर सदरचे पाणी शुध्दीकरणांसाठी आवश्यक क्लोरीन गॅस सिलेंडरची खरेदी करता येईल असे मत आहे.

तरी वरीलप्रमाणे नमुद क्लोरीन गॅस सिलेंडर खरेदी करणेसाठी अंदाजे रु. १,६०,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे. तरी सदरचे क्लोरीन गॅस सिलेंडर विहीत पध्दतीने निविदा मागवून खरेदी करणेस व त्यासाठी येणारे अंदाजे रु. १,६०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळावी ही विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे पाणी पुरवठा विभागास सन २०१५-२०१६ करीता पाणी शुध्दीकरणांसाठी आवश्यक असलेले क्लोरीन गॅस सिलेंडर शासनाकडील रेट कॉन्ट्रॅक्ट यादीमध्ये समावेश असल्यास रेट कॉन्ट्रॅक्ट नुसार खरेदी करणेत यावे. रेट कॉन्ट्रॅक्ट मध्ये समावेश नसल्यास ते खरेदीकामी विहीत पध्दतीने निविदांची मागणी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.१,६०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.**

(कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

१२ **सन २०१५-२०१६ करीता वार्षिक साहित्य खरेदी करणेबाबत.**

बगीचा विभागामार्फत संस्थान परीसरातील मदिर परीसर, लेंडीबाग परीसर नवीन भक्तनीवास परीसर व्दारावती निवासस्थान इमारत परीसर नवीन प्रसादलय परीसर, शै. संकुल परीसर, साई आश्रम निवासस्थान साई धर्मशाळा इ.ठिकाणी बाग बगीचा तयार करण्यात आलेला आहे. तसेच साठवण तलाव परीसर व साईनगर परीसर नवीन भक्तनीवास परीसर व धर्मशाळा परीसर याठिकाणी नारळ झाडे लावण्यात आलेली आहे.

संस्थान परीसरात लावण्यात आलेल्या बागेतील झाडे रोपे व नारळ झाडे यांना वेळो-वेळी वेगवेगळया प्रकारची खते द्यावी लागतात. तसेच या झाडावर पडणाऱ्या रोगासाठी किडींसाठी या झाडावर वेगवेगळी किडनाशक, बुरशीनाशक, संजीवके इ. औषधांची फवारणी करणे आवश्यक असते. ऋतुमानाप्रमाणे वातावरणातील बदलानुसार झाडावर, रोपांवर औषध फवारणी करावी लागते.

सन २०१५-२०१६ या कालावधीकरीता वार्षीक खर्चासाठी साधारणत: वर्ष भरासाठी बगीचा विभागास खालीलप्रमाणे औषधे व खतांची आवश्यकता आहे. तपशील खालील प्रमाणे

| अं.नं | मालाचा तपशील | मागणी | अंदाजे दर (प्रती लीटर) | रक्कम |
|---|---|---|---|---|
| **औषधे** | | | | |
| ०१ | तननाशक | १०० ली. | ३७० | ३७,००० |
| ०२ | नुवान | ५ ली. | ६०० | ३००० |
| ०३ | रोगर | ५ ली. | २९२ | १४६० |
| ०४ | कॉन्टॉफ | ३ ली | ४९० | १४७० |
| ०५ | क्लोरीपायरीफॉस (लिफान) | ५ ली. | ५८० | २९०० |
| ०६ | टाटा मिडा Trishul | 5 ली | १६९० | ८४५० |
| ०७ | सल्फर | २ कि. | २०० कि. | ४०० |
| ०८ | व्हटीसीलीयम | ४ कि. | ४६०कि. | १८४० |
| ०९ | ब्लॉयट्रेक्स | ५ कि. | ५१० कि | २५५० |
| १० | M 45 | 4 कि. | ३१० | १२४० |
| ११ | कॉन्फीडोर | २ ली. | १६९० | ३३८० |
| १२ | बायोझाईम | १ ली. | ६०० | ६०० |
| | एकुण | | अ | ६४,२९० |

| खते | | | | |
|---|---|---|---|---|
| ०१ | युरीया | २० गोणी | ४५० | ९००० |
| ०२ | निंबोळी पेन्ड | ५० गोणी | ५६० | २८००० |
| ०३ | D A P | 15 गोणी | १२५० | १८७५० |
| ०४ | सुपर फॉस्फेट (पावडर) | ३० गोणी | ३७० | ११९०० |
| ०५ | १०/२६/२६ | १५ गोणी | ११३० | १६९५० |
| ०६ | पॉटेश | २० गोणी | ८४० | १६८०० |
| ०७ | बलीचींग पावडर | २५०किलो | ५० (प्रती किलो ) | १२५०० |
| | एकुण | | ब | १,१३,१०० |
| | एकुण | | अ + ब | १,७७,३९० |

उपरोक्त प्रमाणे औषधे व खते खरेदी करणेसाठी अंदाजे रु.१,७७,३९०/- ( एक लाख सत्याहत्तर हजार तीनशे नव्वद) मात्र खर्च अपेक्षीत आहे.

बगीचा विभागासाठी आवश्यक असणारे औषधे, खते इ. खरेदी करणेकामी वेगवेगळ्या दुकानदाराकडुन विहीत पध्दतीने दरपत्रके घेवुन न्युनत्तम दराने खरेदी करता येईल. तरी उपरोक्त प्रमाणे औषधे, खते खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळावी

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे बगीचा विभागासाठी सन २०१५-२०१६ करीता आवश्यक असलेले वार्षिक साहित्य खरेदीकामी विहीत पध्दतीने दरपत्रके मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.१,७७,३९०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.**

(कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख)

---

१३ **साईभक्तांना पुस्तके/ फोटोसाठी नॉनवूल पिशव्या उपलब्ध करुन देणेबाबत.**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी प्रकाशित प्रकाशने विभागाव्दारे एकूण ७५ प्रकारचे पुस्तके व २० प्रकारचे फोटो तसेच ११ प्रकारामध्ये इलेक्ट्रॉक्स अॅटम त्यात संस्थान निर्मित श्री साईबाबा मंदिरातील आरत्या व मंत्रोपच्चार सी.डी.,व्हिसीडी,साईभक्तांसाठी प्रकाशने पुस्तके/फोटो विक्री काऊन्टर नं.१,२ व ३ वर भक्तांना उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.

प्रकाशने विभाग दि.१८.१२.२०१० चे मंजूर प्रस्तावान्वये खरेदी विभागामार्फत वर्षभराच्या टेंडरनुसार २००००० नग पांढ-या पिशव्या खरेदी करण्यात आल्या होत्या. प्रकाशने विभागातील अंतर्गत चालणा-या काऊंटरवर साईभक्तांना संस्थान प्रकाशने खरेदी केल्यानंतर नॉनवूल पिशवी देण्यात येते. सदर पिशव्यांचा स्टॉक अल्प प्रमाणात १०,००० नग शिल्लक असून २ ते ३ महिने पुरेल एवढाच स्टॉक शिल्लक आहे.

खरेदी विभागामार्फत १६" x २०" आकारातील १,००,००० नग पांढ-या पिशव्या प्रकाशने विभागास एक वर्षासाठी काऊंटरवर भक्तांना पुस्तके/फोटो खरेदी करणा-या भक्तांना देणेकामी उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे.

खालील प्रमाणे पिशवीचे साईजनुसार दरपत्रक अवलोकनार्थ सादर केले आहे.

| अ.नं. | तपशिल | साईज | मागणी संख्या | प्रति हजारी अंदाजे दर रुपये | पिशवी क्षमता |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | पांढरी पिशवी हॅण्डल असलेली नॉनवूल | १६" x २०" | १००००० | ३५००/- | ५ नग पुस्तकांसाठी वापरता येईल (वजन ३,५०० किलो पर्यंत) |

उपरोक्त तक्त्यात दर्शविलेप्रमाणे नॉनवूल साईभक्तांना पिशव्या साईभक्तांना उपलब्ध करुन दिल्यास त्याचा जास्तीत जास्त पुस्तके/फोटो मागणी करणा-या भक्तांना उपयोग होऊ शकेल.

सबब उपरोक्त तक्यात दर्शविलेप्रमाणे पांढरी पिशवी प्रति हजारी रु.३५००/- प्रमाणे खरेदी केल्यास प्रकाशने विभागांतर्गत तिन्ही बुकस्टॉलसाठी अंदाजे वर्षभरासाठी १,००,००० (अक्षरी एक लाख नग) मात्र नॉनवूल पिशव्या खरेदी विभागामार्फत संस्थानचे वर्षभराच्या टेंडरमध्ये नमुद करुन खरेदी करणेस, व त्यसाठी येणा-या अंदाजे एकूण रुपये.३,५०,०००/- मात्रचे अपेक्षित खर्चास मान्यतेसाठी सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रकाशने विभागाकडील बुक स्टॉलवर साईभक्तांसाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे नॉनवूल पिशव्या उपलब्ध करुन देणेकामी सदर पिशव्यांचा वार्षीक खरेदीमध्ये समावेश करुन खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.३,५०,०००/- खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

१४ **श्री साईलिला द्वैमासिकांच्या मराठी, हिंदी-इंग्रजी आवृत्यांच्या माहे मे-जुन, २०१५ व जुलै-ऑगष्ट, २०१५ या दोन अंकांची मागील दराने छपाई करणेस मान्यता मिळणेबाबत.**

सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ मधील कलम नं.१७ (२) ( ठ) मध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे.

''श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य,त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार- प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील''

यानुसार श्री साईबाबाच्या शिकवणुकीचा प्रचार प्रसार करण्याच्या उद्देशाने श्री साईलीला मराठी व हिंदी – इंग्रजी व्दैमासिक प्रकाशित केली जातत. मे.टॅको व्हिजन प्रा.लि., मुंबई यांना इकडील जा.नं.५३७८/ दि.२९.०१.२०१५ अन्वये माहे मार्च-एप्रिल २०१५ अखेर मासिक छपाईचा कार्यादेश देण्यात आला होता.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.१२.०६.२०१५ चे सभेतील निर्णय क्र.५०६ व मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचा दि.१३.०३.२०१५ रोजीच्या हुकुमनाम्यानुसार श्री साईलीला व्दैमासिक मराठी व हिंदी-इंग्रजी छपाईकामी येणा-या अंदाजे रक्कम रु. २३,००,०००/- मात्रचे खर्चास व विहित पध्दतीने ई निविदा मागविणेस छपाईकामी वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करणेकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

१) श्री साईलीला व्दैमासिक मराठी व हिंदी- इंग्रजी छपाईकामी वृत्तपत्रात जाहिरात देऊन दि.१५.०४.२०१५ ते दि.२५.०४.२०१५ या कालावधीत ई निविदा प्रेसधारकांकडून मागविण्यात आल्या होत्या. सदर कालावधीत फक्त एकच निविदा निट प्रिंटर्स, अहमदनगर यांची प्राप्त झाली होती.

२) दि.०९.०५.२०१५ ते दि.१६.०५.२०१५ या कालावधीत दुस-यांदा फेर ई निविदा मागविण्यात आल्या होत्या. दि.१८.०५.२०१५ रोजी ईडीपी मॅनेजर यांचे व्दारे किती निविदा प्राप्त झाल्या आहेत. याबाबत पाहणी केली असता फक्त दोनच ई निविदा आल्या असलेबाबत सांगण्यात आले.

नियमानुसार कमीत कमी तीन निविदा येणे आवश्यक होते. परंतू दोनच निविदा आल्यामुळे तिस-यांदा फेर निविदा मागविण्यासाठी वृत्तपत्रात जाहिरात देणे, ई निविदा मागविणे, संस्थान वेबसाईटवर जाहिरात देणे, ई निविदा प्राप्त झाल्यानंतर मा.व्यवस्थापन समितीचे सभेत उघडणे याकामांसाठी कालावधी लागणार असल्याने, तूर्त श्री साईलीला व्दैमासिकांच्या मराठी व हिंदी-इंग्रजी आवृत्यांच्या माहे मे-जुन २०१५ व जुलै –ऑगस्ट २०१५ या दोन अंकांची छपाई मागील दराने करुन घेणेकामी खालीलप्रमाणे मे.टॅको व्हिजन प्रा.लि.मुंबई यांना इकडील जा.नं.१०९९/ दि.२७.०५.२०१५ अन्वये छपाईचा कार्यादेश देण्यात आला आहे.

| अं.नं. | तपशिल | छपाई संख्या (दोन्ही अंकांची मिळून) | मागील मंजूर दर रुपये पैसे | अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साईलीला, मराठी व्दैमासिक, दोन अंक, प्रत्येकी ३२+४=३६ पाने | २०,००० नग (१०,०००x२ अंक) | १०.७५ | २,१५,०००.०० |
| ०२ | श्री साईलीला, हिंदी –इंग्रजी व्दैमासिक, दोन अंक, प्रत्येकी ३२+४=३६ पाने | २८,००० नग (१४,००० x २ अंक) | १०.६५ | २,९८,२००.०० |
| | | | एकूण रुपये | ५,१३,२००.०० |

सबब, प्रस्तावित केलेप्रमाणे श्री साईलीला व्दैमासिक मराठी / हिंदी – इंग्रजी, माहे मे-जुन २०१५ व जुलै – ऑगस्ट २०१५ या दोन अंकांची मागील मंजूर दराने छपाईकामी येणा-या रक्कम रु.५,१३,२००/- चे खर्चास मान्यतेसाठी सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावित केलेप्रमाणे श्री साईलीला व्दैमासिक मराठी / हिंदी – इंग्रजी, माहे मे-जुन २०१५ व जुलै– ऑगस्ट २०१५ या दोन अंकांची मागील मंजूर दराने मे.टॅको व्हिजन प्रा.लि., मुंबई यांचेकडून छपाई करुन घेणेस व याकामी येणा-या रु.५,१३,२००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

१५ **लॉण्ड्रीतील स्टीम बॉयलरकरीता वार्षिक इंधन खरेदी करणेबाबत.**

**अधिनियम २००४ मधील तरतुद –** १) २१ (१) चा (क) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन.

२) २१ (१) चा (ग) भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा कोणतीही धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

**प्रस्ताविक-** साईबाबा भक्तनिवासस्थान विभागाकडील लॉण्ड्रीमध्ये द्वारावती भक्तनिवास, साईप्रसाद निवासस्थान, साईबाबा भक्तनिवासस्थान, शैक्षणिक संकुले, मंदिर, वाहन विभाग.इ. विभागाकडील बेडशिट, उशिकव्हर, चादर, पडदे, रग, गादीकव्हर, बसेसचे शीटकव्हर, आदी कपडे धुवून इस्त्री केले जातात. सदरचे कपडे धुण्याचेकामी २ युनिट (दोन वॉशिंग मशिन) कार्यान्वित करण्यात आलेले आहेत.

लॉण्ड्रीचे कामकाज गरजेनुसार दोन शिफ्टमध्ये करण्यात येते. त्याद्वारे प्रतिदिवशी (दोन शिफ्ट असल्यास) साधारणपणे १५०० ते १६०० नग कपडे धुवून इस्त्री केले जातात.

धुण्यासाठी येणा-या कपडयांमध्ये प्रामुख्याने नमुद निवासस्थान विभागाकडील व्हि.आय.पी.खोल्यांचे धुतलेले टॉवेल सुकविण्यासाठी तसेच पावसाळा व हिवाळा सिझनमध्ये उन्हाचे प्रमाण कमी असते अशा वेळी धुतलेले कपडे सुकविण्यासाठी ड्रायर मशिनचा वापर केला जातो त्यासाठी बॉयलरद्वारे स्टीम देवून कपडे सुकविले जातात, त्याचप्रमाणे धुतलेल्या कपडयांना इस्त्रीकरणेसाठी कॅलेंडर मशिनचा दैनंदिन वापर केला जातो. याकरीता कॅलेंडर मशिनला स्टीम दयावी लागते. मशिनमध्ये धुवून पिळलेले बेडशिट, उशिकव्हर घातल्यावर सुकून इस्त्री होवून बाहेर पडतात. या दोन्ही मशिनसाठी २०० किलो क्षमतेचा स्टिम बॉयलर कार्यान्वित आहे.

दि.२७/०४/२०१३ रोजी झालेल्या सभेमधील संमत विषय नं.६३ व निर्णय क्र.४०६ मध्ये मे.साईसिध्दी पेट्रोलियम, शिर्डी या पेट्रोल पंप धारकाकडून संस्थानने इंधन खरेदी केल्यास मे.साईसिध्दी पेट्रोलियम, शिर्डी हे संस्थानला प्रती लिटर ३० पैसे प्रमाणे सवलत देण्यास व एक महिन्यापर्यंन्त क्रेडीटवर इंधनाचा पुरवठा करण्यास तयार आहेत, सदरचा पंप संस्थानचे वाहन विभागापासून कमी अंतरावर असल्याने तसेच मे.साईसिध्दी पेट्रोलियम, शिर्डी यांनी प्रती लिटर ३० पेसे प्रमाणे संस्थानला सवलत दिल्याने त्यांचेकडून यापुढे संस्थानचे विविध विभागांना लागणारे सर्व प्रकारचे इंधन घेणेस मान्यता देण्यात आली.मे.इंडीयन ऑईल,कार्पोरेशन लि., साकुरी व मे.श्री साई सर्व्हिस सेंटर, सावळीविहीर हे देखिल संस्थानला प्रती लिटर ३० पैसे आणि एक महिन्यापर्यंन्त क्रेडीट देणेस तयार असतील तर याही पंपावरुन संस्थानचे विविध विभागांना लागणारे सर्व प्रकारचे इंधन आवश्यकतेनुसार खरेदी करण्यात यावे, असे संमत असल्याने–

१) जा.नं.एसएसएस/वाहन/१२६४/२०१३ दि.१३/०६/२०१३. अन्वये साईसिध्दी पेट्रोलियम, साकुरीशिव, नगर-मनमाड रोड, शिर्डी

२) जा.नं.एसएसएस/वाहन/१६९०/२०१३ दि.०९/०७/२०१३. अन्वये मा.आमदार श्री राधाकृष्ण विखे पाटील सहकारी ट्रक्स वाहतूक संस्था लि., प्रवरानगर

३) जा.नं.एसएसएस/वाहन/१६९१/२०१३ दि.०९/०७/२०१३ अन्वये श्री साई सर्व्हिस सेंटर, सावळीविहीर, ता.राहाता, जि. अहमदनगर यांचेकडून आवश्यकतेनुसार खरेदी केले जाते.

माहे जुलै-२०१४ ते माहे- जुन २०१५ या एक वर्षाचे कालावधीकरीता दि.०५/०६/२०१४ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेमधील विषय नं.१३२ व निर्णय क्र.४२० चे मंजुर ठरावान्वये एस.के.जी.ज् साई सिध्दी पेट्रोलियम, शिर्डी यांचे पेट्रोल पंपावरुन आवश्यकतेनुसार डिझेल, ऑईल,ग्रीस खरेदी करण्यात आले व करणार आहोत.

स्टिम बॉयलरकरीता दररोज सरासरी २० लिटर डिझेल x ३० दिवस = दरमहा ६०० लिटर x १२ महिन्याकरीता = ७२०० लिटर लागते, एका वर्षाकरीता स्टिम बॉयलर व कॅलेंडर मशिनकरीता ०५ लिटर ऑईल व सर्व मशिनरी करीता ०३ किलो ग्रीस लागते.

**मागणी-** माहे जुलै -२०१५ ते माहे जुन -२०१६ या एका वर्षाचे कालावधीकरीता अंदाजे ७२०० लिटर डिझेल स्टिम बॉयलरसाठी व कॅलेंडरींग मशिनसाठी ०५ लिटर ऑईल व लॉण्ड्रीतील ०३ किलो ग्रीसची आवश्यकता भासणार आहे.

वरील इंधन खरेदीकामी खालीलप्रमाणे अंदाजे खर्च (संभाव वाढ विचारात घेवून) अपेक्षित आहे.

७२०० लिटर डिझेल x ७० अंदाजे दर रुपये प्रती लिटर = ५,०४,०००/-

०५ लिटर ऑईल x २६० अंदाजे दर रुपये प्रती लिटर = १,३००/-

०३ किलो ग्रीस x ३०० अंदाजे दर रुपये प्रती किलो = ९००/-

**एकूण रुपये – ५,०६,२००/-**

**पुर्णांकित रुपये – ५,१०,०००/-**

**(अंदाजे पुर्णांकित अक्षरी रुपये पाच लाख दहा हजार मात्र)**

वरील इंधन खरेदीकामी अंदाजे रु.५,१०,०००/- (अक्षरी रुपये पाच लाख दहा हजार) मात्र खर्च अपेक्षित आहे.

**संस्थान अधिनियम यानुसार छाननी करुन अनुमान-** नमुद अधिनियमातील तरतुदी नुसार व संमत मा.व्यवस्थापन समितीचे मंजुर ठरावानुसार साईबाबा भक्तनिवासस्थान विभागात असणा-या मशिनरी करीता इंधनाची खरेदी करता येईल.

**विभागाचा अभिप्राय-** माहे जुलै -२०१५ ते माहे जुन -२०१६ या एका वर्षाचे कालावधीकरीता अंदाजे ७२०० लिटर डिझेल स्टिम बॉयलरसाठी व कॅलेंडर मशिनसाठी ०५ लिटर ऑईल व लॉण्ड्रीतील सर्व मशिनरीसाठी ०३ किलो ग्रीसची आवश्यकता असून त्याकामी रु.५,१०,०००/- (अक्षरी रुपये पाच लाख दहा हजार) मात्र खर्च अपेक्षित आहे.

इंधनाचे दर हे शासन ठरवत असते त्यामध्ये वेळोवेळी घट अथवा वाढ होत असते. प्रत्येक ठिकाणचे दर हे स्थानिक कर व अंतर यामुळे कमी जास्त असतात. शासनाने विहित केलेल्या दरामध्ये जे इंधन पंपधारक आपणास दि.२७/०४/२०१३ रोजी झालेल्या सभेमधील संमत ठरावामध्ये नमुदप्रमाणे ३० पैसे प्रति लिटर सुट देईल त्यांचेकडून खरेदी करता येईल.

सन २०१५/२०१६ चे अंदाजपत्रकीय तरतुदीमध्ये धुलाई व गणवेश खर्च याबाबीकरीता तरतुद केलेली आहे.

मागील वर्षाप्रमाणे माहे जुलै -२०१५ ते माहे जुन -२०१६ करीता मागील अटी/शर्ती प्रमाणे स्थानिक पेट्रोल पंप धारकांकडून इंधन खरेदीस अंदाजे रुपये ५,१०,०००/- (अक्षरी रुपये पाच लाख दहा हजार) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा.उपसमितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, साईबाबा भक्तनिवास विभागाकडील लॉण्ड्रीतील स्टीम बॉयलरकरीता प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे वार्षिक इंधन खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.५,१०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईबाबा भक्तनिवासस्थान)

---

**१६ श्रावण महिन्यातील श्री साईसच्चरीत पारायण सोहळा मंडप- २०१५ कार्यक्रमासाठी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेबाबत.**

अधिनियमाच्या कलम १७ मधील पोट – कलम (२) च्या खंड (ठ) अन्वये श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लिला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील या प्रयोजनासाठी विश्वस्तव्यवस्थेचा निधी समितीकडून खर्च करण्याची तरतूद आहे.

**प्रस्तावना:–** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी तर्फे सालाबाद प्रमाणे याही वर्षी श्रावणमास निमित्त दि.१५/०८/२०१५ ते दि.२३/०८/२०१५ या कालावधीत श्री साईसच्चरीत पारायण सोहळा आयोजित करणे प्रस्तावीत आहे. सदरचे कार्यक्रमाकरीता मंडप, कमानी, स्टेज व इतर अनुषंगीक व्यवस्था करावी लागेल. त्यानुसार सदरहू कार्यक्रमासाठी मंदिर परिसराचे पूर्वेकडील मोकळया जागेत इकडील विभागामार्फत एम.एस. कॉलम व कैच्या वापरुन ताडपत्रीचे छत असलेला डोम टाईप मंडप, पार्टीशन, स्टेज, स्वागत कमानी, मॅटींग, मेकअप रुम, बॅरेकेडींग, कनात इ. व्यवस्था खालीलप्रमाणे करुन घेता येईल.

**कालावधी दि.१५/०८/२०१५ ते दि.२३/०८/२०१५ अखेर ९ दिवस.**

| अ.नं. | मंडपाचा तपशिल | साईज / नग | परिमाण | अंदाजे दर (९ दिवसां करीता) प्र.चौ.फुट | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | वॉटरप्रुफ छत असलेला व आतील बाजूने सुशोभित कापडी मंडपाची उभारणी करणे. (लोखंडी कॉलम व कैच्याचे नटबोल्ट फीटींग असलेला डोम टाईप मंडप) | २१०'x८०' | १६८००.०० चौ. फुट | १४.४० प्र.चौ.फुट | २,४१,९२०/- |
| ०२ | स्टेज व्यवस्था:- ३०x२० साईजचे स्टेज, जमिनीपासून ३ फुटापर्यंत उंची असलेले भक्कम स्टेज तयार करणे. स्टेजवर मॅटींग टाकणे. | ३०'x१८' | ५४०.०० चौ. फुट | ५७.६० प्र.चौ.फुट | ३१,१०४/- |
| ०३ | स्वागत कमानी २x२ साईजचे बॉक्सच्या ०२ नग कमीत कमी १५ फुट रुंदीच्या बॉक्स टाईप कमानी बांधणे. | ०२ नग | ०२ नग | ४११३/- प्रति नग | ८२२६/- |
| ०४ | संपूर्ण मंडपात मॅटींग व सतरंजी टाकणे | १५.०० फुट रुंद | १६५००.०० चौ.फुट | २.४३ प्रति चौ.फुट | ४०,०९५/- |
| ०५ | ग्रीन रुम:- साईडने ताडपत्री व आतिल बाजूस सुशोभित कापड लावून २०x१८ साईजची ग्रीन रुम तयार करणे व रुममध्ये मॅटींग टाकणे. | २०'x१८' | ३६०.०० चौ. फुट | ४१.१३ प्रति चौ.फुट | १४८०७/- |
| ०६ | मंडपाचे पुर्व व पश्चीम बाजूने पूर्ण ६ फुट उंचीची कनात आवश्यक सपोर्ट देवून लावणे. | ५०० र. फुट | ५०० र. फुट | १६.४७ र.फुट | ८२३५/- |
| | | | | **एकूण रक्कम रु.** | **३,४४,३८७/-** |
| | | | | **पुर्णाकीत रक्कम रु.** | **३,४५,०००/-** |

वरील तक्त्यात नमूद केलेप्रमाणे श्री साईसच्चरित पारायण सोहळा २०१५ करिता श्री साईभक्तांचे सोयीसाठी मंडप व इतर व्यवस्था करणेकामी अंदाजे रु.३,४५,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

तरी वरील तपशिलाप्रमाणे मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी रु.३.४५ लक्ष मात्रचे खर्चास तसेच याकामी वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन ई – निविदा मागविणेस मान्यता असावी.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईसच्चरित पारायण सोहळा २०१५ मध्ये पारायणार्थीच्या सोयीसाठी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करण्यात येऊन ई-निविदांची मागणी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.३,४५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**१७ श्री साईप्रसादालय येथील मुख्य भोजन हॉलमध्ये अन्नदान कक्ष तयार करणेसाठी ॲल्युमिनीअम पार्टीशन तयार करणेबाबत.**

**<u>श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) अधिनियम – २००४ मधिल तरतूद:-</u>**

अधिनियमाच्या कलम २१ मधिल पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये ''मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्ताची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे'' या प्रयोजनासाठी विश्वस्तव्यवस्थेचा निधी समितीकडून खर्च करण्याची तरतूद आहे.

**प्रस्तावना:-**

संस्थानचे जुने प्रसादालय परिसरात असणारे लाडू किचन व बुंदी सुकविणे तसेच लाडू बांधणीचा हॉल रिकामा करुन श्री साई प्रसादालय परिसरात हलविणेची कार्यवाही श्री साईप्रसादालय विभाग व लाडू प्रसाद विभागामार्फत करणेत येत आहे. याकरिता श्री साईप्रसादालयातील अन्नदान कक्षामध्ये लाडू प्रसाद निर्मिती विभागासाठी बुंदी सुकविणे, लाडू बांधणे इ. कामासाठी वापर करावयाचा आहे. त्यासाठी श्री साई प्रसादालयात गरीब व गरजू लोकांना देण्यात येत असलेल्या मोफत प्रसाद भोजनाची व्यवस्था श्री साई प्रसादालय तळमजल्यावरील मुख्य डायनिंग हॉलचे दक्षिण पश्चिम बाजूस, आग्नेय कोपर-यात स्थलांतरीत करणेबाबत मा. कार्यकारी अधिकारी सो. यांनी दि.१०/०५/२०१५ रोजीचे राऊंडमध्ये सुचना केल्या आहेत. त्यानुसार सदर ठिकाणी सहा फुट उंचीचे अल्युमिनीअम पार्टीशन टाकून अन्नदान कक्षासाठी जागा तयार करता येईल. याकामी खालील प्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| Sr. No | Particulars | Quantity | Unit | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1. | Providing supplying and fixing in position, powder coated Aluminium partition having frame made out of extruded tubular section of size 65mm x 40 mm (2.5''x 1.5'') with 12 mm thick three layered flat pressed teak wood particle board bonded with BWP type exterior grade phenolfomaldehyde synthetic resin conforming to IS 12823 – 19890, Laminated on both sides, Novateak or equivalent. Fixing M.S. square pipe 03 no's of 50mm x 35mm size as per drawing for support etc. complete. Aluminium Section – Jindal<br>30'x6' = 180 Sq ft.<br>15' x6' = 90 Sq ft. | 270 | Sqft. | 170/- | 45900.00 |
| | | | | **Total Rs.** | **45,900.00** |

तरी उपरोक्त कामी येणाऱ्या रक्कम रु.४५,९००/- मात्रचे खर्चास व याकामी स्थानिक ठेकेदार यांचेकडून दरपत्रके मागविणेस मान्यता असावी.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, अन्नदान कक्ष तयार करणेसाठी जागेची पाहणी करुन फेर प्रस्ताव सादर करण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

१८ **श्री साईप्रसादालयातील पश्चिम बाजूस साईभक्तांसाठी प्रसादालय परिसरातून बाहेर जाण्यासाठी रस्ता करणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) अधिनियम– २००४ मधिल तरतुद:-** अधिनियमाच्या कलम २१ मधिल पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये "मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्ताची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे" या प्रयोजनासाठी विश्वस्तव्यवस्थेचा निधी समितीकडून खर्च करण्याची तरतुद आहे.

**प्रस्तावना:-** श्री साई प्रसादालयातील पश्चिम बाजूस संस्थान हददी लगत सिमेंट ब्लॉक बसवून भक्तांना बाहेर पडणेसाठी केलेला रस्ता सरळ गार्डनमधून प्रसादालयाचे बाहेरील बाजूचे पुर्व – पश्चिम रस्त्याला जोडून सदर रस्त्यावर सिमेंट ब्लॉक बसविणेत अथवा कॉक्रीटकरण करणेबाबत मा. कार्यकारी अधिकारी यांनी दि.१०/०४/२०१५ रोजी सुचना दिलेल्या असून, याबाबत श्री साईप्रसादालय विभाग यांनी दि.११/०४/२०१५ रोजीचे मंजूर टिपणी अन्वये इकडील विभागास कळविले आहे.

**प्रस्ताव:-** श्री साई प्रसादालयाचे नैऋत्य बाजूस असलेल्या गार्डनमधून १२ फुट रुंदीचा रस्ता केल्यास प्रसाद भोजन घेऊन बाहेर पडणा-या साईभक्तांना सरळ प्रसादालय परिसराचे बाहेर जाता यईल. यासाठी १०० फुट लांबीचा व १२ फुट रुंदीचा रस्ता तयार करावा लागेल. यासाठी सध्याचे गार्डनमधील लॉन काढून तेथे खोदकाम करुन मुरुम भराई करणे, ९ इंच जाड सोलींग करणे व ८० एम.एम. जाड M40 ग्रेडचे पेव्हींग ब्लॉक बसविणे इ. कामे करावी लागतील. याकामी जिल्हादर सुची २०१४-१५ नुसार अंदाजे रक्कम रु.१,८२,२६३/- मात्रचा खर्च अपेक्षित आहे.

तरी श्री साई प्रसादालय परिसरातून साई भक्तांना बाहेर जाण्यासाठी गार्डनमधून पेव्हींग ब्लॉक टाकून रस्ता करणेस व याकामी येणारे रक्कम रु.१,८२,२६३/- मात्रचे खर्चास तसेच याकामासाठी विहीत पध्दतीने निविदा मागवून सदरचे काम करणेस मानूयता मिळणेस विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

१९ **संस्थानचे श्री इंग्लिश मिडीअम स्कुल येथील हॉलला ॲल्युमिनीअम पार्टीशन तयार करणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) अधिनियम– २००४ मधिल तरतूद:-** अधिनियमाच्या कलम २१ मधिल पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये "मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्ताची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे" या प्रयोजनासाठी विश्वस्तव्यवस्थेचा निधी समितीकडून खर्च करण्याची तरतूद आहे.

**प्रस्तावना:-** संस्थानचे औदयोगिक प्रशिक्षण संस्थेमधील तळमजल्याचा हॉल दि.२२/०४/२०१५ रोजीचे मंजूर टिपणी अन्वये श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कूलकडे वर्ग करण्यात आला असून, सदर हॉलमध्ये श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल करीता ०२ वर्ग खोल्या तयार करणेकामी ॲल्युमिनीयम पार्टीशन टाकून मिळणेबाबत मा. प्राचार्य, श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कूल यांनी दि.३०/०४/२०१५ रोजीचे पत्रान्वये इकडील विभागास कळविले आहे.

**प्रस्ताव:-** त्यास अनुसरुन इकडील विभागामार्फत सदर हॉलची समक्ष पहाणी करणेत आली असून, त्या ठिकाणी अल्युमिनीयम पार्टीशन टाकणेकामी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| Sr. No. | Particulars | Quantity | Unit | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1. | Providing supplying and fixing in position, powder coated Aluminium partition having frame made out of extruded tubular section of size 65mm x 40 mm (2.5" x 1.5") with 12 mm thick three layered flat pressed teak wood particle board bonded with BWP type exterior grade phenolfomaldehyde synthetic resin conforming to IS 12823 – 19890, Luminated on both sides, Novateak or equivalent. Fixing M.S. square pipe 03 no's of 50mm x 35mm size as per drawing for support etc. complete. Aluminium Section – Jindal Size - 10'x20' = 200 Sq ft. | 200 | Sqft. | 170/- | 34000/- |
| | | | | **Total Rs.** | **34,000/-** |

तरी उपरोक्त कामी येणा-या रक्कम रु.३४,०००/- मात्रचे खर्चास व याकामी स्थानिक ठेकेदार यांचेकडून दरपत्रके मागविणेस मान्यता असावी.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, शैक्षणिक संकूलाकडे श्री साईबाबा इंग्लिश मिडीअम स्कूलमधील हॉलला ॲल्युमिनीअम पार्टीशन तयार करणेकामी स्थानिक ठेकेदारांकडून विहित पध्दतीने दरपत्रके मागविणेस व यांकामी येणा-या अंदाजे रु.३४,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

२० **श्री साईबाबा समाधी मंदिर परिसरात प्रथमोपचार केंद्रासाठी देण्यात आलेल्या खोल्यांचे रंगकाम करणे व ॲल्युमिनीअम विंडो बसविणे, कारपेट व डोअर क्लोजर बसविणे इ. कामे करणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:-** अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये,मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्ताची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी विश्वस्तव्यवस्थेचा निधी समितीकडून खर्च करण्याची तरतुद आहे.

**प्रस्तावना:-** श्री साईबाबा समाधी मंदिर परिसरामध्ये गर्दीचे कालावधीत व इतर वेळी साईभक्त अचानक आजारी पडल्यास तातडीची वैद्यकीय सेवा देणेसाठी सन १९८७ – ८८ पासून श्री साईनाथ रुग्णालयामार्फत दिक्षित वाडयाचे इमारतीमध्ये प्रथमोपचार केंद्र सुरु करण्यात आलेले आहे. त्याची वेळ सकाळी ७:०० ते दुपारी ३:०० आणि दुपारी ३:०० ते रात्री ११:०० पर्यंत असते. यासाठी एक वैद्यकीय अधिकारी, दोन परिचारीका, दोन वॉर्डबॉय, तसेच दोन आया इ. कर्मचारी दररोज नेमणूक केली जाते. सदर रुमची जागा कर्मचारी व पेशंटसाठी अपुरी पडते. त्यामुळे मंदिर परिसरात साईभक्त श्री आब्दुल बाबा यांचे समाधी पाठीमागील बाजूस असलेल्या दोन रुम श्री साईनाथ रुग्णालय यांचे ताब्यात देण्यात आलेल्या असून, सदरहू रुममध्ये रंगकाम करणे, ॲल्युमिनीअम विंडो बसविणे, कारपेट बसविणे आणि दरवाजास डोअर क्लोजर बसवून देणेबाबत श्री साईबाबा हॉस्पीटल यांनी दि.२७/०४/२०१५ रोजीची टिपणी अन्वये कळविले आहे.

दि.०६/०५/२०१५ रोजी उपरोक्त खोल्यांची पहाणी इकडील विभागामार्फत केली असून, दुरुस्ती कामांसाठी खालील प्रमाणे अंदाजे खर्च अपेक्षित आहे.

**अ) आतिल रंगकाम करणे.**

**१) मटेरियल खर्च:-**

| अ.नं. | मटेरियलचा तपशिल | परिमाण / एकक | प्रचलित दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | लस्टर पेन्ट (१० लिटरचा एक ड्रम) | १५ लिटर | २४०/- | ३,६००/- |
| ०२ | टरपेन | ०५ लिटर | १००/- | ५००/- |
| ०३ | वॉल पुट्टी (२० किलोची एक बॅग) | २० किलो | ४५/- | ९००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०४ | पॉलिश पेपर (६० नंबर, १०० नंबर) | ०२ डझन | १२०/- | २४०/- |
| ०५ | प्रायमर | १० लिटर | १००/- | १०००/- |
| एकूण रु. | | | | ६,२४०/- |

२) मजुरी खर्च: –

| अ.नं. | कामाचा तपशिल | परिमाण / एकक | प्रचलित दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | सिलींगचा व भिंतीचा जुना रंग घासून टचअप पुट्टी करुन दोन कोट लस्टर पेन्ट रंगकाम मजुरी दराने करणे. | ९३० चौ.फुट | ३.५० | ३,२५५/- |
| | | | एकूण रु. | ३,२५५/- |

**एकूण मटेरियल व मजुरी खर्च रु.९,४९५/-**

**ब) कारपेट टाकणे:-**

| अ.नं. | कामाचा तपशिल | परिमाण / एकक | प्रचलित दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | मटेरियल व मजुरीसह फ्लोरींगवर २ एम.एम. जाडीचे पी.व्ही.सी. कारपेट बसविणे. | २१५ चौ.फुट | ५०/- | १०,७५०/- |
| | | | एकूण रु. | १०,७५०/- |

**क) डोअर क्लोझर:-**

| अ.नं. | तपशिल | परिमाण / एकक | प्रचलित दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | डोर क्लोझर खरेदी करुन इकडील विभागामार्फत बसविणे. | ०२ नग | १०००/- | २,०००/- |
| | | | एकूण रु. | २,०००/- |

**ड) ॲल्युमिनीअम स्लायडींग विंडो बसविणे -**

| अ.नं. | तपशिल | परिमाण / एकक | डी.एस.आर दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | मटेरियल व मजुरी कामासह ॲल्युमिनीअम टू ट्रॅक स्लायडींग खिडक्या बसविणे. | ०३ चौ. मिटर | ४४०१/- | १३,२०३/- |
| एकूण रु. | | | | १३,२०३/- |

**एकूण खर्च अ+ब+क+ड = ३५,४४८/-**

**प्रस्ताव:-** तरी श्री साईबाबा मंदिर परिसरातील प्रथमोपचार केंद्रासाठी देण्यात आलेल्या दोन खोल्यांमध्ये उपरोक्त प्रमाणे सिव्हील वर्कचे काम करणेसाठी रु.३५,४४८/- मात्रचे खर्चास व सदरहू काम करणेसाठी आवश्यक मटेरीयल आणि मजुरी कामासाठी मजुर ठेकेदार यांचेकडून विहीत पध्दतीने कोटेशन्स मागवून काम करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा मंदिर परिसरातील प्रथमोपचार केंद्रासाठी देण्यात आलेल्या दोन खोल्यांमध्ये प्रस्तावात नमूदकेले प्रमाणे सिव्हील वर्कचे काम करुन घेणेसाठी मजुर ठेकेदारांकडून विहित पध्दतीने कोटेशन मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.३५,४४८/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

२१ **श्री साईबाबा रुग्णालयातील CRU-1 मध्ये फॉल्स सिलींग करणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम 2004 मधील तरतुद :** अधिनियमाचे कलम 21 मधील पोटकलम (1) चा खंड (क) अन्वये, "मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची देखभाल व्यवस्थापन व प्रशासन करणे अशी तरतुद आहे".

**प्रस्तावना:** श्री साईबाबा सुपर स्पेशालिटी रुग्णालयातील CRU-I विभागात सन-२००५-२००६ मध्ये मेटल फॉल्स सिलींग श्री साईबाबा रुग्णालयाव्दारे एअरबोर्न क्लीनलीनेस सर्व्हिसेस, मुंबई यांचेमार्फत करण्यात आले आहे. वैद्यकिय संचालक यांनी दि.११/०३/२०१५ रोजीचे पत्रान्वये फॉल्स सिलींग दुरुस्ती करणेबाबत इकडील विभागास कळविले आहे. याबाबत इकडील विभागामार्फत पाहणी करणेत आली असून, सदर मेटल फॉल्स सिलींग काही ठिकाणी सॅग झालेली आहे तसेच काही ठिकाणी सदर सिलींगचे शिटस् निघत आहेत. सदर सिलींग ही क्लीप इन सिस्टीमची असल्याने मेन्टेनन्स करणे अवघड आहे. तसेच सदर सिलींग करुन बराच कालावधी झालेला आहे. त्यामुळे सदर ठिकाणी नवीन फॉल्स सिलींग करणे योग्य राहील.

**प्रस्ताव:** उपरोक्त विषयांकीतकामी खालील तपशिलाप्रमाणे मटेरीयल व खर्चाची आवश्यकता आहे.

| Sr. No. | Description | Size | Qty. | Unit | Approx. Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|---|
| 01. | Metal False Ceiling Details: Providing & fixing True horizontal level 600mm X 600mm X 0.5mm, Metal False Ceiling system as per the following Spec.:600x600mm square edge unperforated tiles, weight - 2kg/$m^2$, colour - white, | 21.5 X 14.00 | 301.00 | Sqm | 1850/- | 5,56,850/-. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | tegular edge of 15 mm, 0.71mm Aluminum finish with 50 micron thk. approved powder coating, with G.I. perimeter L-Channel, intermediate T-grid channels with powder coating. Suspension - 0.45mm thk. of size 25mm x 2440mm GS carrier, GS sil carrier coupler, GS 1.15mm thk. hold on hangers, GS 1.2mm pressure clip, 4mm dia. galvanized rod, powder coated height adjustment spring steel clip and other components for design and drops and to the entire satisfaction of Sansthan with all necessary fittings & fixtures. (Makes – Armstrong- Unperforated) | | | | | |
| 02. | <u>Removing Existing Metal False Celing</u>: Removing the existing suspended metal false ceiling of 2'x2' grid, including removing all necessary G.I. L-Channels, G.I. T-Grid, stacking the material at specific location at G. Floor, transport, scaffolding and all necessary labour, material and machinery etc. complete. | 21.5 X 14.00 | 301.00 | Sqm | 110/- | 33,110/-. |
| | | | | | Total (Rs.): | 5,89,960/-. |
| | | | | | Add Contingencies@ 5%: | 29,498/-. |
| | | | | | Total Amount (Rs.): | 6,19,458/-. |

उपरोक्त तपशिलानुसार सदरकामी रु.६,१९,४५८/- मात्रचा खर्च अपेक्षीत आहे. तरी याकामी येणारे खर्चास व सदरचे काम विहीत पध्दतीने ई-निविदा मागवून करुन घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील CRU-1 मध्ये फॉल्स सिलींग करणेकामी प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे मटेरीअल खरेदीकरणेकामी विहित पध्दतीने ई-निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.६,१९,४५८/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

२२ **संस्थानच्या व्यायामशाळा परिसरामध्ये पेव्हींग ब्लॉक बसविणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:**

अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम (१) च्या खंड (क) अन्वये, "मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेंच्या मालमत्तेची देखभाल व्यवस्थापन व प्रशासन करणे," अशी तरतुद आहे.

**प्रस्तावना:** संरक्षण अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी दि.२५/०४/२०१५ रोजीचे पत्रान्वये व्यायाम शाळा परिसरामध्ये प्रत्यक्ष पाहाणी करुन पेव्हींग ब्लॉक बसवून देणेकामी कळविले आहे. व्यायाम शाळा परिसरामध्ये उत्तर व पूर्व बाजुस काही भागात पेव्हिंग ब्लॉक बसविण्यात आले आहेत. आता सदर इमारतीच्या दक्षिण व पश्चिम बाजुकडील व सांडपाणी प्रक्रीया सयंत्र (STP) चे काही भागात एकुण २७५ चौ. मी. क्षेत्रात पेव्हिंग ब्लॉक बसविणे गरजेचे आहे, जेणेकरून सदरहु परीसर स्वच्छ दिसेल व साफसफाई करणे सोईचे होईल असे मत आहे.

**प्रस्ताव:** त्यानुसार याकामी इकडील विभागामार्फत प्रत्यक्ष पाहणी करणेत येऊन मोजमापे घेण्यात आली व ले-आउट प्लॅन तयार करणेत आलेला आहे. सदरकामी चालू जिल्हा दर सूची (२०१४-२०१५) नुसार तयार केलेल्या अंदाजपत्रकानुसार रू.२,४०,५०६/- मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे.

तरी याकामी येणारे रू.२,४०,५०६/- मात्रचे खर्चास व सदरकामी विहीत पध्दतीने वर्तमानपत्रातील जाहिरातीव्दारे निविदा मागविणेकामी सदरहु प्रस्ताव मा. उप समितीचे सभेपुढे सादर करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे व्यायामशाळा परिसरामध्ये प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे पेव्हींग ब्लॉक बसविणेकामी विहीत पध्दतीने निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.२,४०,५०६/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

२३ **श्री साईबाबा हॉस्पिटलमधील न्युरो ओ.टी. वरील डोमचे पॉलिकार्बोनेट शिट बदलणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद :** अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

**मागणी :** वैद्यकिय संचालक, श्री साईबाबा हॉस्पीटल यांनी त्यांचेकडील दिनांक १८ मे, २०१५ रोजीचे पत्रान्वये Neuro OT मधील Reception रुममध्ये पाऊस आल्यानंतर पाणी फॉल्स सिलींगमधून खाली गळत असल्याने सिलींगचे वरती बसविलेले पॉलीकार्बोनेट शिट बदलून मिळणेबाबत विनंती केली आहे.

**प्रस्ताव:** वैद्यकिय संचालक, यांचे विनंतीनुसार श्री साईबाबा हॉस्पीटल मधील Neuro OT मधील Reception रुमची इकडील विभागामार्फत समक्ष पहाणी करणेत आली असून, Reception रुमचे वरील छतास बसविलेले पॉलीकार्बोनेट शिटला काही ठिकाणी तडे / क्रॅक गेलेले असल्याने, पावसाळ्याचे दिवसात पावसाचे पाणी सदरहू छतामधून गळती होत असते. करीता सदरचे छतास नवीन पॉलीकार्बोनेट शिट बसविणे आवश्यक आहे. त्यासाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| Sr. no. | Description | Qty. / Unit | Rate | Amount |
|---|---|---|---|---|
| 01. | Providing and fixing 10 mm polycarbonate multiwall Ultra-Voilet protected sheet for roofing over existing fabricated steel structure including fixing the polycarbonate sheet with aluminum angle and flat anodized and dyed as per approved shade including all water proofing sealant materials, nuts bolts, hardware, labour complete including all scaffolding etc. as required. (Only actual area of polycarbonate sheets to be considered for measurements) | 22 m2 | 2200/- | 48,400/- |
| | | | **Total Amount Rs. :** | **48,400/-** |

वरील प्रमाणे विषयांकीत कामासाठी रु.४८,४००/- मात्र खर्च अपेक्षीत आहे. तरी याकामी येणारे खर्चास व सदरचे काम विहीत पध्दतीने दरपत्रके मागवून करुन घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलमधील न्युरो ओ.टी. वरील डोमचे पॉलिकार्बोनेट शिट बदलणेसाठी विहित पध्दतीने दरपत्रके मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.४८,४००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

२४ **झेरॉक्स मशिन मॉडेल नं.५७५५ साठी फ्युजर मॉडेल पार्टच्या खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.**

प्रशासन विभागात सध्या झेरॉक्स कंपनीचे मॉडेल नं.५७५५ व मॉडेल नं.७५५६ या दोन झेरॉक्स मशीन कार्यरत आहेत. यापैकी मशीन मॉडेल नं.५७५५ ची फयुजर मॉडेल या पार्टची क्षमाता संपत आलेली होती. सदर मशीन वर तसा मेसेज येत होता. त्यामुळे मशीन कोणत्याही क्षणी बंद पडले असते.

दैनंदिन कार्यालयीन कामकाजा मध्ये कागदपत्रांच्या झेरॉक्स काढण्याकरीता मशीन सुव्यवस्थितीत असणे आवश्यक असल्याने सदरच्या फयुजर मॉडेल हा पार्ट बदलणे गरजेचे होते.

सदरचा पार्ट हा मानोपॉल ॲटम असल्याने तो झेरॉक्स कंपानीच्याच पुरवठा धारकांकडून खरेदी करावा लागणार होता. म्हणून संदर्भ ०१ चे मंजूर टिपणीने १० पुरवठा धारकांकडून सिलबंद दरपत्रके मागविणेसाठी मंजूरी घेतली होती. सदर मंजूरीस अनुसरुन मुदतीत ०६ सिलबंद दरपत्रके प्राप्त झाली होती. आलेली दरपत्रके उघडून सरला एन्टप्रायजेस, औरंगाबाद यांचेकडून न्यूनतम दराने फयुजर पार्ट खरेदी करण्यात आलेला आहे. सरला एन्टप्रायजेस, औरंगाबाद यांनी संदर्भ क्र ०५ अन्वये सदर पार्टचे बील रु.४७,७७५/- पाठविलेले आहे. सदरचे बील आदा करण्यास कार्योतर मान्यता आसावी ही विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, झेरॉक्स मशिन मॉडेल नं.५७५५ चा फ्युजर मॉडेल पार्ट बदलणेसाठी आलेल्या रु.४७,७७५/- मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.**

(कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी- १२)

---

२५ **संस्थान वाहनांसाठी नवीन बॅट-या खरेदी करणेबाबत.**

वाहन विभागाकडे संस्थान कार्यालयीन कामासाठी-१२, सर्व विभागाचे मालवाहतुकीसाठी-२२, श्री इंग्लिश मिडीअम स्कुलचे विद्यार्थी व साईभक्त ने-आण करणेसाठी २३ बसेस, तसेच रुग्न ने आण करणेसाठी ०९ रुग्णवाहीका अशी एकुण ६६ वाहने वापरात आहेत. सदर वाहनांकरीता खालील तपशिलात दिले प्रमाणे बॅटरीजची आवश्यकता भासते.

| अं.क्र. | बॅटरी प्रकार | वाहन प्रकार |
|---|---|---|
| 01 | 150 Ampere | बसेस |
| 02 | 130 / 120 Ampere | बसेस |
| 03 | 88 Ampere | टाटा-११०९, टाटा-४०७, स्वराज ट्रॅक्टर |
| 04 | 75 Ampere | टोयोटा ईनोव्हा, महिंद्रा बोलेरो, टाटा विंगर, रुग्णवाहीका |
| 05 | 70 Ampere | महिंद्रा XUV |
| 06 | 65 Ampere | टाटा-ACE, महिंद्र मॅक्स |
| 07 | 55 Ampere | मारुती इको रुग्णवाहीका |
| 08 | 38 Ampere | ट्रॅक्टर |
| 09 | 40 / 35 Ampere | टाटा नॅनो. |

वरील वाहनांचे बॅटरीज सततचे वापराने खराब होतात. माहे जुन-२०१४ ते माहे मे-२०१५ या एक वर्ष कालावधीकरीता बॅटरीज पुरविणेकामी परिसरातील एक्साईड / एस. एफ. सोनीक कंपनीचे अधिकृत डिलर्स यांचेकडून वार्षिक दरपत्रके घेवून निम्नतम दरधारक साई ॲटो बॅटरी सर्व्हिस, शिर्डी यांना कार्यादेश देण्यात आला होता. सदर

कार्यादेशाची मुदत माहे मे-२०१५ अखेर संपुष्ठात येत आहे. त्यामुळे पुढील एक वर्षे कालावधीसाठी संस्थान वाहनांकरीता आवश्यकतेनुसार बॅटरीज पुरविणे कामी परीसरातील एक्साईड, एस. एफ. सोनीक, अॅमरॉन, प्रेस्ट्रोलाईन, पॅनासोनिक व टाटा या नामांकित कंपनीचे बॅटरी पुरवठारांकडून सिल बंद दरपत्रके बोलविणे आवश्यक आहे.

तरी संस्थान वाहनांकरीता माहे जुन-२०१५ ते माहे मे-२०१६ या कालावधीसाठी एक वर्षाकरीता आवश्यकतेनुसार नवीन बॅटरीज विहीत पध्दतीने मंजुर दराने खरेदी करणे कामी नामांकित कंपनीचे अधिकृत डिलर्स यांचेकडून सिलबंद दरपत्रके बोलाविणेस तसेच बॅटरीज खरेदीसाठी येणा-या खर्चास मान्यता मिळणे कामी विषयाची टिपणी मा.उपसमितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

२६ **पुरवठा केलेल्या तांदुळाबाबत.**

माहे आक्टोबर २०१४ ते मार्च २०१५ या कालावधीसाठी ३०५० क्विंटल तांदुळ, सोना मसुरी, जुना रु.३,३४१/- प्रती क्विंटल या दराने मे.संदिप ट्रेडींग कंपनी, नांदेड यांना पुरवठा आदेश देण्यात आलेला होता. तथापि मागील तांदुळाचा साठा शिल्लक असल्यामुळे त्यांचेकडून या कालावधीत तांदुळ खरेदी करण्यात आलेला नाही.

मागील शिल्लक असलेल्या तांदुळाच्या साठ्यामध्ये अळया व बादड आढळून आल्यामुळे त्याचा वापर थांबविण्यात आलेला होता. ऐनवेळी गैरसोय होऊ नये म्हणून साईभक्तांकडून काही तांदुळ देणगी मिळालेला होता. साईभक्तांना प्रसादभोजनाच्या सेवेमध्ये अडथळा येऊ नये म्हणून व सन २०१५-१६ करीता किराणामाल खरेदीची निविदा प्रक्रिया पुर्ण झालेली नसल्याने वरील कालावधीतील मे.संदिप ट्रेडींग कंपनी, नांदेड यांचेकडून त्यांना दिलेल्या पुरवठा आदेशाच्या २५% म्हणजेच ७६२.५० क्विंटल तांदुळ खरेदी करण्याचा पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. त्यापैकी ४५० क्विंटल तांदुळ दिनांक १६.०४.२०१५ रोजी मागणी करण्यात आलेला होता. सदरचा साठा संपलेला आहे. म्हणून उर्वरीत ३१२.५० क्विंटल तांदुळ दिनांक ०५.०५.२०१५ रोजी मागणी केलेला आहे. यापैकी दिनांक ०८.०५.२०१५ रोजी १५८.७२ क्विंटल (३२० गोणी) व दिनांक १३.०५.२०१५ रोजी १५१.५८ क्विंटल (३०५ गोणी) तांदुळ पुरविलेला आहे.

प्रसादालय विभागाने दिनांक १८.०५.२०१५ रोजी तांदुळामध्ये अळया व बादड असल्याचे लेखी पत्राने कळविलेले आहे. म्हणून संस्थानचे मा.कार्यकारी अधिकारी, मुख्यलेखाधिकारी, प्रशासकीय अधिकारी, अधिक्षक प्रसादालय, अधिक्षक भांडार, प्र.अधिक्षक खरेदी यांनी तातडीने संबंधित तांदुळाची पाहणी केली असता त्यात सत्यता आढळली आहे. अशा पुरवठा झालेल्या तांदुळाचा भात करुन भक्तांना प्रसाद रुपात देणे आरोग्याच्या दृष्टिने घातक आहे. त्यामुळे सदर पुरवठाधारक यांना पुरविलेल्या तांदुळापैकी सध्या संस्थानचे भांडार व प्रसादालय विभागांमध्ये शिल्लक असलेला एकुण ४७६ गोणी तांदुळ त्वरीत स्वखर्चाने करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार घेऊन जाणेबाबत कळवावे अन्यथा सदरचा तांदुळ अन्न व औषध प्रशासन यांचे ताब्यात देऊन पुढील कारवाई करण्यात येईल, असे लेखी पत्राद्वारे कळविण्यात यावे व साईभक्तांना प्रसाद भोजनामध्ये अडथळा येऊ नये व सन २०१५-१६ करीता किराणामालचे पुरवठा आदेश अंतिम झालेले नसल्यामुळे तातडीने सन २०१५-१६ चे किराणामालाचे वार्षिक खरेदीतील निवड केलेल्या न्युनतम दरधारक मे.रामनाथ जगन्नाथ अॅण्ड कंपनी, नाशिक यांचे न्युनतम दर रु.२,९७५/- प्रती क्विंटल या दराने ३०० क्विंटल तांदुळ खरेदी करणेत यावा, असे ठरले. यानुसार मे.संदिप ट्रेडींग कंपनी, नांदेड यांना माल परत घेऊन जाणेबाबत दुरध्वनीद्वारे व दि.१८.०५.२०१५ चे पत्राव्दारे कळविले आहे. तसेच मे.रामनाथ जगन्नाथ अॅण्ड कंपनी, नाशिक यांना ३०० क्विंटल तांदुळ, स्टिम कोलम, जुना पुरविणेबाबत दुरध्वनीद्वारे कळविलेले आहे. त्यानुसार उद्या दुपारपर्यंत २० क्विंटल तांदुळाचा पुरवठा होईल, असे संबंधितांनी सांगितले आहे.

उपरोक्तप्रमाणे मे.रामनाथ जगन्नाथ अॅण्ड कंपनी, नाशिक यांना ३०० क्विंटल तांदुळाचा पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. त्यासाठी (३०० क्विंटल x प्रती क्विंटल रु.२,९७५/-) = एकुण रु. ८,९२,५०० (अक्षरी रुपये आठ लाख बॅन्नव हजार पाचशे) मात्रचे येणा-या खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा. उपसमितीचे सभेसमोर निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावामध्ये नमूद केलेल्या कार्यवाहीस व आलेल्या रु.८,९२,५००/- मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

२७ **जादा वैद्यकिय बीलाचा परतावा अदा करणेस मंजुरी मिळणेबाबत.**

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. –** १) जा. नं. एसएसएस-वशी रुग्णालय ५८२-९७ दि. १६/०१/१९९९. २) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०८/०२/२००९ निर्णय क्र. ७५ अन्वये रु. १०,०००/- पर्यंत मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात तर त्यावरील खर्चाची बिले ही मा. व्यवस्थापन समितीचे सभेच्या मान्यतेने अदा करावी.

**प्रास्ताविक –** खालील संस्थान कर्मचा-यांची रु. १०,०००/- पर्यंतची खर्चाची मर्यादा संपल्यामुळे रु. १०,०००/- पेक्षा जास्त खर्चाचे बिले परतावा मिळणेकामी सादर केलेले आहेत.

**मागणी –**

| अ. नं. | कर्मचा-याचे नाव | कर्मचा-याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयाचे नाव | एकूण मागणी रक्कम | एकूण देय रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पिटल मध्ये उपचार घेतलेले | | | | | | |
| १ | सतिष गोविंद कासार | स्वतः | Diabeties | डॉ. शुभा वर्मा | साईबाबा हॉस्पिटल | १९४३.०० | १९४३.०० |
| २ | डॉ. विष्णुपंत रामेश्वर राठी | स्वतः | Psychatric Treatment | डॉ. पोरवाल | साईनाथ हॉस्पिटल | १८७८.०० | १८७८.०० |
| ३ | रमेश तुकाराम कोते | स्वतः | Diabeties | डॉ. शुभा वर्मा | साईबाबा हॉस्पिटल | २४३९.०० | २४३९.०० |
| ४ | लुटे चंद्रकांत धोंडीराम | वडील | Diabeties | डॉ. शुभा वर्मा | साईबाबा हॉस्पिटल | २०२०.०० | २०२०.०० |
| ५ | मालिनी नंदकुमार कुलकर्णी | स्वतः | Asthama | डॉ. शुभा वर्मा | साईबाबा हॉस्पिटल | ८०१८.०० | ७८९१.०० |
| ६ | भाऊसाहेब रघुनाथ वाणी | वडील | Asthama | डॉ. पोरवाल | साईनाथ हॉस्पिटल | ४७९.०० | ३२८.०० |
| ७ | सुखदेव शंकर बारहाते | स्वतः | Diabeties | डॉ. शुभा वर्मा | साईबाबा हॉस्पिटल | ४०९५.०० | ३८७३.०० |
| ८ | रवि श्रावण चौधरी | आई व वडील | Ayurvedic Treatment | डॉ. कुलकणी व डॉ. शेळके | साईनाथ हॉस्पिटल | १२२२.०० | १२२२.०० |
| ९ | कल्पना रघुनाथ मुसमाडे | स्वतः/ पती/ वडील | Skin disease | डॉ. पोरवाल | साईनाथ हॉस्पिटल | ६३५.०० | ६३५.०० |
| १० | मोतीराम लक्ष्मण काकड | स्वतः | Diabeties | डॉ. शुभा वर्मा | साईबाबा हॉस्पिटल | ४७५४.०० | ४७५४.०० |
| ११ | राजेंद्र बाबासाहेब पवार | वडील | Abdominal with Pelvis | डॉ. मुंदडा | साईबाबा हॉस्पिटल | २७९४.०० | २६८४.०० |
| १२ | इंदुबाई बाबासाहेब ब्राम्हणे | मुलगी | Fever Anaemia with hepatitis | डॉ. साबळे व डॉ. राठी | साईनाथ रुग्णालय | ३६३०.०० | ३६३०.०० |
| १३ | डॉ. अनिल विठ्ठलराव घरटे | स्वतः आई मुलगी मुलगा | Diabeties Arthritis | Casualty | साईनाथ रुग्णालय | २४६२.०० | २४१२.०० |
| १४ | नवनाथ साहेबराव जाधव | आई | Epilepsy with Seizeur | डॉ. म्हात्रे | साईबाबा हॉस्पिटल | २८१७.०० | २८१७.०० |
| १५ | पठाण नसरुल्ला नुरखाँ | पत्नी | IBD | डॉ. वर्मा | साईबाबा हॉस्पिटल | ३२३६.०० | ३२३६.०० |
| १६ | डॉ. अजितकुमार तुकाराम वाघ | वडील | Nephritis | डॉ. वाघुळदे | साईबाबा हॉस्पिटल | ४२२७०.०० | ४२२७०.०० |
| १७ | डॉ. शितल ओमप्रकाश बागडिया | वडील | Diabeties | डॉ. वर्मा | साईबाबा हॉस्पिटल | ३७६२.०० | ३७६२.०० |
| १८ | डॉ. मेहेरे मंगेश नंदकुमार | आई | Arthritis | डॉ. इंगळे | साईबाबा हॉस्पिटल | १८०१.०० | १८०१.०० |
| १९ | रविंद्र बाळासाहेब नवले | स्वतः | Hypertension | डॉ. शिंदे | साईबाबा हॉस्पिटल | ६९६.०० | ६९६.०० |
| २० | पंढरीनाथ कि. रोकडे | वडील | Arthritis with Diabeties | डॉ. वर्पे | साईनाथ रुग्णालय | २५८७.०० | २०९३.०० |
| २१ | कोते मिनीनाथ भाऊसाहेब | वडील | Diabeties | डॉ. पोरवाल | साईनाथ रुग्णालय | ५२७४.०० | ४७५१.०० |
| २२ | सुचिता राजीव मुठाळ | स्वतः सासू सासरे | Diabeties | डॉ. इंगळे | साईबाबा हॉस्पिटल | ३९८६.०० | २९२५.०० |
| २३ | दिपक सुर्यकांत लोखंडे | आई | Blood Pressure with Diabeties | डॉ. शुभा वर्मा | साईबाबा हॉस्पिटल | ८३८६.०० | ८३८६.०० |
| २४ | अशोक नामदेव झुरंगे | स्वतः | Ophthal Treatment | डॉ. सोनटक्के | साईनाथ रुग्णालय | ३६१८.०० | ३६१८.०० |
| २५ | संगिता संजय थोरात | पती | Severiour illness | डॉ. गोरे | साईबाबा हॉस्पिटल | २४५३१.०० | १९८३६.०० |
| २६ | सतिष रामभाऊ खरात | मुलगी पत्नी | Subcutaneous Haemorrage | डॉ. आव्हाड | साईनाथ रुग्णालय | ६६६१.०० | ६३०१.०० |
| २७ | पठारे शामराव मारुती | आई / मुलगा / स्वतः | Arthiritis | डॉ. पोरवाल | साईनाथ रुग्णालय | १०७८४.०० | १०७८४.०० |
| २८ | सुभाष मल्हारी बंदावणे | मुलगा | Nephritis Treatment | डॉ. वाघुळदे | साईनाथ रुग्णालय | २६६२१.०० | २५८१७.०० |
| २९ | डॉ. सुरवसे संतोष बब्रुवन | स्वतः | Hypertension | डॉ. शिंदे | साईनाथ रुग्णालय | ३४३५८.०० | ३४३५८.०० |
| ३० | नागरे प्रभाकर विश्वनाथ | वडील | Diabeties | डॉ. वर्मा | साईनाथ रुग्णालय | ७४७७.०० | ७४७७.०० |
| ३१ | वर्पे सविता चांगदेव | आई | Diabeties | डॉ. इंगळे | साईबाबा हॉस्पिटल | ७१२८.०० | ७१२८.०० |
| ३२ | सुर्वे वैशाली वसंतराव | आई | Diabeties | डॉ. इंगळे मॅडम | साईबाबा हॉस्पिटल | ३१२६०.०० | २१५३६.०० |
| ३३ | रुकसाना साजिद खान | स्वतः | Blood Pressure | डॉ. वर्मा | साईबाबा हॉस्पिटल | ८३७०.०० | ८३७०.०० |
| ३४ | डॉ. अमोल भ. सरदार | आई | Blood Pressure with Diabeties | डॉ. मुदडा व डॉ. चाफेकर | साईनाथ रुग्णालय | ८२५५.०० | ४६३१.०० |

| अ. नं. | कर्मचा-याचे नाव | कर्मचा-याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयाचे नाव | एकूण मागणी रक्कम | एकूण देय रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३५ | जहाँआरा शहाबुद्दीन मिरजकर | सासरे | T.R.V.S guided of Prostate | डॉ. मुंदडा | साईबाबा हॉस्पिटल | १२५२२.०० | १०९२२.०० |
| ३६ | रमेश नारायण चौधरी | वडील | Diabeties | डॉ. पोरवाल | साईनाथ रुग्णालय | ७२८६.०० | ६२४२.०० |
| ३७ | भानुदास बजरंग चव्हाण | स्वतः | Arthritis | डॉ.रामाराव | साईबाबा हॉस्पिटल | १३६५.०० | १३६५.०० |
| ३८ | प्रशांत भानुदास गोंदकर | वडील | Blood Pressure | डॉ. मुंदडा | साईबाबा हॉस्पिटल | ३१६६.०० | ३१३०.०० |
| ३९ | मिनीनाथ भाऊसाहेब कोते | आई | Blood Pressure | डॉ. पोरवाल | साईनाथ रुग्णालय | ५३९३.०० | ४७५१.०० |
| | | | | | एकूण | 309979.00 | २८४७१२.00 |

**संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान–** सदर बिलांची संस्थान वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये छाननी केली असून देय होणारी एकूण रक्कम 284712/- इतकी आहे.

**विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत–** नियमावली प्रमाणे छाननी केली असुन मा.उप समितीचे पुर्वमान्यता घेऊन समितीने मान्य केलेली देय होणारी रक्कम अदा करणेस हरकत नाही, असे मत आहे.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावामध्ये नमुद केलेप्रमाणे संस्थान कायम कर्मचा-यांच्या नावासमोरील देय असलेली रक्कम त्यांना अदा करणेस मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.** (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

२८ **श्री साईबाबा रुग्णालयातील विविध शस्त्रक्रिया विभागाकरिता Fogger Machine मंजूर दराने खरेदीबाबत.**

श्री साईबाबा रुग्णालयातील विविध ऑपरेशन थिएटरमध्ये शस्त्रक्रिया झाल्यानंतर निर्जंतुकीकरणासाठी Fogger Machine ची आवश्यक असते. त्यामुळे C.V.T.S O.T.–I, C.V.T.S O.T.–II, Neuro O.T. तसेच Ortho O.T विभागाने Fogger Machine ची मागणी केलेली आहे.

यापूर्वी M/s. Rank Engineering, Chennai यांचे कडून श्री साईनाथ रुग्णालयातील ऑपरेशन थिएटर करीता इकडील पत्र क्र. ७१३६, दि. १०/०२/२०१४ अन्वये प्रती नग रु.२०,०००/- या दराने २ नग Fogger Machine खरेदी करण्यात आलेले होते तेंव्हा सदर Fogger Machine खरेदीकामी अंदाजे खर्चासाठी M/s. Rank Engineering, Chennai यांचेकडुन ई - मेल द्वारे दरपत्रक मागविण्यात आलेले होते त्यानूसार M/s. Rank Engineering, Chennai यांनी त्याच दराने Fogger Machine देण्यास तयार आहेत असे दि.१५/०१/२०१५ चे ई-मेल पत्रान्वये कळविलेले आहे. तेंव्हा त्यांचे दरानुसार सदर ०४ नग Fogger Machine खरेदीकामी रक्कम रु.८००००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

| Sr. No. | Description | Qty. | Rate Per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | Fogger Machine | 4 | 20000.00 | 80000.00 |
| | | | Total Amt. in Rs. | 80000.00 |

**मागणी –**

| अ.नं. | विभागाचे नाव | मागणी पत्रकाची दि. | औषध भांडार विभाग प्राप्त दि. |
|---|---|---|---|
| 1 | C.V.T.S O. T. – I | 18/12/2014 | 03/01/2014 |
| 2 | C.V.T.S O. T. – II | 26/02/2015 | 27/02/2015 |
| 3 | Neuro O.T. | 20/02/2015 | 19/03/2015 |
| 4 | Ortho O.T | 26/03/2015 | 06/04/2015 |

**संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान –** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण)अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालय चालविण्यात येतात.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत –** सदर Fogger Machine ऑपरेशन थिएटरमध्ये शस्त्रक्रिया झाल्यानंतर निर्जंतुकीकरणासाठी आवश्यक असते म्हणून खरेदी करणे गरजेचे आहे. त्यामुळे वरील मागणीप्रमाणे ०४ नग Fogger Machine मागील मंजूर दराने खरेदी करण्यास हरकत नाही.

तरी उपरोक्त ०४ नग Fogger Machine मागील मंजूर दराने खरेदी करणेस व याकामी येणा-या रु. ८००००/- चे खर्चास मान्यता असावी.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील विविध शस्त्रक्रिया विभागाकरिता ०४ नग Fogger Machine मागील मंजूर दराने खरेदी करणेस व याकामी येणा-या रु.८०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.** (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

२९ **श्री साईबाबा रुग्णालयातील कॅथलॅब विभागाकरिता सी.डी.चे स्टीकर छपाई करुन घेणेस व सी.डी.कव्हर खरेदीबाबत.**

श्री साईबाबा रुग्णालयाचे कॅथलॅब विभागामध्ये पेशंटरची अॅन्जीओग्राफी किंवा अॅन्जीओप्लास्टीचे ऑपरेशन केल्यानंतर सी.डी. बनविली जाते. पेशंट डिसचार्ज झालेनंतर सदर सी.डी.रुग्णाला दिली जाते. सदर सी.डी.वर रुग्णालयाचे नावाचे स्टीकर छपाई करणे व उत्तम दर्जाचे सी.डी. कव्हर खरेदी करणे फार गरजेचे आहे. सध्या आपणाकडे उपलब्ध असलेल्या सी.डी. ह्या स्टीकरसह येतात. त्यावर रुग्णालयाचे नांव सोबतच्या मुसद्याप्रमाणे आहे. तसेच सी.डी. कव्हर देखील हा पॉलीथीन पेपरचा आहे. परंतू कॅथलॅब विभागाने त्यापेक्षा वेगळ्या प्रकारची सी.डी. कव्हर व स्टीकर छपाई करुन पाहिजे आहेत व त्याचा नमुना त्यांनी सोबत सादर केला आहे. त्यासाठी त्यांनी डी.पी. नं.३१२१ दि.१२.१२.२०१४ चे डी.पी. व्दारे इकडील कार्यालयास कळविलेले आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.नं. | तपशिल | साईज व कागद प्रकार | छपाई नग | अंदाजे किंमत प्रती नग | एकुण रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | सी.डी. स्टिकर | नमुन्याप्रमाणे छपाई व साईज | ७००० नग | २.२५ | १५७५०.०० |
| ०२ | सी.डी.कव्हर | प्लास्टीकचे चांगल्या क्वॉलीटचे | ७००० नग | १.५० | ८७५०.०० |
| **(अक्षरी रक्कम रु.चोवीस हजार पाचशे मात्र )** | | | **एकुण रक्कम रु.-** | | **२४५००.००** |

उपरोक्त प्रमाणे स्टीकर व कव्हर छपाईकामी दि.१७.०१.२०१५ चे मंजूर टिपणीन्वये विहीत पध्दतीने छपाई करणेस व याकामी येणा-या अंदाजे खर्च रु.२४,५००/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार सदरचे छपाईकामी दुरध्वनीवरुन सिलबंद कोटेशन मागविणेत आले होते. त्यास अनुसरुन एकुण ०३ कोटेशन प्राप्त झाले आहे. त्याचा तपशिल खलीलप्रमाणे.

| अ.नं. | तपशिल | आवक नंबर | दिनांक |
|---|---|---|---|
| ०१ | मे.क्लासिक स्टेशनर्स, मुंबई | १४७१ | १८.०४.२०१५ |
| ०२ | मे.लक्ष्मीटॉल एंटरप्रायजेस, मुंबई | १४७० | १८.०४.२०१५ |
| ०३ | नाव नसलेले कोटेशन | १४६९ | १८.०४.२०१५ |

तरी उपरोक्त प्रमाणे प्राप्त ०३ कोटेशन मा.वैद्यकीय संचालक, रुग्णालये यांचे कक्षात समक्ष दि.२५.०४.२०१५ रोजी उघडण्यात आले असून, त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| अ.नं. | तपशिल | छपाई नग | मे.क्लासिक स्टेशनर्स, मुंबई | मे.लक्ष्मीटॉल एंटरप्रायजेस, मुंबई | मे.मेहूल स्टेशनरी अॅण्ड झेरॉक्स, मुंबई | एकुण रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | सी.डी. स्टिकर | ७००० नग | ४.८० | ५.१० | ५.२० | ३३६००.०० |
| ०२ | सी.डी.कव्हर | ७००० नग | १.१५ | १३५ | १.४५ | ८०५०.०० |
| | | | | **एकुण रक्कम रु.-** | | ४१६५०.०० |

उपरोक्त तुलनात्मक दरांचा विचार करता मे.क्लासिक स्टेशनर्स, मुंबई यांचे दर निम्नतम आहे. दि.१७.०१.२०१५ चे मंजूर टिपणीन्वये विहीत पध्दतीने छपाई करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.२४५००/- चे खर्चास मान्यता मिळालेली होती. परंतू प्रत्यक्षात तुलनात्मक तक्ता पहाता एकुण रु.४१,६५०/- इतका खर्च येत आहे. म्हणजे रु.१७,१५०/- इतका वाढीव खर्च येणार आहे.

तरी सी.डी.स्टीकर व सी.डी.कव्हर मे.क्लासिक स्टेशनर्स, मुंबई यांचेकडून निम्नतम दराने छपाई व कव्हर खरेदी करुन घेणेस व याकामी येणा-या रक्कम रु.४१,६५०/- चे खर्चाचा प्रस्तावास मान्यता असावी.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील कॅथलॅब विभागाकरीता आवश्यक असलेले सी.डी.स्टीकर छपाईचा व सी.डी. कव्हर खरेदीचा कार्यादेश मे.क्लासिक स्टेशनर्स, मुंबई यांना देणेस तसेच याकामी मंजुर रक्कमेपेक्षा येणा-या रु.१७,१५०/- मात्रचे वाढीव खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

३० **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वॉर्ड/ विभागाकरीता फर्निचर खरेदीकामी पुरवठा आदेश देणेस व मंजूर रकमेपेक्षा जास्तीच्या खर्चास मान्यता असावी.**

श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वॉर्ड / विभागाने विविध प्रकारच्या हॉस्पिटल / कार्यालयीन फर्निचरची मागणी केलेली आहे. रुग्णालयात रुग्णांची संख्या वाढल्यामुळे कॉटची संख्या देखील वाढत आहे, त्यामुळे तेथे नवीन फर्निचरची मागणी केलेली आहे तसेच ब-याच वॉर्ड / विभागातील फर्निचर हे वापरुन खराब झालेले आहे, त्यामुळे त्यांनी नवीन फर्निचर मिळणेबाबत मागणी केलेली आहे. विविध वार्ड / विभागाने मागणी केलेल्या फर्निचरचा तपशिल सोबच्या तक्त्यात दर्शविण्यात आलेला आहे.

उपरोक्त फर्निचर खरेदीकामी अंदाज रक्कम रु. 7, 99, 421/- इतका खर्च अपेक्षित आहे.

दि. 28/08/2014 रोजीचे मा. सदस्य समिती सभेत निर्णय क्र. 724 अन्वये श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वॉर्ड / विभागाकरिता फर्निचर खरेदी व याकामी येणा-या रक्कम रु. 7, 99, 421/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार सदरचे खरेदीस जास्तीत– जास्त प्रतिसाद मिळणेकामी सदरची जाहिरात फ्री प्रेस जनरल मुंबई, लाईफ– 365 इंग्लिश– पुणे, दिव्य मराठी– नाशिक, पुण्यनगरी– औरंगाबाद या वर्तमानपत्रात देण्यात आली होती तसेच संस्थानचे संकेत स्थळावर वरीलप्रमाणे जाहिरात व निविदा देण्यात आली होती तसेच एकूण 72 उत्पादक कंपन्या/ पुरवठाधारकांना ई – मेलव्दारे जाहिरातीबाबत अवगत करण्यात आले होते.

निविदा विक्रीची मुदत दि. 10/11/2014 ते 22/11/2014 पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्वीकारण्याची अंतिम मुदत दि. 25/11/2014 अखेर ठेवण्यात आली होती.

त्यास अनुसरुन येथील कार्यालयात 06 निविदा प्राप्त झाल्या आहेत. त्याचा तपशिल खालील प्रमाणे-

| Sr. No. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 01 | M/s. Quali Surge Surgical Pvt Ltd., Pune | 22/11/2014 |
| 02 | M/s. Sanjivani Hospital Furniture, Pune | 24/11/2014 |
| 03 | M/s. Sai Enterprises, Shrirampur | 25/11/2014 |
| 04 | M/s. Austin Healthcare, Pune | 25/11/2014 |
| 05 | M/s. Axenic Labs Pvt Ltd., Nashik | 25/11/2014 |
| 06 | M/s. Janak Healthcare Pvt Ltd., Mumbai | 25/11/2014 |

दि. 02/03/2015 रोजीच्या मा. उपसमिती सभेपुढे कर्मशियल निविदा उघडण्यात आलेले असून त्याचा तुलनात्मक तक्ता तक्ता तयार करुन निम्नतम दरानूसार पुरवठा आदेश देण्यात यावा असे ठरले.

दि. 28/08/2014 रोजीचे टिपणीन्वये उपरोक्त साहित्य खरेदीकामी एकूण रक्कम रु. 7,99,421/- इतक्या खर्चाची मंजूरी मिळालेली होती. परंतु, प्रत्यक्षात तुलनात्मक तक्ता पाहता एकूण पूर्णांकींत रक्कम रु. 8,56,669/- इतका खर्च येत आहे.

त्यानुसार सदरचे खरेदीकामी येणा-या एकूण पूर्णांकींत रक्कम रु. 57,248/- च्या वाढीव खर्चाचे प्रस्तावास तसेच सोबत तक्त्यात नमूद केलेप्रमाणे साहित्य खरेदीस पुरवठा आदेश देण्यास मान्यता असावी.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वॉर्ड/ विभागाकरीता फर्निचर खरेदीकामी निम्नतम दरधारकास पुरवठा आदेश देणेस व मंजूर रकमेपेक्षा येणा-या रु.५७,२४८/- मात्रचे वाढीव खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

३१ **इलेक्ट्रोलाईट ॲनालायरझर मशिनचे दुरुस्तीबाबत.**

श्री साईबाबा हॉस्पीटलच्या पॅथोलॉजी लॅब मध्ये रूग्णांचे रक्त तपासणी करणेकामी सन 2013 यावर्षी मे. ट्रिव्हीट्रॉन हेल्थकेअर प्रा. लि. मुंबई यांचेकडुन Fully Automatic Cilinical Bio- Chemistry Analyzer (Model: Nanolab 240) व Electrolyte Analyzer (Model: Elite) मशिन एकुण रू 10,35,500/- इतक्या रकमेत खरेदी करणेत आले आहे. सदर मशिन दि. 29/07/2013 रोजी कार्यान्वीत करण्यात आले असुन कंपनीने दिलेला तीन वर्षाचा वॉरंटी कालावधी दि. 28/07/2016 रोजी संपत आहे. सदर वॉरंटी कालावधी मध्ये कंपनीचे इंजिनीअर मशिनची दुरूस्ती व देखभाल करीत आहे. परंतु कन्झ्युमेबल पार्टस (उद. Lamp, Reaction Cuvettes, Electrodes) संस्थानने वेगळे खरेदी करावयाचे आहे.

सध्या Electrolyte Analyzer (Model: Elite) मशिन व्यवस्थीत काम देत नसल्यामुळे कंपनी इंजिनीअर यांनी तातडीचे भेटीद्वारे मशिनची तपासणी करून सर्व्हीस रिपोर्ट क्र. 26162, दि. 29/01/2015 अन्वये मशिनचे Na, K, CL, REF Electrodes हे कन्झ्युमेबल पार्टस बदलण्याची आवश्यकता असल्याचे कळविले आहे. सदर Electrodes करीता कंपनीने त्यांचे पत्र क्र. TRI/DGSTS/14/W0117, Dtd. 03/04/2015 अन्वये सर्व करांसहीत एकुण रू. 50,400/- (अक्षरी- पन्नास हजार चारशे मात्र) इतक्या रकमेचे कोटेशन पाठविले आहे. सदर Electrodes करीता कंपनी एक वर्षाची वॉरंटी देत आहे. सदर Electrodes हे विशिष्ट रचना स्पेसीफिकेशन असलेले असतात त्यामुळे इतर पुरवठाधारक कंपनीकडे उपलब्ध होत नाही. सदर मशिन नियमीत वापरात असल्याने तातडीने दुरूस्त करणे आवश्यक आहे. तसेच सदर कंपनी हे एकमेव पुरवठाधारक आहेत. त्यामुळे मे. ट्रिव्हीट्रॉन हेल्थकेअर प्रा. लि. मुंबई यांचेकडुन Electrolyte Analyzer मशिन करीता Electrodes खरेदी करणेस हरकत नाही.

तरी मे. ट्रिव्हीट्रॉन हेल्थकेअर प्रा. लि. मुंबई यांचेकडुन Electrolyte Analyzer मशिन करीता Electrodes हे कन्झ्युमेबल पार्ट खरेदी करणेस व त्यासाठी येणाऱ्या एकुण रू. 50,400/- च्या खर्चास मान्यता असावी.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.ट्रिव्हीट्रॉन हेल्थकेअर प्रा.लि., मुंबई यांचेकडुन श्री साईबाबा हॉस्पीटलमधील Electrolyte Analyzer मशिन करीता Electrodes हे कन्झ्युमेबल पार्ट खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या एकुण रु.५०,४००/- च्या खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

३२ **सिंहस्थ कुंभमेळा सन- २०१५ निमित्ताने शिर्डी व परिसरात साईभक्तांसाठी करावयाच्या अतिरिक्त सुविधा पुरविणेकामी लाईट फिटींग, केबल आणि स्विचेस खरेदीकामी प्राप्त झालेल्या ऑनलाईन ई-निविदा (कमर्शियल बीड) उघडून निर्णय होणेबाबत.**

सिंहस्थ कुंभमेळा सन-२०१५ निमित्ताने शिर्डी व परिसरात साईभक्तांसाठी करावयाच्या अतिरिक्त सुविधा पुरविणेकामी लाईट फिटींग, केबल आणि स्विचेस खरेदीकामी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिद्ध करुन निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रुपये ९,२३,७००/- मात्रचे खर्चास मा.व्य. समितीच्या दिनांक ३०.०१.२०१५ चे सभेतील विषय क्र.०६ निर्णय क्र.०६ अन्वये व मा.मुंबई उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ यांचे समोरील रिट पिटीशन नं.१८/२०११ मध्ये सिव्हिल अर्ज नं.३५००/२०१५ अन्वये दि.०६.०५.२०१५ रोजी मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार सदर कामाचे ऑनलाईन निविदा मागविणेकामी दि.२५-०५-२०१५ रोजी, दैनिक पुढारी, अहमदनगर या वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात आली होती. त्यानुसार सदर निविदा महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन निविदा मागविणेकामी टेंडर नोटीस व टेंडर डाक्युमेंट दि.२७-०५-२०१५ रोजी अपलोड करण्यात आले होते. निविदा ऑनलाईन डाऊन लोडींगसाठी दि.२७.०५.२०१५ रोजी सकाळी १०.०० वाजेपासून उपलब्ध करण्यात आली होती. तसेच निविदा ऑनलाईन दाखल करण्याची अंतिम मुदत दि.०३.०६.२०१५ रोजी सायं.०५.०० वाजेपर्यंत ठेवण्यात आली होती. ऑनलाईन निविदेसोबत तांत्रिक लिफाफामध्ये सादर करावयाच्या सर्व कागदपत्रांच्या स्कॅन कॉपी जोडण्यास व दि.०६.०६.२०१५ रोजी सायं.०५.०० या अखेर किंवा त्यापुर्वी (रविवार खेरीज) निविदेसोबत स्कॅन करुन जोडलेले तांत्रिक (Techincal Bid) कागदपत्रांच्या मुळप्रती शिर्डी कार्यालयात सादर करणेकामी ऑनलाईन अपलोड करण्यात आलेल्या जाहिरातीमध्ये कळविण्यात आले होते. त्यानुसार तीन तांत्रिक निविदा प्राप्त झाल्या होत्या. तसेच तांत्रिक लिफाफा (Technical Bid) दि.०६.०६.२०१५ रोजी समक्ष सादर करण्याची मुदत ठेवण्यात आली होती. ऑनलाईन तांत्रिक ई-निविदा (Technical Bid) उघडण्याची तारीख १२.०६.२०१५ अशी होती.

प्राप्त ०३ निविदाधारकांचे तांत्रिक ई-निविदा व लिफाफे दि.१२.०६.२०१५ रोजी मा.सर्व प्रशासकीय अधिकारी व मुख्यलेखाधिकारी यांचे समक्ष उघडून निविदाधारकांच्या बयाणा रक्कम तसेच कागदपत्रांची तपासणी मुख्यलेखाधिकारी लेखाशाखा यांचेमार्फत करण्यात आलेली आहे. सदर लाईट फिटींग, केबल आणि स्विचेस खरेदी कामी प्राप्त ऑनलाईन मुळ ई-निविदा (कमर्शियल बीड) मा.उपसमितीसमोर उघडावे लागणार आहे.

सिंहस्थ कुंभमेळा सन-२०१५ निमित्ताने शिर्डी व परिसरात साईभक्तांसाठी करावयाच्या अतिरिक्त सुविधा पुरविणेकामी लाईट फिटींग, केबल आणि स्विचेस खरेदीकामी दि.०३.०६.२०१५ रोजी सायं.५.०० वा.पावेतो ऑनलाईन ई-निविदा Upload केलेले निविदाधारकाचा तपशील खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | ई-निविदा Upload केलेल्या निविदाधारकाचे नांव |
|---|---|
| ०१) | मे.यशवंत इलेक्ट्रीकल्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर, अहमदनगर |
| ०२) | मे.इंटरनॅशनल इलेक्ट्रीकल्स, अहमदनगर |
| ०३) | मे.आदिती इलेक्ट्रीकल्स, नाशिक |

सिंहस्थ कुंभमेळा सन २०१५-निमित्ताने शिर्डी व परिसरात साईभक्तांसाठी करावयाच्या अतिरिक्त सुविधा पुरविणेसाठी लाईट फिटींगकेबल आणि , स्विचेस खरेदीकामी प्राप्त झालेल्या ०३ निविदा आजचे उपसमिती सभेसमोर उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव | निविदेमधील दर रु. |
|---|---|---|
| 1. | मे.यशवंत इलेक्ट्रीकल्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर, अहमदनगर | ८,४०,५६७/- |
| 2. | मे.इंटरनॅशनल इलेक्ट्रीकल्स, अहमदनगर | ७,४६,३४९/- |
| 3. | मे.आदिती इलेक्ट्रीकल्स, नाशिक | **७,२५,१०४/-** |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सिंहस्थ कुंभमेळा सन- २०१५ निमित्ताने शिर्डी व परिसरात साईभक्तांसाठी करावयाच्या अतिरिक्त सुविधा पुरविणेकामी लाईट फिटींग, केबल आणि स्विचेस खरेदीकामी मे.आदिती इलेक्ट्रीकल्स, नाशिक यांचे रु.७,२५,१०४/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

३३ **श्री साईप्रसादालयातील मुख्य किचनमध्ये स्टेनलेस स्टील एल.पी.गॅस पाईपलाईन बसविणेकामी तसेच जुन्या गॅस प्लॅन्ट येथे खराब झालेली एम.एस. पाईप लाईन बदलविणेकामी प्राप्त निविदा उघडणेबाबत.**

श्री साई प्रसादालयातील किचनमध्ये नेहमीचे वापरामुळे सध्या बसविण्यात आलेली एमगॅस पाईप लाईन .एस. ईन खरागॅसची पाईप ला .खराब झालेली आहेब होऊन, लिकेज होण्याची शक्यता जास्त असल्याने सुरक्षिततेच्या श्री साई प्रसादालयातील मुख्य किचनमध्ये येथे टॅंक जवळील खराब न्टलची व जुना गॅस प्लॅनलेस स्टीभट्याकरीता स्टे 13 कामी येणापाईप लाईन नविन टाकणेकामी व त्या .एस.झालेली एम-या अंदाजे रक्कम रु1 .,61, -/020मात्रचे खर्चास मा .ता मिळालेली आहेनुसार मान्य (12)2 .रोजीचे सभेतील निर्णय क्र 2015/01/30 य समितीचे दिनांकत्रिसदस्यी .

त रोजी दैनिक पुढारी या वर्तमानपत्रात जाहीरात देण्या 2015/03/22 कामी निविदा विक्रीसाठी दिनांकउपरोक्त .आलेली होतीनिविदा विक्री दिनांक या कालावधीत तीन .अशी होती 2015/03/30 ते दिनांक 2015/03/24

निविदाधारकांनी निविदा विकत घेतल्या होत्या. परंतु सबमिशन तारीख 03/04/2015 मुदतीत खालीलप्रमाणे दोन निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| अ.नं | निविदाधारकाचे नांव |
|---|---|
| 1 | यशराज टेक्नोक्रेटर्स, नाशिक |
| 2 | एच. जोशी ब्रदर्स, नाशिक |

विहीत मुदतीत दोनच निविदाधारकांनी निविदा जमा केलेली असल्याने लेखापरिक्षणाचेदृष्टीने कमीत कमी तीन निविदा आवश्यकता होती. त्यामुळे याकामी वृत्तपत्रात जाहीरात देवुन फेर निविदा विक्री करणेकामी वृत्तपत्रात जाहीरात देण्यात आलेली होती.

फेर निविदा विक्री दिनांक 25/05/2015 ते 30/05/2015 अशी होती. या कालावधीत महावीर अॅटो पार्ट, मुंबई या निविदाधारकांनी निविदा विकत घेतली होती व मुदतीत जमा केलेली आहे. तसेच यशराज टेक्नोक्रेटर्स, नाशिक व एच. जोशी ब्रदर्स, नाशिक यांनी पत्राव्दारे कळविलेले आहे की, आम्ही यापुर्वी सादर केलेल्या निविदेचे दर ग्राह्य धरण्यात यावे. यापुर्वी प्राप्त निविदा अद्याप शिलबंद पाकीटात असल्याने ग्राह्य धरता येतील. पुढीलप्रमाणे तीन शिलबंद निविदा मा. उप-समितीचे सभेसमोर उघडता येतील.

| अ.नं | निविदाधारकाचे नांव |
|---|---|
| 1 | यशराज टेक्नोक्रेटर्स, नाशिक |
| 2 | एच. जोशी ब्रदर्स, नाशिक |
| 3 | महावीर अॅटो पार्ट, मुंबई |

श्री साई प्रसादालयातील मुख्य किचनमध्ये 13 भट्याकरीता स्टेनलेस स्टीलची व जुना गॅस प्लॅट येथे टॅकजवळील खराब झालेली एम.एस. पाईप लाईन नविन टाकणेकामी प्राप्त झालेली ०३ टेंडर्स आजचे उपसमिती सभेसमोर उपस्थित टेंडरधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील पात्र निविदाधारकांच्या मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | टेंडरधारकाचे नांव | एस.एस. पाईप लाईनचे दर रु. | एम.एस. पाईप लाईनचे दर रु. | एकत्रित दर रु. |
|---|---|---|---|---|
| 1. | यशराज टेक्नोक्रेटर्स, नाशिक | १,०२,१७०/- | ७७,२३०/- | **१,७९,४००/-** |
| 2. | एच. जोशी ब्रदर्स, नाशिक | १,२२,१००/- | ९६,००५/- | २,१८,१०५/- |
| 3. | महावीर अॅटो पार्ट, मुंबई | १,४३,०८०/- | १,११,७४०/- | २,५४,८२०/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालयातील मुख्य किचनमध्ये स्टेनलेस स्टील एल.पी.गॅस पाईपलाईन बसविणेकामी तसेच जुन्या गॅस प्लॅन्ट येथे खराब झालेली एम.एस. पाईप लाईन बदलविणेकामी यशराज टेक्नोक्रेटर्स, नाशिक यांचे एकत्रित रु.१,७९,४००/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.**

(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

३४ **श्री साईबाबा हॉस्पीटलमधील CVTS-II-OT च्या सेंट्रल ए.सी. प्लॉटबाबत.**

श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये विविध ऑपरेशन थिएटरमध्ये सन 2005 पासून सेंट्रल ए.सी. प्लांट कार्यरत करणेत आलेले आहे. सध्या असलेल्या CVTS-II-OT चा वापर पुर्वी ऑप्थल OT करीता करणेत येत होता व त्यानुसार तेथील सेंट्रल ए.सी. प्लांट ऑप्थल OT आवश्यकतेनुसार 2000 CFM चे AHU 5 टन क्षमतेचे कंडेशींग युनिट याप्रमाणे डिझाईन करणेत आले होते. मात्र ऑप्थल OT चे जागी कार्डीयाक OT सुरु करणेपूर्वी प्लांटची कॅपासिटी वाढवून डिझाईनमध्ये बदल करणे आवश्यक होते. तथापि तसे न करता रुग्णालय विभागामार्फत सदर प्लांटला हेपा फिल्टर बसवून प्लांट CVTS-II-OT करीता कार्यरत करण्यात आला. मुळातच प्लांटची कॅपासिटी कमी असतांना हेपा फिल्टर बसविलेमुळे प्लांटचा एअर प्लो कमी झाला. आवश्यक कुलींग होत नसल्याने वारंवार तक्रारी येत आहेत म्हणून 2 टन क्षमतेचा स्प्लिट ए.सी. बसविणेत आला, तथापि ए.सी. प्लांट जुना झाला असून अनेकवेळा त्यांच्या दुरुस्त्या करुन कार्यरत ठेवला आहे

सदरचा ए.सी. प्लांट असेंम्बल असल्याने त्याचे स्पेअर पार्ट बाजारात वेळीच उपलब्ध होत नाही. म्हणून दुरुस्त करुन चालू करणेस विलंब होतो. प्लांट १० वर्षे अहारोत्र कार्यरत राहील्याने त्याची कार्यक्षमता कमी झालेली आहे. तसेच अचानक शस्त्रक्रिया चालू असतांना सदर प्लांट बंद पडल्यास दुसरी कुलींगची कोणतीही सोय नसल्याने रुग्णांचे जिवीतास धोका पोहोचू शकतो म्हणून एक स्प्लिट ए.सी. बसविला आहे. परंतु कार्डीयाक O.T. ला स्प्लिट ए.सी. ऑपरेशन चालू असतांना वापरता येत नाही. सदर OT मध्ये शस्त्रक्रिया करतेवेळी सदर ए.सी. प्लांटचा एअर प्लो व कुलींग होत नसलेमुळे संबंधीत डॉक्टरांनी वारंवार सदर ए.सी. प्लांट बदलणेबाबत कळविले आहे.

उपरोक्त बाबींचा विचार करता CVTS-II-OT करीता 4000 CFM चा एक A.H.U. व 5.5 टनाचे दोन Condensing Unit बसविणे आवश्यक आहे. त्याकामी अंदाजे 6,50,000/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

वरीलप्रमाणे श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये CVTS-II-OT करीता 4000 CFM चा एक A.H.U. व 5.5 टनाचे दोन Condensing Unit खरेदी करणेकामी वर्तमानपत्रात जाहीरात प्रसिध्द करणेस, तसेच

संस्थानचे वेबसाईटवर जाहीरात अपलोड करुन ई-निविदा बोलविणेस व याकामी येणा-या रुपये 6,50,000/- मात्रचे खर्चाचा प्रस्ताव मा. उप-समितीची सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पीटलमधील CVTS-II-OT करीता प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे सेंट्रल ए.सी. प्लांट बसविणेकामी वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन, ई-निविदांची मागणी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.६,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.**

(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

३५ **सी.सी.टि.व्ही. कंट्रोल सेल कक्षात सेंट्रल ए.सी. प्लांट बसविणेबाबत.**

श्री साई समाधी मंदिर परिसरात सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून मंदिराचे आतील व बाहेरील परिसरामध्ये सी.सी.टि.व्ही. कंट्रोल सेलमार्फत 12 PTZ व 89 फिक्स असे एकूण 101 सी.सी.टि.व्ही. कॅमेरे बसविण्यात आलेले आहेत.

सी.सी.टि.व्ही. कंट्रोल सेल कक्षचा भाग गुरुस्थान जवळील इमारतीचे बेसमेंटला असून, सध्या तेथे कार्यरत असलेल्या ट ए.सी. चे ड्रेन वॉटर बाहेर पडणेकामी छोट्या मोटार बसवाव्या लागतात. या मोटार वारंवार खराब होऊन सदर ठिकाणी असलेल्या इलेक्ट्रॉनिक्स सर्कीटवर पाणी पडून संबंधीत यंत्रणेला धोका पोहचून अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच सी.सी.टि.व्ही. कंट्रोल सेलमध्ये व्हेन्टीलेशन नसल्याने मशीनरीमधून निर्माण होणारी उष्णता बाहेर पडण्यास वाव नाही. त्याचप्रमाणे या ठिकाणी स्प्लिट ए.सी.चे आतील बाजूने इनडोअर युनिटचे मेन्टेनन्स करता येत नाही. सध्याचे कार्यरत असलेल्या स्प्लिट ए.सी.ची क्षमता कमी पडत आहे. म्हणून सेंट्रल ए.सी. प्लांट बसविल्यास फक्त थंड हवेचे डक्ट आतील भागात घेता येईल व प्लांटचे ए.एच.यु. युनिट टेरेसवर ठेवता येईल. यामुळे सदर ठिकाणी अनेक स्प्लिट ए.सी. ऐवजी नामांकित कंपनीचा एक सेट्रल ए.सी. प्लांट बसविणे गरजेचे आहे.

देणगीदार साईभक्त यांनी देणगी स्वरुपात समाधी मंदिर, भुयारी मार्ग, म्युझियम हॉल या ठिकाणी नविन ए.सी. यंत्रणा बसवून दिलेली आहे. त्यामुळे समाधी मंदिरात कार्यरत असलेली जुनी यंत्रणेचे 5.5 टन क्षमतेचे 3 नग कंन्डेसींग युनिट मेकॅनिकल विभागाकडे जमा आहेत. सदरचे युनिट वापरता येईल. मात्र सी.सी.टि.व्ही. सेलकरीता 6000 CFM क्षमतेचे AHU तसेच डक्टींग खरेदी करावे लागणार आहे. 6000 CFM क्षमतेचे AHU खरेदी करणेस तसेच आवश्यक डक्टींग याकरीता अंदाजे रुपये 5,00,000/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

वरीलप्रमाणे सी.सी.टि.व्ही. कंट्रोल सेल कक्षात सेंट्रल ए.सी. 6000 CFM क्षमतेचा AHU व डक्टींग खरेदी करुन सदर यंत्रणेला कॉपर पाईप, गॅस वापरुन उभारणी करणेकामी वर्तमानपत्रात जाहीरात प्रसिध्द करणेस, तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहीरात अपलोड करुन ई-निविदा बोलविणेस व याकामी येणा-या रुपये 5,00,000/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. उप-समिती सभेसमोर निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सी.सी.टि.व्ही. कंट्रोल सेल कक्षात प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे सेंट्रल ए.सी. प्लांट बसविणेकामी वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन, ई-निविदांची मागणी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.५,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

३६ **होमोजेनाझींग मशिनचे स्पेअरपार्ट खरेदीस मान्यता मिळणेबाबत.**

श्री साई प्रसादालयातील प्रसाद भोजन बनविणेकामी सुलभता येणेकरीता सन 2008 मध्ये मे. राईट इक्युपमेंट प्रा. लि., मुंबई यांचेकडून निलमा कंपनीचे परदेशी बनावटीचे एक होमोजेनाझींग मशीन खरेदी करण्यात आलेले आहे. सदर मशीनचा वापर दैनंदिन प्रसाद भोजनाची डाळ, कढी, सांबर व पिठले तयार करणेसाठी होत आहे.

दैनंदिन वापराने सदर मशीनचा मुख्य शॉप तुटलेला आहे. तुटलेला शॉप्ट फ्लेझींबल असल्याने स्थानिक मार्केटमध्ये मिळत नाही. सदरचे मशीनचे स्पेअरपार्ट मार्केटमध्ये फक्त सर्व्हीस डिलर यांचेकडे उपलब्ध असल्यामुळे मशीनचे पुरवठादार व निलमा कंपनीचे अधिकृत सर्व्हीस डिलर मे. राईट इक्युपमेंट प्रा. लि., मुंबई यांचेकडून खरेदी करावे लागणार आहे.

मे. राईट इक्युपमेंट प्रा. लि., मुंबई यांचेकडून सदर स्पेअरपार्टचे दरपत्रक मागविण्यात आलेले असून खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | पार्टचा तपशील | पार्ट नं. | संख्या | दर | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1. | Flexible Shaft | 40040016 | 1 | 26992.00 | 26,992.00 |
| 2. | Watertight bearing 6303 2RS | 40284022 | 1 | 7882.00 | 7,882.00 |
| 3. | Mechanical Shaft Seal | 40288120 | 1 | 6553.00 | 6,553.00 |
| | | | | व्हॅट 12.50% : | 5,178.00 |
| | | | | **एकूण रक्कम :** | **46,605.00** |
| | | | | | **अक्षरी रुपये शेहचाळीस हजार, सहाशे पाच मात्र** |

श्री साई प्रसादालयातील होमोजेनाझींग मशिन अत्यंत उपयुक्त असून, दैनंदिन प्रसाद भोजन तयार करणेसाठी मशीन बंद असल्यामुळे अडचण येत आहे. मशीनचे पुरवठादार मे. राईट इक्युपमेंट प्रा. लि., मुंबई यांचेकडून उपरोक्तप्रमाणे स्पेअरपार्ट खरेदी करणे आवश्यक आहे. मे. राईट इक्युपमेंट प्रा. लि., मुंबई यांनी कोटेशनमध्ये ॲडव्हान्स

रकमेची मागणी केलेली आहे. परंतु यापुर्वी संस्थानने त्यांचेकडून मटेरीअल खरेदी केलेले असून संस्थानला क्रेडीटवर मटेरिअल देतात. उपरोक्त खर्चास मा. उप-समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे.

तरी होमोजेनाझींग मशिनकरीता निलमा कंपनीचे डिलर मे. राईट इक्युपमेंट प्रा. लि., मुंबई यांचेकडून स्पेअरपार्ट खरेदी करणेस व त्याकामी येणा-या रक्कम रुपये 46,605/- मात्रचे खर्चास मान्यता घेणेकामी सदरचा प्रस्ताव मा. उप. समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे श्री साई प्रसादालयातील होमोजेनाझींग मशिनचे स्पेअरपार्ट खरेदीस करणेस व याकामी येणा-या रु.४६,६०५/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

३७ **सेवाधाम इमारतीचे तळमजल्यास साईभक्त व नागरिकांकरीता वाढीव टॉयलेटची व्यवस्था करणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:-**

अधिनियमाचे कलम २१ (१) मधील खंड (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन, अशी तरतूद आहे.

अधिनियमाचे कलम २१ (१) मधील खंड (ग) अन्वये भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे, अशी तरतूद आहे.

**प्रस्तावना:-** सेवाधाम इमारतीचे पश्चिम बाजूस प्रत्येकी १० युरिनल व ०१ शौचालय असलेले स्त्री व पुरुष प्रसाधन गृहाची निर्मिती करणेत आलेली आहे. सदरहु प्रसाधन गृहे दि.२८/०४/२०१५ रोजी साईभक्तांसाठी सुरु करणेत आलेले आहे. दि. २८/०४/२०१५ रोजी मा. कार्यकारी अधिकारी, मा. उपकार्यकारी अभियंता, प्रभारी अधिक्षक आरोग्य विभाग यांचे उपस्थितीत सेवाधाम इमारतीचे परिसरासह मंदिर परिसरात पाहणी करणेत आली. त्यावेळी मा. कार्यकारी अधिकारी यांनी साईभक्त व स्थानिक नागरिकांचे सोयीसाठी सेवाधाम इमारतीचे तळमजल्यास स्त्री व पुरुषांकरीता स्वतंत्र वाढीव टॉयलेट ब्लॉकची व्यवस्था करणेकामी सूचना वजा निर्देश दिलेले आहेत.

**प्रस्ताव:-** सेवाधाम इमारतीमध्ये वाढीव प्रसाधन गृहांची निर्मिती करणेकामी पाहणी करणेत आली. त्यावेळी खालील बाबी निर्दशनास आल्या आहेत.

१) सेवाधाम इमारतीचे दक्षिण बाजूकडील तळमजल्यावरील खोल्या रिकाम्या आहेत. परंतु इमारतीचे दक्षिण बाजूस श्री कानिफनाथ महाराज मंदिर असल्याने याबाजूस टॉयलेट ब्लॉकची व्यवस्था करणे सोईस्कर होणार नाही.

२) सेवाधाम इमारतीचे पश्चिम बाजूस सध्या नव्याने सुरु केलेल्या टॉयलेट ब्लॉक शेजारील ०२ खोल्या होमगार्ड व विज वितरण कंपनी यांचे कार्यालयासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. तथापी सदर ठिकाणी नविन स्वच्छतागृहाची निर्मिती करावयाची झाल्यास विज वितरण कंपनी व होमगार्ड यांना सेवाधाम इमारतीमध्ये पर्यायी जागा उपलब्ध करुन द्यावी लागेल.

सेवाधाम इमारतीत स्त्री व पुरुषांकरीता नव्याने स्वतंत्र टॉयलेट ब्लॉकची व्यवस्था करणेकामी इकडील विभागामार्फत आराखडा व अंदाजपत्रक तयार करणेत आलेले आहे. सदरहु अंदाजपत्रक चालू जिल्हा दर सूचीनुसार (२०१४-१५) तयार करणेत आले असून याकामासाठी सोबत जोडलेल्या अंदाजपत्रकानुसार एकूण रक्कम रु.७,९५,०००/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. सदर इमारतीमध्ये नविन टॉयलेट ब्लॉक उभारवयाचे झाल्यास प्रस्तावामध्ये नमूद केलेप्रमाणे अ.न. ०२ चे पर्यायाचा विचार करता येईल. तसेच याकामी मालमत्ता विभागामार्फत तांत्रीक व कायदेशीर बाबी तपासून वीजवितरण कंपनी व होमगार्ड यांचे कार्यालयाकरीता सेवाधाम इमारतीमध्येच पर्यायी जागा उपलब्ध करुन देता येईल.

तरी उपरोक्त विषयांकितकामी येणारे रु.७,९५,०००/- मात्रचे खर्चास व याकामी विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहीरात देऊन ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेसाठी सदरहु प्रस्ताव मा. उप समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सेवाधाम इमारतीचे तळमजल्यास साईभक्त तसेच नागरिकांकरीता वाढीव टॉयलेटची व्यवस्था करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदांची मागणी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.७,९५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

३८ **बांधकाम विभागामार्फत करण्यात येणा-या दैनंदिन देखभाल दुरुस्तीसाठी सिमेंट खरेदीबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम,२००४ मधील तरतुद :-** अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट –कलम (१) च्या खंड (क) अन्वये " मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्ताची देखभाल व्यवस्थापन व प्रशासन" करण्याचे प्रयोजनासाठी समितीकडुन विश्वस्तव्यवस्थेचा निधीचा विनीयोग करण्याची तरतुद आहे.

**प्रस्तावना :-** बांधकाम विभागामार्फत संस्थान परिसरातील इमारतींची दैनंदिन देखभाल व दुरुस्ती केली जाते. या दैनंदिन देखभाल दुरुस्तीचे कामासाठी आवश्यक असणारे सिमेंट सध्या बांधकाम विभागामार्फत आवश्यकतेनुसार टप्प्याटप्प्याने खरेदी केली जाते.

सन २०१४-१५ मध्ये, मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेनुसार ४३ ग्रेड सिमेंट अल्ट्राटेक, ए.सी.सी.,बिर्ला ए-१ बिर्ला गोल्ड व अंबुजा या कंपन्याचे अधिकृत विक्रेत्यांकडुन दरपत्रके मागवुन सिमेंट गोण्या बांधकाम विभागामार्फत

आवश्यकतेनुसार टप्प्याटप्प्याने खरेदी करणेत आल्या व सन- २०१४-१५ चे मागील शिल्लक २५१ गोणी तसेच देणगी दाखल मिळालेल्या ३२० गोण्या मिळुन एकुण ८४६ गोण्या वापरण्यात आल्या याकामी रक्कम रु. २,५३,१७०/- मात्र इतका खर्च आलेला आहे. सदर सिमेंट देखभाल दुरुस्तीसह विभागांतर्गत करणेत येणा-या कामांसाठी वापरणेत आलेला आहे.

**प्रस्ताव**:- आता सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी मागील वर्षाप्रमाणे अंदाजे १५०० गोणी सिमेंट विहित पध्दतीने दरपत्रके मागवुन आवश्यूकतेनुसार टप्प्याटप्प्याने खरेदी करणेस व अंदाजे रुपये ३००/- प्रति गोणी या दराने रक्कम रुपये ४,५०,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

**विभागाचा अभिप्राय/ मत**:- तरी बांधकाम विभागामार्फत करणेत येणा-या दैनंदिन देखभाल दुरुस्तीसाठी व विभागांतर्गत कामांसाठी, सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी अंदाजे १५०० गोण्या सिमेंट वर नमुद केलेल्या कंपन्यांचे अधिकृत विक्रेत्यांकडुन दरपत्रके मागवुन आवश्यकतेनुसार टप्प्या टप्प्याने खरेदी करणेस व त्याकामी अंदाजित रक्कम रु.४,५०,०००/- मात्र पर्यंतचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, बांधकाम विभागामार्फत दैनंदिन देखभाल दुरुस्ती तसेच विभागांतर्गत कामांसाठी, सन २०१५-१६ या आर्थिक वर्षामध्ये अंदाजे १५०० गोण्या सिमेंट प्रस्तावात नमुद केलेल्या कंपन्यांच्या अधिकृत विक्रेत्यांकडुन दरपत्रके मागवुन आवश्यकतेनुसार टप्प्या-टप्प्याने खरेदी करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.४,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

३९ **कुंभमेळा- २०१५ चे नियोजनाकरीता यशवंतराव चव्हाण विकास प्रबोधिनी, पुणे (यशदा) यांचेमार्फत आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करणेकामी येणारे खर्चास मंजुरी मिळणेबाबत.**

संरक्षण विभाग जा.नं.210/2015 दि.15/05/2015 नुसार कुंभमेळा 2015 चे नियोजनाकरीता यशवंतराव चव्हाण विकास प्रबोधिनी, पुणे यांचेमार्फत आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करणेकामी टिपणी सादर करण्यात आली होती. त्यानुसार जा.नं.एसएसएस/वशि/संरक्षण/960/2015 दि.18/05/2015 ने मा.महासंचालक, यशदा, पुणे यांना प्रत्यक्ष शिर्डी भेट देवून मंदीर व संस्थान परिसराची पहाणी करुन खर्चाचा अहवाल देणेबाबत पत्र देण्यात आलेले होते. यशदा, पुणे यांनी क्र.CDM/2015-16/सिं.क.शिर्डी/प्रशि, दि.25/05/2015 चे पत्राने कर्नल व्ही.एन.सुपनेकर, संचालक, आपत्ती व्यवस्थापन केंद्र यांनी दि.01/06/2015 रोजी प्रत्यक्ष पहाणी करणेसाठी येत असलेबाबत इकडील कार्यालयास कळविलेले आहे व दि.01/06/2015 रोजी शिर्डी येथे प्रत्यक्ष भेट देवून रात्रौ.08 ते 10 वाजेचे दरम्यान दर्शनरांग, समाधी मंदीर व मंदिर परिसराची पहाणी केलेली आहे. तसेच दि.02/06/2015 रोजी सकाळी 4.30 ते 6.30 या वेळेत मंदीर परिसराची पहाणी केलेली आहे.

त्यानुसार यशदा पुणे यांनी त्यांचे दि.05/06/2015 रोजीचे ई-मेल मध्ये, श्री साईबाबा मंदिरामध्ये होणा-या संभाव्य गर्दीच्या नियंत्रणाच्या दृष्टीने श्री साईबाबा मंदिर बाबतचा आपत्ती व्यवस्थापन आराखडा यशदा तर्फे तयार करण्यात येईल. वरील आराखडा तयार करण्यासाठी आपणास शुल्क् रु.तीन लाख यशदास अदा करावे लागेल. तीन लाख पैकी 60% शुल्क् रु.1,80,000/- अग्रीम म्हणून देण्यात यावे व उर्वरीत 40% शुल्क् रु.1,20,000/- आराखडा पुर्ण झाल्यानंतर देण्यात यावे. वरील आराखडा तयार करण्यासाठी आपल्याकडून निश्चीत पत्र (Confirmation Letter) व अग्रीम शुल्क् प्राप्् झाल्यानंतर कमीत कमी एक महिन्याचा कालावधी लागेल. तरी, आराखडा तयार करायचा किंवा नाही याबाबतचे निश्चीत पत्र (Confirmation Letter) पाठविण्यात यावे ही विनंती, असे कळविले आहे.

तरी आपत्ती व्यवस्थापन आराखडा यशदा पुणे यांचे कडून तयार घेणेस तसेच त्याकामी येणारा खर्च रक्कम रु.3,00,000/- (अक्षरी रु. तीन लाख मात्र) चे खर्चास मान्यता, मिळणेस व तद्नंतर यशदा, पुणे यांनी मागणी केलेप्रमाणे रु.3,00,000/- पैकी 60% शुल्क् रु.1,80,000/- अग्रीम म्हणून देणेस व उर्वरीत 40% शुल्क् रु.1,20,000/- आपत्ती व्यवस्थापन आराखडा पुर्ण झाल्यानंतर देणेस मान्यता मिळणेकामी सदरचा विषय निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.** (कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

---

४० **संस्थानचे अग्निशमन वाहनासाठी साहीत्य खरेदी करणेबाबत.**

संस्थानचे फायर ॲण्ड सेफ्टी विभागाकडे अग्निशमन वाहन (फोम टेंडर) देणगी स्वरुपात प्राप्त होत आहे. सदरचे टेंडरवर अग्निशमन सेवेत वापरासाठी आवश्यक असणारे साहीत्य हे वाहना सोबत उपलब्ध होत नसल्याने सदरचे साहीत्य हे खरेदी करणे आवश्यक आहे.सदरचे आवश्यक साहीत्यांची पुर्तता झालेशिवाय वाहन अग्निशमन सेवेत वापरता येणार नाही.

अग्निशामक वाहन हे संस्थान मालमत्ता व जिवसंरक्षण उपाय- योजनेसाठी वापरावयाचे आहे. शिर्डी संस्थानचे हेलिपॅडवर येणारे हेलिकॉप्टर सुरक्षा तसेच संस्थान परीसरातील तेलाच्या आगींवर उपाय – योजने करीता उपयुक्त आहे. फोम टेंडरवर आवश्यक असणारे साहीत्य हे सदरचे वाहनांसोबत प्राप्त होणार नसल्याने त्यांची खरेदी करणे गरजेचे आहे.

संभाव्य दुर्घटणांवर नियंत्रणासाठी अग्निशमन वाहनांवर (सर्व प्रकारच्या आगी, दुर्धटणा, तसेच रेस्क्यु / बचाव कार्यासाठी) आवश्यक आय.एस.आय. मार्क खालील प्रमाणे साहीत्य तातडीने खरेदी करणे गरजेचे आहे.

फोम टेंडर व आपत्कालीक वापरासाठीचे आवश्यक साहीत्य खालील प्रमाणे

| अ.नं. | फायर साहित्य ( आय.एस.आय.मार्क) | वर्णन / IS कोड नं. | एकुण | परीमाण |
|---|---|---|---|---|
| ०१ | शॉर्ट ब्रॅंच | Is – 903 | ०२ | नग |
| ०२ | फॉग नोजल ब्रॅंच | IS 952 :1986 | ०२ | नग |
| ०३ | लंडन पॅर्टन हॅंड कंट्रोल ब्रॅंच | 63 MM GUN METAL LTB-II | ०१ | नग |
| ०४ | रिव्हॉल्व्हींग उईथ रिव्हॉल्व्हींग हेड ब्रॅंच | IS 906 :1988 | ०१ | नग |
| ०५ | एलबो फॉर नोझल ब्रॅंच | IS – 2871 SELECT-O- FLOW-118 | ०१ | नग |
| ०६ | ट्रिपल परपज हॅंड कंट्रोल ब्रॅंच | IS - 5131 | ०१ | नग |
| ०७ | डिव्हायडींग हॅंड कंट्रोल ब्रॅंच | IS – 5131: 2002 | ०१ | नग |
| ०८ | कलेटींग ब्रॅंच | IS – 905 : 1980 | ०१ | नग |
| ०९ | एफ बी ५ x उईथ पिक अप टयुब ( फोम ब्रॅंच ) | IS - 2097 :1983 | ०२ | नग |
| १० | ऑईल फायर नोजल ब्रॅंच | GM 55304 | ०१ | नग |
| ११ | रबर होज रॅम्पू टु वे | --- | ०२ | नग |
| १२ | सक्शन होज ८ फुट ४ इंच १०० M.M. रबर ISI MARK | IS 3549 :1983 | ०४ | नग |
| १३ | डिलिव्हरी होज RRL टाईप- A ISI ६३६ लांबी १५ मिटर ६३ mm डाया मिटर | IS 903 :1975 | २० | नग |
| १४ | फोम कंपाऊड | AFFF 3% | ५०० | लि. |
| १५ | टु - वे कलेंटींग हेड | IS – 904 : 1984 | ०१ | नग |
| १६ | सक्शन रिंचेस युनिर्व्हसल | IS – 4643 : 1984 | ०१ | नग |
| १७ | सक्शन रिंचेस कन्वेहशल | IS – 4643 : 1984 | ०१ | नग |
| १८ | मेटल स्ट्रेनर सक्शन स्ट्रेनर सिलेंड्रीकल टाईप | IS – 907 : 1984 | ०१ | नग |
| १९ | बासकेट स्ट्रेनर सिलेंड्रीकल टाईप | IS - 2930 | ०१ | नग |
| २० | सक्शन होज फिमेल राऊंड थेडेड कपलींग | Blank cap | ०१ | नग |
| २१ | नोजल स्पॅनर आय एस स्टॅंर्डड | ---- | ०२ | नग |
| २२ | कॉल बेल इलेक्ट्रीकल fire bell | IS-928 | ०१ | नग |
| २३ | रबर हॅंड ग्लोज १४ इंची | IS - 4770 :1991 | १० | नग |
| २४ | कॅनव्हॉस बकेट | -- | ०१ | नग |
| २५ | एक्स | -- | ०२ | नग |
| २६ | पीक एक्स | -- | ०२ | नग |
| २७ | पावडे | -- | ०२ | नग |
| २८ | शॉवेल | -- | ०२ | नग |
| २९ | घमीले | -- | ०२ | नग |
| आपत्कालीन परीस्थीतीत अग्निशमन वाहनावर वापरावयाचे साहीत्य ( आय.एस.आय.मार्क) | | | | |
| ३० | स्नेक टॉग | Lucky Reptile Snake Tongs 66 cm | ०१ | नग |
| ३१ | हायड्रोलिककटर मॅन्युअली ऑपरेटेड (हॅंड ऑपरेटेड काम्बीनेशन टुल्स ) | SPS 260 H | ०१ | नग |
| ३२ | चैन सॉ (वुड कटर ) | STIHL MS 361 OR EQUI पेट्रोल २२ इंच | ०१ | नग |
| ३३ | बी.ए सेट S.C.O.C. (30 बार क्षमता, कार्बन कंपोजेट सिलेंडरसह ) ट्रॅगर कं. | BS/EN 136 ,137,139/93 OR ISO 9001 | ०१ | नग |
| ३४ | बी.ए सेट सिलेंडर | ४५ बार क्षमता कार्बन कंपोजेट | ०१ | नग |
| ३५ | लाईफ बायोंन्सी | | ०२ | नग |
| ३६ | लाईफ जॅकेट फुल साईज | ( जॅकेट टाईप ) | ०२ | नग |
| ३७ | फायर नॉमेक्स सुट | नॉमेक्स कं. | १० | नग |

लेखाशाखा विभागाकडील जा.क्र.१२१/२०१५, दि.०७.०४.२०१५ रोजीचे परिपत्रकान्वये रुपये ३ लाखापेक्षा आधिक खर्चाच्या कामांना ई - निवीदा कार्यप्रणाली लागु करण्यात आलेली आहे .

उपरोक्त अ.नं. ०१ ते ३७ मधील आवश्यक साहीत्य खरेदी कामी अंदाजे रु.७,००,०००/- येणाऱ्या खर्चास तसेच अहमदनगर, नाशिक, पुणे, मुंबई या शहरातील वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्दी करणे व संस्थानचे संकेतस्थळावर ई – निविदा प्रसिद्ध करणे बाबत निर्णयार्थ सविनय सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान सेवेत दाखल होणा-या अग्निशमन वाहनाकरिता प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे आवश्यक असलेले साहित्य महाराष्ट्र शासनाकडील शासनाकडील रेट कॉन्ट्रॅक्ट यादीमध्ये समावेश असल्यास रेट कॉन्ट्रॅक्ट नुसार खरेदी करणेत यावे. रेट कॉन्ट्रॅक्ट मध्ये समावेश नाही, असे साहीत्य खरेदी करणेकामी वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन, निविदांची मागणी करणेस व त्यासाठी येणा-या अंदाजे रु.७,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.**

(कार्यवाही- फायर अॅण्ड सेफ्टी विभागप्रमुख)

---

४१ **देणगी पावत्या छपाई करण्यास मान्यता मिळणेबाबत.**

लेखाशाखा विभागामार्फत संस्थान परिसरात एकूण १० देणगी काऊंटर्स कार्यरत आहेत. श्री साई भक्तांकडून देणगी स्विकारुन त्यांना संगणक प्रणालीवर प्रिंट होणारी देणगी पावती देण्यात येते. अशाप्रकारे देणगीपावत्या दि.३१ जुलै,२०१३ रोजी विहीत निविदापध्दतीने छपाई करुन घेण्यास मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घेण्यात आली होती. भक्तांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढल्याने छपाई केलेल्या देणगी पावत्या संपत आल्या असून खरेदी विभागाकडे मागणी केली असता वार्षिक छपाईसाठी काही कालावधी लागणार असल्याचे त्यांच्याकडून समजले. तथापी भक्तांना देणगी पावत्या देणे गरजेचे असल्याने तातडीची बाब म्हणून मागील मंजूर दराने एकूण दोन लाख देणगी पावत्या खरेदी करणे आवश्यक आहे. म्हणजे भक्तांची गैरसोय होणार नाही.

जुलै, २०१३ मध्ये मे.नॅशनल पेपर इंडस्ट्रिज, कोल्हापूर यांचेकडून विहित निविदा पध्दतीने एकूण रु.५,६०,०००/- देणगी पावत्या रु.०.४५ या दराने छपाई करुन घेण्यात आल्या होत्या. सदर पुरवठादारास मागील मंजूर दराने दोन लाख देणगी पावत्या छपाई करुन देणेबाबत विचारणा केली असता मागील मंजूर दराप्रमाणे छपाई करुन देण्यास तयार आहे.

तरी मागील मंजूर दराने मे.नॅशनल पेपर इंडस्ट्रिज, कोल्हापूर यांचेकडून २ लाख देणगी पावत्या छपाई करुन घेण्यास व त्यासाठी येणा-या रु.९०,०००/- चे खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. उपसमितीपुढे सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, तातडीची गरज म्हणून मागील मंजूर दराने मे.नॅशनल पेपर इंडस्ट्रिज, कोल्हापूर यांचेकडून २ लाख देणगी पावत्या छपाई करुन घेण्यास व त्यासाठी येणा-या रु.९०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.**

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

४२ **संस्थान मालमत्ता विमापॉलिसी व श्री साईभक्तांच्या अपघाती विमापॉलीसीचे नुतनीकरणाबाबत.**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे मालमत्तेचे विमा संरक्षण व श्री साईभक्तांना अपघाती विमा संरक्षण मिळणेसाठी संस्थानने राष्ट्रीयकृत विमा कंपन्यांकडून निविदा मागवून न्युनतम दराच्या निविदा स्विकारून विमा संरक्षण घेतले आहे, त्याची मुदत लवकर संपत आहे. सन 2014-15 यावर्षाकरीता घेण्यात आलेल्या विमा संरक्षणाचा थोडक्यात तपशिल खालील प्रमाणे.

(अ) संस्थान मालमत्ता विमा- संस्थानच्या एकूण रु.386 कोटी रक्कमेचा मालमत्ता विमा दि.10जुलै, 2014 ते दि.09 जुलै, 2015 या एका वर्षासाठी न्युनतम दराने युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी, शिर्डी यांचे कडून आलेल्या न्युनतम दराने रू.10,05,000/- इतक्या प्रिमियम रक्कमेस उतरविण्यात आला होता. सदर विमापॉलिसीची मुदत दि.09 जुलै,2015 रोजी संपत आहे.

(ब) श्री साईभक्तांचा अपघात विमा- संस्थान परिसरामध्ये श्री साईभक्तांना काही अपघात झाल्यास एका वेळेस 25 साईभक्तांना विमा संरक्षण मिळावे, यासाठी संस्थानने त्यांची अपघाती विमापॉलिसी घेतली आहे. हा विमा आलेल्या निविदेतील न्युनतम दराप्रमाणे दि युनायटेड इंडिया इंन्शुरन्स कंपनी लि. शिर्डी यांचेकडून 25 भक्तांना विमा संरक्षण देणेसाठी रू.9,51,000/- ची विमापॉलिसी घेण्यात आली आहे. त्याचा कालावधी दि.12 ऑगस्ट,2014 पासून दि. 11 ऑगस्ट,2015 पर्यंत असल्याने सदर विमापॉलिसी दि.11 ऑगस्ट,2015 ला संपत आहे.

उपरोक्त "अ" आणि "ब" मध्ये नुमुद केल्याप्रमाणे दि.10 जुलै,2015 ते दि.09 जुलै,2016 याकालावधीकरीता मालमत्ता विमा उतरविण्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| Sr. No. | Particulars | Insured Sum (in Crore) |
|---|---|---|
| 1 | Cash in Transit Insurance | **3.75** |
| 2 | Fidelity Guarantee Insurance | **4.40** |
| 3 | Burglary & Housebreaking Policy | **165.00** |
| 4 | Cash in Safe, Drawers | **0.77** |
| 5 | Comprehensive Fire Policy (Including STFI, Terrorism & Earthquake Cover) | **374.55** |
| 6 | Group Insurance Under Provisions of Workmen Compensation Act,1923 | **(Approx 2212 Personnel)** |
| | **Total** | **548.47** |

विमापॉलिसींचे पुढील एक वर्षाच्या कालावधीकरीता नुतनीकरण करणे आवश्यक असल्याने विविध राष्ट्रीयकृत विमा कंपन्यांकडून "ई निविदा" मागवून त्या मा.कार्यकारी अधिकारी सो., यांचे समोर उघडून त्यातील न्युनतम दराच्या "ई" निविदा स्विकारण्यास व त्याप्रमाणे मालमत्ता विमा व कर्मचारी फिडीलिटी गॅरंटी तसेच श्री साईभक्तांच्या अपघाती विमा पॉलिसीचे पुढील 1 वर्षाच्या कालावधीसाठी नुतनीकरण करून घेण्यास व त्यावर येणाऱ्या खर्चाच्या प्रस्तावास तसेच "ई" निविदा साठीच्या जाहिरात खर्चास मंजुरी मिळणेसाठी मा.उप समिती समोर ठेवण्यास आपली मान्यता असावी, ही विंनती,

सन 2015-16 या आर्थिक वर्षासाठी रू. 30,00,000/- रक्कमेची एकत्रीत विमा खाती अंदाजपत्रकीय तरतुद करण्यात आलेली आहे.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान मालमत्ता विमापॉलिसी व श्री साईभक्तांच्या अपघाती विमापॉलीसीचे नुतनीकरण करणेचे प्रस्तावास उपसमिती सभेला अधिकार असलेल्या रु.१० लाख मात्र पर्यंतचे खर्चास अधीन राहून मान्यता देण्यात यावी, तसेच याकामी जाहिरात प्रसिध्द करणेसाठी येणा-या अपेक्षीत खर्चासही मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.**

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

४३ **देणगी महिंद्रा स्कॉर्पिओ वाहनाचे विमा व आर.टी.ओ. खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

वाहन विभागाकडील दि.२९/०५/२०१५ रोजीचे मंजुर टिपणीनुसार, महिंद्रा अॅण्ड महिंद्रा कंपनी मार्फत देणगी मिळालेली नवीन महिंद्रा स्कॉर्पिओ वाहनाचा विमा उतरावुन आर.टी.ओ. कार्यालयात वाहनाची रजिस्ट्रेशन व टॅक्स फी भरुन पासींग करणे कामी श्री अमृत गंगाधर जगताप, सहाय्यक अभियंता, वाहन विभाग यांचे नांवे रु.१,०७,०००/- (अक्षरी रक्कम रु.एक लाख सात हजार) मात्रचा अॅडव्हान्स घेण्यात आला होता. सदर खर्चाचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.नं. | तपशिल | पॉलीसी / पावती नं./ दिनांक | रक्कम (रु.) |
|---|---|---|---|
| ०१ | दि.न्यू इन्डिया एश्योरन्स कंपनी लि., श्रीरामपुर (दि.२९/०५/२०१५ ते दि.२८/०५/२०१६) | १५१८०२३११५०३०००११४०६ दि.२९/०५/२०१५ | २५,१६१.०० |
| ०२ | उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, श्रीरामपुर (OTT टॅक्स फी) | १३९३२२८-दि.०५/०६/२०१५ | ८१,०६२.०० |
| ०३ | उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, श्रीरामपुर (रजिस्ट्रेशन फी) | SR४९३९८- दि.०५/०६/२०१५ | २५०.०० |
| ०४ | कांबळे स्टुडिओ अॅन्ड झेरॉक्स, श्रीरामपुर (ऑनलाईन टॅक्स स्टेट बैंक चलन भरणा फी) | - दि.०५/०६/२०१५ | ५०.०० |
| ०५ | केतन झेरॉक्स, श्रीरामपुर (आवश्यक आर.टी.ओ. पेपरची झेरॉक्स फी) | - दि.०५/०६/२०१५ | १७.०० |
| | | **एकुण रक्कम (रु.)** | **१,०६,५४०.००** |

उपरोक्त प्रमाणे नवीन महिंद्रा स्कॉर्पिओ वाहनाचा विमा पॉलिसी उतरविणे व आर.टी.ओ. कार्यालयात वाहनाची रजिस्ट्रेशन, टॅक्स फी भरणे कामी रक्कम रु.१,०६,५४०/- (अक्षरी रक्कम रु.एक लाख सहा हजार पाचशे चाळीस) मात्र खर्च झालेली असुन शिल्लक रक्कम रु.४६०/- मात्र लेखाशाखा पावती नं.२९४, दि.०६/०६/२०१५ ने जमा केलेली आहे.

तरी वरील प्रमाणे नवीन महिंद्रा स्कॉर्पिओ वाहनाचा विमा पॉलिसी उतरविणे व आर.टी.ओ. कार्यालयात वाहनाची रजिस्ट्रेशन, टॅक्स फी भरणे कामी झालेल्या एकुण रक्कम रु.१,०६,५४०/- (अक्षरी रक्कम रु. एक लाख सहा हजार पाचशे चाळीस) मात्र खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेस विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानला देणगी मिळालेल्या महिंद्रा स्कॉर्पिओ वाहनाचा विमा पॉलिसी उतरविणे व आर.टी.ओ. कार्यालयात वाहनाची रजिस्ट्रेशन, टॅक्स फी भरणेकामी एकुण रक्कम रु.१,०६,५४०/- मात्र खर्च झालेला असून त्यापैकी महिंद्रा अॅण्ड महिंद्रा कंपनी आर.टी.ओ. कार्यालयात जमा करण्यात आलेली वाहनाची रजिस्ट्रेशन व टॅक्स फी रक्कम रु.८१,३१२/- मात्र संस्थानला जमा करणार असल्याने उपरोक्त प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.**

(कार्यवाही- वाहन विभागप्रमुख)

---

४४ **श्री साईनाथ व श्री साईबाबा हॉस्पिटल मालमत्ता विमा पॉलिसी नुतनीकरणाबाबत.**

(अ) दरवर्षी श्री साईबाबा संस्थानच्या दोन्ही रुग्णालयाच्या इमारती, फर्निचर, मशिनरी, इक्विपमेंट-इन्ट्रुमेन्ट इ. चल-अचल मालमत्ता, कॅश इन डॉवर, कॅश इन सेफ, कॅश इन ट्रॅन्झीट व कामगार नुकसान भरपाई कायदा, १९२३ चे कलम ३ नुसार रुग्णालये कर्मचा-यांचा समुह विमा राष्ट्रीय कृत विमा कंपन्यांकडे तुलनात्मक प्रीमीयम दर कार्यपध्दतीने उतरवीण्यात येतो. मागील वर्षी युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी लीमीटेड, शाखा शिर्डी यांच्याकडे रु.३,९६,०००/- इतक्या प्रीमीयम रकमेस दि.१० जुलै २०१४ ते दि.९ जुलै २०१५ या कालावधीसाठी विमा उतरविण्यात आला होता, ही मुदत दि.०९ जुलै २०१५ रोजी पुर्ण होत आहे.

(ब) उपरोक्त अ मध्ये नमुद केल्यानुसार दि.१० जुलै २०१५ ते दि.०९ जुलै २०१६ कालावधीकरीता मालमत्ता विमा उतरवीणेबाबतचा तपशील खालील प्रमाणे:-

| Sr. No | Particulars | Insured Sum (in Crore) |
|---|---|---|
| 1 | Cash in Transit Insurance | 50.00 |
| 2 | Fidelity Guarantee Insurance | 00.50 |
| 3 | Burglary & Housebreaking policy | 65.00 |
| 4 | Cash in Safe, Drawers | 00.50 |
| 5 | Comprehensive Fire policy (Including STFI, Terrorism & Earthquake cover) | 78.00 |
| 6 | Group Insurance under provisions of Workmen Compensation Act, 1923 | Approx 600 personnel |
| | **Total-** | **194 Crores** |

श्री साईनाथ व श्री साईबाबा हॉस्पिटल मालमत्ता विमा पॉलिसी नुतनीकरणासाठी राष्ट्रीयकृत विमा कंपन्यांना आवश्यक ती माहिती देऊन त्यांच्याकडुन प्रिमीयमचे दर बोलवीले जातात. आलेल्या दरांचा तुलनात्मक तक्त्यातील न्युनतंम प्रिमीयम दरानुसार विमा पॉलिसीचे नुतनीकरण केले जाते. राष्ट्रीयकृत विमा कंपन्यांकडुन सदर विमा पॉलिसीचे नुतनीकरण करणेसाठी ई-निवीदा बोलविणे आवश्यक आहे. विमा पॉलिसीचे नुतनीकरणासाठी सन २०१५-१६ च्या आर्थिक वर्षाच्या अंदाज पत्रकामध्ये रु.१५.५० लाखांची तरतुद करणेत आलेली आहे.

राष्ट्रीयकृत विमा कंपन्यांकडुन ई-निवीदा मागवुन त्या उघडण्याची न्युनतम निविदा धारकास विमा पॉलिसीचे नुतनीकरणाचे आदेश देण्याच्या कार्यपध्दतीसह मा.कार्यकारी अधिकारी सो. यांना अधिकार प्रदान करुन त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यासाठीच्या मंजुरीस सदरचा सविनय सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ व श्री साईबाबा हॉस्पिटल मालमत्ता विमा पॉलिसी नुतनीकरण करणेचे प्रस्तावास व त्याकामी येणा-या खर्चास तसेच यासाठी जाहिरात देणेकामी येणा-या अपेक्षीत खर्चासही मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

विषय नं.०३ **वाढीव दर्शनरांगेकरिता मंदिर परिसरात (१६ गुंठे) स्टेनलेस स्टील वॉकर रेलींग तयार करणेबाबत.**

प्रस्ताव- नाशिक सिहस्थ कुंभमेळा सन 2015 मध्ये दिनांक 27 ऑगष्ट 2015 ते 26 सप्टेंबर, 2015 या कालावधीत शिर्डी येथे भाविकांची प्रंचड गर्दी होण्याची शक्यता आहे. त्याकामी करावयाच्या कार्यवाहीसाठी संस्थानचे संबंधीत विभागांनी दिलेल्या अंदाजपत्रकीय खर्चाचा एकत्रित प्रस्तावास मा. त्रिसदस्य समितीचे दिनांक 30/01/2015 रोजीचे सभेतील निर्णय क्र.6 अन्वये तसेच त्यानुसार नियोजित कामासाठी येणा-या अंदाजे रुपये 57,54,80,000/- मात्रचे खर्चास मा. मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरगाबाद यांनी दिनांक 06/05/2015 रोजी दिलेल्या आदेशान्वये मान्यता दिलेली आहे. सदर मान्यता मिळालेल्या खर्चामध्ये स्टेनलेस स्टील वॉकर रेलींग तयार करुन बसविणेकामी येणा-या अंदाजे खर्चाचा सामावेश आहे.

मा. त्रिसदस्य समितीचे व मा. मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरगाबाद यांचे मान्यतेनुसार सदरहु कामांसाठी इकडील विभागामार्फत निविदा तयार करुन संस्थान संकेतस्थळावर व वर्तमानपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागविण्यात आलेल्या असून याकामी खालीलप्रमाणे निविदाधारकांनी ई-निविदा अपलोड केलेल्या आहेत:

| अ.नं. | निविदाधारकांचे नांव |
|---|---|
| 1. | मे. रत्ना इंजिनिअर्स, पुणे |
| 2. | मे. पद्माटेक फुडटेक ॲन्ड प्रोसेस टेक्नोलॉजी, पुणे |
| 3. | मे. अपूर्वा इंजिनिअरींग, औरंगाबाद |
| 4. | मे. चंद्रगुप्त कंन्स्ट्रक्शन, साकुरी |
| 5. | मे. साई इंजिनिअर्स, नाशिक |
| 6. | मे. प्रेस-व्हॅक स्टील इंडस्ट्रीज, सिन्नर |

वरीलप्रमाणे विषयांकित कामांसाठी प्राप्त झालेल्या 6 (सहा) ई-निविदांचा लिफाफा क्रमांक 1 (टेक्नीकल बीड) दिनांक 22/06/2015 रोजी मा. प्रशासकीय अधिकारी यांचे समक्ष उघडणेत आले असून, प्राप्त कागदपत्रांची छाननी केल्यानंतर त्यामध्ये सर्व सहाही निविदाधारक पात्र झालेले आहेत.

वरीलप्रमाणे सहा प्राप्त निविदाधारकांचे कमर्शियल बीड दिनांक 22/06/2015 रोजी मा. कार्यकारी अधिकारी, प्रशासकीय अधिकारी यांचे समक्ष उघडणेत आले असून, त्यांच्या दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव | निविदेतील दर रुपये |
|---|---|---|
| 1. | मे. रत्ना इंजिनिअर्स, पुणे | 39,53,875/- |
| 2. | मे. पद्माटेक फुडटेक ॲन्ड प्रोसेस टेक्नोलॉजी, पुणे | 38,67,470/- |
| **3.** | **मे. अपूर्वा इंजिनिअरींग, औरंगाबाद** | **24,91,710/-** |
| 4. | मे. चंद्रगुप्त कंन्स्ट्रक्शन, साकुरी | 25,68,786/- |
| 5. | मे. साई इंजिनिअर्स, नाशिक | 36,89,200/- |
| 6. | मे. प्रेस-व्हॅक स्टील इंडस्ट्रीज, सिन्नर | 30,51,350/- |

उपरोक्त तपशीलानुसार विषयांकित कामांसाठी मे. अपूर्वा इंजिनिअरींग, औरंगाबाद यांनी देऊ केलेले दर निम्नतम आहेत. तरी मे.अपूर्वा इंजिनिअरींग, औरंगाबाद यांचे निम्नतम दर स्विकारणेस व त्यांना कार्यादेश देणेस मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.१६३ **वाढीव दर्शनरांगेकरिता मंदिर (१६ गुंठे) परिसरात स्टेनलेस स्टील वॉकर रेलींग तयार करणेसाठी प्रस्तावात नमुद केलेल्या कार्यवाहीचे अवलोकन करणेत आले.**

**त्यावर सविस्तर चर्चा होऊन, प्राप्त झालेले निम्नतम दर डि.एस.आर. नुसार योग्य आहेत किंवा कसे, याबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन यांचा अभिप्राय घेण्यात यावा व त्यांच्या अभिप्रायानुसार निम्नतम दरधारकास कार्यादेश देणेबाबत कार्यवाही करणेत यावी,**

(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

विषय नं.०४ **संरक्षण विभागाकरिता विविध ठिकाणी बॅरेकेडींग करणेसाठी लोखंडी बॅरिकेड्स तयार करणेबाबत.**

प्रस्ताव- नाशिक सिहस्थ कुंभमेळा सन 2015 मध्ये दिनांक 27 ऑगष्ट 2015 ते 26 सप्टेंबर, 2015 या कालावधीत शिर्डी येथे भाविकांची प्रंचड गर्दी होण्याची शक्यता आहे. त्याकामी करावयाच्या कार्यवाहीसाठी संस्थानचे संबंधीत विभागांनी दिलेल्या अंदाजपत्रकीय खर्चाचा एकत्रित प्रस्तावास मा. त्रिसदस्य समितीचे दिनांक 30/01/2015 रोजीचे सभेतील निर्णय क्र.6 अन्वये तसेच त्यानुसार नियोजित कामासाठी येणा-या अंदाजे रुपये 57,54,80,000/- मात्रचे खर्चास मा. मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरगाबाद यांनी दिनांक 06/05/2015 रोजी दिलेल्या आदेशान्वये मान्यता दिलेली आहे. सदर मान्यता मिळालेल्या खर्चामध्ये संरक्षण विभागासाठी विविध ठिकाणी बॅरीकेडीग करणेकरीता लोखंडी बॅरीकेडस तयार करणेकामी येणा-या अंदाजे रुपये 7,50,000/- मात्रचे खर्चाचा सामावेश आहे.

मा. त्रिसदस्य समितीचे व मा. मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरगाबाद यांचे मान्यतेनुसार सदरहु कामांसाठी इकडील विभागामार्फत निविदा तयार करुन संस्थान संकेतस्थळावर व वर्तमानपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागविण्यात आलेल्या असून याकामी खालीलप्रमाणे निविदाधारकांनी ई-निविदा अपलोड केलेल्या आहेत:

| अ.नं. | निविदाधारकांचे नांव |
|---|---|
| 1. | मे. रत्ना इंजिनिअर्स, पुणे |
| 2. | मे. अपूर्वा इंजिनिअरींग, औरंगाबाद |
| 3. | मे. चंद्रगुप्त कंन्स्ट्रक्शन, साकुरी |
| 4. | मे. साई इंजिनिअर्स, नाशिक |
| 5. | मे. प्रेस-व्हॅक स्ट्रील इंडस्ट्रीज, सिन्नर |

वरीलप्रमाणे विषयांकित कामांसाठी प्राप्त झालेल्या 5 (पाच) ई-निविदांचा लिफाफा क्रमांक 1 (टेक्नीकल बीड) दिनांक 22/06/2015 रोजी मा. प्रशासकीय अधिकारी यांचे समक्ष उघडणेत आले असून, प्राप्त कागदपत्रांची छाननी केल्यानंतर त्यामध्ये सर्व पाचही निविदाधारक पात्र झालेले आहेत.

वरीलप्रमाणे पाच प्राप्त निविदाधारकांचे कमर्शियल बीड दिनांक 22/06/2015 रोजी मा. कार्यकारी अधिकारी, प्रशासकीय अधिकारी यांचे समक्ष उघडणेत आले असून, त्यांच्या दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव | निविदेतील दर रुपये |
|---|---|---|
| 1. | मे. रत्ना इंजिनिअर्स, पुणे | 7,25,465/- |
| 2. | मे. अपूर्वा इंजिनिअरींग, औरंगाबाद | 7,29,100/- |
| 3. | मे. चंद्रगुप्त कंन्स्ट्रक्शन, साकुरी | 5,98,060/- |
| 4. | मे. साई इंजिनिअर्स, नाशिक | 7,29,400/- |
| **5.** | **मे. प्रेस-व्हॅक स्टील इंडस्ट्रीज, सिन्नर** | **5,58,185/-** |

उपरोक्त तपशीलानुसार विषयांकित कामांसाठी मे. प्रेस-व्हॅक स्टील इंडस्ट्रीज, सिन्नर यांनी देऊ केलेले दर निम्नतम आहेत. तरी मे. प्रेस-व्हॅक स्टील इंडस्ट्रीज, सिन्नर यांचे निम्नतम दर स्विकारणेस व त्यांना कार्यादेश देणेस मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.१६४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, संरक्षण विभागाकरिता विविध ठिकाणी बॅरेकेडींग करणेसाठी लोखंडी बॅरिकेड्स तयार करुन घेणेकामी प्रस्तावात नमुद केलेल्या कार्यवाहीचे अवलोकन करणेत येऊन, सदरहूकामी मे. प्रेस-व्हॅक स्टील इंडस्ट्रीज, सिन्नर यांचे रु.५,५८,१८५/- मात्र निम्नतम दर स्विकारणेस व त्यांना कार्यादेश देणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

विषय नं.०५ **साठा संपत आलेली संस्थान प्रकाशित पुस्तके पुन:र्मुद्रण विहित पध्दतीने ई-निविदा मागवून करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ नुसार मा.व्यवस्थापन समितीची कर्तव्ये व अधिकाराबाबत कलम नं.१७ (२) ठ मध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे.

''श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य,त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार- प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील''

उपरोक्त तरतूदीनुसार प.पू.श्री साईबाबांच्या शिकवणूकीचा प्रचार प्रसार होणेसाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी मार्फत संस्थान प्रकाशित साईचरित्रे, पुस्तके,फोटो व ऑडीओ/ व्हिडीओ सीडीचे पुनर् मुद्रण करुन साईभक्तांना माफक किंमतीने विक्री केली जाते.

सर्व साधारण एक वर्ष पुरेल एवढया प्रतींची छपाई केली जाते.जाहिरात प्रसिध्द करणे,ई निविदा मागविणे,प्राप्त सिलबंद निविदा मा.व्यवस्थापन समितीचे सभेत उघडणे, अशा कामासाठी बराच कालावधी लागतो. त्यामुळे ४ ते ५ महिने पुरेल एवढा साठा शिल्लक राहिल्यानंतर छपाईची कार्यवाही चालू करण्यात येते.अनेक साईमंदिरात साईभक्तांना संमेलने आयोजित केली जातात. त्यामुळे ठराविक प्रकाशनांची अचानक मागणी वाढते.

पुनर् मुद्रण करावयाची पुस्तके, शिल्लक साठा,अंदाजे किती महिने पुरेल व प्रस्तावित छपाई याबाबतचे परिशिष्ट खालील प्रमाणे.

| अ.नं. | छपाईचा तपशिल | भाषा | वार्षिक विक्री | शिल्लक साठा | दरमहा सरासरी विक्री | किती महिने पुरेल | नवीन छपाई संख्या | मागिल छपाई दर | अंदाजे छपाई दर | अंदाजे एकूण छपाई रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री साई सतचरित्र पोथी आवृत्ती क्र.३४ | मराठी | ४०,०० | २२८१७ | ३३३३ | ७ | ५०००० | ८१.५० | १००.०० | ५००००००.०० |
| २ | श्री साई सतचरित्र आवृत्ती क्र.५ | ओडिया | १५००० | ३५०० | १२५० | ३ | २०००० | ३७.५० | ५०.०० | १००००००.०० |
| ३ | श्री साईचे सत्य चरित्र आवृत्ती क्र.५ | तेलगू | ५७३७ | ४०० | ४७८ | १ | १५००० | ११७.०० | १३०.०० | १९५००००.०० |
| ४ | मातृसाई आवृत्ती क्र.५ | तेलगू | १०८०० | १०० | ९०० | ० | २०००० | ३५.०० | ४०.०० | ८०००००.०० |
| ५ | श्री साई चरित्र (सार) हिंदी दोहावली आवृत्ती क्र.६ | हिंदी | १५००० | ४१६५ | १२५० | ४ | १५००० | ६१.२० | ७०.०० | १०५००००.०० |
| ६ | दैनंदिन साईबोध आवृत्ती क्र.०७ | मराठी | ५४०० | ८०० | ४५० | १ | १५००० | ६८.४० | ८०.०० | १२०००००.०० |
| ७ | शिलधी आवृत्ती क्र.५ | मराठी | २००० | ९०० | १६६ | ५ | ७००० | ११.०० | १५.०० | १०५०००.०० |
| ८ | खापर्डे डायरी आवृत्ती क्र.७ | हिंदी | ३००० | ० | २५० | ० | ५००० | १३.८० | २०.०० | १०००००.०० |
| ९ | खापर्डे डायरी आवृत्ती क्र.६ | तामिळ | ५००० | ० | ४१६ | ० | ५००० | १७.०० | २५.०० | १२५०००.०० |
| १० | मुलांचे साईबाबा आवृत्ती क्र.१२ | मराठी | ५००० | १५०० | ४१६ | ४ | ७००० | ५.२५ | ०७.०० | ४९०००.०० |
| ११ | मुलांचे साईबाबा आवृत्ती क्र.९ | गुजराथी | १००० | ४०० | ९० | ८ | १००० | ८.८० | १०.०० | १००००.०० |
| १२ | एक फकीर की पाठशाला आवत्ती क्र.७ | हिंदी | १०००० | ० | ८३३ | ० | २०००० | २८.०० | ४०.०० | ८०००००.०० |
| १३ | श्री साईलिलामृत आवृत्ती क्र.१२ | हिंदी | १०००० | ० | ८३३ | ० | १०००० | १९.२० | २५.०० | २५००००.०० |
| १४ | श्री साईलिलामृत आवृत्ती क्र.१२ | गुजराथी | १००० | १०० | ५८ | १ | २००० | १९.२० | २५.०० | ५००००.०० |
| १५ | श्री साईनाथ सगुणोपासना आरती आवृत्ती क्र.९ | हिंदी | ३५६९८ | १५००० | २९७५ | ५ | ३६००० | ९.६५ | १५.०० | ५४००००.०० |
| १६ | श्री साईनाथ सगुणोपासना आरती आवृत्ती क्र.९ | इंग्रजी | ६१५२ | ० | ५१३ | ० | १५००० | १५.३० | २०.०० | ३०००००.०० |
| १७ | श्री साईनाथ सगुणोपासना आरती आवृत्ती क्र.९ | तामिळ | ५२४६ | ० | ४३७ | ० | १०००० | ११.७० | १५.०० | १५००००.०० |
| १८ | श्री साईनाथ सगुणोपासना आरती आवृत्ती क्र.०४ | बंगाली | २००० | ४० | ८६ | ० | ५००० | १०.८० | १५.०० | ७५०००.०० |
| १९ | श्री साईनाथ स्तवनमंजीरी आवृत्ती क्र.३५ | मराठी | ७८१४९ | १०००० | ६५१२ | १ | १५०००० | २.०० | ३.०० | ४५००००.०० |
| २० | श्री साईनाथ स्तवनमंजीरी आवृत्ती क्र.१० | हिंदी | ३४९६८ | ० | २९१४ | ० | १००००० | २.९७ | ३.०० | ४५००००.०० |
| २१ | अर्वाचिन व संत लिलामृत यातील चार | हिंदी | २५०० | ० | ४२ | ० | ५००० | ११.५० | १५.०० | ७५०००.०० |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | अध्याय आवृत्ती क्र.१६ | | | | | | | | | |
| २२ | श्री साईनाथ सगुणोपासना आरती आवृत्ती क्र.१ | उर्दू | नवीनछपाई | ० | ० | ० | १००० | ० | ४.०० | ४०००.०० |
| २३ | श्री साईच्चरित पोथी आवृत्ती क्र.०१ | गुजराथी | नवीन छपाई | ० | ० | ० | २००० | ० | १५०.०० | ३०००००.०० |
| २४ | श्री साईच्चरित पोथी आवृत्ती क्र.०१ | हिंदी | नवीन छपाई | ० | ० | ० | १०००० | ० | १५०.०० | १५०००००.०० |
| २५ | श्री साईच्चरित पोथी आवृत्ती क्र.०१ | कन्नड | नवीन छपाई | ० | ० | ० | २००० | ० | ७०.०० | ३५००००.०० |
| २६ | श्री साई सतचरित्र आवृत्ती क्र. ०७ | बंगाली | ५००० | ३००० | ५००० | ६ | ५००० | ५७.३९ | ७०.०० | ३५००००.०० |
| २७ | श्री साईबाबा चित्रावली आवृत्ती क्र.११ | मराठी / इंग्रजी | १५९२२ | १०००० | १३२७ | ८ | १५००० | ४.९९ | ६००० | ९००००.०० |
| २८ | श्री साईबाबांची शिकवण व तत्वज्ञान आवृत्ती क्र.६ | मराठी | ७००० | २००० | २२८ | ८ | ७००० | १७.२८ | २०.०० | १४००००.०० |
| २९ | श्री साईनाथ स्तवनमंजीरी आवृत्ती क्र.४ | तेलगू | ३२८३६ | २०००० | २७३६ | ८ | ३०००० | ३.३० | ५.०० | १५००००.०० |
| ३० | मुलांचे साईबाबा आवृत्ती क्र.१२ | हिंदी | २०४२७ | १५००० | १७०२ | ८ | २०००० | ६.१० | ८.०० | १६००००.०० |
| ३१ | श्री साईनाथ सगुणोपासना आरती पॉकेट साईज आवृत्ती क्र.१ | तेलगू | नवीन छपाई | ० | ० | ० | २०००० | ० | १५.०० | ३०००००.०० |
| ३२ | श्री साईनाथ भजनमाला आवृत्ती क्र.०६ | हिंदी | ५००० | २१० | १११ | १ | ५००० | ३२.२५ | ४०.०० | २०००००.०० |
| ३३ | श्री साई सतचरित्र पोथी डिलक्स आवृत्ती क्र.०१ | मराठी | नवीन छपाई | ० | ० | ० | ५००० | ० | २००.०० | १००००००.०० |
| ३४ | श्री साईनाथ स्तवनमंजीरी आवृत्ती क्र.१० | इंग्रजी | ८००० | ० | ० | ० | १५००० | ३.१७ | ५.०० | ७५०००.०० |
| | | | | | | | | | एकूण रु. | १८९४८०००.०० |

प्रस्तावित छपाईकामी विहीत पध्दतीनुसार वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन, ई निविदा मागवून, निविदाधारकांना चर्चा/ वाटाघाटीस निमंत्रित करुन,चर्चा वाटाघाटी अंती मान्य होणा-या निम्नतम दराने छपाई कार्यादेश देणेत येतील.याकामी अंदाजे रु.१,८९,४८,०००/- (अक्षरी रुपये एक कोटी, एकोणनव्वद लाख, अठ्ठेचाळीस हजार) मात्र खर्च अपेक्षीत आहे.प्रस्तावास मा.व्यवस्थापन समितीचे सभेत मान्यता मिळालेनंतर, मा.मुंबई उच्च न्यायलय, औरंगाबाद खंडपीठाचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात येईल.मा.उच्च न्यायालयाचे मान्यतेनंतर विहीत पध्दतीने छपाईची कार्यवाही करण्यात येईल.

सन २०१५-१६ चे अदाजपत्रकात पुस्तके/फोटो/ श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका छपाईसाठी केलेल्या रु.७,००,००,०००/- चे अंदाजपत्रकातील तरतूदीनुसार उक्त कामासाठीचा छपाई खर्च करता येईल.सदर पुस्तके विक्री केली जात असल्याने खर्चाची भरपाई होते.

सबब प्रस्तावित पुस्तके छपाईकामी खालील बाबींवर निर्णय होणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे ठेवणेस मान्यतेसाठी सादर.

१) छपाईकामी येणा-या अंदाजे रु.१,८९,४८,०००/- (अक्षरी रुपये एक कोटी, एकोणनव्वद लाख, अठ्ठेचाळीस हजार) खर्चास मान्यता असावी.

२) मा.मुंबई उच्च न्यायलय खंडपीठ, औरंगाबाद यांचेकडे प्रस्ताव सादर करणेस मान्यता असावी.

३) जनसंपर्क कार्यालयाव्दारा वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करणेकामी येणा-या योग्य त्या खर्चास मान्यता असावी.

४) विहीत पध्दतीने ई-निविदा मागवून छपाई कार्यवाही करणेस मान्यता असावी.

**प्रस्तावना-** दि.२७ ऑगष्ट २०१५ ते दि.२६ सप्टेंबर २०१५ या कालावधीत मुख्य शाही स्नानाच्या तिथी असल्याने त्याकाळात जास्तीत जास्त गर्दी होण्याची शक्यता आहे. त्यासाठी शिर्डी व परिसरात साईभक्तांकरीता अतिरिक्त सोयी-सुविधा उपलब्ध करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने वर नमूद गर्दीचे कालावधीत भक्तांसाठी करावयाच्या अतिरिक्त सुविधांमध्ये साईभक्तांच्या वाहनांसाठी वाहनतळे तयार करणे, जड वाहतूक बाह्यवळण रस्त्याने वळविणे, तात्पुरत्या स्वरुपाची निवासव्यवस्था, अतिरिक्त दर्शनरांग व्यवस्था, तात्पुरत्या सार्वजनिक स्वच्छतागृहांची व्यवस्था, पाणीपुरवठा, सुरक्षा, अतिरिक्त प्रसाद भोजनव्यवस्था, अल्पोपहार इत्यादी सोयी-सुविधा संस्थानतर्फे करणे प्रस्तावित आहे.

जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर क्र.जि./स्वी.स./कुंभमेळा/४१/२०१५, अहमदनगर, दि.२९/०१/२०१५ रोजीचे आदेशान्वये नाशिक सिंहस्थ कुंभमेळा सन-२०१५ करीता शिर्डी व परिसरात करावयाच्या अतिरिक्त सुविधांच्या नियोजनासाठी उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांचे अध्यक्षतेखाली स्थापन करणेत आलेल्या तालुकास्तरीय समितीच्या वेळोवेळी झालेल्या बैठकामध्ये व दि.३१/०१/२०१५ रोजीचे बैठकीत अतिरिक्त वाहनतळे, निवारा शेड उभारणी करणेकामी जागांची पाहणी करण्याचे ठरलेनुसार दि.०१/०२/२०१५ रोजी शिर्डी पोलीस स्टेशन व वहातूक शाखेचे पोलिस निरिक्षक यांचेसह प्रस्तावित वाढीव जागांची पाहणी करण्यात आली. पहाणीअंती खालील वाढीव जागा निश्चित करणेत आल्या.

**वाढीव वाहनतळांची माहितीः-**

| अ.नं | गांव | गट/ सर्व्हे नंबर | क्षेत्र हे-आर | शेतीमालकाचे नांव | ठिकाण | करावयाची व्यवस्था |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | शिर्डी | ५९/१ | ००.५० | सुशिलाबाई दिलीप गोंदकर | बिरेगाव रोड, कालीका नगर | वाहनतळ |
| २ | रूई | ३४८ | ००.७० | श्री लक्ष्मण मारुती कोते, श्री संतोष शोभाचंद लोढा, श्री मोहनलाल मानकचंद कांकरीया व इतर | पिंपळवाडी रोड | वाहनतळ |
| ३ | नांदुर्खी बु. | १७५ | १-४५ | श्री. शिवाजी भिमराज चौधरी व इतर०८ | नांदुर्खी रोड | वाहनतळ |
| ४ | निमगाव-को-हाळे | २६/१,<br>६८/१ | ००-७४<br>००-७० | साईनगर रेल्वे स्टेशन | मध्य रेल्वे, रेल्वे स्टेशन साईनगर, शिर्डी | वाहनतळ |

**प्रस्तावः-** उपरोक्त नमूद केलेप्रमाणे अतिरिक्त वाढीव वाहनतळांचे व्यवस्थेचे ठिकाणी दि.२७/०८/२०१५ ते दि.२६/०९/२०१५ या कालावधीत संस्थानतर्फे पार्कींग, अंतर्गत रस्ते, या सुविधा तात्पुरत्या स्वरुपात उपलब्ध करुन देण्याचे नियोजन आहे. तसेच यापैकी साईनगर रेल्वे स्टेशन परिसरातील वाहनतळाचे ठिकाणी निवाराशेड, क्लोकरुम, स्वच्छतागृहे, अल्पोहार स्टॉल, सुरक्षाचौक्या या सुविधा करण्याचे नियोजन आहे.

वर नमूद केलेप्रमाणे नाशिक सिंहस्थ कुंभमेळा सन-२०१५ चे कालावधीत शिर्डीमध्ये श्री साईबाबा समाधीच्या दर्शनासाठी होणा-या संभाव्य गर्दीचे कालावधीत साईभक्तांचे सोयीसाठी करावयाच्या अतिरिक्त वाहनतळांसाठी तयार केलेल्या अंदाजपत्रकानुसार खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.न. | कामाचा तपशिल | अंदाजे अपेक्षित खर्च |
|---|---|---|
| १ | वर नमूद चार वाहनतळांचे ठिकाणी पार्किंग करीता जागेचे सपाटीकरण, मुरुम, खडीकरण इत्यादी सिव्हील कामे करणे. तसेच गौण खनिजांची रॉयल्टी भरणे. | १,०४,४४,८७५/-. |
| २ | वरील चार वाहनतळांपैकी रेल्वे स्थानक परिसरातील नियोजीत वाहनतळावर शेडस् उभारणे, माहिती केंद्र व क्लोक रुम , प्राथमिक उपचार केंद्र, अल्पोपहार गृहे व पोर्टेबल टॉयलेटस् उभारणे. | ३५,२२,२००/-. |
| ३ | बोर्ड, बॅनर्स इत्यादी अनुषंगीक कामांसाठी आवश्यक खर्च | १,००,०००/-. |
| ४ | एकूण ११ ठिकाणचे वाहनतळांचे जागांकरीता भाडेपट्टा अदा करणेकामासाठी आवश्यक खर्च (एकूण क्षेत्र ८७.४९ एकर, कालावधी ९० दिवस) | ९८,५८,६५१/- |
| | **एकूण रक्कम रु.** | २,३९,२५,७२६/- |

याकामी उपरोक्त तपशिलात नमूद केलेप्रमाणे एकूण रक्कम रु.२,३९,२५,७२६/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.

यापुर्वी मा. त्रिसदस्यीय समितीच्या दिनांक ३०/०१/२०१५ रोजीचे सभेत पुर्वीचे ढोबळ नियोजनानुसार करावयाचे कामांसाठी प्राथमिक अंदाजानुसार सादर केलेल्या रुपये ५७,५४,८०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे.

कुंभमेळा कालावधीत होणा-या गर्दीचे अनुषंगाने उपलब्ध करावयाच्या सोयी-सुविधांकरीता मा. उच्च न्यायालयाने रु. ५७.५४ कोटी मात्रचे खर्चाचे प्रस्तावास मान्यता दिलेली आहे. सदरहु प्रस्तावामधील मंजूर रकमेपैकी श्री साईप्रसादालय, कॅन्टीन विभाग व लाडू प्रसाद निर्मिती विभागांचे किराणा माल खरेदी मागणीचा समावेश हा नित्याचे वार्षिक खरेदीमध्ये करणेत आलेला असल्याने सदरहु बाबींसाठी तरतूद करण्यात आलेल्या रकमांची बचत होण्याची शक्यता आहे. तरी याप्रमाणे होणा-या संभाव्य बचतीतून वर नमूद प्रस्तावित खर्च करता येईल. याकामी मा. उच्च न्यायालयाचे परवानगी नुसार पुर्वी मंजूर करणेत आलेल्या ०७ वाहनतळांचे ठिकाणी जमिनीचे सपाटीकरण करणे, मुरुम व खडीकरण, मंडप निवारा शेडस् उभारणे, पोर्टेबल टॉयलेटस् पुरविणे आदि कामे करणेसाठी ई-निविदा प्रक्रिया राबविणेत येत आहे. सदर निविदे प्रक्रियेव्दारे नियुक्त होणा-या ठेकेदारांकडून उपरोक्त ०४ नविन वाहनतळांचे काम तसेच त्याठिकाणी उपलब्ध करावयाची अनुषंगिक व्यवस्था त्याच मंजूर दरात पूर्ण करुन घेता येईल असे मत आहे.

तरी वर नमूद केलेप्रमाणे ०४ वाढीव वाहनतळे विकसीत करणे व वाहनतळांच्या जागांकरीता भाडेपट्टा अदा करणेसाठी येणारे अपेक्षित एकूण रु.२,३९,२५,७२६/- मात्रचे खर्चास, तसेच सदरहु कामे यापुर्वी ०७ वाहनतळांकरीता करण्यात येत असलेल्या ई-निविदा प्रक्रियेव्दारे ठरविण्यात येणा-या ठेकेदारांकडून मंजूर दराने करुन घेणेस मान्यतेस्तव सादर .

निर्णय क्र.१७२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे नाशिक सिंहस्थ कुंभमेळा सन- २०१५ चे कालावधीत संस्थानतर्फे शिर्डी व परिसरात साईभक्तांचे वाहनांसाठी ०४ वाढीव वाहनतळे विकसीत करणे व वाहनतळांच्या जागांकरीता भाडेपट्टा अदा करणेसाठी येणा-या अंदाजे रु.२,३९,२५,७२६/- मात्रचे खर्चास, तसेच सदरहु कामे यापुर्वी ०७ वाहनतळांकरीता करण्यात येत असलेल्या ई-निविदा प्रक्रियेव्दारे ठरविण्यात येणा-या ठेकेदारांकडून मंजूर दराने करुन घेणेस चक्रीय पध्दतीने समिती अध्यक्ष व सदस्यांची मान्यता घेण्यात येऊन, त्यावर कार्यवाही चालू करण्यात आलेली आहे. त्याची नोंद घेण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

विषय नं.१३ **शिर्डी येथील सर्व्हे नं.१७१/१२ मधील बसस्थानक व भक्तनिवास इमारतीचे सबस्टेशन व जनरेटर रुम शेडचे बांधकामाबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदः-**

अधिनियमाच्या कलम १७ मधील पोटकलम (१) मध्ये भक्तगणांना आवश्यक त्या सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याची तरतूद आहे.

**शासन मान्यता:–** महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्रं. सांसवि २००६/६०७/(८७) का.सांबा दि.१३/०१/२००९ अन्वये संस्थानतर्फे बसस्थानक बांधकामाकरीता रु.७,६५,५०,८९८/- मात्रचे खर्चास शासन मान्यता देणेत आली आहे.

**प्रस्तावना:–** संस्थानमार्फत शिर्डी बसस्थानक व भक्तनिवास इमारतीचे बांधकाम करणेचेकाम ठेकेदार मे. पाटील कन्ट्रक्शन अॅन्ड इन्फ्रास्ट्रक्चर लि.,पुणे यांचेमार्फत सुरु आहे. ठेकेदार मे. पाटील कन्ट्रक्शन, पुणे यांचे कामामध्ये इलेक्ट्रीक कामाचा समावेश केलेला नसल्याने विद्युतीकरण कामासाठी विदयुत विभागामार्फत स्वतंत्र निविदा बोलावून काम देण्यात आले आहे.

विद्युत विभागाकडील जा.नं.२४१/२०१४ दि.०३/०१/२०१४ रोजीचे पत्रानुसार आर्किटेक्ट यांचेकडून प्रस्तावीत सबस्टेशन व जनरेटरकरिता शेड उभारणीकामी सविस्तर अंदाजपत्रक व प्लॅन तयार करुन मिळणेबाबत इकडील जा.नं.५४८१/२०१५ दि.०४/०२/२०१५ रोजीचे पत्रान्वये कळविणेत आले होते. याबाबत आर्किटेक्ट काबरे चौधरी, नाशिक यांचेकडून दि.२५/०२/२०१५ रोजीचे पत्रान्वये शिर्डी बसस्थानक इमारत व सुलभ शौचालय यामधिल मोकळया जागेत पूर्वेकडील कम्पाउंड लगत १३.५० x ६.१० मी. या साईजचे शेड उभारणीसाठी नकाशे व अंदाजपत्रक दिले आहे.

**प्रस्ताव:–** आर्किटेक्ट काबरेचौधरी, नाशिक यांनी प्रस्तावीत सबस्टेशनचे जनरेटर व इलेक्ट्रीक पॅनल करीता १३.५० x ६.१० मी. या साईजचे शेड उभारणीकरीता प्लॅन व अंदाजपत्रक दिले आहे. त्यानुसार आर्किटेक्ट यांनी शेडकरीता आरसीसी फ्रेम स्ट्रक्चर, शेडचे छताकरिता Percolated Galvalume Sheet व फ्लोअरींगकरिता पॉलिश शहाबाद याप्रमाणे Specifications घेतलेले आहेत. तसेच विदयुत विभागाकडील जा.नं.३२१/२०१५ रोजीचे पत्रातील अभिप्रायानुसार जनरेटर सेटकरिता फाऊंडेशन व केबल टाकणेकरिता केबल ट्रेंचचा समावेश अंदाजपत्रकात केलेला आहे. याकामी सोबतचे अंदाजपत्रकानुसार रक्कम रु.१४,५५,७००/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

**विभागाचा अभिप्राय:–** उपरोक्त प्रमाणे सबस्टेशनचे जनरेटर व पॅनलकरिता शेड उभारणीकामी एकूण रु.१४,५५,७००/- मात्र खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च रु.१० लक्षपेक्षा जास्त असल्याने मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी पी.आय.एल. नं. १८/२०११ मधील सिव्हील ॲप्लीकेशन नं. १२०५६/२०१२ दि.१६/१०/२०१२ रोजी दिलेल्या आदेशानूसार मा. उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घ्यावी लागेल.

सदरहू खर्च वर नमूद शासन मान्यतेचे मर्यादेत राहील असा अंदाज आहे. तसेच उपरोक्त काम नियोजित इमारतीचा वापर करण्याचे दृष्टीने अत्यावश्यक असल्याने ते करणे गरजेचे आहे.

तरी सदरचे खर्चास व याकामी विहीत पध्दतीने ई - निविदा मागविणेसाठी वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेत स्थळावर निविदा सूचना प्रसिध्द करुन निविदा मागविणे व मा. उच्च न्यायालयाची परवानगी प्राप्त झालेनंतर कार्यादेश देणे याप्रमाणे कार्यवाहीसाठी प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

निर्णय क्र.१७३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी येथील सर्व्हे नं.१७१/१२ मधील बसस्थानक व भक्तनिवास इमारतीचे सबस्टेशन व जनरेटर रुम शेडचे बांधकाम करुन घेणेसाठी येणा-या अंदाजे रु.१४,५५,७००/- मात्रचे खर्चास तसेच याकामी वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन, विहीत पध्दतीने ई-निविदांची मागणी करणेस तत्वत: मान्यता देण्यात आली.**

**परंतु तत्पुर्वी सदरहूकामी येणा-या खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाच्या मान्यतेनंतर कार्यादेश देणेची कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख/ विधी अधिकारी)

---

विषय नं.१४ **शिर्डी येथील सर्व्हे नं.१७१/१२ पै. मधील जागेवर संस्थान निधीतून बसस्थानक व भक्तनिवास इमारतीचे बांधकाम ठेकेदार पाटील कन्ट्रक्शन अँण्ड इन्फ्रास्ट्रक्चर लि., पुणे यांनी केलेल्या आर.ए. बिलाचे मागणीबाबत.**

प्रस्ताव- शिर्डी येथील स.नं. 171/12 पै मधील जागेवर संस्थान निधीतून अद्यावत बस स्थानक व भक्त निवास इमारतीचे बांधकाम ठेकेदार पाटील कन्स्ट्रक्शन्स अँण्ड इन्फ्रास्ट्रक्चर लि., पुणे यांचेमार्फत करण्यात येत आहे. सदर कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| 1 | कामाचे नांव | शिर्डी बसस्थानक व त्यावरील भक्तनिवास इमारत संस्थान निधीतून विकसीत करणे. |
| 2 | आर्किटेक्ट | मे. काबरे चौधरी आर्किटेक्टस्, नाशिक |
| 3 | ठेकेदार | मे पाटील कन्स्ट्रक्शन अँण्ड इन्फ्रास्ट्रक्चर लि. पुणे |
| 4 | मंजूर निविदा रक्कम | रु.7,60,90,089/- |
| 5 | कार्यादेश क्र. व दिनांक | जा.क्र.6821/10, दि.29/04/2010 |
| 6 | करारनाम्यानुसार काम सुरु करण्याचा दिनांक | दि.14/05/2010 |
| 7 | काम पूर्ण करण्याचा कालावधी | 15 महिने |
| 8 | करारनाम्यानुसार काम पूर्ण करण्याचा दिनांक | दि.13/08/2011 |
| 9 | प्रथम मुदतवाढ | मा. व्यवस्थापन समिती निर्णय क्र. 81, दि.14/01/2012 अन्वये दि.31/07/2012 अखेर. |
| 10 | द्वितीय मुदतवाढ | मा. व्यवस्थापन समिती निर्णय क्र.746 दि.15/09/2012 अन्वये दि.28/02/2013 अखेर. |
| 11 | तृतीय मुदतवाढ | मा. व्यवस्थापन समिती निर्णय क्र.615 दि.17/09/2012 अन्वये दि.30/11/2013 अखेर. |
| 12 | चतुर्थ मुदतवाढ | मा. व्यवस्थापन समिती निर्णय क्र.858 दि.27/10/2013 अन्वये दि.31/01/2014 अखेर. |
| 13 | कामाची सद्यस्थिती | 1. ठेकेदार यांनी काही किरकोळ कामाव्यतिरिक्त इमारतीचे आर.सी.सी., वीट बांधकाम, आतील व बाहेरील प्लास्टर, टेरसचे चायना मोझॅक वॉटरप्रुफींगचे काम पूर्ण केले आहे.<br>2. रुम मधील व्हेट्रीफाईड टाईल्स फ्लोअरींग व डॅडोचे काम पूर्ण केले आहे. पॅसेजचे फ्लोरींग व डॅडोचे 90% काम पूर्ण.<br>3. तीन मजल्यावरील जनरल टॉयलेट व पॅसेजचे फ्लोअरींग व डॅडोचे टाईल्स बसविणेचे काम प्रगतीपथावर असून सुमारे 80% काम पूर्ण झाले आहे. ग्राऊंड फ्लोअरचे व्हेट्रीफाईड टाईल्स फ्लोरींगचे काम पूर्ण, ग्रॅनाईट फ्लोअरींग व डॅडोचे काम सुरु केलेले आहे.<br>4. ठेकेदार यांनी Aluminium Composite panel cladding करणेकामी फ्रेम वर्क तयार असून शीट बसविणेचे काम सुरु.<br>5. ठेकेदार यांनी परिसर विकास कामातील बसस्थानक प्लॅटफॉर्म समोरील बस पार्किंगचे ट्रीमिक्स कॉक्रीटचे सुमारे 50% भागातील काम पूर्ण केले आहे.<br>6. ठेकेदार यांनी अंतर्गत प्लंबींगचे काम पूर्ण केलेले असून फीक्चर बसविणे बाकी आहे.<br>7. दोन सेप्टीक टॅन्कचे काम पूर्ण झाले आहे.<br>8. उत्तर, दक्षिण व पश्चिम बाजूकडील कंम्पाऊंड भिंतीचे बांधकाम, ड्रेनेज लाईन, एक्सटर्नल प्लंबींग, दरवाजे शटर बसविणे, प्लंबींग फीक्चर, कमोड संडास भांडे बसविणे, रिनोव्हा पेंट, इ. कामे बाकी आहेत. |

दि.13/10/2014 रोजी मा. कार्यकारी अधिकारी यांचे कक्षात झालेल्या बैठकीतील चर्चेनुसार ठेकेदार यांचे प्रतिनिधी श्री. के. के. चतुर्वेदी यांनी सदरचे काम दि.31/12/2014 अखेर पूर्ण करुन देऊ असे दि.16/10/2014 रोजीचे पत्रान्वये कळविले होते. परंतू प्रत्यक्षात ठेकेदार यांचे दि.20/10/2014 ते 20/11/2014 या कालावधीत संपूर्ण काम बंद

होते. ठेकेदार यांचेकडे कामाची गती वाढवून काम पूर्ण करणेसाठी वेळोवेळी समक्ष चर्चेद्वारे तसेच पत्राद्वारे पाठपुरावा करणेत आला आहे. परंतू याबाबत ठेकेदार यांचेकडून अपेक्षीत प्रतिसाद मिळालेला नाही. याकरीता निविदेतील क्लॉज नं. 27, 28 व 29 पान नं. 79, 80 नुसार ठेकेदार यांना या प्रकल्पाचे आर्किटेक्ट काबरे चौधरी आर्किटेक्टस, नाशिक यांचेमार्फत दि.23/01/2015 रोजीचे पत्रान्वये नोटीस देणेत आलेली आहे. सदर नोटीसबाबत ठेकेदार यांनी दि.02/02/201 रोजीचे पत्रान्वये आर्किटेक्ट यांना उत्तर दिलेले आहे. ठेकेदार यांचे सदरहू पत्र सोबत अवलोकनार्थ ठेवले आहे.

ठेकेदार यांचे साईटवरील प्रामुख्याने खालील कामे बाकी आहेत.

01) इमारतीचे बाहेरील बाजूने ACP Sheet चे क्लॅडींग करणेचे 60% काम बाकी.

02) एक्सटर्नल प्लंम्बींग व फिक्चर बसविणे.

03) इमारतीचे बाहेरील रिनोव्हो पेंट.

04) ट्रिमीक्स कॉक्रीटीकरणाचे 50% काम बाकी आहे.

05) बसस्थानकचे उत्तर, दक्षिण व पश्चिम बाजूकडील कंम्पाउंड भिंतीचे बांधकाम.

06) ड्रेनेज लाईन.

ठेकेदार यांनी काम पूर्ण करणेसाठी दि.31/12/2014 अखेर मुदतवाढ मिळणेची विनंती केली होती. ठेकेदार यांचे मुदतवाढ मागणीबाबतचे प्रस्तावावर दि.25/09/2014 रोजी झालेल्या मा. त्रिसदस्य समितीचे सभेतील निर्णय क्र. 815 अन्वये सदरहू ठेकेदार यांना मूदतवाढ मिळणार नाही, दि.31/12/2014 चे आत काम पूर्ण करुन द्यावे व दंड आकारणीचा हक्क राखून ठेवून काम पूर्ण झाल्यानंतर अंतिम बील देण्यात येईल असे लेखी कळविण्यात यावे, असे ठरले. त्यानुसार ठेकेदार यांना इकडील जा. नं. 4115/2014 दि.29/11/2014 रोजीचे पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

यापुर्वी ठेकेदार यांना सहावे रनिंग बिलापोटी रक्कम रु.9,79,000/- मात्र ॲडव्हान्स म्हणून अदा केलेली आहे. आर्किटेक्ट यांनी सहावे रनिंग बिलाची सविस्तर तपासणी केलेली असून सदर बिलाची रक्कम रु.53,16,968/- मात्र प्रमाणीत केली आहे. सदर बिलापोटी अदा केलेला ॲडव्हान्स व यापूर्वी ठेकेदार यांना मटेरीअलपोटी अदा केलेल्या ॲडव्हान्सची रक्कम कपात करुन निव्वळ रक्कम रु.4,85,254/- मात्र ठेकेदार यांना अदा करणेची शिफारस केली आहे. परंतू मा. त्रिसदस्य समितीचे उपरोक्त निर्णयानुसार ठेकेदार यांना सदरहू बिलापोटी देय होणारी निव्वळ रक्कम अदा केलेली नाही.

त्यानंतर ठेकेदार यांनी दि.30/09/2014 रोजी सातवे रनिंग बिल रक्कम रु.54,46,701/- मात्र रक्कमेचे सादर केलेले आहे. सदर बिलाची आर्किटेक्ट यांनी तपासणी करुन बिलाची रक्कम रु.47,12,169/- मात्र इतकी प्रमाणित केली आहे. निविदा शर्तीनुसार आर. अे. बिलाची रक्कम रु. 50 लक्ष होत नाही. त्यामुळे सदर बिल ठेकेदार यांना देय होत नाही.

आता ठेकेदार यांनी दि.20/03/2015 रोजी रु.65,07,005/- मात्र रक्कमेचे आठवे रनिंग बील सादर केलेले आहे. सदर बिलाची तपासणी केली असता त्याची रक्कम (Value of work done) रु.46,80,886/- मात्र इतकी होते.

ठेकेदार यांचे आठवे रनिंग बिलापर्यंत झालेल्या कामाचा व या बिलांपोटी त्यांना देय होणारे रकमेचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

Details of Bill upto and including 8th R.A Bill.

| | | |
|---|---|---|
| A | Amount of work executed upto and including this bill | |
| 1 | Tender Item | |
| | a. main building | 3,80,35,609.58 |
| | b. Temparory S.T. stand | 4,43,208.06 |
| | c. Parking | 5,47,310.00 |
| | d. Leveling & compacting of bus parking | 58,296.00 |
| Total - | | 3,90,84,423.06 |
| Tender percentage 9.9% above | | 38,69,357.94 |
| | | 4,29,53,781.58 |
| 2 | Extra Items Part- A | 42,341.00 |
| | Part - B | 20,298.00 |
| | Part - C | 2003.00 |
| | Gross Value of work executed | 4,30,18,424.00 |
| | Less value of work executed in previous bill | 2,83,08,402.00 |
| | Net value of work executed (A) | 1,47,10,022.00 |
| B | Deduction | |
| | 1. S.D. 5% of (A) | 7,35,501.00 |
| | 2. T D S @ 2% of (A) | 2,94,200.00 |
| | 3. Vat @ 2% of (A) | 2,94,200.00 |
| | 4. Recovery of material Advance | 9,87,131.00 |

| | | |
|---|---|---|
| | 5. Less advance paid agins 6th R.A<br>6. Liquidated damages maximum 10% of contract value (as per clause 21 page 30 of tender document) i.e. 76,09,009-2,40,000 = 73,69,009 | 9,79,000.00<br>73,69,009.00 |
| | Total Deduction (B) | 1,06,59,041.00 |
| | Net amount ( A-B) | 40,50,981.00 |

निवेदेतील शर्तीनुसार ठेकेदार यांचेकडून विलंबापोटी जास्तीत जास्त निविदा रक्कमेच्या 10% म्हणजे 7,60,90,089/- रक्कमेच्या 10% रक्कम रु.76,09,009/- मात्र रक्कम दंड आकारणी पोटी कपात करता येईल. ठेकेदार यांचे पाचवे रनिंग बिलातून रु.2,40,000/- मात्र रक्कम विलंबापोटी कपात केलेली आहे, उर्वरीत दंडाची रक्कम रु.73,69,009/- मात्र या बिलातून कपात होईल. त्यानुसार ठेकेदार यांचे बिलातून विलंबापोटी दंड आकारणी अधिक मटेरीअल पोटी अदा केलेला ॲडव्हान्स कपात करुन उपरोक्त तपशिलानुसार निव्वळ रक्कम रु.40,50,981/- मात्र देय होते. ठेकेदार यांनी संस्थानकडे सादर केलेल्या बिलांपैकी 50% रक्कम त्यांना मिळावी अशी विनंती केली आहे.

निविदा शर्तीनुसार विलंबापोटी कपात करण्याजोगी दंडाची जास्तीत जास्त रक्कम मंजूर निविदा रकमेच्या १०% प्रमाणे रु.76,09,009/- मात्र इतकी होते. तरी वर नमूद केलेल्या तपशिलानुसार सदर दंडाची रक्कम कपात करुन निव्वळ रक्कम रु.40,50,981/- मात्र ठेकेदार यांना देय होते. याबाबत ठेकेदार यांचेकडून लवकरात लवकर काम पूर्ण करुन घेण्याचे दृष्टीने त्यांना सदरहू रक्कम अदा करुन त्यानंतर सर्व काम पूर्ण झालेनंतर अंतिम बिलापोटी देय होणारी उर्वरीत रक्कम अदा करता येईल, असे मत आहे. तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.१७४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे निविदा शर्तीनुसार निविदा रकमेच्या १०% प्रमाणे रु.76,09,009/- मात्र रक्कम विलंबापोटी कपात करणेत येऊन, निव्वळ रु.40,50,981/- मात्र रक्कम बसस्थानक व भक्तनिवास इमारतीचे बांधकाम ठेकेदार, पाटील कन्ट्रक्शन ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर लि., पुणे यांना आदा करणेत यावी. तसेच सदरहू काम अंतीम टप्प्यात असल्याने व लवकरात लवकर पूर्ण करुन घेण्याचे दृष्टीने यापुढील बिलांच्यापोटी देय होणा-या रक्कमा बांधकाम ठेकेदार यांना वेळोवेळी आदा करणेत याव्यात, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

विषय नं.१५ **द्वारावती भक्तनिवास इमारतीचे आतील भागास रंगकाम करणेकामी प्राप्त झालेल्या ई-निविदांबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद :** अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

**मा.त्रीसदस्य् समितीचे सभेतील निर्णय:** मा.त्रिसदस्य् समितीचे दिनांक १५/०३/२०१४ रोजीचे सभेत निर्णय क्र.१९६ खालील प्रमाणे संमत करणेत आलेला आहे.

".. यावर सविस्तर चर्चा होऊन, व्दारावती भक्तनिवास इमारतीचे आतील भागास रंगकाम करणेसाठी विहीत पध्दतीने निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.८३,६३,५५३/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.

तसेच याकामी येणा-या खर्चास संस्थान वकीलामार्फत अर्ज सादर करणेत येऊन, मा. मुंबई उच्च् न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले."

**मा. मुंबई उच्च् न्यायालय खंडपीठ परवानगी आदेश:** C.A. No. 8698 of 2014 In P.I.L. NO. 18 of 2011 dt. 14/01/2015 अन्वये परवानगी देण्यात आलेली आहे.

**प्रस्ताव:** मा.त्रिसदस्य् समितीचे उपरोक्त् निर्णयानुसार व मा. मुंबई उच्च् न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचे मान्यतेनुसार सदरहू कामासाठी इकडील विभागामार्फत निविदा तयार करुन संस्थानचे संकेतस्थळावर व वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द् करून ई-निविदा मागवित आल्या असून, याकामी खालील ठेकेदारांनी ई-निविदा अपलोड केल्या आहेत.

| अ.क्र. | ठेकेदाराचे नांव |
|---|---|
| 01. | Chandragupta Constructions, Sakuri |
| 02. | Giridhar Construction, Sonewadi |
| 03. | S. G. Gaikwad, Rahata |
| 04. | Atul V. Chavan, A.nagar |

विषयांकीत कामासाठी वरील प्रमाणे अपलोड झालेल्या चार ई-निविदांचा लिफाफा क्र.०१ (Technical bid) दि.११/०४/२०१५ रोजी प्रशासकिय अधिकारी यांचे समक्ष उघडणेत आले असून, प्राप्त कागदपत्रांची छाननी केल्यानंतर त्यामध्ये वरील चारही ठेकेदार पूर्व पात्रता निकषांची पुर्तता करत असल्याने पात्र होत असल्याने, उपरोक्त ठेकेदारांचे लिफाफा क्र.०२ (Commercial bid) प्रशासकिय अधिकारी यांचे समक्ष दि.०२/०५/२०१५ रोजी उघडणेत आले असून, त्यांचे दरांचा तुलनात्मक तक्ता  खालील प्रमाणे आहे.

| Sr. No. | Bidder Name | Estimated Rate | Quoted Percentage | Rate |
|---|---|---|---|---|
| 01. | Chandragupta Constructions, Sakuri | 8263552.5 | -8.16 | 7589247.00 |
| 02. | Giridhar Construction, Sonewadi | 8263552.5 | -7.00 | 7685104.00 |
| 03. | S. G. Gaikwad, Rahata | 8263552.5 | -4.01 | 7932184.00 |
| 04. | Atul V. Chavan, A.nagar | 8263552.5 | -17.77 | **6795119.00** |

उपरोक्त तपशिलानुसार विषयांकीत कामासाठी Shri. Atul Vitthal Chavan, Ahmednagar यांचे ई-निविदेतील दर निम्नतम (L-1) स्वरुपाचे आहेत, तरी त्यांचे निम्नतम दर स्विकारणेस व त्यांना कार्यादेश देणेस मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.१७५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, द्वारावती भक्तनिवास इमारतीचे आतील भागास रंगकाम करणेसाठी प्रस्तावात नमुद केलेल्या ई-निविदा प्रक्रियेचे अवलोकन करणेत आले. तसेच याकामी C.A. No. 8698 of 2014 In P.I.L. NO. 18 of 2011 dt. 14/01/2015 अन्वये मा.उच्च न्यायालयाची मान्यता मिळालेली असल्याने, प्रस्तावितकामी श्री.अतुल विठ्ठल चव्हाण, अहमदनगर याचे रु.६७,९५,११९/- मात्र हे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

विषय नं.१६ **श्री साईनाथ रुग्णालयातील एम.एस. खिडक्यांऐवजी ॲल्युमिनिअम स्लायडींग विंडो बसविणेकामी प्राप्त झालेल्या ई-निविदांबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:** अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

**मा.त्रीसदस्य् समितीचे सभेतील निर्णय:** मा. त्रिसदस्य् समितीचे दिनांक १५/०३/२०१४ रोजीचे सभेत निर्णय क्र.१९१ खालील प्रमाणे संमत करणेत आलेला आहे.

“.. यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील एम. एस. खिडक्यांऐवजी ॲल्युमिनियम स्लायडींग विंडो बसविणेसाठी विहीत पध्दतीने निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.२०,८३,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.

तसेच, याकामी येणा-या खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज सादर करणेत येऊन, मा. मुंबई उच्च् न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले.”

**मा. मुंबई उच्च् न्यायालय खंडपीठ परवानगी आदेश.:** C.A. No. 8699 of 2014 In P.I.L. NO. 18 of 2011 dt. 26/09/2014 अन्वये परवानगी मिळालेली आहे.

**प्रस्तावना :** श्री साईनाथ रुग्णालय इमारतीस असलेल्या खिडक्यांपैकी ९२ नग खिडक्याना ॲल्युमिनिअम स्लायडींग करणेत आलेले असून, उर्वरीत खिडक्या ह्या काचेचे शटर असलेल्या एम. एस. ओपनेबल असून, सदरचे खिडक्यांमधून डासांचा प्रादुर्भाव होत असल्याने रुग्णालय इमारतीच्या उर्वरीत सर्व खिडक्या ॲल्युमिनिअम स्लाडींग करुन मिळणेबाबत श्री साईनाथ रुग्णालय यांनी मागणी केलेली आहे.

**प्रस्ताव:** मा.त्रिसदस्य् समितीचे उपरोक्त् निर्णयानुसार व मा. मुंबई उच्च् न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचे मान्यतेनुसार सदरहू कामासाठी इकडील विभागामार्फत निविदा तयार करुन संस्थानचे संकेतस्थळावर व वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द् करून ई-निविदा मागवित आल्या असून, याकामी खालील पाच ठेकेदारांनी ई-निविदा सादर केल्या आहेत.

| अ.क्र. | ठेकेदाराचे नांव |
|---|---|
| 01. | Yashwant D. Gade, Kopargaon |
| 02. | Dadasaheb B.Phopse, Vaijapur |
| 03. | Magbul Badashah Shaikh, Ahmednagar |
| 04. | Chandragupta Constructions, Sakuri |
| 05. | M/s. A. S. Construction, Aurangabad |

विषयांकीत कामासाठी वरील प्रमाणे प्राप्् झालेल्या पाच ई-निविदांचा लिफाफा क्र.०१ (Technical bid) दि.१८/०२/२०१५ रोजी मा. प्रशाकिय अधिकारी यांचे समक्ष उघडणेत आले असून, प्राप्त कागदपत्रांची छाननी केल्यानंतर त्यामध्ये खालील चार ठेकेदार पूर्व पात्रता निकषांची पुर्तता करत असल्याने पात्र होत आहेत.

| अ.क्र. | ठेकेदाराचे नांव |
|---|---|
| 01. | Dadasaheb B.Phopse, Vaijapur |
| 02. | Magbul Badashah Shaikh, Ahmednagar |
| 03. | Chandragupta Constructions, Sakuri |
| 04. | M/s. A. S. Construction, Aurangabad |

वरील प्रमाणे चार पात्र ठेकेदारांचे लिफाफा क्र. ०२ (Commercial bid) मा. कार्यकारी अधिकारी, प्रशाकिय अधिकारी यांचे समक्ष दि.११/०४/२०१५ रोजी उघडणेत आले असून, त्यांचे दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| Sl.No | Bidder Name | Estimated Rate | Quoted Percentage | Rate |
|---|---|---|---|---|
| 1 | Dadasaheb B.Phopse | 2083000.0803 | -5.02 | 1978433.00 |
| 2 | Magbul Badashah Shaikh | 2083000.0803 | -20.57 | 1654527.00 |
| 3 | chandragupta construction | 2083000.0803 | -1.16 | 2058837.00 |
| 4 | AS Construction | 2083000.0803 | -4.99 | 1979058.00 |

उपरोक्त तपशिलानुसार विषयांकीत कामासाठी मगबूल बादशाह शेख, अहमदनगर यांचे ई-निविदेतील दर निम्नतम स्वरुपाचे आहेत, तरी त्यांचे निम्नतम दर स्विकारणेस व त्यांना कार्यादेश देणेस मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.१७६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील एम.एस. खिडक्यांऐवजी ॲल्युमिनिअम स्लायडींग विंडो बसविणेसाठी प्रस्तावात नमुद केलेल्या ई-निविदा प्रक्रियेचे अवलोकन करणेत आले. तसेच याकामी C.A. No. 8699 of 2014 In P.I.L. No. 18 of 2011 dt. 26/09/2014 अन्वये मा.उच्च न्यायालयाची मान्यता मिळालेली असल्याने, प्रस्तावितकामी मगबूल बादशाह शेख, अहमदनगर याचे रु.१६,५४,५२७/- मात्र हे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

विषय नं.१७ **मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी उपविभाग, शिर्डी यांचे कार्यालयातील, त्यांचे अधिनस्त असलेल्या संस्थानचे भू-संपादन कक्षास व या कक्षास कंत्राटी पध्दतीने नेमलेल्या कर्मचा-यांना देणेत आलेल्या मुदतवाढीस कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- (अ) तत्कालीन मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १५-१६ व १७ जुलै, २००० रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक २३८ अन्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे संबंधित भूसंपादनाची कामे करणेकरीता पुर्वीच्या मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर उपविभाग, श्रीरामपूर (महसुल) यांचे पर्यवेक्षणाखाली त्यांचे श्रीरामपूर येथील कार्यालयात स्वतंत्र भूसंपादन कक्ष स्थापन करणेत आलेला होता.

त्यानंतर, मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडील आदेश क्रमांक भूसंपादन/ कार्या /१६-क/१०८५/ २०१३, दिनांक २९ ऑक्टोबर, २०१३ रोजीचे आदेशाने मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर यांचे अधिनस्त असणारा उपरोक्त भूसंपादन कक्ष तेथे कार्यरत असलेल्या कर्मचारी वृंदासह मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी यांचे अधिनस्त देणेत आलेला आहे.

तत्कालीन मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १५ ते १७ जुलै, २००० रोजीचे सभेतील निर्णयानुसार, विषयांकित भूसंपादन कक्षासाठी कार्यरत असलेल्या कर्मचा-यांना मा.त्रिसदस्य समितीचे दि.१७/०७/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.५७६ नुसार विषयांकित कक्षास व या कक्षाकडे कंत्राटी पध्दतीने नेमलेल्या कर्मचा-यांना दि.०१/०५/२०१४ ते दि.३०/०४/२०१५ अखेर खालीलप्रमाणे कर्मचा-यांची त्यांचे नावासमोरील मानधनावर मुदतवाढ देणेत आलेली असून दि.३०/०४/२०१५ रोजी सदरची मुदतवाढ संपुष्टात आली आहे.

| अ.नं | तपशिल | मंजूर पद संख्या | सध्या प्रति महिना देणेत येत असलेले मानधन रुपये |
|---|---|---|---|
| ०१ | श्री.आर.बी.नागरे, सेवानिवृत्त अव्वल कारकुन | ०१ | ७,०००/- (एकत्रित) |
| ०२ | लिपीक टंकलेखक संवर्ग कर्मचारी (कर्मचारी कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने रोजंदारीवर) | ०२ | किमान वेतन दराप्रमाणे कुशल कर्मचारी वेतन |
| | शिपाई संवर्ग कर्मचारी (कर्मचारी कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने रोजंदारीवर) | ०१ | किमान वेतन दराप्रमाणे अकुशल कर्मचारी वेतन |

(ब) आता, मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांनी त्यांचेकडील जावक क्रमांक कावि / भूसं / १२५ / २०१५, दिनांक २४ फेब्रुवारी २०१५ रोजीचे विनंती पत्राव्दारे, त्यांचेकडे एकुण १५ भूसंपादन प्रस्तावांवर कार्यवाही सुरु असल्याने, तसेच श्री साईबाबा जन्मशताब्दी वर्ष, येणा-या कुंभमेळयासाठी भूसंपादनाची नवीन प्रकरणे या वर्षी दाखल होण्याची शक्यता आहे, या सर्व बाबीं विचारात घेऊन, या सर्व प्रकरणांचा जलदगतीने निपटारा करणेसाठी या भूसंपादन कक्षास दिनांक ०१/०५/२०१५ ते दि.३०/०४/२०१६ अखेर एक वर्षाची मुदतवाढ मिळणेस तसचे सध्या

या कार्यालयाकडे कार्यरत असलेले श्री रामचंद्र भानुदास नागरे (सल्लागार) अव्वल कारकून यांना उचित मानधन रक्कम वाढवून देणेबाबत विनंती केलेली आहे.

(क) उपरोक्त परिच्छेद ब मध्ये नमुद केलेले मा. उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांचे दिनांक २४ फेब्रुवारी, २०१५ रोजीचे पत्र प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग यांचेकडेस अभिप्रायासाठी पाठविणेत आले होते. त्यांनी दिनांक ०५ मार्च, २०१५ रोजीचे पत्राने खालील अभिप्राय दिलेला आहे.

"सध्या सदर कक्षास मा.व्यवस्थापन समितीचे दि.०३/०८/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.६१२(१) नुसार दि.०१/०५/२०१४ ते दि.३०/०४/२०१५ अखेर एक वर्षाकरीता मुदतवाढ देण्यात आलेली असून त्यांचेकडून संस्थानचे भूसंपादनाची ०५ प्रकरणे चालू आहेत. तसेच याव्यतिरिक्त खालील भूसंपादन प्रकरणांची कार्यवाही या कार्यालयामार्फत सुरु आहेत.

| अं.क्र | भूसंपादन संस्थेचे नाव | कार्यवाही चालू असलेल्या प्रकरणांची संख्या |
|---|---|---|
| ०१ | मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत,शिर्डी (अंतर्गत रस्ते) | ०३ |
| ०२ | मा.अधिक्षक, डाकघर शिर्डी पोस्ट ऑफीस | ०१ |
| ०३ | श्री साईबाबा शिक्षण प्रसारक मंडळ, शिर्डी | ०१ |
| ०४ | मा.कार्यकारी अभियंता मार्ग प्रकल्प क्रमांक ०२ विभाग अहमदनगर राहाता साकुरी, नगर-मनमाड रस्ता रुंदीकरण. | ०२ |

(ड) Land Acquisition, Rehabilitation and Resettlement Act, 2013 मध्ये महसुल व वन विभागाने दि.१९ मार्च २०१४ रोजी प्रकाशित केलेल्या नोटीफिकेशन मध्ये "Such an amount equal to 30 per cent of the amount of compensation towards establishment charges to be deposited to the State Government." असे नमूद केलेले आहे. याचाच अर्थ भूसंपादनासाठी येणा-या एकूण खर्चापैकी ३% रक्कम भूसंपादनाचे आस्थापना खर्चापोटी शासनाकडे जमा करावी. या अटीनुसार श्री साईबाबा संस्थानचे व्यवस्थापनाने वेळोवेळी भूसंपादनापोटी, भूसंपादन खर्चाच्या **३%** रक्कम मा.शासनास आदा केली आहे / करत आहे.

तसेच, महसुल व वन विभागाने दि.१९ मार्च २०१४ रोजी प्रकाशित केलेल्या नोटीफिकेशन मध्ये परिच्छेद क्र.०३ मध्ये, 'Such an amount honorarium of the private of retired Governmental employees including on retired Tahsildar, two retired Avalkarkuns, one retired Circle officer, retired Surveyors, retired Engineers, retired Horticulturist and retired forest officer for valuation of structures and trees in the land to be acquired, two private Computer Operators and two private persons as peons and whatever human assistance required by the officer acquiring land, and an amount towards retaining of the vehicle with driver needed during the process of the acquisition of the land and Rehabilitation and Resettlement of the affected families, be deposited in the Personal Ledger Account (PLA) of the concerned Land Acquisition officer of Sub-Divisional Officer or, as the case may be, the Administrator, appointed in this behalf(along with the proposal); and' असे नमूद केले आहे. याचाच अर्थ, शासनास जमा करावयाच्या ३% आस्थापना खर्चाच्या व्यतिरिक्त वरीलप्रमाणे कंत्राटी मनुष्यबळ उपलब्ध करुन दयावे.

तरी उपरोक्त परिच्छेद क व ड मधील वस्तुस्थिती विचारात घेता, मा. उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांनी दिनांक २४ फेब्रुवारी, २०१५ रोजीचे पत्राने केलेली विनंतीस अनुसरुन, तातडीची बाब म्हणून विषयांकित भूसंपादन कक्षास व सदर कक्षाकडे कार्यरत असलेल्या कुशल/अकुशल कर्मचा-यांना जा.नं.एसएसएस/ वशी०७ए/ ७५४/२०१५ दि.०९/०५/२०१५ रोजीचे आदेशाने तसेच सदर कक्षाकडे सध्या कार्यरत असलेले "सल्लागार" (अव्वल कारकुन) यांना पुर्वीचे अटीशर्तीवर व मानधनावर जा.नं.एसएसएस/वशी-०१/७५३/२०१५ दि.०९/०५/२०१५ रोजीचे आदेशाने दि.०१/०५/२०१५ ते दि.३०/०४/२०१६ अखेर मुदतवाढ देणेत आलेली असून त्यास कार्योत्तर मान्यता असावी.

निर्णय क्र.१७७ **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी उपविभाग, शिर्डी यांचे कार्यालयातील, त्यांचे अधिनस्त असलेल्या संस्थानचे भू-संपादन कक्षास व प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे या कक्षाममध्ये कंत्राटी पध्दतीने नेमलेल्या कर्मचा-यांना देणेत आलेल्या मुदतवाढीस कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक सामान्य प्रशासन)

---

विषय नं.१८ **परिविक्षाधीन कालावधीसाठी लिपीक-टंकलेखक पदावर पदस्थापना केलेल्या कर्मचा-यांच्या दि.१५.०४.२०१५ रोजी घेण्यात आलेल्या विभागीय परिक्षेत उत्तीर्ण झालेबाबत संस्थान सेवेत कायम करुन त्यांना वेतनवाढ लागू करणेबाबत.**

प्रस्ताव- संस्थानने सन १९९१ ते डिसेंबर २००० अखेर जे कंत्राटी कर्मचारी सलग सेवेत होते अशा १०५२ कर्मचा-यांना दि.०२ डिसेंबर २००६ रोजी वर्ग-०४ चे पदावर एकत्रित मानधन रु.२,०००/- प्रति महिना याप्रमाणे संस्थान सेवेत सामावून घेणेत आले. त्यांचा परिविक्षाधीन कालावधी कामावर हजर झाल्याचे तारखेपासून शासनाची मान्यता येईपर्यंत एवढया कालावधीकरिता निश्चित करण्यात आलेला होता. दरम्यानचे कालावधीत शासन निर्णयान्वये सदर कर्मचा-यांचे एकत्रित मानधनात वाढ करण्यात आली.

त्यानंतर, शासन निर्णय क्रमांक: सासंवि-२००९/४३३/(३७/०९) का.सोळा. मंत्रालय मुंबई ३२, दि.०७/०८/२००९ नुसार शासनाने संस्थानचे आस्थापनेवरील एकूण ४८२६ (२९०८ स्थायी + १९१८ कायम स्वरुपी कंत्राटी) पदांचे कर्मचारी आकृतीबंधास मान्यता मिळालेली आहे.

मा.व्यवस्थापन समिती दि.१९/०९/२००९ रोजीचे सभेतील निर्णयानुसार जा.नं.एसएसएस/वशी-०१/३५०३ दि.०१/१०/२००९ चे आदेशान्वये वेतनबँड ४४४०-७४४० अधिक ग्रेड पे १३०० ही वेतनश्रेणी दि.०७/०८/२००९ पासून एकत्रित मानधनावरील १०५२ कर्मचा-यांना लागू करण्यात आली. या आदेशात कुशलचे वेतन घेणा-या कर्मचा-यांची शैक्षणिक पात्रता, आकृतीबंधानुसार रिक्त पदे व प्रत्यक्षात करण्यात येणारे काम तपासून नियमानुसार वेतनबँड तसेच अकुशल कर्मचा-यांना स्थानापन्नतेचे आदेश यथावकाश देण्यात येतील, असे नमूद करण्यात आले.

त्यानंतर, मंजुर आकृतीबंधानुसार प्रस्तावीत केलेली शैक्षणिक पात्रता ज्या कर्मचा-यांनी धारण केलेली आहे अशा सर्व कर्मचा-यांना लिपीक-टंकलेखक, दूरध्वनी चालक, तारतंत्री, वेल्डर, वाहन चालक व इतर तांत्रिक पदांवर पुर्वलक्षी प्रभावाने दि.०७/०८/२००९ पासून एकूण १४१ कर्मचा-यांना ज्या त्या पदावर एक वर्ष परिविक्षाधीन कालावधीसाठी पदस्थापना करण्यात आली.

त्यानंतरही वर्ग-०४ पदावरील १२ कर्मचा-यांनी लगतच्या पदाची प्रस्तावीत शैक्षणिक पात्रता पुर्ण केल्याने त्यांची लिपीक-टंकलेखक, तारतंत्री व इतर पदावर दि.०१/११/२०१० पासून एकूण १२ कर्मचा-यांना एक वर्ष परिविक्षाधीन कालावधीसाठी पदस्थापना करण्यात आली.

तद्नंतर, संस्थानने दि.०७/०८/२००९ व दि.०१/११/२०१० पासून एक वर्ष परिविक्षाधीन कालावधीसाठी पदस्थापना केलेल्या एकूण १५३ कर्मचा-यांचे काम समाधानकारक आहे किंवा नाही याची पडताळणी करणेकामी दि.१४/११/२०१० रोजी १०० गुणांची विभागीय लेखी व प्रात्यक्षिक परिक्षा घेतली. सदर परिक्षेचे सिलबंद लखोटे उघडणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समिती दि.१९/११/२०११ रोजीचे सभेपुढे सादर करण्यात आला. त्यावर मा.व्यवस्थापन समितीने निर्णय क्र.७६५(४) खालीलप्रमाणे घेतलेला आहे.

"परिविक्षाधीन कालावधीसाठी पदस्थापना केलेल्या कर्मचा-यांच्या दि.१४/११/२०१० रोजी लेखी व प्रात्यक्षिक परिक्षा घेण्यात आलेल्या कार्यवाहीच्या पदनिहाय प्रश्नोत्तर पत्रिका व गुणपत्रकांच्या याद्यांचे सिलबंद लखोटे आजचे सभेत समक्ष उघडण्यात आले. परिविक्षाधीन कालावधीसाठी लिपीक-टंकलेखक व इतर तांत्रिक पदांवर पदस्थापना केलेल्या कर्मचा-यांच्या संस्थानमार्फत घेण्यात आलेल्या लेखी व प्रात्यक्षिक परिक्षेत, ज्या कर्मचा-यांना लेखी परिक्षेत किमान ३५% गुण व प्रात्यक्षिक परिक्षेत किमान ४०% गुण मिळाले अशाच कर्मचा-यांना संस्थान सेवेत कायम करण्यात यावे. तसेच या नियमानुसार अपात्र ठरणा-या कर्मचा-यांचा परिविक्षाधीन कालावधी १ वर्ष वाढवून त्यांना पुन:श्च एक संधी म्हणून त्यांच्या लेखी व प्रात्यक्षिक परिक्षा घेण्यात याव्यात. जोपर्यंत सदरहू कर्मचारी उत्तीर्ण होत नाहीत अशा कर्मचा-यांना वार्षिक वेतनवाढ देण्यात येऊ नये."

उपरोक्त निकषानुसार एकूण १५३ कर्मचा-यांपैकी **१३८** कर्मचारी **उत्तीर्ण** झाले व **१५** कर्मचारी **अनुत्तीर्ण** झालेले होते. उत्तीर्ण झालेल्या कर्मचा-यांना संस्थान सेवेत ज्या त्या पदावर कायम करण्यात आले. अनुत्तीर्ण कर्मचा-यांना जा.नं.एसएसएस/४८७२/२०१२ दि.२३/०१/२०१२ चे ज्ञापनाने लेखी व प्रात्यक्षिक परिक्षेत उत्तीर्ण होणेचे अटीवर त्यांचा परिविक्षाधीन कालावधी वाढविण्यात आलेला आहे. तसेच सदरची पूर्तता केल्यांनतर संबंधीतांना संस्थान सेवेत कायम करणेबाबत तसेच वार्षिक पगारवाढ देणेबाबत विचार करण्यात येईल, असे कळविण्यात आलेले आहे.

तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ (एक) मधील तरतुदीनुसार संबंधीत सर्व कर्मचा-यांचा एक वर्ष परीवीक्षेचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर पहिली वेतनवाढ देण्यात आलेली आहे.

तद्नंतर, यापुर्वीचे दि.१४/११/२०१० रोजीचे परिक्षेत अनुत्तीर्ण झालेले १५ कर्मचारी व वर्ग-०४ पदावरील कर्मचा-यांनी लगतच्या पदाची प्रस्तावीत शैक्षणिक पात्रता पुर्ण केलेले इतर ११० कर्मचारी अशा एकूण १२५ कर्मचा-यांची पुन्हा दि.२६/०२/२०१२ रोजी सल्लागार, श्री.प्रशांत खंबसवाडकर व समिती सदस्यांसमोर १०० गुणांची लेखी व प्रात्यक्षिक परिक्षा घेण्यात आलेली आहे.

सदर परिक्षेत यापुर्वी अनुत्तीर्ण झालेल्या १५ कर्मचा-यांपैकी (दि.०७/०८/२००९ रोजी पदस्थापना केलेल्यांपैकी) ७ कर्मचारी उत्तीर्ण झाले व ८ कर्मचारी पुन्हा दुस-यांदा अनुत्तीर्ण झाले. उत्तीर्ण-अनुत्तीर्ण कर्मचा-यांचा विषय मा.व्यवस्थापन समिती दि.१५/०९/२०१२ रोजीचे सभेपुढे सादर करण्यात आलेला होता. त्यावर मा.व्यवस्थापन समितीने निर्णय क्र.७९१ नुसार उत्तीर्ण कर्मचा-यांना संस्थान सेवेत कायम करुन वेतनवाढी लागू करण्यात आल्या आहेत परंतु जे कर्मचारी विभागीय परिक्षेत दुस-यांदा अनुत्तीर्ण झाले अशा सर्व कर्मचा-यांची पुन:श्च लेखी व प्रात्यक्षिक परिक्षा घेण्यात यावी असे ठरले. दुस-यांदा अनुत्तीर्ण झालेल्या कर्मचायांची माहिती खालीलप्रमाणे :-

| अ.नं. | कर्मचा-याचे नांव | पदनाम | विभाग |
|---|---|---|---|
| ०१ | श्री.सुनिल सुर्यभान तुरकणे | लिपीक-टंकलेखक | प्रसादालय विभाग |
| ०२ | श्री.रावसाहेब चंद्रभान कासार | लिपीक-टंकलेखक | सामान्य प्रशासन |
| ०३ | श्री.संतोष शामराव परसपाटकी | लिपीक-टंकलेखक | लेखाशाखा विभाग |
| ०४ | श्री.संजय बबन डांगे | लिपीक-टंकलेखक | साईबाबा भक्तनिवासस्थान |
| ०५ | श्री.विजय यशवंत सोनवणे | लिपीक-टंकलेखक | साईप्रसाद निवासस्थान विभाग |
| ०६ | श्री.सुदाम निवृत्ती जमधडे | लिपीक-टंकलेखक | साईबाबा हॉस्पिटल |
| ०७ | श्री.भिवाजी जाखू देवकर | लिपीक-टंकलेखक | लेखाशाखा विभाग |
| ०८ | श्री.संजय तुळशीराम पठारे | लिपीक-टंकलेखक | प्रसादालय विभाग |

उपरोक्त अनुत्तीर्ण कर्मचा-यांना पुन:श्च एक संधी देऊन त्यांच्या विभागीय परिक्षा घेणेचा विषय मा.त्रिसदस्य समिती दि.१८/०२/२०१५ रोजीचे सभेपुढे सादर करण्यात आलेला होता. त्यावर समितीने खालीलप्रमाणे निर्णय क्र.४४ घेतलेला आहे.

"लिपीक-टंकलेखक पदावर पदस्थापना केलेले परंतु विभागीय परिक्षेत दोन वेळा संधी देऊनही अनुत्तीर्ण झालेल्या प्रस्तावित कर्मचा-यांना पुन:श्च एक वेळ संधी देण्यात येऊन, त्यांची उपसमिती समोर १०० गुणांची लेखी व प्रात्यक्षिक परिक्षा घेण्यात यावी. तसेच यापुढे संस्थानचे स्थायी पदावरील कर्मचा-यांना पदोन्नती देतांना विभागीय परिक्षेत उत्तीर्ण होणेसाठी तीन वेळा संधी देण्यात यावी, असे ठरले."

मा.त्रिसदस्य समितीचे निर्णयास अनुसरुन दि.१५/०४/२०१५ रोजी सकाळी १० वाजता संस्थानचे औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत वरील अनुत्तीर्ण कर्मचा-यांची ५० गुणांची लेखी व ५० गुणांची प्रात्यक्षिक (संगणक) परिक्षा उप समितीचे समोर घेण्यात आलेली असून प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांनी परिक्षेच्या तपासलेल्या उत्तरपत्रिका, प्रात्यक्षिक परीक्षेच्या बॅकअप सीडी, अनुषंगिक कागदपत्रे तसेच मुल्यांकन तक्ता यांचा सिलबंद लखोटा जा.नं.एसएसएस/आयटीआय/संकीर्ण/२०१५/३९ दि.१५/०४/२०१५ अन्वये सादर केलेला आहे. सदर सिलबंद लखोटा आस्थापना विभागाकडील दि.२९/०४/२०१५ रोजीचे टिपणीवरील मान्यतेने मा.कार्यकारी अधिकारी महोदय यांचे समक्ष उघडून मा.व्यवस्थापन समिती दि.१९/११/२०११ रोजीचे सभेत निश्चित केलेल्या निकषानुसार ज्या कर्मचा-यांना लेखी परिक्षेत ३५% गुण व प्रात्यक्षिक परिक्षेत ४०% गुण मिळतील असे कर्मचारी उत्तीर्ण व त्यापेक्षा कमी गुण मिळणारे कर्मचारी अनुत्तीर्ण याप्रमाणे जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/६७८/२०१५ दि.१२/०५/२०१५ चे परिपत्रकान्वये निकालपत्र जाहीर करणेत आलेले असून सदर परिक्षेत सर्व कर्मचारी उत्तीर्ण झालेले आहेत.

तसेच जा.नं.एसएसएस/साप्रशा/आस्था/६९७/२०१५ दि.१३/०५/२०१५ रोजीचे परिपत्रकान्वये संबंधीत कर्मचा-यांचे दैनंदिन कामकाजाबाबत अधिक्षक/ विभाग प्रमुख यांचेकडून खालीलप्रमाणे अभिप्राय मागविण्यात आलेले आहे.

१) संबंधीत कर्मचा-यांची वर्तणूक कशी आहे?
२) ते हुकूमाप्रमाणे, योग्य रितीने काम करतात किंवा कसे?
३) त्यांचेबाबत काही प्रकरणे चालू अथवा प्रस्तावीत आहेत काय?
४) संबंधीत कर्मचा-यांना संस्थान सेवेत कायम करावे अगर कसे?

त्यावर संबंधीत अधीक्षक / विभाग प्रमुख यांनी उपरोक्त कर्मचा-यांची वर्तणूक चांगली आहे, ते हुहूमाप्रमाणे व योग्य रितीने काम करतात, त्यांचेबाबत कोणतेही प्रकरण चालू अथवा प्रस्तावीत नाही. तसेच सदरचे कर्मचा-यांना संस्थान नियमाप्रमाणे तथा संस्थान सेवेत कायम करणेस हरकत नसलेबाबत अभिप्राय दिलेले आहेत.

उपरोक्त सर्व कर्मचा-यांना संस्थान सेवेत कायम करुन त्यांना वार्षिक वेतनवाढी देणेबाबत कार्यवाही करावयाची आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) सेवा (वेतन) विनियम, २०१३ मध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे.

(२०) वेतनवाढीसाठी गणना करण्यात येणारी सेवा :- अपवाद, (अ) परिवीक्षा कालावधीत परिवीक्षेवर नियुक्त केलेल्या संस्थानाच्या कर्मचा-याच्या वेतनवाढीचे नियमन पुढीलप्रमाणे करण्यात येईल :-

(१) पहिली वेतनवाढ परिवीक्षा कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण केल्यांनतर दिली जाईल.

(२) विभागीय परीक्षा विहित कालमर्यादेत उत्तीर्ण न होऊ शकल्यामुळे किंवा परिवीक्षा कालावधीत रजा घेतल्यामुळे परिवीक्षा कालावधीत वाढ झालेल्या परिवीक्षाधीन कर्मचा-याला परिवीक्षा कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण झाल्यांनतर दिर्घकालीन पायावर त्या पदावर नियुक्ती झाल्यावर जर तो परिवीक्षेवर नसता तर त्याला त्यामुळे प्राप्त होणा-या थकित रकमेसहीत जेवढे वेतन प्राप्त होईल तेवढे प्राप्त करण्याची अनुमती दिली जाईल.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) सेवा (वेतन) विनियम, २०१३ मधील (२०) अपवाद, (अ) (२) नुसार खालील कर्मचा-यांना रकाना नं.३ मध्ये दर्शविलेल्या तारखेस संस्थान सेवेत कायम करणेस तसेच रकाना नं.७ मध्ये दर्शविल्याप्रमाणे थकबाकीसह वेतनवाढ लागू करता येईल.

| अ. नं. | कर्मचा-याचे नांव, पदनाम, विभाग व वेतनबँड +ग्रेड वेतन | सेवेत कायम करावयाची तारीख | सध्याचे मुळ वेतन | ग्रेड वेतन | वार्षिक पगारवाढ | वार्षिक पगारवाढी नंतरचे मुळ वेतन | वेतनवाढीची तारीख |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ | ०६ | ०७ | ०८ |
| ०१ | श्री.सुनिल सुर्यभान तुरकणे<br>लिपीक-टंकलेखक,<br>प्रसादालय विभाग<br>५२००-२०२००+१९०० | १२/०५/२०१५ | ६०७०<br>६३१०<br>६५६०<br>६८२० | १९००<br>१९००<br>१९००<br>१९०० | २४०<br>२५०<br>२६०<br>२७० | ६३१०<br>६५६०<br>६८२०<br>७०९० | ०१/०७/२०११<br>०१/०७/२०१२<br>०१/०७/२०१३<br>०१/०७/२०१४ |
| ०२ | श्री.रावसाहेब चंद्रभान कासार<br>लिपीक-टंकलेखक,<br>सामान्य प्रशासन विभाग<br>५२००-२०२००+१९०० | १२/०५/२०१५ | ६०७०<br>६३१०<br>६५६०<br>६८२० | १९००<br>१९००<br>१९००<br>१९०० | २४०<br>२५०<br>२६०<br>२७० | ६३१०<br>६५६०<br>६८२०<br>७०९० | ०१/०७/२०११<br>०१/०७/२०१२<br>०१/०७/२०१३<br>०१/०७/२०१४ |
| ०३ | श्री.संतोष शामराव परसपाटकी<br>लिपीक-टंकलेखक,<br>लेखाशाखा विभाग<br>५२००-२०२००+१९०० | १२/०५/२०१५ | ६०७०<br>६३१०<br>६५६०<br>६८२० | १९००<br>१९००<br>१९००<br>१९०० | २४०<br>२५०<br>२६०<br>२७० | ६३१०<br>६५६०<br>६८२०<br>७०९० | ०१/०७/२०११<br>०१/०७/२०१२<br>०१/०७/२०१३<br>०१/०७/२०१४ |
| ०४ | श्री.संजय बबन डांगे<br>लिपीक-टंकलेखक,<br>साईबाबा भक्तनिवासस्थान<br>५२००-२०२००+१९०० | १२/०५/२०१५ | ६०७०<br>६३१०<br>६५६०<br>६८२० | १९००<br>१९००<br>१९००<br>१९०० | २४०<br>२५०<br>२६०<br>२७० | ६३१०<br>६५६०<br>६८२०<br>७०९० | ०१/०७/२०११<br>०१/०७/२०१२<br>०१/०७/२०१३<br>०१/०७/२०१४ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०५ | श्री.विजय यशवंत सोनवणे | १२/०५/२०१५ | ६०७० | १९०० | २४० | ६३१० | ०१/०७/२०११ |
| | लिपीक-टंकलेखक, | | ६३१० | १९०० | २५० | ६५६० | ०१/०७/२०१२ |
| | साईप्रसाद निवासस्थान विभाग | | ६५६० | १९०० | २६० | ६८२० | ०१/०७/२०१३ |
| | ५२००-२०२००+१९०० | | ६८२० | १९०० | २७० | ७०९० | ०१/०७/२०१४ |
| ०६ | श्री.सुदाम निवृत्ती जमधडे | १२/०५/२०१५ | ६०७० | १९०० | २४० | ६३१० | ०१/०७/२०११ |
| | लिपीक-टंकलेखक, | | ६३१० | १९०० | २५० | ६५६० | ०१/०७/२०१२ |
| | साईबाबा हॉस्पिटल | | ६५६० | १९०० | २६० | ६८२० | ०१/०७/२०१३ |
| | ५२००-२०२००+१९०० | | ६८२० | १९०० | २७० | ७०९० | ०१/०७/२०१४ |
| ०७ | श्री.भिवाजी जाखू देवकर | १२/०५/२०१५ | ६०७० | १९०० | २४० | ६३१० | ०१/०७/२०११ |
| | लिपीक-टंकलेखक, | | ६३१० | १९०० | २५० | ६५६० | ०१/०७/२०१२ |
| | लेखाशाखा विभाग | | ६५६० | १९०० | २६० | ६८२० | ०१/०७/२०१३ |
| | ५२००-२०२००+१९०० | | ६८२० | १९०० | २७० | ७०९० | ०१/०७/२०१४ |
| ०८ | श्री.संजय तुळशीराम पठारे | १२/०५/२०१५ | ६०७० | १९०० | २४० | ६३१० | ०१/०७/२०११ |
| | लिपीक-टंकलेखक, | | ६३१० | १९०० | २५० | ६५६० | ०१/०७/२०१२ |
| | प्रसादालय विभाग | | ६५६० | १९०० | २६० | ६८२० | ०१/०७/२०१३ |
| | ५२००-२०२००+१९०० | | ६८२० | १९०० | २७० | ७०९० | ०१/०७/२०१४ |

वरीलप्रमाणे कार्यवाही करणेकामी निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.१७८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, परिविक्षाधीन कालावधीसाठी लिपीक-टंकलेखक पदावर पदस्थापना केलेले उपरोक्त ०८ कर्मचारी दि.१५.०४.२०१५ रोजी घेण्यात आलेल्या विभागीय परिक्षेत उत्तीर्ण झालेले असल्याने त्यांना प्रस्तावामधील तक्त्यातील स्तंभ क्र.३ मध्ये नमुद केलेल्या तारखेस संस्थान सेवेत कायम करणेत येऊन, स्तंभ क्र.८ मध्ये नमुद केलेल्या तारखेपासून वेतनवाढ लागू करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक सामन्य प्रशासन)

---

विषय नं.१९ **शासकीय/ निमशासकीय रुग्णालयांना सी.टी.स्कॅन व एक्स-रे मशिनकरीता संस्थानमार्फत अर्थसहाय्य देणेबाबत.**

**(अ) प्रस्तावीत मागणी**:- मा.संचालक आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी दि.०१ एप्रिल २०१५ चे ई-मेल पत्रान्वये खालीलप्रमाणे कळविले आहे.

" दि.३०.०३.२०१५ रोजी मा.सचिव, विधी व न्याय विभाग यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने सार्वजनिक आरोग्य विभागातील रूग्णालयांमध्ये आवश्यक असलेल्या सी.टी.स्कॅन मशीन व एक्स-रे मशीन बाबतची माहिती सोबतच्या प्रपत्रात सादर करीत आहे. त्यानुसार त्यांनी खालील प्रमाणे ०३ प्रस्ताव सादर केलेले आहेत.

१. संदर्भ क्र.-०२ प्रस्ताव पत्रानुसार शासकीय / निमशासकीय रूग्णालयांना सी.टी.स्कॅन मशिन व एक्स-रे मशीन अर्थसहाय्यासाठी मिळणेबाबत, प्रस्ताव क्रमांक ०१ खालील प्रमाणे सादर केला आहे.

| Sr. No. | Name of Institute | C.T. Scan Machine (unit cost in Rs.) | Construction & Electrification Cost Appro in Rs. | Total Cost |
|---|---|---|---|---|
| 1 | District Hospital, Jalgaon | 18000000 | | |
| 2 | District Hospital, Sindhudurgh | 18000000 | | |
| 3 | District Hospital, Amarawati | 18000000 | | |
| 4 | District Hospital,Nashik | 18000000 | | |
| 5 | District Hospital, Chandrapur | 18000000 | | |
| 6 | District Hospital, Bhandara | 18000000 | | |
| 7 | District Hospital, Thane | 18000000 | | |
| 8 | District Hospital, Parbhani | 18000000 | | |
| 9 | District Hospital, Raigad-Alibag | 18000000 | | |
| 10 | District Hospital, Ahmednagar | 18000000 | | |
| 11 | District Hospital, Satara | 18000000 | | |
| 12 | District Hospital, Jalna | 18000000 | | |
| 13 | District Hospital, Hingoli | 18000000 | | |
| 14 | District Hospital, Khamgaon, Buldhana | 18000000 | 4000000 | 22000000 |
| | Total | 25,20,00000 | 4000000 | 256000000 |

सी.टी.स्कॅन मशीन खरेदी करण्याबाबत एकुण रू.२५,२०,००,०००/- (अक्षरी पंचवीस कोटी वीस लक्ष मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे. वरील ०१ ते १३ ठिकाणी प्रशिक्षित मनुष्यबळ, आवश्यक ती जागा व विद्युत पुरवठा सर्व अदयावत आहे. तसेच अ.नं.१४ येथे म्हणजे खामगांव, जि.बुलढाणा येथे मनुष्यबळ व बांधकाम व इलेक्ट्रीफिशनचे काम संचालनालय अथवा राष्ट्रीय आरोग्य अभियान यांचे मार्फत करण्यात येईल.

तरी आपणांस विनंती करण्यात येते की, प्रथम फेज मधील १ ते १४ संस्थांमध्ये प्राधान्याने सी.टी.स्कॅन मशीन बसविल्यास रूग्णांची गैरसोय होणार नाही.

२. संदर्भ क्र.-०३, प्रस्ताव पत्रा नुसार " शासकीय /निमशासकीय रूग्णालयांना ५०० एम.ए.क्ष-किरण मशीन अर्थसहाय्यासाठी, प्रस्ताव क्रमांक ०२ खालीलप्रमाणे सादर केला आहे.

| Sr. No. | Name of Institute | ५०० M.A. X-Ray Machine (unit cost in Rs.) | Construction & Electrification Cost Appro in Rs. | Manpower (Contractual) | Total Cost |
|---|---|---|---|---|---|
| 1 | District Hospital, Ahmednagar | 2200000 | 0 | 0 | 2200000 |
| 2 | District Hospital, Jalana | 2200000 | 0 | 0 | 2200000 |
| | Total | 4400000 | 0 | 0 | 4400000 |

५०० एम.ए.क्ष-किरण मशीन एकुण रू.४४,००,०००/- (अक्षरी चौरेचाळीस लक्ष मात्र ) इतका खर्च अपेक्षित आहे. तरी आपणांस विनंती करण्यात येते की, प्रथम फेज मधील दोन्ही संस्थेकरीता प्राधान्याने ५०० एम.ए.क्ष-किरण मशीन बसविल्यास रूग्णांची गैरसोय होणार नाही, असे नमूद केले आहे.

१. संदर्भ क्र.-०४ प्रस्ताव पत्रानुसार " शासकीय / निमशासकीय रूग्णालयांना सी.टी.स्कॅन मशीन (द्वीतीय फेज) अर्थसहाय्यासाठी, प्रस्ताव, प्रस्ताव क्रमांक ०३ खालीलप्रमाणे सादर केला आहे.

| Sr.No. | Name of Institute | C.T.Scan Machine (unit cost in Rs.) | Construction & Electrification Cost Appro. In Rs. | Total Cost |
|---|---|---|---|---|
| 15 | District Hospital, Osmanabad | 18000000 | 0 | 18000000 |
| 16 | Central Hospital, Ulhasnagar, Thane | 18000000 | 0 | 18000000 |
| 17 | District Hospital,Nandurbar | 18000000 | 0 | 18000000 |
| 18 | District Hospital,Ratnagiri | 18000000 | 0 | 18000000 |
| 19 | District Hospital,Beed | 18000000 | 0 | 18000000 |
| 20 | District Hospital,Gondia | 18000000 | 0 | 18000000 |
| 21 | General Hospital, Malegaon,Nashik | 18000000 | 4000000 | 22000000 |
| 22 | District Hospital,Washim | 18000000 | 4000000 | 22000000 |
| 23 | Regional Refferal Hospital, Amarawati | 18000000 | 4000000 | 22000000 |
| 24 | District Hospital,Palghar | 18000000 | 4000000 | 22000000 |
| | **Total** | **180000000** | **16000000** | 196000000 |

सी.टी.स्कॅन मशीन खरेदी करण्याबाबत एकुण रू.१८,००,००,०००/- (अक्षरी अठरा कोटी मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे. वरील १५ ते २० ठिकाणी प्रशिक्षित मनुष्यबळ, आवश्यक ती जागा व विदयुत पुरवठा सर्व अद्ययावत आहे. तसेच अ.क्र.२१ ते २४ या ठिकाणी मनुष्यबळ व बांधकाम व इलेक्ट्रीफिशनचे काम संचालनालय अथवा राष्ट्रीय आरोग्य अभियान यांचे मार्फत करण्यात येईल.

तरी आपणांस विनंती करण्यात येते की द्वीतीय फेज मधील १५ ते २४ संस्थामध्ये प्राधान्याने सी.टी.स्कॅन मशीन बसविल्यास रूग्णांची गैरसोय होणार नाही.

संदर्भांकीत ३०.०३.२०१५ रोजी मुंबई येथे मा.सचिव विधी व न्याय विभाग यांच्या अध्यक्षतेखाली त्यांचे दालनात झालेली बैठक, तसेच दि.१८.०६.२०१५ रोजी मा.सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्री यांच्या दालनात झालेली बैठक, या दोनही बैठकींना श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे तर्फे मा.कार्यकारी अधिकारी हे स्वतः उपस्थित होते.

दि.१८/०६/२०१५ रोजीच्या बैठकीस मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री स्वतः सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग व संचालक, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य सेवा मुंबई यांच्या समवेत झालेल्या बैठकीत मान्यवरांनी उपरोक्त सादर केलेल्या प्रस्तावाबाबत श्री साईबाबा संस्थान तर्फे ३४ सी.टी.स्कॅन व ९ सोनोग्राफी मशिन व ०२ एक्स-रे मशीन बाबत मागणी केली आहे.

सदर बैठकी वेळी चर्चे अंती १) मा.मंत्री महोदयांना साईबाबा हॉस्पीटल मार्फत राजीव गांधी जीवनदायी योजना राबविण्यात येत असून, सदर योजनेअंतर्गत शासनाकडून मिळणारे अनुदान रक्कम रू.३८ कोटी मात्र थकीत असलेबाबत सांगितले असता, त्याबाबत बैठकीत मा.मंत्री महोदयांनी उपस्थित सविवांना शासनाकडून राजीव गांधी जीवन दायी योजनेअंतर्गत संस्थानला देय्य असलेले अनुदान त्वरीत देणे बाबत कार्यवाही करणेबाबत सुचना केल्या आहेत.

२) सध्या संस्थानचा कारभार त्रिस्तरीय समितीचे अधिपत्याखाली कार्यरत असल्याने आपल्या मागणी बाबत मा.त्रिस्तरीय समितीपुढे प्रस्ताव सादर करावा लागेल. असे बैठकीत मा.कार्यकारी अधिकारी यांनी प्रतिनिधी या नात्याने संबोधित केले आहे.

अधिनियमातील तरतूदः- कलम १७(२) (ण) मध्ये अशी तरतूद आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ चे कलम १७ मधील (२) (ण)

" मानवजातीचे कल्याण करणा-या किंवा आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणतयाही उदात्त कार्यास चालना देईल. "

तसेच श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ चे कलम २१ मधील पोटकलम (१) (क) तरतूदींना अधिन राहून, "विश्वस्तव्यवस्थेस, राज्य शासनाच्या पूर्व मंजूरीने, आणि राज्य शासनाकडून राजपत्रात प्रसिध्द केलेल्या विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कमालमर्यादेच्या आणि अशा अटी व शर्तींच्या अधीन राहून, भक्तांच्या सोयीसाठी बस वाहनतळ, रेल्वे सथानक व विमानतळ आणि तत्सम पायाभूत यांसारख्या पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी किंवा त्या वाढविण्यासाठी शासकीय विभागांना, शासकीय महामंडळांना कंपन्यांना किंवा शासकीय उपक्रमांना सहायक अनुदान देता येईल."

**(ब)** दि.१३.०३.२०१२ चे मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे आदेशानुसार सध्या संस्थान दैनंदिन व्यवस्थापनाचे कामकाज मा.त्रिसदस्य समिती बघत आहे. या अनुषंगाने मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांनी खालीलप्रमाणे निर्देश दिलेले आहेत.

दि.१३.०३.२०१२ चे मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे PIL No.18/2011, date 13 March 2012 Sr.No.18 मध्ये खालीलप्रमाणे निर्देश दिलेले आहेत.

"The existing Committee and the Committee constituted by this Court is directed not to take any major financial decision in respect of management of the affairs of the Sansthan without intimating this Court. "

तसेच CIVIL APPLICATION NO.12056/2012 IN PIL NO.18/2011 , date 16 Oct.2012 Sr.No.6 (C) shall not take any major financial decision of whatsoever nature.

**(क)** उपरोक्त परिच्छेदातील तपशीलाचा विचार करता मा.संचालक, आरोग्य सेवा संचनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी महाराष्ट्र राज्यातील शासकीय/ निमशासकीय रुग्णालयांमध्ये आवश्यक असलेल्या सी.टी.स्कॅन मशीन व एक्स-रे मशीनसाठी खालीलप्रमाणे निधीची/ अर्थसहाय्याची मागणी केलेली आहे.

| **अ.नं.** | **तपशिल/प्रस्ताव** | **निधिची मागणी रूपये** |
|---|---|---|
| ०१ | फेज-०१ मधील एकूण १४ जिल्हयातील जिल्हा शासकीय रूग्णालयासाठी सी.टी.स्कॅन मशीनसाठी अर्थसहाय्य मागणी. | २५,२०,००,०००/- |
| ०२ | अहमदनगर व जालना जिल्हयासाठी जिल्हा शासकीय रूग्णालयासाठी ५०० एम.ए.क्ष-किरण मशीनसाठी अर्थसहाय्य. | ४४,००,०००/- |
| ०३ | फेज-०२ मधील एकूण १० जिल्हयातील जिल्हा शासकीय रूग्णालयासाठी सी.टी.स्कॅन मशीन साठी अर्थसहाय्य मागणी. | १८,००,००,०००/- |
| | **एकूण रूपये** | रू.४३,६४,००,०००/- |

उपरोक्त प्रमाणे मा.संचालक आरोगय सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी विविध ०३ प्रस्ताव पत्राद्वारे महाराष्ट्र राज्यातील शासकीय / निमशासकीय रूगणालयांमध्ये रूग्णसेवेसाठी आवश्यक असणारी सी.टी.स्कॅन मशीन व एक्स-रे मशीनसाठी संस्थान मार्फत अर्थ सहाय्य / निधी रूपये ४३,६४,००,०००/- (अक्षरी रूपये त्रेचाळीस कोटी चौसष्ट लाख मात्र) एवढा निधि मिळणेबाबत मागणी केलेली आहे.

उपरोक्त परिच्छेद "ब" व "क" मध्ये नमुद केलेल्या प्रमाणे मा.संचालक आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना त्यांनी प्रस्तावीत केलेला निधी रूपये (रूपये ४३ कोटी ६४ लक्ष) मात्र उपलब्ध करून दयावयाचा झाल्यास मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांची तसेच अधिनियमातील तरतूदी नुसार मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांची मान्यता घ्यावी लागेल.

तरी उपरोक्त प्रमाणे मा.संचालक आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचा प्रस्ताव मा.त्रिसदस्यीय समिती पुढे निर्णयार्थ सादर.

प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.१७९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे शासकीय/ निमशासकीय रुग्णालयांना सी.टी.स्कॅन व एक्स-रे मशिनकरीता संस्थानमार्फत रु.४३,६४,००,०००/- मात्र अर्थसहाय्य देणेसाठी अधिनियमातील तरतूदीनुसार मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन याची मान्यता घेण्यात यावी. तसेच मा.विधी व न्याय विभागाची मान्यता मिळाल्यानंतर सदरहूकामी मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मंजुरी घेणेसाठी संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०३/ विधी अधिकारी)

---

विषय नं.२० **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे सौजन्याने व शिर्डी ग्रामस्थ शिर्डी यांचे सहकार्याने २१ वा श्री साईसच्चरित्र पारायण सोहळा साजरा करणेस व अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम -२००४ चे कलम १७ (१) मध्ये खालील प्रमाणे तरतूद आहे.

**समितीची कर्तव्य व अधिकारी**- १७(१) राज्य शासनाच्या कोणत्याही सर्व साधारण किंवा विशेष ओदशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे.मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा,समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे,भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे. ती उद्दीष्ठे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे , ही सामितीची कर्तव्ये असतील.

१७ (२) ठ- श्री साईबाबांचे जीवन, त्याचे कार्य,त्यांच्या लीला व त्यांची शिकवण या बाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्रीसाई साहित्य ग्रंथालय चालवील व त्या विस्तार करील

श्रावण शु // १, शनिवार दि.१५/०८/२०१५ ते श्रावण शु // ८, रविवार दि. २३/०८/२०१५ या कालावधीत श्री साईसच्चरीत्र पारायण सोहळा साजरा करणे करीता संस्थानमार्फत याकामी खर्चाचे अंदाजपत्रक सादर करण्यात आले आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी, नाटय रसिक संच, शिर्डी ग्रामस्थ यांचे संयुक्त विद्यमने श्री साईसच्चरीत पारायण सोहळयाचे आयोजन समाधी मंदीर परिसरात गेल्या २० वर्षापासून करण्यात येते. नाटय रसिक संच,शिर्डी यांचे मार्फत पारायणार्थीचे नाव नोंदणी करण्यात येते. याकामी शिर्डी ग्रामस्थ यांचे मोलाचे सहकार्य असते. या पारायण सोहळयासाठी शिर्डी ग्रामस्थ, नाटयरसिक संच, शिर्डी व श्री साईबाबा संस्थान , शिर्डी यांचे संयुक्ताने हा सोहळा पार पाडला जातो. या पारायण सोहळयाचे आयोजनात खालीलप्रमाणे ठळक कामे करावी लागतात.

१) मंडप व स्टेज, फुल सजावट
२) नियोजीत कीर्तनकार, कलाकार बिदागी जाणे-येण्याचे प्रवास खर्चासह
३) मिरवणूक खर्च , बॅन्ड , बाद्य खर्च
४) पत्रिका, हॅन्डबील , बॅनर इ. छपाई
५) चहा व नाश्ता , श्रींचे पारायण समाप्ती नंतर महाप्रसाद भंडारा.

नाटय रसिक संच फक्त वाचकांचे नोंदणी व बॅचेचा खर्च करतात तसेच श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी नाटय रसिक संच, शिर्डी यांचे मदतीने सन १९९५ पासून म्हणजे गेल्या २० वर्षापासून दरवर्षी सामुदायिक श्री साईसच्चरित पाराया सोहळा आयोजित केला जातो.

पारायणात सुमारे ४५०० साईभक्त सहभाग घेत असतात. दरवर्षी सोहळयांची रुपरेषा पुढील प्रमाणे असते.

१) दररोज सकाळी ७.०० ते ११.३० पुरुष पारायणार्थी
२) दररोज दुपारी १.०० ते ५.३० महिला पारायणार्थी
३) दररोज रात्रौ. ७.३० ते ९.३० निमंत्रीतांचे कीर्तन / व्याख्यान/ इतर करमणुकीचे कार्यक्रम.
४) आठव्या दिवशी साईचरित्र ग्रंथाची गावातुन शोभा यात्रा.
५) अवतरणिकेच्या दिवशी एकच बॅच (स्त्री व पुरुष)
६) नवव्या दिवशी काला कीर्तन व महाप्रसाद भंडारा.

मागील वर्षी श्रावण मासानिमित्त आयोजित पारायण सोहळयास संस्थान मार्फत आलेला खर्च व यावर्षी पारायण आयोजित करावयाचे असल्यास या कामी संस्थानला येणारा अंदाजे खर्च याची तपशिलवार माहिती खालील प्रमाणे आहे.

| अ.न. | तपशिल | श्री साईसच्चरीत्र पारायण सोहळा २०१४ | | श्री साईसच्चरीत्र पारायण सोहळा २०१५ अंदाजे खर्च |
|---|---|---|---|---|
| | | अंदाजे खर्च | प्रत्यक्ष खर्च | |
| १ | मंडप , मॅटीन व स्टेज | ३०००००.०० | २८९४५७.०० | ३४५०००.०० |
| २. | कलाकार बिदागी | ७५०००.०० | ७९०२.०० | ६७१६९.०० |
| ३. | प्रसाद खर्च (चहा, कॉफी व खर्चासह) | ५७५०००.०० | ५८१९४३०० | ८९४६१८.०० |
| ४. | जादा कंत्राटी ( कामगार) | --- | ६५७८७.०० | १०००००.०० |
| ५. | इतर खर्च (फर्निचर भाडे, प्लास्टिक कापड, फोटोग्राफी, किरकोळ खर्च ) | २००००.०० | ७२८०.०० | २५०६३.०० |
| ६. | फुल सजावट खर्च | --- | --- | ६००००.०० |
| ७. | विदयुत रोषणाई | --- | --- | १६८१५०.०० |
| | **एकुण** | ९७००००.०० | ९५२३६९.०० | १६६००००.०० |

मागील वर्षी श्रावण मासातील पारायण ग्रामास्थांचे आग्रहास्तव १६ गुंठे जागेत घेण्यात आले होते. ४५०० पारायणार्थी पारायणासाठी सहभागी झाले होते. यात सकाळी पुरुष व दुपारी महिला असे दोन वेळेत वाचनाचे आयोजन केले होते. तेथे जागेची अडचण निर्माण झाली होती. यावर्षी पारायणार्थीचे संख्येत वाढ होण्याची शक्यता आहे.

१) सन १९९५ साली दिक्षीत वाडयाच्या सभागृहात पारायणाची सुरवात झाली. सन १९९६ पासून ते सन २००६ पर्यत गेट नं ४ चे परिसरात आयोजीत करण्यात येत असे.

२) साईभक्तांच्या संख्येत वाढ झालेने त्यांच्या जाणे-येणेस जागा अपुरी पडत असलेने सन २००७ पासून १६ गुंठे जागेत आयोजीत करणेत येत होते.

३) भक्तांच्या संख्येत दिवसेदिवस लक्षणीय स्वरुपात वाढ होत असलेने तसेच २०१० मध्ये मंडप कोसळलयाने साईप्रसादालयाचे हॉलमध्ये आयोजीत केले होते.

**खालील बाबीवर निर्णय होणेस विनंती.**

१) उपरोक्त श्रावण मासातील पारायण आयोजीत करणे निर्णयास्तव तसेच पारायण घेणे निश्चीत झालेस या कामी संस्थानला येणारे अंदाजे रु. १६६००००/- चे खर्चास तसेच पारायणाची जागा निश्चित होणे आवश्यक आहे.

२) मागील वर्षी प्रमाणे पारायणासाठी १६ गुंठेची जागा निश्चित करणे असल्यास त्या जागेत पारायणार्थी बसु शकतील तसेच भक्तांचे जाणे-येणेसाठी पुरेसी जागा राहील याबाबी विचारात घेता पारायणर्थीची कमाल संख्या निश्चित करणे.

३) इच्छुक पारायणार्थींना पारायणासाठी बसण्याची व्यवस्था करणे असल्यास साईनगर अगर दुस-या मोठया जागेवर मंडप टाकणे.

४) जागा निश्चीतीबाबत तसेच पारायणार्थीची कमाल संख्या निश्चीत करणेबाबत शिर्डी ग्रामस्थ यांची सभा आयोजीत करावी किंवा कसे ?.

५) सिंहस्थ कुंभमेळा कालावधीत पारायण सोहळा असल्याने शिर्डीत गर्दीचे प्रमाण वाढण्याची शक्यता असल्याने पारायणासाठी जागा निश्चित करणे किंवा आहे त्याच ठिकाणी (१६ गुंठे) जागेत पारायणांचे नियोजन करणे.

६) दि.०५/६/२०१४ रोजी मा.व्यवस्थापन समितीचे निर्णय क्र. ४३७ अन्वये "श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे सौजन्याने व नाटय रसिक संच , शिर्डी यांचे सहकार्याने २० वा श्री साईसच्चरीत पारायण सोहळा साजरा करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.९,७०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.

तसेच, पारायण सोहळा संपल्यानंतर काही स्थानिक सहली आयोजक पारायणार्थींना घेऊन धार्मिक ठिकाणी सहली काढतात व त्या वाहनांवर पारायण सोहळयाचे फलक लावतात, त्यामुळे बाहेरील भक्तांमध्ये चुकीचा संदेश जातो. यासाठी स्थानिक सहली आयोजकांना सहलीच्या वाहनांवर व ओळखपत्रांवर पारायण सोहळयाचे नावाचा उल्लेख करु नये,असे लेखी कळविणेत यावे. पारायण सोहळयामध्ये होणारा सर्व खर्च संस्थानने करावा व विविध ठिकाणी लावणेत येणा-या फलकांवर साईबाबा संस्थान व्यतिरिक्त इतर मंडळांची नावे लिहीणेत येऊ नये, असे ठरले "

७) मा. व्यवस्थापन समितीचे निर्णय क्र ४३७ अन्वये श्री साईसच्चरीत पारायण सोहळा या कार्यक्रमाच्या फलकावर फक्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी आयोजित असा उल्लेख करण्यात आलेला होता.

शिर्डी ग्रामस्थ यांनी तत्कालीन मा. अध्सक्ष साहेब, यांना दुरध्वनी वरुन पारायण कार्यक्रमाच्या फलकावर शिर्डी ग्रामस्थांचे नाव टाकणे बाबत चर्चा केली. तसेच मा. कार्यकारी अधिकारी साहेब व उप कार्यकारी अधिकारी साहेब यांना समक्ष भेटून पारायण कार्यक्रमाच्या फलकांवर शिर्डी ग्रामस्थांचे नाव टाकणे बाबत चर्चा केली. तत्कालीन मा. कार्यकारी अधिकारी साहेब यांचे तोंडी आदेशान्वये पारायणाच्या फलकावर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व शिर्डी ग्रामस्थ आयोजित असा उल्लेख करण्यात आला होता. याही वर्षी मागील वर्षी प्रमाणे कार्यवाही करता येईल.

८) अंदाजे रक्कम रुपये खर्च रु.१६,६०,०००/- ( रुपये सोळा लाख साठ हजार ) मात्र चे खर्चास मंजूरी मिळणे.

उपरोक्त प्रमाणे श्रावण मासातील पारायण आयोजित करणे बाबत निर्णयास्तव तसेच पारायण घेणे निश्चित झालेस या कामी संस्थानला येणारे अंदाजे रु.१६,६०,०००/- चे खर्चास मान्यता असावी.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.१८० **यावर सविस्तर चर्चा होऊन, सालाबादप्रमाणे याही वर्षी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे सौजन्याने व शिर्डी ग्रामस्थ शिर्डी यांचे सहकार्याने श्री साईसच्चरित्र पारायण सोहळा साजरा करणेस तसेच त्यासाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.१६,६०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**परंतु तत्पुर्वी श्री साईसच्चरित्र पारायण सोहळा साजरा करणेकामी येणा-या खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाच्या मान्यतेनंतर पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- सामान्य प्रशासन वशी -०५/ विधी अधिकारी)

---

विषय नं.२१ **श्री गुरुपौर्णिमा उत्सव- २०१५ साजरा करणेस व याकामी येणा-या खर्चाचे अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- सन २००४ महाराष्ट्र शासन अधिनियम क्र.१४ च्या कलम नं.१७ (१) मध्ये खालीलप्रमाणे तरतुद आहे.

"राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ

चालवावयाचा आहे, ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे ही समितीची कर्तव्ये असतील." त्याप्रमाणे रुढी परंपरेनुसार धार्मिक पूजा विधी, उत्सव साजरे केले जातात.

सालाबाद प्रमाणे यावर्षी श्री गुरूपौर्णिमा उत्सव गुरुवार दि.३०/०७/२०१५ ते शनिवार दि.०१/०८/२०१५ असा तीन दिवस साजरा करण्यात येणार आहे. उत्सवाचा मुख्य दिवस शुक्रवार दि.३१/०७/२०१५ आहे. या उत्सवासाठी खालीलप्रमाणे तयारी करावी लागणार आहे.

| अ.नं. | तपशील | उत्सवात करावयाची कामे |
|---|---|---|
| १ | उत्सव निमंत्रण पत्रिका | संस्थानचा कारभार चालविणेसाठी तयार करण्यात आलेल्या योजनेच्या तरतुदीमध्ये दुरुस्ती झाल्याप्रमाणे भक्त मंडळाचे आजीव व आश्रयदाते सभासदांना उत्सवाच्या निमंत्रण पत्रिका पाठवाव्या लागतात. यंदाचे श्री गुरुपौर्णिमा उत्सवात सभासदांची वाढती संख्या धरुन १,८३,००० पाकीटांसह निमंत्रण पत्रिका छपाई करुन घ्याव्या लागतील. तसेच नेहमीप्रमाणे प्रेस नोट (न्युज ॲटम) म्हणून वर्तमान पत्रातून प्रसिध्दी देण्यात येईल. |
| २ | उत्सव व्यवस्था | अ) कलाकार कार्यक्रम |
| | गुरुवार दि.३०/०७/२०१५ (प्रारंभ दिवस) | सायंकाळी ७.३० ते रात्रौ १०.३० पर्यंत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम समाधी मंदिराशेजारील उत्तरेकडील स्टेजवर होईल. |
| | शुक्रवार दि.३१/०७/२०१५ (मुख्य दिवस) | १) सायंकाळी ७.३० ते रात्रौ १०.३० पर्यंत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम समाधी मंदिराशेजारील उत्तरेकडील स्टेजवर होईल.<br>२) रात्रौ ११.०० ते सकाळी ०५.०० वाजेपर्यंत (३१/०७/२०१५) इच्छुक कलाकारांचा साईभजन कार्यक्रम होईल. यादिवशी समाधी मंदिर दर्शनासाठी रात्रभर उघडे राहिल. |
| | शनिवार दि.०१/०८/२०१५ (सांगता दिवस) | सायंकाळी ७.३० ते रात्रौ १०.३० पर्यंत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम (समाधी मंदिराचे उत्तरेकडील उत्तरेकडील स्टेजवर) उत्सवांचे तीनही दिवसाकरीता निमंत्रित कलाकारांचे कार्यक्रम ठरावयाचे आहेत.<br>इच्छूक कलाकारांची पत्रे व तक्ता नंतर सादर केला जाईल. |
| | | ब) कीर्तन कार्यक्रम |
| | गुरुवार दि.३०/०७/२०१५<br>शुक्रवार दि.३१/०७/२०१५<br>शनिवार दि.०१/०८/२०१५ | श्री गुरुपौर्णिमा उत्सवासाठी तीन दिवस कीर्तन कार्यक्रम ठेवावयाचा आहे. निमंत्रीत कीर्तनकारांची व कलाकारांची निवास व्यवस्था संस्थानमार्फत मोफत करण्यात येईल. निमंत्रीत कीर्तनकारांचे व कलाकारांचे मानधन मंदिर विभागामार्फत अदा करण्यात येईल. |
| ३ | श्री साईसत्यव्रत (सत्यनारायण) पूजा व अभिषेक पूजा | उत्सवकाळात दि.३०/०७/२०१५ ते दि.०१/०८/२०१५ अखेर श्री साईसत्यव्रत पूजा व अभिषेक पूजा बंद राहतील. |
| ४ | विद्युत रोषणाई | समाधी मंदिर, व्दारकामाई, चावडी, गुरुस्थान व मंदिर परिसरात सोईप्रमाणे विद्युत रोषणाई करण्यात येईल. श्री गुरुपौर्णिमा उत्सवात श्री साईराज डेकोरेटर्स, मुंबई विनामुल्य रोषणाई करीत असतात. त्यांची शिर्डी येथे निवास, भोजन व चहा-नाष्टयाची व्यवस्था संस्थानमार्फत विनामूल्य करण्यात येते. मात्र ट्रक भाडे व जाणे-येण्याचा खर्च देण्याची प्रथा आहे. यावेळी विद्युत विभागामार्फत त्यांना दि.०७/०५/२०१५ रोजी पत्र देण्यात आलेले आहे. ते न आल्यास संस्थानमार्फत विद्युत रोषणाई करण्यात येईल. |
| ५ | अखंड पारायण व्यवस्था | उत्सव काळात दिनांक ३०/०७/२०१५ रोजी सकाळी ५.१५ वाजता श्री व्दारकामाई मंदिरात श्री साईचरित्राचे अखंड पारायणास सुरुवात होईल. दि.३१/०७/२०१५ रोजी सकाळी ०५.०० वाजता त्याची समाप्ती होईल. मा.त्रिसदस्य समितीचे ३ सदस्य पहिले तीन अध्याय वाचतील व राहिलेले ५० अध्याय प्रत्येकी एक असे ५० भक्त वाचतील. इच्छूक भक्तांची नांवे दि.३०/०७/२०१५ रोजी समाधी मंदिरासमोरील स्टेजवर कर्मचा-याकडे नोंदविली जातील व त्याच दिवशी सायंकाळी त्यांच्या नावाच्या चिठ्ठया काढून पारायणाकरीता नांवे निश्चित केली जातील. पारायणात भाग घेणा-या प्रत्येक भक्तास प्रसाद म्हणून एक श्रीफळ देण्यात येईल. या उत्सवात पोथी, वीणा, प्रतिमा, अध्याय वाचन, रुद्राभिषेक, पाद्यपूजा या कार्यक्रमाकरीता त्रिसदस्य समितीचे सदस्य राहतील. |
| ६ | पालखी व रथ मिरवणूक | उत्सवाचे पहिले दिवशी गुरुवार दिनांक ३०/०७/२०१५ रोजी श्रींचे पालखीची गावातून रात्रौ. ९.१५ वाजता मिरवणूक होईल, शुक्रवार दिनांक ३१/०७/२०१५ रोजी रात्रौ. ९.१५ वाजता रथाची गावातून मिरवणूक होईल. |

| | | |
|---|---|---|
| ७ | संरक्षण व्यवस्था | उत्सव काळात समाधी मंदीर व मंदीर परिसरात बंदोबस्त ठेवणेकामी संरक्षण सुव्यवस्था राखणेसाठी पुरेसा बंदोबस्त ठेवणेकामी मा. पोलीस अधिक्षक , अहमदनगर यांना तसेच कार्यक्रमासाठी ध्वनीक्षेपणची परवानगी बाबत मा. पोलिस निरिक्षक , शिर्डी यांना विनंती करण्यात येईल |
| ८ | प्रसाद भोजन व्यवस्था | उत्सव काळात प्रसादालयात मिष्टांन्न सह रु.१०/- या दरानेभक्तांना प्रसाद भोजन दिले जाते.मा. त्रिसदस्य समितीचे सदस्यांचे कुटूंबीय व नातेवाईक तसेच इतर सन्माणीय व्यक्तींना व निमंत्रित कलाकारांना स्वतंत्र प्रसाद भोजनाची व्यवस्था करण्यात येईल. पोलिस कर्मचारी व उत्सवात काम करणेकरीता मदतीस येणा-या व्यक्तींची प्रसाद भोजन व्यवस्था नेहमी प्रमाणे करता येईल. साई भक्तांचे सोयीसाठी अन्न पाकीटे, चहा, कॉफी, दूध व बिस्कीटे इ. कॅन्टीन मध्ये २४ तास सुविधा उपलब्ध आहे. लाडू प्रसाद तसेच ०३ दिवस मिष्टांन्न अन्न प्रसाद नेहमीचे दराने देण्यात येईल. उत्सव काळात लाडू प्रसाद विक्री जास्तीत जास्त ठिकाणी चालू करावी लागतील. तशी व्यवस्था करण्यात येईल. तसेच श्रीरामनवमी उत्सवात पालखीधारकांना आलेल्या दिवशी एक वेळचे जेवण संस्थान मार्फत कुपन्स वाटून दिले होते. त्यानुसार श्रीगुरुपौर्णिमा उत्सवात येणा-या पालखीधारकांना एक वेळचे जेवण संस्थान मार्फत कुपन्स वाटून देवावयाचे आहे.श्री श्रीरामनवमी उत्सवात सन २०१५ तिनही दिवसाचे मिष्टांन्न पदार्थ पुढील प्रमाणे ठेवण्यात आले होते.<br>१.प्रथम दिवस – बुंदी<br>२. मुख्य दिवस- बुंदी<br>३. सागता दिन – बुंदी<br>या उत्सवात देखील या नुसार ०३ दिवस तिन मिष्टांन्न देण्यात येतील. |
| ९ | लिलाव | श्रींना अर्पण केलेले वस्त्रे व इतर वस्तूची प्रसाद रुपाने जाहिर लिलावाने विक्री तीनही दिवस करण्यात येईल. |
| १० | देणगी काऊंटर्स | उत्सवाचे मुख्य दिवशी मंदीर रात्रीभर उघडे असल्याने देणगी काऊंटर्स तीन शिप्ट मध्ये<br>ठेवण्यात येतील |
| ११ | जादा कंत्राटी कर्मचारी | उत्सवाचे पुर्व तयारी करणेकामी व उत्सव पार पाडणेकरीतालागणा-या जादा कर्मचारी वर्ग आवश्यकते नुसार ज्या - त्या खात्यास नेमण्यात येईल. या कामी मा. कार्यकारी अधिकारी विविध खात्याकडूनआलेल्या मागणीची छानणी करुन योग्य ते आदेश पारीत करतील. |
| १२ | रुग्णालय व्यवस्था | संस्थान मार्फत ०२ ठिकाणी २४ तास प्रथमोपचार केंन्द्र सुरु करण्यात येतील तसेच सुसज्य अशी रुग्णवाहीका मंदीर प्ररिसर , प्रसादरलय परिसर या ठिकाणी ठेवण्यात येतील. |
| १३ | पाणी पुरवठा | पाट बंधारे खात्यास उत्सव काळात कॅनॉलचालू ठेवणे बाबत विनंती करण्यात येईल. नियमित पाणी पुरवठा राहील याची व्यवसथा करण्यात येईल. |
| १४ | भक्तांची प्रासंगीक निवासव्यवस्था | संस्थानचे साई आश्रमभक्तनिवासस्थान नं १ व साईधर्मशाळा, व्दारावती , भकतनिवासस्थान इ. इमारती मधुन पालखी पदयात्रीसाठी व भक्तांची निवासव्यवस्था करण्यात येईल. |
| १५ | पालखी व्यवस्था | श्री गुरुपौर्णिमा उत्सवात पुणे तसेच इतर ठिकाणाहून पालख्या येत असतात. उत्सवात येणा-या पालख्या व सोबत येणा-या भक्तांचीव्यवस्था साई आश्रम (धर्मशाळा) परिसरात करण्यात येते. येणा-या पालख्यांचा तक्ता अलहिदा सादर केला जाईल. पायी येणा-या भकतांची आवश्यकतेनुसार शिगवे, गुहा पाट, प्रिंपी निर्मळ येथे संस्थान तर्फे टॅकरने पिण्यचे पाणी पुरविण्याची व्यवस्था यंदाही करावी लागणार आहे. |
| १६ | कार्यक्रमाची सांगता | गोपाळ काल्याचे कीर्तनाने उत्सवाची सांगता होईल. काल्याचे कीर्तन निमंत्रित कीर्तनकार करतील. |
| १७ | खर्चाचे अंदाजपत्रक | श्री गुरुपौर्णिमा उत्सव -२०१४ मध्ये प्रत्यक्ष खर्च रु. २३६४७२३/- (रु. तेवीस लाख चौसष्ठ हजार सातशे तेवीस ) मात्र इतका खर्च झाला होता.<br>श्री गुरुपौर्णिमा उत्सव-२०१५ करता सोबत जोडलेल्या तपशिला प्रमाणे अंदाजे रु.४१,००,०००/-( रु. एकेचाळीस लाख) मात्र अपेक्षित आहे. |

उपरोक्त प्रमाणे श्री गुरुपौर्णिमा उत्सव-२०१५ साजरा करणेस, त्यासाठी वरीलप्रमाणे कार्यवाही करणेस व त्यासाठी येणा-या अंदाजे रु.४१,००,०००/-( रु. एकेचाळीस लाख) मात्रचे खर्चास मान्यता असावी.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विंनती.

निर्णय क्र.१८१ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सालाबादप्रमाणे याही वर्षी श्री गुरुपौर्णिमा उत्सव साजरा करणेस तसेच उत्सवानिमित्त प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व त्यासाठी येणा-या अंदाजे रु.४१,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**परंतु तत्पुर्वी श्री गुरुपौर्णिमा उत्सव- २०१५ निमित्त येणा-या खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाच्या मान्यतेनंतर पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- सामान्य प्रशासन वशी-०५/ विधी अधिकारी)

---

विषय नं.२२ **२५% जादा किराणामाल खरेदीबाबत.**

प्रस्ताव- सन २०१४-१५ चे माहे ऑक्टो.२०१४ ते मार्च-२०१५ अखेर प्रसादालय, मंदिर व कॅन्टीन विभागाकरीता आवश्यक किराणामाल पुरविणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९.१०.२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.९२१ नुसार न्युनतम दर धारकांस पुरवठा आदेश देण्यात आलेले होते. पुरवठा आदेशाची मुदत मार्च २०१५ अखेर संपलेली आहे.

सन २०१५-१६ करिता आवश्यक किराणा माल खरेदीकामी दि.१३.०३.२०१५ रोजी मा.उच्च न्यायालयाची मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार ई-निविदा प्रक्रिया राबवित आहोत. सदरची ई-निविदा प्रक्रिया राबवितांना वर्तमानपत्रात जाहिरात देणे, निविदा प्रसिद्ध करणे, स्विकृती करणे, तांत्रिक लिफाफे उघडणे, नमुने निवडणे, व्यापारी लिफाफे उघडणे, पुरवठा आदेश देणे इत्यादी सर्व कार्यवाही होणेसाठी साधरणतः ३० ते ४० दिवसांचा कालावधी अपेक्षित आहे.

निविदेतील शर्ती व अटी क्रमांक १९ अन्वये "निविदा कालावधीत अगर तद्नंतरही पुढील खरेदी संबधी प्रक्रीया पूर्णहोईपावेतो आवश्यकतेनुसार मंजुर केलेल्या परीमानापेक्षा २५% पर्यंत जादा मालाची मागणी संस्थानकडून झाल्यास त्या मालाचा पुरवठा मान्य दरानेच करणे निविदाधारकावर बंधनकारक राहील. तसेच पुरवठा आदेशामध्ये नमुद केलेला सर्व माल घेणे संस्थानवर बंधनकारक राहणार नाही"

तसेच करारनाम्यातील शर्ती व अटी क्रमांक ०८ अन्वये "प्रसंगी निविदा कालावधी व तद् नंतरही नमुद केलेल्या मालापेक्षा २५% इतका जादा माल मंजुर दरानेच पुरविणे पार्टी नं.०२ यांचेवर बंधनकारक राहील."

त्यानुसार प्रसादालय, लाडु निर्मिती, मंदिर व कॅन्टीन विभागांसाठी लागणारा आवश्यक किराणामाल पुढील निविदा प्रक्रिया पुर्ण होईपावेतो मागील मंजुर दराने त्या-त्या पुरवठाधारकांकडून खरेदी करावा लागेल.

**विभागाचा अभिप्राय-** किराणामालाअभावी साईभक्तांना प्रसादालयामध्ये भोजन देण्यास अडचण निर्माण होऊ नये याकरिता सन २०१५-१६ चे किराणा माल व त्या अनुषंगिक इतर साहित्य खरेदीकामी निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन, पुरवठा आदेश पारित होईपावेतो अटी व शर्तीस अधीन राहुन मागील मंजुर दराने त्या-त्या पुरवठाधारकांकडून आवश्यकतेनुसार किराणामाल खरेदी करता येईल, असे नम्र मत आहे.

**मागणी** – तरी किराणामालाअभावी साईभक्तांना प्रसादालयामध्ये भोजन देण्यास अडचण निर्माण होऊ नये याकरिता सन २०१५-१६ चे किराणा माल व त्या अनुषंगिक इतर साहित्य खरेदीकामी निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन, पुरवठा आदेश पारित होईपावेतो अटी व शर्तीस अधीन राहुन मागील मंजुर दराने त्या-त्या पुरवठाधारकांकडून आवश्यकतेनुसार किराणामाल खरेदी करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा.व्य.समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१८२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे आवश्यकतेनुसार मागील मंजुर दराने व अटी/ शर्तीवर श्री साईप्रसादालयासाठी २५% जादा किराणामाल खरेदी करणेत आलेला आहे, त्यास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक खरेदी विभाग)

---

विषय नं.२३ **संस्थान कायम कर्मचा-यांचा जादा वैद्यकिय बीलाचा परतावा देणेबाबत.**

प्रस्ताव- **<u>व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. –</u>** १) जा. नं. एसएसएस-वशी रुग्णालय ५८२-९७ दि. १६/०१/१९९९. २) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०८/०२/२००९ निर्णय क्र. ७५ अन्वये रु. १०,०००/- पर्यंत मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात तर त्यावरील खर्चाची बिले ही मा. व्यवस्थापन समितीचे सभेच्या मान्यतेने अदा करावी.

**<u>प्रास्ताविक –</u>** खालील संस्थान कर्मचा-यांची रु. १०,०००/- पर्यंतची खर्चाची मर्यादा संपल्यामुळे रु. १०,०००/- पेक्षा जास्त खर्चाचे बिले परतावा मिळणेकामी सादर केलेले आहेत.

| अ. नं. | कर्मचा-याचे नाव | कर्मचा-याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयाचे नाव | एकूण मागणी रक्कम | एकूण देय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | अ – संस्थान मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये रेफर केले होते | | | | | | | |
| 1 | महांकाळे विठठल काशिनाथ | पत्नी | Ca | डॉ . रेडडी | बॉम्बे हॉस्पिटल, मुंबई | 269092.00 | 264352.00 | |
| 2 | भाऊसाहेब आप्पा सुरळे | मुलगा | Dengue / fever | डॉ. दिपक साळुंके | निरामय हॉस्पिटल, पुणे | 25063.00 | 20503.00 | रुग्ण बाहेरगावी असतांनी आजारी पडले होते. |

| अ. नं. | कर्मचा-याचे नाव | कर्मचा-याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयाचे नाव | एकूण मागणी रक्कम | एकूण देय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | सदाफळ राजेंद्र सोपान | स्वत: | Blood Ca | डॉ. मेहरोत्रा | दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटल, पुणे | 343874.00 | 332114.00 | |
| 4 | बाबासाहेब काशिनाथ थेटे | स्वत: | Thigh Liposurgery | डॉ . देशमुख | रुबी हॉल, पुणे | 121262.00 | 116862.00 | |
| 5 | सतिष रामभाऊ खरात | मुलगी | Thrmbo Cytopenia | डॉ. साबळे | बॉम्बे हॉस्पिटल, मुंबई | 2908.00 | 2908.00 | |
| 6 | जगन्नाथ देवराम डांगे | स्वत: | Tumour / Ca | डॉ. कुलकर्णी | टाटा मेमोरीयल हॉस्पि. , मुंबई | 174125.00 | 154665.00 | |
| 7 | शकिला सलीम शेख | पती | Ca | डॉ. रामनाईक | प्रवरा रुरल हॉस्पिटल, लोणी | 104081.00 | 100061.00 | |
| 8 | पठाण नसरुल्ला नुरखॉ | पत्नी | Inflammatory Powel Disease | डॉ. शर्मा | रुबी हॉल, पुणे | 4946.00 | 4946.00 | |
| 9 | छाया पोपट शेलार | स्वत: | Ca-Breast | डॉ. रामनाईक | रुबी हॉल, पुणे | 15180.00 | 15180.00 | |
| 10 | मोहन बबन शिरसाठ | स्वत: | Nephritis / Renal Failure | डॉ. मेहरोत्रा | सहयाद्री हॅास्पिटल, नाशिक (लाईफ लाईन हॅास्पिटल नावात बदल) | 209373.00 | 203231.00 | |
| 11 | किशोर नाथा चव्हाण | मुलगी | Acute Gall Stone Pancreatis | डॉ राम नाईक | दिनानाथ मंगेशकर हॅास्पिटल, पुणे | 38447.00 | 37607.00 | |
| 12 | विनायक माधव उदावंत | वडील | Panisinasitus With Orbetal Complications with uncontrolled Diabeties | डॉ. महाजन | निरामय हॅास्पिटल, पुणे | 246062.00 | 237932.00 | |
| 13 | शेषराव रावसाहेब चव्हाण | स्वत: | Ca -Tongue | डॉ. कुलकर्णी | रुबी हॉल क्लिनीक, पुणे | 251117.00 | 163805.00 | |
| 14 | अंजाबापू कोंडाजी कोते | वडील | Paralysis | डॉ. इंगळे | रुबी हॉल क्लिनीक, पुणे | 116752.00 | 110592.00 | |
| 15 | जयश्री अंबादास गायकवाड | स्वतः | Chronic active hepatitis | डॉ. पोरवाल | रुबी हॉल क्लिनीक, पुणे | 96800.00 | 72600.00 | |
| 16 | रमेश सी. पुजारी | आई | Ca-breast | डॉ. हेमंतकुमार देवरे | प्रवरा मेडिकल ट्रस्ट लोणी | 25292.00 | 21810.00 | |
| 17 | सांबारे दिलीप बाबासाहेब | पत्नी | Eye operation | डॉ. सोनटक्के | सुजाता बिरला हॅास्पिटल नाशिक | 50305.00 | 49785.00 | |
| 18 | मधुकर परसराम गव्हाणे | वडील | Ca – Pancreas | डॉ. गोरे | रुबी हॉल क्लिनीक, पुणे | 214450.00 | 212690.00 | |
| | | | | | **एकूण** | **2309129.00** | **2121643.00** | |
| | **ब. संस्थानचे मान्य यादीत नसलेले परंतु रेफर केलेले हॅास्पिटल-** | | | | | | | |
| 19 | अशोक नामदेव झुरंगे | स्वत: | Eye Operation | डॉ. सोनटक्के | दृष्टी आय इंस्टीटयुट, औरंगाबाद | 6796.00 | 5576.00 | सदर उपचार श्री साईनाथ हॅास्पिटलमध्ये होत नाहीत. |
| 20 | जगन्नाथ देवराम डांगे | स्वत: | Right Nasal Tumour / CA | डॉ. कुलकर्णी | परेल हॅास्पिटल, मुंबई | 188247.00 | 140070.00 | |
| | | | | | **एकूण** | **195043.00** | **145646.00** | |
| | **क. संस्थानचे मान्य यादीत नसलेले व रेफर न केलेले हॅास्पिटल** | | | | | | | |
| 21 | विठठल मानिकराव बर्गे | मुलगा | Dengue / Fever | डॉ. चव्हाण | चव्हाण हॅास्पिटल, पुणे | 19031.00 | 12408.00 | रुग्ण बाहेरगावी असतांनी आजारी पडले होते. |
| 22 | रामचंद्र बाबू दर्गे | पत्नी / मुलगी | Diabeites | डॉ. आनंद अबासणे | तिरुपती मेडिकल सेंटर मुंबई | 12623.00 | 10092.00 | |

| अ. नं. | कर्मचा-याचे नाव | कर्मचा-याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयाचे नाव | एकूण मागणी रक्कम | एकूण देय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 23 | सुनील सखाराम तांबे | वडील व आई | Paralysis | डॉ. आदित्य महामनकर | आदित्य नर्सिंग होम | 13512.00 | 9594.00 | रुग्णाचे वास्तव्य महाड येथे आहे. |
| 24 | गुंजाळ भिमराज बबन | स्वतः व मुलगा | ACCIDENT | डॉ. संजय धुरजाद | सुदर्शन हॉस्पिटल, नाशिक | 32171.00 | 25129.00 | |
| 25 | बाबर सुजय आनंदराव | स्वतः | Hiatus Hernia | डॉ. भालेराव | Center for Laparoscopy surgery,Pune | 133728.00 | 99366.00 | |
| 26 | सुरेखा राजु गायकवाड | पती | Ca-Tongue | डॉ. राम नाईक | Hi Tech Hospital, Dahisar | 58310.00 | 35224.00 | - |
| 27 | किशोर केशव क्षिरसागर - मुंबई कार्यालय | वडील | Asthama | डॉ. संजय पृथ्वी | Lifeline Hospital, Dombiwali | 36647.00 | 939.00 | |
| 29 | चोळके दिलीप बाळू | स्वत: | Accident | डॉ. किरण दोषी | कोल्हापूर इन्सिस्टुट ऑफ अथोपेडीक ड्रामा | 25858.00 | 20373.00 | |
| | | | | | एकूण | 331880.00 | 213125.00 | |
| | | | | | अ + ब + क एकूण | 2836052.00 | 2470414.00 | |

<u>**संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान–**</u> सदर बिलांची संस्थान वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये छाननी केली असून देय होणारी एकूण रक्कम रु. 24,80,414/- इतकी आहे.

<u>**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत–**</u> नियमावली प्रमाणे छाननी केली असुन समितीने मान्य केलेली देय होणारी रक्कम अदा करणेस हरकत नाही, असे मत आहे.

निर्णय क्र.१८३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावामध्ये नमुद केलेप्रमाणे संस्थान कायम कर्मचा-यांच्या नावासमोरील देय असलेली रक्कम वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये छाननी केलेली असून ती रक्कम संबंधीतांना अदा करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

विषय नं.२४ **कॅथलॅब मशिन (Axiom Artis dfc) चे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा हॉस्पीटलचे कार्डीओलॉजी विभागाकरीता सन 2005 यावर्षी मे.सिमेन्स लि. मुंबई, यांचेकडुन Axiom Artis dfc cath lab System एकुण रू. 2,95,00,000/- इतक्या रकमेत खरेदी करणेत आले आहे. सदर मशिन श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये दि 18/02/2006 रोजी कार्यान्वीत करण्यात आले असुन कंपनीने मशिन करीता दिलेला तीन वर्षाचा वॉरंटी कालावधी दि. 17/02/2009 रोजी पुर्ण झालेला आहे. सदर कॅथलॅब मशिनची दि. 31/03/2014 रोजी घसारा वजा किंमत रू. 26,06,678/- इतकी आहे. मशिन करीता कंपनीने दिलेल्या वरील पुरवठा आदेशातील अटी नुसार वार्षीक CMC (Comprehensive Maintenance contract) करणेबाबत खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

<u>**दि. 11/08/2005 च्या पुरवठा आदेशातील अ. क्र. 12 अन्वये -**</u>

Comprehensive Maintenance Contract (CMC) price for the fourth year is Rs.27,22,500/-. For subsequent years the escalation of 10% will be applicable. The service tax will be extra.

The CMC includes X-ray general I.I. Tube & Detector system, all spare parts and labour will be given free of cost. Payment for CMC to be done at beginning of each year after the demand of company.

वरील अटी नुसार आजपावेतो मे. सिमेन्स लि. मुंबई यांचेकडे दरवर्षी सदर मशिनचे कॉम्प्रेहेन्सीव वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणेत येत आहे. सदर मशिनचे दुरूस्ती करीता केलेला खर्च व पेशंटची संख्या इ. वर्षनिहाय माहीती खालीलप्रमाणे आहे.

| **Sr. No.** | **Period** | **CAMC Amount Incl. of all Taxes in Rs.** | **Approx. Cost of Spare Parts in Rs.** (replaced by Company in CAMC) | **Total No. of Patients Done** |
|---|---|---|---|---|
| 1 | 17/02/09 to 16/02/10 | 30,59,001/- | 15,00,000+VAT | 4,775 |
| 2 | 17/02/10 to 16/02/11 | 32,99,920/- | 28,00,000+VAT | 5,293 |
| 3 | 17/02/11 to 16/02/12 | 36,29,912/- | 48,00,000+VAT | 7,193 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 4 | 17/02/12 to 16/02/13 | 40,56,616/- | 60,50,000+VAT | 8,910 |
| 5 | 17/02/13 to 16/02/14 | 44,48,682/- | 1,22,40,880 (Incl. of all taxes) | 9,008 |
| 6 | 17/02/14 to 16/02/15 | 46,97,933/- | USD 1,08,733 (Approx Rs.70,64,027+VAT) | 7,239 |
| | **Total** | **2,31,92,064/-** | **Approx. Rs. 3,44,54,907** | **42418** |

मे.सिमेन्स लि. मुंबई यांनी पत्र क्र. West/HIM/AXA/Jan14/92886 Dtd. 16/01/2015 (रूग्णालये प्राप्त दि. 16/01/2015) अन्वये पुढील दोन वर्षाकरीता म्हणजे दि. 17/02/2015 ते दि. 16/02/2017 या कालावधीसाठी Cath Lab मशिनचे कॉम्प्रेहेन्सीव वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणेकरीता करारनामा पाठविला आहे.

| Sr. No. | Last Year Period | Last Year CMC Amount in Rs (Incl. of all Taxes) | Current Year CMC Period | Current Year CMC Amount in Rs (Incl. of all Taxes) | % Increase |
|---|---|---|---|---|---|
| 01 | 17 Feb. 2014 to 16Feb.2015 | 46,97,233/- | 17 Feb.2015 to 16Feb.2016 | 49,32,830/- | 5% |

सदर एक वर्षाच्या कालावधीमध्ये कंपनी इंजिनीअर एकुण 4 वेळा नियमीत सर्व मशिन्सची सर्व्हीसींग करून मशिन ब्रेकडाउनचे वेळी दुरूस्ती करीता आवश्यक असणारे सर्व स्पेअर पार्ट (एक्स-रे टयुबसह) बदलणार आहेत आणि आवश्यकतेनुसार अमर्यादीत भेटी देउन सॉफ्टवेअर / हार्डवेअर सेफ्टी अपडेट करणार आहेत.

परंतु कंपनीने दि.21/01/2015 रोजीच्या ई-मेल द्वारे असे कळविले आहे की उपरोक्त कॅथलॅब सिस्टीमपैकी Axiom Sensis या पार्टची आयु:मर्यादा संपलेली असुन कंपनी सदर पार्टला उपलब्धतेनुसार सर्वतापरी स्पेअर पार्टचा पुरवठा करून आवश्यकतेनुसार दुरूस्ती व देखभाल करणार आहे. परंतु स्पेअर पार्ट उपलब्ध होणे बंद झालेनंतर फक्त Axiom Sensis या पार्ट CMC कॉन्ट्रॅक्ट पुर्वसुचना देउन बंद करणेत येउन सदर पार्टची CMC ची उर्वरीत रक्कम वजा करणेत येईल. तसेच सदर मशिनला जोडण्यात आलेले M/s. Consul Neowatt Power Solutions Pvt. Ltd., Pune या कंपनीचे 10 KVA चे UPS दहा वर्षापासुन वापरात असून कंपनीने सदर यु.पी.एस.ची आयु:मर्यादा संपली असुन यु.पी.एस. बदलणे आवश्यक आहे असे ई-मेल द्वारे कळविले आहे.

सदर मशिन खरेदी करतेवेळी कंपनीसोबत करण्यात आलेले ॲग्रीमेंट नुसार कंपनीने 98% अपटाईम दिला असुन दुरूस्ती करीता जर कंपनीमुळे एकुण 5 दिवसापेक्षा अधिक काळ लागला तर सलग 5 दिवसानंतर प्रतिदिवस रू. 7500/- इतका दंड संस्थान कंपनीस आकारते.

मा. उच्च न्यायालयाने दि. 26/09/2014 रोजी कॅथलॅब CMC करणेबाबत खालीलप्रमाणे आदेश दिलेले आहे. ***(d) In case the matter is with regard to renewal of agreement and more particularly with the companies, who have provided the said machineries or the products, applicant / Sansthan shall seek renewal of the agreement on the same terms and conditions.***

तसेच मा. व्यवस्थापन समिती दि. 07/08/2014 च्या सभेतील निर्णय क्र. 676 अन्वये

पुर्वीच्या व्यवस्थापन समितीने मान्यता दिलेल्या व मा. खंडपिठाची मान्यता मिळालेल्या खर्चाव्यतीरीक्त साईभक्तांना, रूग्णांना सेवा देण्यात येत असलेल्या सोयी- सुविधा आवश्यक असणाऱ्या सर्व सेवांसाठी लागणारी सर्व मशिनरी/ उपकरणे व तत्सम यांत्रिक सर्व बाबी यांची AMC/CAMC, इतर दुरूस्ती यासाठी येणाऱ्या खर्च तसेच मालमत्ता कर, रेग्युलर टॅक्सेस, कायदेशीर जबाबदारीने भरावयाच्या रक्कमा यांसारखे रक्कम रू. 1 कोटी पर्यंतचे खर्च मा. उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ यांचे मान्यतेमधुन वगळणेत यावेत.

सध्या कॅथलॅब मशिनची घसारा वजा किंमत ही रू. 50,000/- पेक्षा जास्त असल्याने मशिन बायबॅक करणे करीता महाराष्ट्र शासनाची परवानगी घेणेस व याचप्रकारची नवीन मशिनची किंमत रू.10,00,000/- पेक्षा अधिक असल्यामूळे खरेदी करणेस मा. उच्च न्यायालयाची मान्यता घेणेस तसेच मान्यता मिळाल्यानंतर विहीत पध्दतीने निविदा प्रक्रियेद्वारे खरेदीस अंदाजे सहा ते आठ महिन्यांचा कालावधी लागेल. तो पर्यतच्या काळात उपलब्ध मशिन व्यवस्थीत कार्यान्वीत राहणे कामी सध्याचे मशिनचे CMC करीता कंपनीने दिलेल्या एकुण दरामधुन 10 KVA UPS व Axiom Sensis या दोन्ही ॲक्सेसरिज/ पार्टची CMC ची रक्कम वजा करून उर्वरीत रक्कमेबाबत कंपनी प्रतिनिधीशी प्रत्यक्ष चर्चा करून प्रतिमाह दर निश्चित करणेस किंवा प्रत्यक्ष चर्चेनुसार झालेल्या निर्णयानुसार कॅथलॅब मशिनचे CMC करणेस व त्यासाठी येणाऱ्या खर्चास मान्यता असावी.

निर्णय क्र.१८४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, कॅथलॅब मशिन (Axiom Artis dfc) चे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेस व त्यासाठी येणा-या अंदाजे रु.४९,३२,८३०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**परंतु सदरहू वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणेपूर्वी याकामी येणा-या खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाच्या मान्यतेनंतर पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक/ विधी अधिकारी)

**विषय नं.२५ श्री साईनाथ रुग्णालयातील विविध मशिनचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेबाबत**

प्रस्ताव- श्री साईनाथ रूग्णालयामध्ये 50 कंपन्याचे अंदाजे एकुण रू.10,05,91,869.12 इतक्या रकमेचे अंदाजे 450 मेडीकल इक्विपमेंटस खरेदी करणेत आले असुन नियमीत वापरात आहेत. सदर मशिन्स पैकी 79 मशिन्सचे 19 संबंधीत कंपन्यांकडे दुरूस्ती व देखभाली करीता मा. व्य. समितीच्या विविध निर्णयांन्वये दरवर्षी वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करण्यात येत आहे. सदर वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट कालावधीत कंपन्या नियमीत तसेच आवश्यकतेनुसार तातडीच्या भेटी देउन दुरूस्ती व देखभाल करीत असुन सर्व मशिन्स सध्या व्यवस्थीत काम देत आहेत. सध्या काही मशिन्सचे वॉरंटी कालावधी संपलेले असुन माहे मार्च 2015 अखेर काही मशिन्सचे कॉन्ट्रॅक्ट कालावधी संपत आहेत.

वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट बाबत मा.व्य. समितीच्या दि. 20/05/2007 च्या सभेतील विषय क्र. 33 निर्णय क्र. 386 अन्वये खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

" दरवर्षी संस्थानमधील महत्वाच्या मशिनरीचे (यामध्ये उदा. प्रसादालयातील विविध मशिनरी, विद्युत विभागातील विविध मशिनरी, श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रूग्णालयातील विविध मशिनरी, एअरकंडीशनर्स, वायुवीजन यंत्रणा, वगैरे) वार्षीक मेन्टनन्स सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट अथवा रिस्क् प्रोटेक्शन टाईप सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट हे त्या त्या मशिनरीच्या उत्पादक कंपनीला अथवा संबंधीत मशिनरीच्या उत्पादक कंपनीने निर्देशीत केलेल्या त्याच्या अधिकृत सर्व्हीस डिलरला देण्यात यावे असे ठरले ."

तसेच दि. 07/08/2014 रोजीच्या मा. विश्वस्त सभेतील निर्णय क्र. 678 अन्वये आदेश-

**1)** " पुर्वीच्या व्यवस्थापन समितीने मान्यता दिलेल्या व मा. खंडपिठाची मान्यता मिळालेल्या खर्चा व्यतिरिक्त साई भक्तांना, रूग्णांना सेवा देण्यात येत असलेल्या सोयी सुविधा करीता आवश्यक असणाऱ्या सर्व सेवासाठी लागणारी सर्व मशिनरी/ उपकरणे व तत्सम यांत्रीक सर्व बाबी यांची AMC, CAMC, इतर दुरूस्ती यासाठी येणाऱ्या खर्च तसेच मालमत्ता कर, रेग्युलर टॅक्सेस, कायदेशीर जबाबदारीने भरावयाच्या रक्कमा यांसारखे रक्कम रू. 1 कोटी पर्यतचे खर्च मा. उच्च् न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ यांचे मान्यतेमधुन वगळणेत यावेत." त्यामुळे मा. उच्च न्यायालयाची मान्यता घेणेची आवश्यकता नाही.

**2)** त्याचप्रमाणे मा. उच्च् न्यायालयाचा दि. 26/09/2014 चा आदेशानुसार – (d) in case the matter is with regard to renewal of agreement and more particularly with the companies, who have provided the said machineries or the products, applicant/Sansthan shall seek renewal of the agreement on the same terms & conditions.

तसेच उपरोक्त मशिन्सचे स्पेअर पार्ट हे Monopoly या प्रकारचे असल्यामूळे बाजारात उपलब्ध होत नाही म्हणुन सदरच्या मशिन्सचे AMC/CMC त्याच कंपनीकडे करणे आवश्यक आहे व टेंडर काढण्याची आवश्यकता नाही.

सोबतच्या तक्त्यामध्ये दिलेल्या अ.क्र. 1 ते 30 अन्वये एकुण 19 कंपन्यांच्या 79 नग मशिन्सचे सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणेची आवश्यकता आहे. सदरकामी दरवर्षी प्रमाणे तसेच मा. व्य. समितीच्या दि.12/06/2014 चे सभेतील निर्णय क्र.274 प्रमाणे कंपनीच्या प्रतिनिधींना वैद्यकिय अधिक्षक, उप वैद्यकिय संचालक, वैद्यकिय संचालक यांचे समक्ष बोलावुन दिलेल्या दरांबाबत चर्चा करून वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट चे दर निश्चित करता येतील असे नम्र मत आहे.

तरी श्री साईनाथ रूग्णालयातील वरीलप्रमाणे एकुण 79 नग मशिन्सचे वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणेकरीता संबंधित कंपन्यानी दिलेल्या दरांबाबत कंपनी प्रतिनिधींशी वैद्यकिय अधिक्षक, वित्त व्यवस्थापक, वैद्यकिय संचालक व मुख्य लेखाधिकारी यांचे समक्ष प्रत्यक्ष चर्चा करून दर निश्चित करणेस व त्यानुसार येणाऱ्या अंदाजे एकुण रू.14,62,214/- इतक्या रकमेच्या खर्चास मान्यता असावी.

निर्णय क्र.१८५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रूग्णालयातील वरीलप्रमाणे एकुण ७९ नग मशिन्सचे वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणेस व त्यासाठी येणा-या अंदाजे रु.१४,६२,२१४/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**परंतु सदरहू वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणेपूर्वी याकामी येणा-या खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाच्या मान्यतेनंतर पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.२६ श्री साईबाबा हॉस्पिटलचे पॅथोलॉजी लॅब, रेडीओलॉजी, जनरल, न्युरो व ऑर्थो ओटी विभागातील विविध मशिनचे सन २०१५-१६ या कालावधीसाठी वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये एकुण 52 कंपन्याचे एकुण रू.54,08,74,640.79/- इतक्या रकमेचे अंदाजे 859 मेडीकल इक्विपमेंटस व मशिनरी, उपकरणे इक्विपमेंटस तसेच फर्निचर खरेदी करणेत आले असुन नियमीत वापरात आहेत. सदर मशिन्स पैकी 352 मशिन्सचे संबंधीत 28 कंपन्यांकडे दुरुस्ती व देखभाली करीता मा. व्य. समितीच्या विविध निर्णयांन्वये दरवर्षी वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रक्ट करण्यात येत आहे. सदर कॉन्ट्रक्ट कालावधीत कंपन्या नियमीत तसेच आवश्यकतेनुसार तातडीच्या भेटी देउन दुरूस्ती व देखभाल करीत असुन सर्व मशिन्स सध्या व्यवस्थीत काम देत आहेत. सध्या काही मशिन्सचे वॉरंटी कालावधी संपलेले असुन माहे मार्च 2015 अखेर काही मशिन्सचे कॉन्ट्रक्ट कालावधी संपत आहेत.

वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रक्ट बाबत मा.व्य. समितीच्या दि. 20/05/2007 च्या सभेतील विषय क्र. 33 निर्णय क्र. 386 अन्वये खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

" दरवर्षी संस्थानमधील महत्वाच्या मशिनरीचे (यामध्ये उदा. प्रसादालयातील विविध मशिनरी, विद्युत विभागातील विविध मशिनरी, श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रूग्णालयातील विविध मशिनरी, एअरकंडीशनर्स, वायुवीजन यंत्रणा, वगैरे) वार्षीक मेन्टनन्स सर्व्हीस कॉन्ट्रक्ट अथवा रिस्क् प्रोटेक्शन टाईप सर्व्हीस कॉन्ट्रक्ट हे त्या त्या मशिनरीच्या उत्पादक कंपनीला अथवा संबंधीत मशिनरीच्या उत्पादक कंपनीने निर्देशीत केलेल्या त्याच्या अधिकृत सर्व्हीस डिलरला देण्यात यावे असे ठरले ."

तसेच दि. 07/08/2014 रोजीच्या मा. विश्वस्त सभेतील निर्णय क्र. 678 अन्वये आदेश-

1) " पुर्वीच्या व्यवस्थापन समितीने मान्यता दिलेल्या व मा. खंडपिठाची मान्यता मिळालेल्या खर्चा व्यतिरिक्त साई भक्तांना, रूग्णांना सेवा देण्यात येत असलेल्या सोयी सुविधा करीता आवश्यक असणाऱ्या सर्व सेवासाठी लागणारी सर्व मशिनरी/ उपकरणे व तत्सम यांत्रीक सर्व बाबी यांची AMC, CAMC, इतर दुरूस्ती यासाठी येणाऱ्या खर्च तसेच मालमत्ता कर, रेग्युलर टॅक्सेस, कायदेशीर जबाबदरीने भरावयाच्या रक्कमा यांसारखे रक्कम रू. 1 कोटी पर्यतचे खर्च मा. उच्च् न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ यांचे मान्यतेमधुन वगळणेत यावेत." त्यामुळे मा. उच्च न्यायालयाची मान्यता घेणेची आवश्यकता नाही.

2) त्याचप्रमाणे मा. उच्च् न्यायालयाचा दि. 26/09/2014 चा आदेशानुसार – (d) in case the matter is with regard to renewal of agreement and more particularly with the companies, who have provided the said machineries or the products, applicant/Sansthan shall seek renewal of the agreement on the same terms & conditions.

तसेच उपरोक्त मशिन्सचे स्पेअर पार्ट हे Monopoly या प्रकारचे असल्यामूळे बाजारात उपलब्ध होत नाही म्हणुन सदरच्या मशिन्सचे AMC/CMC त्यांचे उत्पादक/पुरवठाधारक किंवा अधिकृत सर्व्हीस डिलर कंपनीकडे करणे आवश्यक आहे व टेंडर काढण्याची आवश्यकता नाही.

सोबतच्या तक्तामध्ये दिलेल्या अ.क्र. 1 ते 21 अन्वये एकुण 13 कंपन्यांच्या पॅथोलॉजी लॅब, रेडीओलॉजी, जनरल, न्युरो. व ऑथो ओ. टी. विभागातील 29 नग मशिन्सचे सर्व्हीस कॉन्ट्रक्ट

करणेची आवश्यकता आहे. सदरकामी दरवर्षी प्रमाणे तसेच मा. व्य. समितीच्या दि. 27/04/2013 चे सभेतील निर्णय क्र. 351 प्रमाणे कंपनीच्या प्रतिनिधींना वित्त व्यवस्थापक, वैद्यकिय प्रशासक, उप वैद्यकिय संचालक, वैद्यकिय संचालक व मुख्यलेखाधिकारी यांचे समक्ष बोलावुन दिलेल्या दरांबाबत चर्चा करून वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रक्टचे दर निश्चित करता येतील असे नम्र मत आहे.

तरी श्री साईबाबा हॉस्पीटलमधील वरीलप्रमाणे एकुण 29 नग मशिन्सचे वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रक्ट करणेकरीता संबंधित कंपन्यानी दिलेल्या कंपनी प्रतिनिधींशी प्रत्यक्ष चर्चा करून दर निश्चित करणेस व त्यानुसार येणाऱ्या अंदाजे एकुण रू. 14,18,240/- इतक्या रकमेच्या खर्चास मान्यता असावी.

निर्णय क्र.१८६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलचे पॅथोलॉजी लॅब, रेडीओलॉजी, जनरल, न्युरो व ऑर्थो ओटी विभागातील विविध २९ मशिन्सचे सन २०१५-१६ या कालावधीसाठी वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेस व त्यासाठी येणा-या अंदाजे रु.१४,१८,२४०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**परंतु सदरहू वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणेपूर्वी याकामी येणा-या खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाच्या मान्यतेनंतर पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक/ विधी अधिकारी)

---

विषय नं.२७ **श्री साईबाबा हॉस्पिटलचे 1st Floor व 2nd Floor विभागातील विविध मशिनचे सन २०१५-१६ या कालावधीसाठी वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये एकुण 52 कंपन्याचे एकुण रू. 54,08,74,640.79 इतक्या रकमेचे अंदाजे 859 मेडीकल इक्विपमेंटस व मशिनरी, उपकरणे, इक्विपमेंटस तसेच फर्निचर खरेदी करणेत आले असुन नियमीत वापरात आहेत. सदर मशिन्स पैकी 301 मशिन्सचे संबंधीत 30 कंपन्यांकडे दुरूस्ती व देखभाली करीता मा. व्य. समितीच्या विविध निर्णयांन्वये दरवर्षी वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करण्यात येत आहे. सदर कॉन्ट्रॅक्ट कालावधीत कंपन्या नियमीत तसेच आवश्यकतेनुसार तातडीच्या भेटी देउन दुरूस्ती व देखभाल करीत असुन सर्व मशिन्स सध्या व्यवस्थीत काम देत आहेत. सध्या काही मशिन्सचे वॉरंटी कालावधी संपलेले असुन माहे मार्च 2015 अखेर काही मशिन्सचे कॉन्ट्रॅक्ट कालावधी संपत आहेत.

वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट बाबत मा.व्य. समितीच्या दि. 20/05/2007 च्या सभेतील विषय क्र. 33 निर्णय क्र. 386 अन्वये खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

" दरवर्षी संस्थानमधील महत्वाच्या मशिनरीचे ( यामध्ये उदा. प्रसादालयातील विविध मशिनरी, विद्युत विभागातील विविध मशिनरी, श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रूग्णालयातील विविध मशिनरी, एअरकंडीशनर्स, वायुवीजन यंत्रणा, वगैरे) वार्षीक मेन्टनन्स सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट अथवा रिस्क् प्रोटेक्शन टाईप सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट हे त्या त्या मशिनरीच्या उत्पादक कंपनीला अथवा संबंधीत मशिनरीच्या उत्पादक कंपनीने निर्देशीत केलेल्या त्याच्या अधिकृत सर्व्हीस डिलरला देण्यात यावे असे ठरले ."

तसेच दि. 07/08/2014 रोजीच्या मा. विश्वस्त सभेतील निर्णय क्र. 678 अन्वये आदेश-

1) " पुर्वीच्या व्यवस्थापन समितीने मान्यता दिलेल्या व मा. खंडपिठाची मान्यता मिळालेल्या खर्चा व्यतिरिक्त साई भक्तांना, रूग्णांना सेवा देण्यात येत असलेल्या सोयी सुविधा करीता आवश्यक असणाऱ्या सर्व सेवासाठी लागणारी सर्व मशिनरी/ उपकरणे व तत्सम यांत्रीक सर्व बाबी यांची AMC, CAMC, इतर दुरूस्ती यासाठी येणाऱ्या खर्च तसेच मालमत्ता कर, रेग्युलर टॅक्सेस, कायदेशीर जबाबदरीने भरावयाच्या रक्कमा यांसारखे रक्कम रू. 1 कोटी पर्यतचे खर्च मा. उच्च् न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ यांचे मान्यतेमधुन वगळणेत यावेत." त्यामुळे मा. उच्च न्यायालयाची मान्यता घेणेची आवश्यकता नाही.

2) त्याचप्रमाणे मा. उच्च् न्यायालयाचा दि. 26/09/2014 चा आदेशानुसार– (d) in case the matter is with regard to renewal of agreement and more particularly with the companies, who have provided the said machineries or the products, applicant/Sansthan shall seek renewal of the agreement on the same terms & conditions.

तसेच उपरोक्त मशिन्सचे स्पेअर पार्ट हे Monopoly या प्रकारचे असल्यामूळे बाजारात उपलब्ध होत नाही म्हणुन सदरच्या मशिन्सचे AMC/CMC त्यांच कंपन्यांकडे करणे आवश्यक आहे व टेंडर काढण्याची आवश्यकता नाही.

सोबतच्या तक्तामध्ये दिलेल्या अ.क्र.1 ते 27 अन्वये ICCU, GICU, Dialysis, CRU-1, CRU-2, CRU-3, CRU-4, CVTS OT-1, CVTS OT-2, TSR, MGW, FGW विभागातील एकुण 12 कंपन्यांच्या 256 नग मशिन्सचे सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणेची आवश्यकता आहे. दरवर्षी प्रमाणे काही कंपन्यांनी मागील वर्षी दिलेल्या दरामध्ये 5 % वाढ अपेक्षीत धरण्यात आलेली आहे.तसेच ज्या मशिन्सची वॉरंटी संपत आहे, वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट दर पुरवठा आदेशातील अटी शर्तीनुसार घेणेत आलेल्या आहेत. सदरकामी दरवर्षी प्रमाणे मा. व्य. समितीच्या दि. 27/04/2013 चे सभेतील निर्णय क्र. 351 प्रमाणे कंपनीच्या प्रतिनिधींना मुख्यलेखाधिकारी, वैद्यकिय संचालक, उप वैद्यकिय संचालक, वैद्यकिय प्रशासक, वित्त व्यवस्थापक यांचे समक्ष बोलावुन दिलेल्या दरांबाबत चर्चा करून वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट चे दर निश्चित करता येतील असे नम्र मत आहे.

तरी श्री साईबाबा हॉस्पीटलमधील ICCU, GICU, Dialysis, CRU-1, CRU-2, CRU-3, CRU-4, CVTS OT-1, CVTS OT-2, TSR, MGW, FGW विभागातील एकुण 256 नग मशिन्सचे वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणेकरीता संबंधित कंपन्यानी दिलेल्या दरांबाबत कंपनी प्रतिनिधींशी प्रत्यक्ष चर्चा करून दर निश्चित करणेस व त्यानुसार येणाऱ्या अंदाजे एकुण रू. 74,36,690/- इतक्या रकमेच्या खर्चास मान्यता असावी.

निर्णय क्र.१८७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पीटलमधील ICCU, GICU, Dialysis, CRU-1, CRU-2, CRU-3, CRU-4, CVTS OT-1, CVTS OT-2, TSR, MGW, FGW विभागातील एकुण 256 नग मशिन्सचे वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेस व त्यासाठी येणा-या अंदाजे रु.७४,३६,६९०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**परंतु सदरहू वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणेपूर्वी याकामी येणा-या खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाच्या मान्यतेनंतर पुढील कार्यवाही करणेत यावी.**

**तसेच वरील निर्णय क्र.१८४ ते १८७ यांना मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेण्यासाठी एकत्रित अर्ज सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकीय संचालक/ विधी अधिकारी)

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा करणेत आली.**

आयत्या वेळेचा विषय नं.०१ **सीसीटीव्ही कन्सल्टंन्ट नेमणुकीबाबत.**

प्रस्ताव- सोमवार दि.२२/०६/२०१५ रोजी सायंकाळी ६.३० वाजता मा.जिल्हाधिकारी कार्यालय येथे मा.जिल्हाधिकारी साहेब यांच्या कक्षात झालेल्या सभेमध्ये मा.अध्यक्ष साहेब यांनी सुचित केल्याप्रमाणे सदर असलेली निविदा संदर्भ प्राप्त झालेल्या निविदा व त्या निमित्ताने निर्दशनास आलेल्या काही तांत्रिक बाबी यांची पुर्तता झालेली नसल्यामुळे निविदा प्रक्रीया रद्द करुन, दि.२४/०६/२०१५ रोजी होणा-या मा. त्रिसदस्यीय समितीचे सभेत सीसीटीव्ही कन्सल्टंन्ट नेमणेबाबत सांगण्यात आलेले आहे. सदर कन्सल्टंन्ट नेमणुकीसाठी सीसीटीव्ही खरेदी पुर्नरनिविदा प्रक्रीयेचे टेंडर डॉक्युमेंन्टस तयार करणे, प्री-बीड मिटींगकरीता शंका निसरन करणे, गरजेनुसार शुध्दीपत्रक काढणे, प्राप्त निविदेचे टेक्नीकल इव्हयुलेशन करणे तसेच सल्लागार नेमणुकीचे टेंडर डॉक्युमेंन्टस तयार करणे याबाबतची सेवा संबंधित जाणकारांकडुन ३ कोटेशन्स मागवावे.

त्यानुसार मा.अध्यक्ष साहेबांनी सांगीतल्याप्रमाणे मे.एमआयएनएल या कंपनीचे कोटेशन घेणेबाबत कळविलेले आहे. सदर कन्सल्टंन्ट नेमणुकीकरीता दि.२४/०६/२०१५ रोजी मे.एमआयएनएल या कंपनीचे प्रतिनिधी श्री. देशपांडे यांनी ३ कंपन्यांचे सीलबंद कोटेशन्स पाकीटे संस्थान आवक विभागात सादर करुन, इकडील कार्यालयास प्राप्त झालेले आहेत. सदर कंपन्यांचे कोटेशन्सची माहीती खालीलप्रमाणे-

१. मे.समर्थ सिक्युरीटी सिस्टीम, मुंबई.
२. मे.क्रीस्टल इंटिग्रेटेड सर्व्हिसेस, मुंबई.
३. मे.महा इन्फोटेक प्रा.लि. (एमआय एन एल), मुंबई.

सदर कन्सल्टंन्ट नेमणुकीकरीता प्राप्त झालेल्या तीन सीलबंद निविदा आजचे सभेसमोर मे.एमआयएनएल या कंपनीचे प्रतिनिधी श्री.देशपांडे यांचेसमक्ष उघडण्यात येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | कंपनीचे नाव | निविदेमधील मुळ दर रु. |
|---|---|---|
| ०१ | मे.समर्थ सिक्युरीटी सिस्टीम, मुंबई | १,२०,०००/- + टॅक्स |
| ०२ | मे.क्रीस्टल इंटिग्रेटेड सर्व्हिसेस, मुंबई | ८०,०००/- + टॅक्स |
| ०३ | मे.महा इन्फोटेक प्रा.लि. (एमआय एन एल), मुंबई | ४८,०००/- + टॅक्स |

निर्णय क्र.१८८ **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानसाठी नव्याने उभारणी करावयाच्या सीसीटीव्ही सिस्टीमसाठी कन्सल्टंन्टची नेमणूक करुन त्यांचेकडून सेवा घेणेकामी मे.महा इन्फोटेक प्रा.लि. (एमआय एन एल), मुंबई यांचे रु.४८,०००/- + टॅक्स मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना त्वरीत कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- सी.सी.टी.व्ही. कंट्रोल सेलप्रमुख)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०२ **दिनांक १९/०६/२०१५ रोजी सायंकाळी ७.०० वाजता गावरान तूप खरेदीकामी निर्णय घेण्यासाठी मा.व्यवस्थापन समितीची तातडीने सभा अहमदनगर येथील मा.जिल्हाधिकारी नगरनिवास कार्यालय, अहमदनगर येथे संपन्न झालेल्या सभेचे इतिवृत्त.**

प्रस्ताव- कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ मर्यादीत, कोल्हापूर यांनी निविदेमध्ये नमूद केलेला दर हा तुपाचे बाजारातील दर पाहता चुकीने नमूद झाला आहे, हे स्पष्ट दिसून येते. त्यांनी दिलेला खुलासा पाहता असे दिसून येते की, क्विंटलचे दर मागविले असता, नजरचुकीने १० कि.ग्रॅ.चा दर दिला गेला आहे. म्हणजेच संगणकामध्ये एक शुन्य नमूद करण्याचे राहिले आहे, हे स्पष्ट होते. कारण तुपाचा भाव रू. ३१.९० पैसे प्रति कि.ग्रॅ. कोठेही नाही. खुलासा देताना पहिला आकडा बदलून कोणताही वाढीव आकडा अथवा नंबर दोनच्या स्पर्धकापेक्षा थोडा कमी करुन दिलेला नाही. त्यामुळे तांत्रिक चूक मान्य करुन खुलासा स्वीकारण्यात यावा, असे ठरले. जर तांत्रिक बाब धरुन बसले व क्रमांक ०२ ला कंत्राट दिल्यास संस्थानचे उघडपणे लाखो रुपयांचे नुकसान होईल. दोन्ही दरांमध्ये खूपच फरक आहे.

त्यामुळे खुलाशाप्रमाणे कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ मर्यादीत, कोल्हापूर यांचा दर न्युनतम असल्यामुळे त्यांची निविदा मान्य करणे योग्य ठरेल. मा.उच्च न्यायालयाचे दिनांक ११.०६.२०१५ च्या आदेशामुळे पूर्वीचे वितरक सोनाई ब्रॅण्डचे गावरान तुप घेण्याचा प्रश्न राहिलेला नाही.

सदरची तांत्रिक चूक वर नमूद केल्याप्रमाणे विचारात घेऊन निविदा स्वीकारण्यात येत असल्याने तसेच सध्याची तुपाची तातडीची गरज लक्षात घेऊन सुरुवातीला फक्त तीन महिन्यांपुरते गावरान तूप खरेदी करावे. त्यानंतर सदर कंपनीला मुदतवाढ देणे अथवा अन्य पर्यायाबाबत नंतर निर्णय घेता येईल.

निर्णय क्र.१८९ **उपरोक्त इतिवृत्ताचे अवलोकन करण्यात येऊन, त्याची नोंद घेणेत आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०३ **सिंहस्थ कुंभमेळा कालावधीत शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना १०० अकुशल कंत्राटी कामगार देणेबाबत.**

प्रस्ताव- नाशिक येथे दि. २७/०८/२०१५ ते दि. २६/०९/२०१५ या कालावधीत कुंभमेळा असल्याने पर्वणीच्या काळात शिर्डीत साईभक्तांची जास्त गर्दी होण्याची शक्यता आहे. संभाव्य गर्दीमुळे कचरा जास्त प्रमाणात निघेल. भक्तांचे आरोग्याचे दृष्टीकोनातून परिसरात स्वच्छता ठेवून निघणा-या घनकच-याची विल्हेवाट लावणे गरजेचे आहे.

शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांचेकडील कर्मचारी संख्या कमी असल्याने सिंहस्थ कुंभमेळा २०१५ चे कालावधीत श्रींचे दर्शनार्थ होणा-या गर्दीत शिर्डी शहरातील साफसफाईचे कामांसाठी व घनकच-याची विल्हेवाट लावणेकामी शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना दि.२७/०८/२०१५ ते दि.२६/०९/२०१५ या कालावधीसाठी आवश्यकतेनुसार प्रतिदिनी १०० कंत्राटी अकुशल कर्मचारी आऊटसोर्स पध्दतीने पुरविल्यास एक महिन्यासाठी पुढील प्रमाणे अंदाजे खर्च येईल.

**१०० कंत्राटी अकुशल कर्मचा-यांचे वेतनावर होणारा अंदाजे खर्च :-**

| अ.नं. | तपशिल | होणारा खर्च |
|---|---|---|
| १ | प्रति दिन प्रति कर्मचारी दर रु. | २६५-८१ |
| २ | प्रा. फंड १३.३६% | ३५-५१ |
| ३ | सर्व्हिस चार्ज ०.०००१% | ००-०० |
| | एकुण | **३०१-३२** |
| ४ | सर्व्हिस टॅक्स १२.३६% | ३७-२४ |
| ५ | प्रति दिन प्रति कर्मचारी दर रु. | ३३८-५६ |
| ६ | प्रति दिन १०० कर्मचारी रु. | ३३८५६-०० |
| ७ | प्रति दिन १०० कर्मचारी ३१ दिवसाकरिता रु. | १०४९५३६-०० |
| | एकुण | **१०,४९,५३६-००** |

उपरोक्त प्रमाणे शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांना सिंहस्थ कुंभमेळा गर्दीचे कालावधी करिता १०० कंत्राटी अकुशल कर्मचारी पुरवावयाचे असल्यास त्यांचे वेतनापोटी अंदाजे रुपये १०,४९,५३६/- (अक्षरी रुपये दहा लाख

एकोणपन्नास हजार पाचशे छत्तीस मात्र) इतका खर्च येईल. उपरोक्त कर्मचारी कामगार विभागामार्फत आवश्यकतेनुसार आऊटसोर्स पध्दतीने पुरविता येतील.

सदरचा खर्च मा.उच्च्य न्यायालय औरंगाबाद येथे दाखल केलेल्या सिव्हील ॲप्लीकेशन नं. ३५/२०१५ मधील पीआयएल नं. १८/२०११ वर मा. उच्च्य न्यायालय यांनी दि.०६/०५/२०१५ रोजी दिलेल्या आदेशान्वये कुंभमेळा- २०१५ साठी रु. ५७,५४,८००००/- मात्रचे खर्चास मान्यता दिलेल्या रकमेतून करता येईल.

तरी या प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती आहे.

निर्णय क्र.१९० **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे सिंहस्थ कुंभमेळा कालावधीत शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना संस्थान लेबर कॉन्ट्रॅक्टरमार्फत १०० अकुशल कंत्राटी कामगार पुरविणेस मान्यता देण्यात आली. तसेच सिंहस्थ कुंभमेळयाचा कालावधी संपल्यानंतर सदरहू १०० अकुशल कंत्राटी कामगार बंद करण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, आरोग्य विभाग/ कामगार अधिकारी)

---

आयत्या वेळेचा विषय नं.०४ **ऑगस्ट २०१५ सत्रापासून औदयोगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये राज्य शासनाव्दारे ऑनलाईन प्रवेश प्रक्रीया तसेच सुधारीत प्रशिक्षण शुल्क लागू करणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम** - सन २००४ महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ (भाग ४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तापित केलेले अध्यादेश व केलेले विनीयम १७ (२ ड) मध्ये सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास सहाय्य करील, तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी , शैक्षणिक संस्था स्थापन करील, अशी तरतूद आहे.

**प्रास्ताविक** – १ ऑगस्ट १९८४ पासून संस्थानव्दारे औदयोगिक प्रशिक्षण संस्था **'कायमस्वरुपी विनाअनुदान'** तत्वावर सुरु करण्यात आली. ग्रामिण भागातील तरुणांना रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध होऊन त्यांचे जिवनमान उंचावले जावे तसेच औद्योगिक क्षेत्राला कुशल कारागिराची उपलब्धता होऊन देश विकासाला हातभार लागावा या दुहेरी उद्देशाने ही संस्था सुरु करण्यात आली.

देशातील सर्व औदयोगिक प्रशिक्षण संस्था या केंद्र शासनाच्या श्रम मंत्रालयाअंतर्गत , डायरेक्टोरेट जनरल ऑफ एम्प्लॉयमेंट ॲण्ड ट्रेनिंग (DGE&T) या विभागाचे संलग्नतेने व त्या –त्या राज्याच्या राज्य व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या थेट नियंत्रणाखाली चालविल्या जातात. त्यानुसार आपली औदयोगिक प्रशिक्षण संस्थाही कार्यरत आहे.

या संस्थेत सुरुवातीला वीजतंत्री, मोटर मेकॅनिक ,ट्रॅक्टर मेकॅनिक व फार्म मेकॅनिक या चार व्यवसायांच्या चार तुकडया सुरु करण्यात आल्या. यापैकी फार्म मेकॅनिक मागणी अभावी सन १९८८ मध्ये बंद केला. पुढे १९९१ ते १९९६ या कालावधीत वेल्डर, फिटर, टर्नर, मशिनिष्ट ग्राईण्डर, मेकॅनिक रेफ्रीजरेशन ॲण्ड एअर कंडीशनिंग, टुल ॲण्ड डायमेकर व मेकॅनिक रेडीओ ॲण्ड टीव्ही या व्यवसायांच्या प्रत्येकी दोन तुकडया सुरु करण्यात आल्या. सन २००० मध्ये मेकॅनिक रेडीओ ॲण्ड टीव्ही या व्यवसायाला आय.टी.ॲण्ड इलेक्ट्रॉनिक सिस्टीम मेंटनन्स (IT&ESM ) या अभ्यासक्रमात बदलण्यात आले. सन २००६ ते २००९ मध्ये कॉम्प्युटर ऑपरेटर ॲण्ड प्रोग्रामिंग असिस्टंट (Copa) या व्यवसायाच्या दोन तुकडया तसेच क्राफटसमन फुड प्रॉडक्शन (व्हेजिटेरीयन) CFP (VEG) हे व्यवसाय सुरु करण्यात आले. यापैकी क्राफटसमन फुड प्रॉडक्शन (व्हेजिटेरीयन) CFP (VEG) हा व्यवसाय ऑगस्ट २०१५ पासून शासनानी या कार्यक्रमातून वगळला आहे.

यानुसार सध्या आपल्या औ.प्र.संस्थेमध्ये शासनाची मान्यता असलेल्या १२ व्यवसायांच्या २३ तुकडया पैकी ११ व्यवसयांच्या २२ तुकडया कार्यरत आहेत. ११ व्यवसायांपैकी ट्रॅक्टर मेकॅनिक, वेल्डर व कोपा हे व्यवसाय एक वर्ष कालावधीचे असून उर्वरीत ८ व्यवसायांचा कालावधी प्रत्येकी दोन – दोन वर्षांचा आहे. संस्थेची एकूण प्रवेश क्षमता 472 प्रशिक्षणार्थी असून यापैकी प्रथम वर्षात प्रवेश घेणा'यांची संख्या ३०४ एवढी आहे.

**प्रशिक्षणार्थी प्रवेश प्रक्रीयेबाबत-** संस्थेच्या स्थापनेपासून ते सन १९९५ च्या प्रवेशापर्यंत ११ वर्षे या संस्थेमध्ये तालुका,जिल्हा,राज्य किंवा देश याबाबतचे क्षेत्र बंधन न ठेवता सर्वांना गुणानुक्रमे खुला प्रवेश देण्याची पध्दती अवलंबविण्यात आली. राज्य शासनाच्या नियमावलीनुसार १९९३ पासून ५०% जागांवर मागारवर्गीय उमेदवारांना आरक्षण देण्यात आले. तर १९९६ पासून तत्कालिन व्यवस्थापन समितीने सदरचे मागासवर्गीयांसाठी आरक्षण कायम ठेवुन मागसवर्गीय व खुल्या गटांमधील जागांपैकी प्रत्येकी 80 टक्के जागा शिर्डी पासुन 15 कि.मी. परीघातील 72 गावामधील विद्यार्थ्यांना आरक्षित करुन प्रवेश प्रकिया करण्याचा निर्णय केला. तसेच उर्वरीत 20% जागा खुल्या क्षेत्रासाठी खुल्या ठेवण्यात आल्या ही पध्दती 2014 पर्यंत अवलंबण्यात आली. यात २०१० पासून सर्व व्यवसायांमध्ये असलेल्या अधिकच्या (सुपरन्युमररी) 30% जागा मा. व्यवस्थापन समितीच्या निर्देशानुसार भराव्या त्यास गुणानुक्रम व क्षेत्र आरक्षण याचे बंधन असणार नाही असे ठरले. मात्र त्रिसदस्य पध्दतीने व्यवस्थापन समितीचे कालावधीत सदरच्या अधिकच्या 30% जागाही गुणानुक्रमे व गुणानुक्रमे भरावयाच्या जागांसाठी ठरलेले सर्व प्रकारचे विहीत आरक्षणांचा अवलंबकरुन भरण्याची कार्यवाही केलेली आहे.

संस्था स्थापनेपासून ते ऑगस्ट २०१४ चे सत्रापर्यंत संस्था स्तरावर विहीत नमुन्यात अर्ज घेऊन गुणानुक्रमे प्रवेश प्रकिया होत असे.

ऑगस्ट २०१५ सत्रापासून राज्यातील सर्व शासकीय व खाजगी औ.प्र.संस्थेमध्ये प्रशिक्षणार्थी प्रवेश हे राज्य शासनाचे व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे मार्फत ऑनलाईन पध्दतीने करण्याचा उच्च व

तंत्रशिक्षण विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण -3315 / प्रक्र १७ /व्यशि-३, दि.१४/०५/२०१५ क्र.०१ नुसार ठरले आहे. त्यानुसार आपल्या संस्थेतील प्रवेशही ऑनलाईन पध्दतीने होतील. त्यासाठी शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट 1 नुसार नियमावली अवलंबविली जाणार आहे,ती सोबत ठेवली आहे. यानुसार आपल्या औदयोगिक प्रशिक्षण संस्थेतील एकूण ३०४ जागापैकी ८०% जागा (२४६ जागा) मध्यवर्ती प्रवेश पध्दतीने (CAP) फे-यामधून भरल्या जातील तसेच 20% (५८ जागा) या संस्था स्तरावर भरावयाच्या आहेत. मात्र सदर संस्थास्तरावरील जागा मध्यवर्ती पध्दतीने (Cap) भरावयाचे झाल्यास तसी विनंती विहीत मुदतीमध्ये संस्थेव्दारे संचालनालयास करता येईल. या शिवाय मध्यवर्ती प्रवेशाची (Cap) पाचवी फेरी (समोपदेशन फेरी) अखेर (CAP) साठीच्या ८०% जागांपैकी काही जागा शिल्लक राहील्यास त्या जागाही संस्थास्तरावर भराव्या लागतील. व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे मार्फत ऑनलाईन पध्दतीने प्रवेश प्रक्रियेसाठी वृत्तपत्रात जाहीराती देण्यात आल्या आहेत. राजयातील सर्व शासकीय व खाजगी औ.प्र.संस्था प्रवेशाची अधिकृत नोंदणी केंद्रे (ARC) म्हणून निश्चित करण्यात आले असून त्यानुसार प्रवेश अर्ज करण्याची प्रक्रिया चालू आहे.

ऑनलाईन प्रक्रियेमध्ये भरावयाच्या जागांमध्ये खुला / मागासवर्गीय, माजी सैनिक, संरक्षण सेवेतील कार्यरत व्यक्ती, अपंग, अल्प संख्यात तसेच तांत्रीक विषयासह माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाणपत्र धारक या प्रकारासह 70 टक्के जागा पहिल्याकही प्रवेश फे-या पर्यंत त्या-त्या तालुक्यामधील उमेदवारामधुन भरल्या जाणार आहे. यामुळे स्थानिक उमेदवरांना प्रवेशाची संधी उपलब्ध असणार आहे.

संस्थास्तरावरील आपल्या संस्थेच्या ५८ जागा या आॅन लाईन प्रवेशासाठीच्या विहीत मुदतीमध्ये (चालुवर्षी दि. ०५/०६/२०१५ ते २५/०६/२०१५) ज्या उमेदवरांनी अर्ज सादर केलेला आहे, त्यामधुनच भराव्या लागणार आहेत. त्यामुळे संस्थास्तरावर प्रवेशाची जाहीरात देवुन वेगळा अर्ज मागावून प्रवेश देणे शक्य होणार नाही. सदर संसथास्तरावरील जागावर अर्ज करण्यासाठी संचालनालयाच्या संकेत स्थळावर दि. २९/०६/२०१५ पासून Candidate Login) उपलब्ध् करुन देण्यात येणार आहे. संस्थास्तरावरील जागा गुणानुक्रमे भरावयाच्या झाल्यास त्यासाठी आपल्या संस्थेत संस्थस्तरवरील जागेसाठी अर्ज करणा-या उमेदवाराची संकलित यादी उपलब्ध होणेची तरतुद सध्याच्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेत दिसून येत नाही किंवा तशी यादी उपलब्ध् करून दिली जाईल हे संचालनालयाकडून स्पष्ट करण्यात आलेले नाही.

संस्थास्तरावर भरण्यासाठी उपलब्ध जागा भरण्यासाठी शासनाने क्षेत्र किंवा अन्य कसल्याही आरक्षणाचे बंधन टाकलेले नाही यामुळे सदर जागा गुणानुक्रमे आरक्षणाशिवाय सरळ भरतीने भरता येतील. मात्र् सदर ५८ जागांवरील प्रवेश हे विशिष्ट प्रमाणकासहीत प्रक्रियेने न झाल्यास वाद व गैरसमज उदभवू शकतात या जागासाठी स्वतंत्र प्रवेश अर्ज मागावून प्रवेश प्रक्रिया करणे सध्य स्थितीत व्यवहार्य वाटत नाही. त्यामुळे संस्थास्तरावरील जागा मध्यर्ती प्रवेश प्रणालीमधून (Cap व्दारा) भरणे योग्य ठरेल. यामुळे संस्थास्तरावरील २० टक्के जागांमध्ये सुध्दा स्थानिक तालुका व अन्य आरक्षणांचा लाभ त्यांच्या त्यांच्या पात्रतेनुसार उमेदवारांना उपलब्ध होऊ शकेल. पाचव्या प्रवेश फेरीनंतर मध्यवर्ती प्रवेश पध्दतीने (Cap) फे-यामधून रिक्त राहीलेल्या जागा संस्थान स्तरावर भराव्या लागणार असल्याने परिस्थतीनुरुप त्या जागा कशा भरता येतील या बाबत योग्य ती पध्दती अवलंबण्याचे अधिकार कार्यकारी अधिकारी यांना असावेत.

**प्रशिक्षण् व अन्य शुल्काबाबत.**

संस्थेच्या सुरुवाती पासून (१९८४) ते ऑगष्ट २००६ सत्रापर्यंत प्रशिक्षणार्थ्यांना प्रशिक्षण शुल्क म्हणून प्रतिवर्ष रु. १५००/- शुल्क आकारले जात असे. तद्नंतर ऑगस्ट २००७ चे सत्रापासुन राज्यातील सर्व विना अनुदानित (खाजगी) औ.प्र. संस्थेतील प्रशिक्षणार्थ्यासाठी प्रशिक्षण शुल्क खालील प्रमाणे वाढ करण्यात आलेली आहे ती ऑगस्ट २०१४ पर्यंत अंमलात होती.

**तक्ता क्र. 1**

| अ.नं. | व्यवसाय प्रकार | प्रतिवर्ष-प्रति प्रशिक्षणार्थी | शेरा |
|---|---|---|---|
| १ | सर्व यंत्र गटातील अभियांत्रिकी व्यवसाय | रु. १२०००/- | 'अ' दर्जा प्राप्त संस्थेसाठी |
| २ | सर्व यंत्र गटा व्यतिरिक्त अभियांत्रिकी व्यवसाय | रु. ८४०० /- | |
| ३ | बिगर अभियांत्रिकी व्यवसाय | रु. ६०००/- | |

ऑगस्ट २०१४ सत्रामध्ये प्रवेश घतेलेले दोन वर्षे कालावधीच्या व्यवसायातील ऑगस्ट २०१५ मध्ये व्दितीय वर्षामध्ये जाणा-या प्रशिक्षणार्थ्यांना ऑगस्ट २०१४ सत्रामध्ये असलेल्या वरील दराने प्रशिक्षण शुल्क आकारावे लागेल. राज्यामध्ये सुमारे ६०० शासकीय तर सुमारे ३०० खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था कार्यरत आहेत. सर्व खाजगी औ.प्र.संस्था विनाअनुदान तत्वावर चालविल्या जात असून प्रशिक्षणार्थ्यांकडून प्रवेशाच्यावेळी प्राप्त होणा-या प्रशिक्षण शुल्क रक्कमेतून संस्था चालविण्याचा प्रयत्न बहुतांश संस्था चालक करीत आहेत. यासाठी शासनाकडून अनुदान नाही व प्रशिक्षणार्थ्यांकडून प्रशिक्षण शुल्कापोटी जमा घ्यावयाच्या दर अल्प असल्याने आवश्यक तो प्रशैक्षणिक दर्जा राखने कठीन बनले होते. यामध्ये प्रशिक्षणाचा दर्जा उंचावण्याच्या दृष्टीने प्रशिक्षण शुल्कात वाढ करण्याचा निर्णय शासनानी केला. त्याच्या तपशिल खालील तक्ता क्र.०२ मध्ये नमूद केला आहे. ज्या संस्थेकडे संस्था चालविण्यासाठी स्वतःचा पुरेसा निधी नाही किंवा पुरेसा निधी उपलब्ध होण्याचे मार्ग नाहीत. त्याच्यासाठी प्रशिक्षण शुल्क व प्रशिक्षण शुल्काची वाढ अत्यावश्यक ठरली होती. तथापि खाजगी औ.प्र.संस्था शासनानी निर्धारीत केलेल्या शुल्का पेक्षा कमी शुल्क आकारु शकतात.

उच्च व तंत्र शिक्षण विभाग , शासननिर्णय क्र.संकीर्ण /३३१५ / प्र.क्र.१७/व्यशी -३ दि.१४ मे २०१५ नुसार राज्यातील सर्व शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे ऑगस्ट २०१५ पासून सुरु होणा-या सत्राचे प्रवेशापासून प्रशिक्षण व इतर शुल्क खालील प्रमाणे निश्चित केलेले आहे.

**तक्ता क्र. ०२**

| अ. नं | तपशील | | शासकीय औ.प्र.संस्था | | | | | खाजगी औ.प्र.संस्था | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | सामान्य श्रेणी | राखीव श्रेण | IMC जागा | OMS | NRI | MS महाराष्ट्र राज्यातील | OMS महाराष्ट्र बाहेरील | NRI अनिवासी भारतीय |
| वार्षिक प्रशिक्षण शुल्क | | | | | | | | | | |
| १ | प्रशि शुल्क | मशीन गट – अभियांत्रिकी व्यवसाय | १२००/- | -- | ३००० ०/- | ४५०००/- | ६००००/- | ३००००/- | ६००००/- | १५००००- |
| | | बिगर मशीन गट – अभियांत्रिकी व्यवसाय | १०००/- | -- | २५०० ०/- | ३७५००/- | ५००००/- | २५०००/- | ५००००/- | १२५०००/- |
| | | बिगर अभियांत्रिकी व्यवसाय | ८००/- | -- | २००० ०/- | २००००/- | ४००००/- | २००००/- | ४००००/- | १०००००/- |
| २ | संस्था विकास शुल्क | | १०००/- | | | | | वरील प्रशिक्षण शुल्कात समाविष्ट | | |
| ३ | ओळखपत्र शुल्क | | ५०/- | | | | | | | |
| ४ | ग्रंथालय शुल्क | | १००/- | | | | | | | |
| ५ | इंटरनेट सुविधा शुल्क | | १००/- | | | | | | | |
| ६ | सांस्कृतिक कार्यक्रम शुल्क | | १००/- | | | | | | | |
| | अ. २ ते ६ एकूण | | १३५०/- | | | | | | | |
| ७ | वस्तीगृह शुल्क | | १२००/- | १२००/- | १२००/- | ६०००/- | १२००००/- | संबधित ओ.प्र.संस्थांनी निश्चित करावे. | | |
| प्रवेशाच्या वेळी जमा करावयाची अनामत रक्कम | | | | | | | | | | |
| ८ | प्रशिक्षण अनामत रक्कम | | ५००/- | | | | | | | |
| ९ | ग्रंथालय अनामत रक्कम | | १००/- | | | | | | | |
| १० | वस्तीगृह शुल्क | | १०००/- | | | | | | | |
| **खाजगी औ.प्र.संस्था वरील निर्धारीत केलेल्या शुल्का पेक्षा कमी शुल्क आकारु शकतात.** | | | | | | | | | | |

ऑगस्ट २०१५ या सत्रापासून लागू करावयाच्या प्रशिक्षणशुल्कासंबधी नियमावली वरील संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयाच्या परिशिष्ट ०२ मध्ये दिले असून ती सोबत ठेवली आहे. प्रशिक्षण शुल्क हे अनुज्ञेय खर्च, विना अनुज्ञेय खर्च व महसूल निर्मीती याबरोबर निगडीत केली असून संचालनालयाकडून स्थापित लेखा परीक्षण मंडळाकडून दरवर्षी ३० जून पुर्वी लेखा परिक्षण करुन घेऊन प्रशिक्षण शुल्क मंजूर करुन घ्यावे लागेल असे स्पष्ट करण्यात आले आहे.

औ.प्र.संस्थेमध्ये शिकविल्या जाणा-या केंद्रशासनाच्या व्यवसायीक प्रमाणपत्र अभ्यासक्रमातून इतर कोणत्याही शिक्षणापेक्षा सुलभरितीने संबंधित तरुण रोजगार किंवा स्वयंरोजगारासाठी स्वतःच्या पायावर उभे राहू शकतो. वरील वाढील शुल्कामुळे संस्थानच्या सदर उपक्रमाचा लाभ समाजीतील गरजू , गरिब तरुणांना घेण्याची संधी मिळणार नाही. सदर ओ.प्र.संस्था अभ्यासक्रम उपक्रमाचे स्वरुप पहाता एक किंवा दोन वर्षांच्या प्रशिक्षणा मधून प्रत्येक तरुण समाजातील एक गरीब कुटुंबाचा आधार बनू शकतो. लगेच चांगले परिणाम देणारा उपक्रमापासून समाजातील गरजूंना संस्थानकडून मोठी अपेक्षा आहे.

आपल्या संस्थेतील उपलब्ध व्यवसायानुसार व प्रशिक्षणार्थी क्षमतेनुसार सध्या ऑगस्ट २०१४ पर्यंतचे व शासनाने ऑगस्ट २०१५ पासून लागू करण्यासाठी निश्चित केलेल्या प्रशिक्षण शुल्क दरानुसार जमा होणारी एकूण वार्षिक रक्कम-

**तक्ता क्र. ३**

| अ. नं. | ट्रेड | प्रशिक्षणार्थी संख्या | | वार्षिक प्रशिक्षण शुल्क दर २०१४पर्यंत (प्रत्येकी ) | एकूण जमा होणारी वार्षिक रक्कम २०१४ पर्यंत | | वार्षिक प्रशिक्षण शुल्क दर २०१५ पासून (फक्त महाराष्ट्राचे रहीवसी ) | एकूण जमा होणारी वार्षिक रक्कम २०१५ पासून | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रथम वर्ष तुकडया २०१४ | व्दितीय वर्ष तुकडया २०१५ | | प्रथम वर्ष तुकडया २०१४ | व्दितीय वर्ष तुकडया २०१५ | | प्रथम वर्ष तुकडया २०१५ | व्दितीय वर्ष तुकडया २०१६ |
| १ | टुल ॲण्ड डायमेकर (जिग्ज ॲण्ड फिक्चर ) | २१ | २१ | १२०००/- | २५२००० | २५२००० | ३००००/- | ६३०००० | ६३०००० |
| २ | टर्नर (कातारी) | १६ | १६ | | १९२००० | १९२००० | | ४८०००० | ४८०००० |
| ३ | मशिनिष्ट ग्राईण्डर (यांत्रिकी घर्षक) | १६ | १६ | | १९२००० | १९२००० | | ४८०००० | ४८०००० |
| ४ | फिटर (जोडारी) | २१ | २१ | | १७६४०० | १७६४०० | | ६३०००० | ६३०००० |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | वेल्डर | ४२ | -- | | ३५२८०० | -- | | १२६०००० | -- |
| ६ | इलेक्ट्रशियन (वीजतंत्री) | २१ | २१ | | १७६४०० | १७६४०० | | ५२५००० | ५२५००० |
| ७ | मेकॅनिक रेफ्रीजरेशन ॲण्ड एसी | २६ | २६ | ८४००/- | २१८४०० | २१८४०० | | ६५०००० | ६५०००० |
| ८ | मेकॅनिक मोटार व्हेईकल | २१ | २१ | | १७६४०० | १७६४०० | २५०००/- | ५२५००० | ५२५००० |
| ९ | मेकॅनिक ट्रॅक्टर (यांत्रिकी कृर्षित्र) | ४२ | -- | | ३५२८०० | -- | | १०५०००० | --- |
| १० | इन्फॉर्मेशन ॲण्ड कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी सिस्टीम मेटेनन्स | २६ | २६ | | २१८४०० | २१८४०० | | ६५०००० | ६५०००० |
| ११ | कॉम्प्युटर ऑपरेटर ॲण्ड प्रोग्रामिग असिस्टंट (कोपा) | ५२ | -- | | ४३६८०० | -- | २००००/- | १०४०००० | -- |
| | **एकूण** | ३०४ | १६८ | | २७४४४०० | १६०२००० | | ७९२०००० | ४५७०००० |
| | **निव्वळ एकूण** | ४७२ | | | ४३४६४०० | | | १२४९०००० | |

प्रवेशाच्या वेळी शासनाने तक्ता क्र.२ मध्ये ठरवून दिल्यानुसार अनामत रक्कम स्विकारता येतील.

औद्योगिक प्रशिक्षण संस्थेवर कर्मचारी वेतन व प्रशिक्षणासाठी कच्चा माल व इतर यासाठी संस्थानव्दारा होणारा खर्च. (१ एप्रिल २०१४ ते ३१ मार्च २०१५ या कालावधीत झालेला )

तक्ता क्र.४

| अ.नं. | तपशिल | रक्कम रुपये | एकूण रुपये |
|---|---|---|---|
| १ | कर्मचारी वेतन | २०६९६४१५ | २१६५५५२० |
| २ | प्रात्याक्षिकासाठी कच्चामाल | ६९९५४४ | |
| ३ | स्टेशनरी खर्च | ९१२४९ | |
| ४ | इतर खर्च | १४५६१४ | |
| ५ | टेलीफोन / इंटरनेट | २२६९८ | |

संस्थानव्दारे चालविला जाणारा हा उपक्रम धर्मदाय तत्वावर सुरु करण्यात आलेला असून यातून जमा होणारी रक्कम व या उपक्रमावर होणारा खर्च याबाबत विचार करुन उपक्रम सुरु करण्याच्या उद्देशापर्यंत पोहचता येणार नाही. तसेच जमा व खर्च याच्या ताळमेळाची तुलना या उपक्रमातून तयार होणा'या व घडविल्या जाणा-या समाज घटकाबरोबर करता येईल. त्यामुळे याउपक्रमाचा लाभ अत्यंत तळागाळातल्या गरजूवंताना घेता यावा. यासाठी येथे आकारली जाणारी प्रशिक्षण शुल्क कमीतकमी कशी राहील यासाठी खालील प्रमाणे पर्यायांवर प्राधान्य क्रमाने विचार व्हावा.

**पर्याय क्रमांक १-**

शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये आकारल्या जाणा-या शुल्काएवढी प्रशिक्षण व इतर शुल्क प्रतिवर्ष आपल्या संस्थेमध्ये आकारली जावी. त्याचा लाभ ऑगस्ट २०१४ मध्ये प्रवेश घेऊन ऑगस्ट २०१५ मध्ये व्दितीय वर्षात जाणा-या प्रशिक्षणार्थ्यासह नव्याने प्रवेश घेणा-या प्रशिक्षणार्थ्यांना मिळावा. याप्रमाणे जमा होणारी वार्षिक रक्कम रु. ११३६८००/- असेल.

**पर्याय क्रमांक-२**

ऑगस्ट २०१४ च्या सत्रापर्यंत घेण्यात आलेल्या दराने प्रशिक्षण शुल्क प्रति वर्ष यापुढेही आकारले जावे.

याप्रमाणे जमा होणारी वार्षिक रक्कम रु.४३४६४००/- असेल.

**पर्याय क्रमांक ०३.**

शासनानी ऑगस्ट २०१५ सत्रापासून खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेसाठी निश्चित केलेल्या प्रशिक्षण शुल्कामध्ये ५० टक्के सरसकट सुट देवून येणा-या रक्कमेनुसार शुल्क प्रतिवर्ष आकारण्यात यावे. याप्रमाणे जमा होणारी वार्षिक रक्कम रुपये ६२४५०००/- असेल.

**पर्याय क्रमांक ४-**

शासनानी ऑगस्ट २०१५ सत्रापासून खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेसाठी निश्चित केलेल्या प्रशिक्षण शुल्कदराने प्रशिक्षण शुल्क प्रतिवर्ष आकारण्यात यावे. याप्रमाणे जमा होणारी वार्षिक रक्कम रुपये १२४९००००/- असेल. (ऑगस्ट २०१५ मधील प्रवेश तसेच ऑगस्ट २०१६ मध्ये व्दितीय वर्षात जाणा-या प्रशिक्षणार्थ्यांचे एकूण शुल्क )

वरील चारही पर्यायामध्ये राज्याबाहेरील उमेदवार व अनिवासी भारतीय उमेदवार यांच्यासाठी शासनानी खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेसाठी ठरविलेले प्रशिक्षण शुल्क आहेत तेवढे ठेवावेत की आपले संस्थान जगातील सर्वांचे श्रध्दास्थान असल्याने त्यांनाही यामध्ये सुट द्यावी किंवा कसे याबाबत निर्णय व्हावा.

**मागणी –**

प्रशिक्षणार्थी प्रवेश प्रक्रीयेबाबत.

संदर्भ क्र.१ नुसार शासन निर्णय झालेला आहे त्यानुसार आपल्या संस्थेतील ऑगस्ट २०१५ सत्राचे प्रवेश ऑनलाईन पध्दतीने होतील. त्यासाठी शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ठ १ नुसार नियमावली अवलंबविली जाणार आहे. यानुसार आपल्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील एकूण ३०४ जागांपैकी ८० टक्के जागा (२४६) जागा मध्यवर्ती प्रवेश पध्दतीने (CAP) फे-यांमधून भरल्या जातील. तसेच २० टक्के जागा (५८ जागा) या संस्थास्तरावर भरावयाच्या

आहेत. मात्र सदर संस्था स्तरावरील जागा मध्यवर्ती प्रवेश पध्दतीने (CAP) भरावयाचे झाल्यास तशी विनंती विहित मुदतीमध्ये संस्थेव्दारे संचालनालयास करता येईल.

संस्था स्तरावर भरण्यासाठी उपलब्ध जागा भरण्यासाठी शासनानी श्रेत्र किंवा अन्य कसल्याही आरक्षणाचे बंधन टाकलेले नाही. त्यामुळे सदर जागा गुणानुक्रमे आरक्षणाशिवाय सरळ पध्दतीने भरता येतील. मात्र सदर जागा ५८ जागांवरील प्रवेश हे विशिष्ट प्रमाणकासहीत प्रक्रीयेने न झाल्यास वाद व गैरसमज उदभवू शकतात. याजागांसाठी स्वतंत्र प्रवेश अर्ज मागवून प्रवेश प्रक्रीया करणे सद्यस्थितीत व्यवहार्य वाटत नाही. त्यामुळे संस्था स्तरावरील जागा मध्यवर्ती प्रवेश प्रणालीमधून (CAP व्दारा ) भरणे योग्य ठरेल. यामुळे संस्थास्तरावरील २० टक्के जागांमध्ये सुध्दा स्थानिक तालुका व अन्य आरक्षणांचा लाभ त्यांच्या त्यांच्या पात्रतेनुसार उमेदवारांना उपलब्ध होऊ शकेल. पाचव्या प्रवेश फेरी नंतर मध्यवर्ती प्रवेश पध्दतीने (CAP) फे-यांमधून रिक्त राहीलेल्या जागा संस्थान स्तरावर भराव्या लागणार असल्याने परिस्थितीनुरुप त्या जागा कशा भरता येतील याबाबत योग्यती पध्दती अवलंबविण्याचे अधिकार कार्यकारी अधिकारी यांना असावेत.

**प्रशिक्षण् व अन्य शुल्काबाबतः-**

ऑगस्ट २०१४ सत्रामध्ये प्रवेश घेतलेले दोन वर्षे कालावधीच्या व्यवसायातील ऑगस्ट २०१५ मध्ये व्दितीय वर्षामध्ये जाणा-या प्रशिक्षणार्थ्यांना ऑगस्ट २०१४ सत्रामध्ये असलेल्या दराने प्रशिक्षण शुल्क आकारावे लागेल.

उपरोक्त संदर्भ क्र. १ चे शासन निर्णयानुसार राज्यातील सर्व शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे ऑगस्ट २०१५ पासून सुरु होणा-या सत्राचे प्रवेशापासून प्रशिक्षण व इतर शुल्क तक्ता क्र.२ प्रमाणे निश्चित केलेले आहे.खाजगी औ.प्र.संस्था वरील निर्धारीत केलेल्या शुल्कापेक्षा कमी शुल्क आकारु शकतात असे व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाने संदर्भ क्र.२ मध्ये स्पष्टपणे नमूद केले आहे.

संस्थानव्दारे चालविला जाणारा हा उपक्रम धर्मदाय तत्वावर सुरु करण्यात आलेला असून यातून जमा होणारी रक्कम व या उपक्रमावर होणारा खर्च याबाबत विचार करुन उपक्रम सुरु करण्याच्या उद्देशापर्यंत पोहचता येणार नाही. तसेच जमा व खर्च याच्या ताळमेळाची तुलना या उपक्रमातून तयार होणा-या व घडविल्या जाणा-या समाज घटकाबरोबर करता येईल. त्यामुळे याउपक्रमाचा लाभ अत्यंत तळागाळातल्या गरजूवंताना घेता यावा. यासाठी येथे आकारली जाणारी प्रशिक्षण शुल्क कमीतकमी कशी राहील. यासाठी खालील प्रमाणे पर्यायांवर प्राधान्य प्रमाणे विचार व्हावा.

**पर्याय क्रमांक १-** शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये आकारल्या जाणा-या शुल्का एवढी प्रशिक्षण व इतर शुल्क प्रतिवर्षे आपल्या संस्थेमध्येही आकारली जावी. त्याचा लाभ ऑगस्ट २०१४ मध्ये प्रवेश घेऊन ऑगस्ट २०१५ मध्ये व्दितीय वर्षात जाणा-या प्रशिक्षणार्थ्यासह नव्याने प्रवेश घेणा-या प्रशिक्षणार्थ्यांना मिळावा. याप्रमाणे जमा होणारी वार्षिक रक्कम रु. ११३६८००/- असेल.

**पर्याय क्रमांक-०२-** ऑगस्ट २०१४ च्या सत्रापर्यंत घेण्यात आलेल्या दराने प्रशिक्षण शुल्क प्रतिवर्ष यापुढेही आकारले जावे. याप्रमाणे जमा होणारी वार्षिक रक्कम रु.४३४६४००/- असेल.

**पर्याय क्रमांक ०३-** शासनानी ऑगस्ट २०१५ सत्रापासून खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेसाठी निश्चित केलेल्या प्रशिक्षण शुल्कामध्ये ५० टक्के सरसकट सुट देवून येणा-या रक्कमेनुसार शुल्क प्रतिवर्ष आकारण्यात यावे. याप्रमाणे जमा होणारी वार्षिक रक्कम रुपये ६२४५०००/- असेल.

**पर्याय क्रमांक ०४-** शासनानी ऑगस्ट २०१५ सत्रापासून खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेसाठी निश्चित केलेल्या प्रशिक्षण शुल्क दराने प्रशिक्षण शुल्क प्रतिवर्ष आकारण्यात यावे. याप्रमाणे जमा होणारी वार्षिक रक्कम रुपये १२४९००००/- असेल. (ऑगस्ट २०१५ मधील प्रवेश तसेच ऑगस्ट २०१६ मध्ये व्दितीय वर्षात जाणा-या प्रशिक्षणार्थ्यांचे एकूण शुल्क )

वरील सर्व पर्यायामध्ये राज्याबाहेरील उमेदवार व अनिवासी भारतीय उमेदवार यांच्यासाठी शासनानी खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेसाठी ठरविलेले प्रशिक्षण शुल्क आहेत तेवढे ठेवावेत की आपले संस्थान जगातील सर्वांचे श्रध्दास्थान असल्याने त्यांनाही यामध्ये सुट द्यावी किंवा कसे याबाबत निर्णय व्हावा

संस्थान अभिप्राय / ठराव यानुसार अनुमान – प्रशासकीय मान्यंतेअंती कार्यवाही करता येईल.

**विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत** – प्रशिक्षणार्थी प्रवेश प्रक्रिये बाबत ऑगस्ट २०१५ व त्यापुढे होणा-या प्रवेशासाठी संस्थास्तरावरील जागा मध्यवर्ती प्रवेश प्रणालीमधून (CAP व्दारा ) भरणे योग्य ठरेल. यामुळे संस्थास्तरावरील २० टक्के जागांमध्ये सुध्दा स्थानिक तालुका व अन्य आरक्षणांचा लाभ त्यांच्या त्यांच्या पात्रतेनुसार उमेदवारांना उपलब्ध होऊ शकेल. पाचव्या प्रवेश फेरी नंतर मध्यवर्ती प्रवेश पध्दतीने (CAP) फे-यांमधून रिक्त राहीलेल्या जागा संस्थान स्तरावर भराव्या लागणार असल्याने परिस्थितीनुरुप त्या जागा कशा भरता येतील याबाबत योग्यती पध्दती अवलंबविण्याचे अधिकार कार्यकारी अधिकारी यांना असावेत.

**प्रशिक्षण् व अन्य शुल्काबाबतः-**

ऑगस्ट २०१४ सत्रामध्ये प्रवेश घेतलेले दोन वर्षे कालावधीच्या व्यवसायातील ऑगस्ट २०१५ मध्ये व्दितीय वर्षामध्ये जाणा-या प्रशिक्षणार्थ्यांना ऑगस्ट २०१४ सत्रामध्ये असलेल्या दराने प्रशिक्षण शुल्क आकारावे लागेल.

ऑगस्ट २०१५ सत्रा पासून शासनाकडून तक्ता क्र.०२ मध्ये खाजगी औ.प्र.संस्था निर्धारीत केलेल्या शुल्का पेक्षा कमी शुल्क आकारु शकतात असे व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाने संदर्भ क्र.०२ मध्ये स्पष्टपणे नमूद केले आहे प्रवेशाच्यावेळी शासनाने सदर तक्त्यामध्ये ठरवून दिल्यानुसार अनामत रक्कमा स्विकारता येतील.

या उपक्रमाचा लाभ अत्यंत तळागाळातल्या गरजूवंताना घेता यावा यासाठी येथे आकारली जाणारी प्रशिक्षण शुल्क कमीतकमी कशी राहील यासाठी उपरोक्त प्रस्तावना व मागणी मध्ये नमूद केलेल्या पर्यायावर प्राधान्यक्रमाने विचार व्हावा.

निर्णय क्र.१९१ **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा औदयोगिक प्रशिक्षण संस्थेमधील, संस्था स्तरावरील २०% जागा ऑगस्ट- २०१५ चे सत्रापासून मध्यवर्ती प्रवेशप्रक्रिये (CAP) द्वारे भरणेत याव्यात.**

**तसेच प्रशिक्षणार्थ्यांच्या प्रशिक्षण शुल्कामध्ये कोणत्याही प्रकारची वाढ करण्यात येऊ नये परंतु शासनाच्या सुधारीत दराने प्रशिक्षण अनामत रक्कम रु.५००/- व ग्रंथालय अनामत रक्कम रु १००/- मात्र आकारणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्राचार्य, आय.टी.आय.)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.०५ **डॉ. हरिष हुकुमचंद बजाज व डॉ. गौरव सरदारीलाल वर्मा, इंटरव्हेन्शनल कार्डीओलॉजिस्ट यांचे खाते चौकशीबाबत मा.श्री.जे.एल. देशपांडे सो., पुणे यांचे मागणीबाबत.**

प्रस्ताव- डॉ. हरिष हुकुमचंद बजाज व डॉ. गौरव सरदारीलाल वर्मा हे संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये हृदयरोगतज्ञ या पदावर कार्यरत आहेत. त्यांनी कॅथलॅबमध्ये पेशंटसाठी वापरण्यात येणारे स्टेंट, बलुन व इतर साहीत्याचा वापर करणेकरता बेकायदेशिररित्या विविध कंपन्यांकडून पैसे घेतलेले आहेत. तसेच रुग्णांच्या प्रोसिजर्स व औषधोपचारामध्ये अनियमितता, निष्काळजीपणा केलेला आहे. अशा व इतर अनेक तक्रारी असल्याने याबाबत खाते चौकशी करणेकामी खाते चौकशी अधिकारी नेमणेबाबत दि. ०५.०५.२०१५ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर विषय सादर करणेत आला होता. त्यावर निर्णय क्र. १४८ खालील प्रमाणे झाला आहे, "चौकशी अधिकारी यांना खातेनिहाय चौकशीच्या प्रत्येक तारखेस रक्कम रु. ५,०००/- मात्र प्रवास भत्ताव आहार भत्ता तसेच इतर खर्च म्हणून देण्यात यावेत, चौकशी अधिकारी यांना सदरहू चौकशी लवकरात लवकर पूर्ण करावी अशी विनंती करण्यात यावी व मानधनापोटी प्रत्येक तारखेस रक्कम रु. ७,५००/- मात्र देण्यात यावेत. परंतु पुढे असेही ठरले की, त्यांना मानधनापोटी जास्तीत जास्त 20 तारखांचे प्रत्येकी रु. ७,५००/- प्रमाणे एकंदर रु. १,५०,०००/- मात्र पेक्षा जास्त मानधन दिले जाणार नाही, २० तारखांपेक्षा जास्त तारखा चौकशीकामी पडल्यास त्यानंतरच्या प्रत्येक तारखेस त्यांना फक्त् प्रवास भत्ता व आहार भत्ता व इतर खर्चापोटी रु. ५,०००/- मात्र देण्यात येतील. त्रीसदस्यीय समितीने पुढे असेही ठरविले की, चौकशी अधिकारी म्हणून निवृत्त सरकारी अधिकारी किंवा निवृत्त जिल्हा न्यायाधिशांची नेमणूक करावी व त्यांचेकडे प्रथम उपरोक्तप्रमाणे मानधन व खर्च देण्यास संस्थान तयार आहे, असे सांगून ते चौकशी अधिकारी म्हणून काम करण्यास इच्छुक आहेत काय, अशी विचारणा करावी व इच्छुक असल्यास संबंधिताकडून तसे लेखी संमती पत्र घेण्यात यावे.

त्याचप्रमाणे सहायक तज्ञ म्हणून डॉ. अनिरुध्द वि. धर्माधिकारी, हृदयरोग तज्ञ, नाशिक यांची नेमणूक करण्यात यावी, असे दि. २६.०४.२०१५ चे सभेमध्ये निर्णय क्र. १४० अन्वये ठरवण्यात आलेले आहे. चौकशी अधिकारी यांनी तज्ञ सहायकाची जेव्हा आवश्यकता भासेल तेव्हाच त्यांना पाचारण करावे व त्यांनी भाग घेतलेल्या चौकशीच्या प्रत्येक तारखेस तज्ञ सहायकास वरील प्रमाणे प्रत्येक तारखेस रु. ५,०००/- प्रवास खर्च,आहार भत्ता व इतर खर्चापोटी आणि मानधन म्हणून रु. ७,५००/- मात्र देण्यात यावे. डॉ. धर्माधिकारी, नाशिक यांना तसे कळवावे व त्यांनी सहमती दर्शविल्यास त्यांचे लेखीसंमती पत्र घ्यावे. जर ते अनुच्छुक असतील तर दुस-या तज्ञ सहायकाची नेमणूक करण्यात यावी, असे एकमताने ठरले."

उपरोक्त निर्णयाप्रमाणे जा. नं. एसएसएस/वशी 7ए/१२०२/२०१५ दि. ३०.०५.२०१५ अन्वये मा. श्री. जे. एल. देशपांडे सो, सेवा निवृत्त जिल्हा प्रधान न्यायाधिश, पुणे यांना पत्र पाठवून कळविणेत आले होते.

त्यावर मा. श्री. जे. एल. देशपांडे सो, पुणे यांनी दि. ०५.०६.२०१५ रोजीचे पत्राने असे कळविले आहे की, मानधन प्रतिदिन ७,५००/- व प्रवासखर्च व इतर खर्च रु. ५,०००/- देणेचा निर्णय व्यवस्थान समितीने घेतलेला आहे. परंतु त्याची एकुण मर्यादा १,५०,०००/- ठरविली आहे. दैनंदिन मानधन व प्रवासखर्च व इतर सर्व खर्च तरतुद योग्य आहे. परंतु चौकशीचे सत्रांची संख्या वाढल्यास किंवा खाते चौकशीचा अपेक्षेपेक्षा अधिक विस्तार झालेस, १,५०,०००/- रु. ची कमाल मर्यादा २,००,०००/- ठरविणे योग्य राहील अशी अपेक्षा आहे. किंवा व्यवस्थापन समितीने भविष्यात त्याबद्दल योग्य तो विचार करावा. तसेच चौकशीकामीआवश्यक कक्ष, कर्मचारी वर्ग व संगणक/ स्टेशनरी संस्थानकडून पुरविणेत यावी. वरील दोनही विनंतीस अधिन राहून चौकशीकामी चौकशी अधिकारी म्हणून काम करण्यास संमती देत आहे. दरम्यान आरोपपत्र, इतर कागदपत्रे व संस्थानने लागू केलेले चौकशी नियम हयांची छायांकीत प्रत इकडे अवलोकनार्थ पाठविणेत यावी.

तरी मा.जे.एल. देशपांडे सो. यांनी संमती दिल्याप्रमाणे त्यांचे नेमणूकीस तसेच त्यांनी केलेल्या वाढीव रक्कम रु. ५०,०००/- मानधनाबाबत निर्णय होणेस विनंती. त्यांनी मागणी केलेल्या आवश्यक कक्ष, कर्मचारी वर्ग व संगणक/ स्टेशनरी याबाबी त्यांना पुरविता येतील.

निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१९२ **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, मा.श्री.जे.एल.देशपांडे, निवृत्त जिल्हा न्यायाधीश, पुणे यांनी केलेली विनंती मान्य करणेत येऊन, सदरहूकामी त्यांना तात्काळ नेमणूक आदेश देण्यात यावा.**

**तसेच त्यांनी मागणी केलेला आवश्यक कक्ष, कर्मचारी वर्ग व संगणक/ स्टेशनरी, याबाबी पुरविणेस व सदरहू चौकशीकामी येणा-या रु.५०,०००/- मात्र वाढीव खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०६ **मा.विश्वस्तांच्या सूचनांबाबत.**

निर्णय क्र.१९३ **मा.विश्वस्तांनी आजचे सभेत खालीलप्रमाणे सुचना केल्या, त्या मान्य करणेत आल्या.**

(१) नाशिक सिंहस्थ कुंभमेळ्यानिमित्त शिर्डीत श्री साईबाबांच्या दर्शनासाठी होणा-या संभाव्य गर्दीचे व्यवस्थापनासाठी करावयाच्या सोयी-सुविधांचे नियोजन व कार्यवाहीबाबत चर्चा करणेसाठी आजचे सभेत डॉ.सौरव त्रिपाठी, पोलीस अधिक्षक, अहमदनगर हे आपल्या सहका-यांसह उपस्थित होते. या बैठकीत संस्थानतर्फे करण्यात येत असलेल्या दर्शन रांग व्यवस्थेबाबत सादरीकरण करणेत आले. तसेच पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांनीही गर्दीचे व्यवस्थापनाकरीता साईमंदीर परिसरातील गर्दीच्या नियोजनाचे नकाशासह सादरीकरण केले. त्यावर सर्व उपस्थितांनी मंदीर व जुना प्रसादालय परिसराची समक्ष पहाणी केली. त्यानंतर याबाबत सविस्तर चर्चा होऊन ठरविण्यात आलेल्या बाबींचा तपशिल खालीलप्रमाणे.

(A) यापूर्वी नगर-मनमाड रस्त्यावर उत्तरेस शासकीय विश्रामगृहापर्यंत व दक्षिणेस नवीन भक्तनिवास प्रवेश व्दारापर्यंत रस्त्याचे पुर्व बाजूचे फुटपाथ लगत रस्त्यावर १५ फुट रूंदीचे पत्राशेड मंडप टाकणेचे ठरले होते. परंतु नगर-मनमाड रस्त्यावरील सदरहू नियोजीत दर्शनरांग मंडपामध्ये मोठी गर्दी झाल्यास सुरक्षिततेच्या दृष्टीने व गर्दी हातळण्यास अडचणी येतील. त्याऐवजी रस्त्यावर मंडपा ऐवजी फक्त फुटपाथवर ७ फुट रूंदीचे पत्राशेड मंडप टाकण्यात यावेत. या मंडपामध्ये दर्शनार्थी साईभक्तांची एकेरी दर्शनरांग लावता येईल. कोपरगांवच्या बाजूकडून येणा-या साईभक्तांना नगर-मनमाड रस्त्यावरील गेट क्र.०१ शेजारील प्रवेश व्दारातून दर्शन रांगेत प्रवेश देण्यात यावा. तसेच राहात्याकडून येणा-या साईभक्तांना नवीन पिंपळवाडी रस्ता मार्गे जुन्या पिंपळवाडी रस्त्यावरील दर्शन रांगेत पुर्व बाजूने प्रवेश देण्यात यावा, असे सर्वानुमते ठरविले.

(B) साईभक्तांना दर्शन सुलभतेने व लवकरात लवकर घेता यावे, याकरीता दर्शनरांग ही नंदीपासून श्री चे दर्शन घेवून दक्षिण गेटने बाहेर पडेल व पुढे गुरूस्थान गेटने तसेच गेट क्रं.०४ ने पुन्हा मंदीर परिसरात प्रवेश करुन नगर-मनमाड रोडवरील गेट क्र. ०१ व ०५ मधून साईभक्त बाहेर पडतील अशी व्यवस्था करणेत यावी. त्यासाठी मंदीर परिसरात आवश्यक त्याठिकाणी बॅरीकेडस लावण्यात यावेत. सध्या असलेले मुखदर्शन गेट कुंभमेळा कालावधीत गर्दीचे वेळी बंद ठेवणेत यावे व श्रींचे व्दारकामाई व चावडी येथील दर्शन बाहेरून घेण्याची व्यवस्था करणेत यावी.

(C) शिर्डी शहरातील भक्तांची गर्दी आटोक्यात रहावी याकरीता रिंगरोडसाठी संपादीत केलेल्या जमीनीवरील रस्त्याचे काम त्वरीत सुरू करावे व आवश्यक त्या ठिकाणी पोलीस बंदोबस्त ठेवण्यात यावा. तसेच कुंभमेळा कालावधीत नगर-मनमाड रस्त्यावरील जड वाहतूक पुणतांबा फाटा- श्रीरामपूर-देवळाली प्रवरा या मार्गे तसेच झगडे फाटा-वडगांवपान-कोल्हार मार्गे वळविणेसाठी पोलिस विभागाने नियोजन करावे.

(D) कुंभमेळा कालावधीत संभाव्य गर्दीचे व्यवस्थापन करणेसाठी स्वंयसेवी संस्था, पालखीभक्त मंडळ, साईभक्त यांना पत्रव्यवहार करुन त्यांचे सहकार्य घेण्यात यावे. यासाठी स्वंयसेवक म्हणून काम करणेस इच्छूक असणा-या साईभक्तांकडून अर्ज मागविणेत यावेत व त्यांना प्राथमिक प्रशिक्षण देण्यात यावे.

(E) कुंभमेळा कालावधीतील वाहनतळे, दर्शनरांग, पिण्याचे पाणी, निवासव्यवस्था, वाहतूक, दर्शनरांग इत्यादी व्यवस्थांबाबत नागरीक व साईभक्तांचे जागृतीसाठी माहितीपत्रके, सोशल मिडीया व अन्य प्रसार माध्यमाव्दारे माहितीचा प्रसार करणे.

(F) प्रत्यक्ष स्थळपाहणी नुसार पोलिस अधिक्षक, अहमदनगर यांनी सुचविल्याप्रमाणे सिंहस्थ कुंभमेळा कक्षामार्फत दर्शन रांग व्यवस्थेबाबतचा ॲनिमेशन स्वरुपात नकाशा तयार करावा व त्यामध्ये मंदिर व परीसरातील माहिती केंद्रांच्या जागी प्राथमिक उपचार केंद्र, ॲम्ब्युलन्स व फायर फायटर यासाठी जागा व त्याचा मार्ग निश्चीती, या सर्व बाबींचा समावेश करावा. दर्शन रांगेमध्ये करावयाची विविध बॅरीकेटींग अथवा पिण्याचे पाणी इ.बाबतच्या व्यवस्थेचा आढावा घेण्यात येऊन, आवश्यक तो प्रस्ताव सादर करणेत यावा. तसेच वाहनतळाच्या ठिकाणी पिण्याच्या पाण्यासाठी आर.ओ. पाण्याच्या मोठया बाटल्यांची व्यवस्था करणेत यावी.

उपरोक्तप्रमाणे पोलिस अधिक्षक, अहमदनगर यांचेबरोबर झालेली चर्चा सर्वानुमते मान्य करणेत आली.

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख/ कुंभमेळा कक्षप्रमुख/ संरक्षण विभागप्रमुख/ जनसंपर्क विभागप्रमुख)

---

वरील निर्णय क्र.१६१ ते १९३ सर्वानुमते घेण्यात आले.

यानंतर रात्रौ १०.३० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरित/-xxx | स्वाक्षरित/- xxx | स्वाक्षरित/- xxx |
| (राजेंद्र जाधव) | (अनिल कवडे) | (विनय जोशी) |
| कार्यकारी अधिकारी | जिल्हाधिकारी, अहमदनगर | मुख्य जिल्हा न्यायाधीश |
| सदस्य | सदस्य | अध्यक्ष |

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी**